गुणलुब्धाः स्वयमेव संपदः ।

महाराष्ट्र-कुटुंब-माला

पुष्प १६ वें

# कौटुंबिक गोष्टी

जून १९२९ इ.

किंमत एक रुपाया

# विनंती विशेषः—

माळेच्या या वर्षांत "कौटुंबिक गोष्टी" (लघुकथांचा संग्रह) द्यावयाची इच्छा होतांच आम्हीं ती बद्दल पूर्वी एक दोन वेळां जाहिरही करून ठेविलें. कादंबरीवाचकांना हा प्रकार कितपत रुचतो, पटतो हें पहावयाचें आहे. माळेच्या कादंबऱ्या केवळ कादंबऱ्या नसतात, तर हेतुविशिष्ट असल्यामुळें त्यांत बरेंचसें शिकण्यासारखें—विचार करण्यासारखें असतें, हें आतां विद्वन्मान्य झालें आहे. माळेचा त्या प्रकारचा वाचकवर्ग तयार झाला असून तो झपाट्यानें प्रतिदिवशीं वाढत आहे. या माळेच्या वाचकवर्गात जें कादंबरीच्या एकाच ताटांत वाढावयाचें तेंच यावेळीं लघुकथेच्या लहान लहान वाट्यांतून वाढण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् हा प्रयत्न प्रिय वाचकांना खास आवडेल असा आम्हांस भरंवसा आहे.

लघुकथेच्या वाट्या ज्यांच्या ज्यांच्याकडून आल्या आहेत, त्यांचे मनः-[ पूर्व]क आभार मानणें जरूर आहे. विनंतीस मान देऊन होसेनें लघुकथा [ज्यां]नीं दिल्या, ती मंडळी महाराष्ट्राची अत्यंत आवडती आहेत. त्यांनीं [माळे]वर अत्यंत दांडगे उपकार करून ठेविले आहेत. असेच उपकार श्री. [ ]. ना. देशपांडे, श्रीमति कमलाबाई देशपांडे, श्री. सौ. गिरजाबाई [के]ळकर, श्री. भा. वि. वेरेरकर, श्री. व. शां. देसाई, श्री. केशवकुमार, श्री. दिवाकर कृष्ण, कु. पिरोजबाई आनंदकर, प्रभृतींकडून मिळावेत, अशी माळेची फार फार इच्छा होती. माळेनें त्या सर्वांना विनंतीही केली होती. परंतु कांहीं कारणें उत्पन्न होऊन सदर मंडळींना माळेची इच्छा निदान या वेळीं तरी पूर्ण करतां आली नाहीं. याबद्दल माळेला कांहींसे दिलगिर वाटत आहे. या मंडळींनीं याच वेळीं म्हटल्याप्रमाणें लघुकथा दिल्या असत्या तर प्रस्तुत 'पुष्प' झालें आहे, त्यापेक्षां अत्यंत उदात्त स्वरूपाचें झालें असतें. पण 'माळा' अजूनही निराश झालेली नाहीं. आश्रयदात्यांना प्रस्तुत पुष्प आवडल्याचें निदर्शनाला आलें म्हणजे या वेळीं न मिळालेला वरील लेखकवर्ग वाटेल तें धाडस करून माळा मिळविल्याखेरीज राहणार नाहीं. एवढें आश्वासन आजच माळा आपल्या प्रिय आश्रयदात्यांना देऊन ठेवीत आहे.

प्रस्तुतचें पुष्प कितपत सुगंधित फुललें आहे हें वाचकांनींच ठरवायाचें आहे. वाचकांचा पडताळा पटला म्हणजे केल्या धाष्टर्याचें चीज होईल असें मालेला वाटेल.

या खेपेस निरनिराळे तेरा लेखक असल्यामुळें सर्वांचीं छाया चित्रें मालेला देतां येणें आवांक्याबाहेरचें झालें. इतकें धाडस करतां येण्यास माला आज समर्थ नाहीं. तें सामर्थ्य प्राप्त करून देणें सर्वस्वी आश्रयदात्यांच्या वाढीवर अवलंबून आहे हें सांगणें नकोच !

सदरहू पुष्प योग्य वेळीं न निघतां जवळजवळ दोन महिने लांबणीवर पडलें, त्याला अनेक अपरिहार्य कारणें झालीं. एकवेळ तर वाटलें कीं पुस्तक घडपणीं निघतें कीं नाहीं कोण जाणें ! परंतु सद्‌गुरूकृपेनें अपरिहार्य संकटांचा निरास होऊन उशिरा कां होईना पण "लघुकथा" वाचकांच्या हातीं देण्यास माला समर्थ झाली आहे, याबद्दल मालेस अत्यंत आनंद होत आहे. आतां यापुढें मालेचीं पुष्पें शक्य तितकी वेळच्यावेळीं प्रफुल्लीत होतील असा भरवंसा देण्यास मुळींच हरकत नाहीं. याहीपे[क्षा] सुबक सुन्दर 'पुष्पें' रसिकांच्या हातीं द्यावींत अशी अत्यंत जबर इच्छा [व] महत्त्वाकांक्षा आहे मात्र त्याकरितां रसिकांनीं मालेला आश्रय द्यावा, [असें] याच ठिकाणीं विनंती करणें बरें.

मालेचें पुढील पुस्तक प्रसिद्ध कादंबरीकार "श्री. शिवराम" य[ांचें] असून तें योग्य वेळीं प्रसिद्ध होईल.

मालेचें माहितीपत्रक, या पुष्पासोबत पाठविलें जात आहे, त्याकडे वाचकांनीं अवश्य लक्ष पुरवावें, व 'मालेस' एकेक नवा वर्गणीदार मिळवून देऊन मालेवरील प्रेम वृद्धिंगत करावें, हीच विशेष विनंति कळावें.

महाराष्ट्र–कुटुंब माला,
३९१ नारायण, पुणें नं. २
ता. ५ माहे जून १९२९

संपादकाचा-नम्र
विठ्ठल रामचंद्र खाडिलकर

[library stamp, illegible]

# अनुक्रमणिका


१ " क्षमा " लेखकः—प्रो. चिंतामण विनायक जोशी, एम्. ए.
२ " विश्वनाथ " ,, श्रीमंत सौ. कमलाबाईसाहेब किबे.
३ " विरहिणी " ,, श्रीयुत, " षडानन ".
४ " विजय " ,, श्री. पं. मा. कामतकर, बी. ए.
५ "अर्पणपत्रिका",, श्री. वामन श्रीधर पुरोहित, बी. ए.
६ " चांडाळीण ? " श्री. शिवराम.
७ " इतकं कांहीं रागवायाला नको होतं!" लेखकः—श्रीमंत अनूसूयाबाईसाहेब घोरपडे–इचलकरंजी.
८ " हे शिकलेले पति " श्री. रामकृष्ण गोपाळ भिडे.
९ " आतां अधिकार नाहीं " ,, श्री. जयकृष्ण केशव उपाध्ये.
१० " अनाथ " ,, श्री. वि. स. खांडेकर.
११ " वजिऱ्या " ,, श्री. नारायण विनायक कुलकर्णी.
१२ " कोणाकरतां कोण ? " श्री. सौ० " ताई "
१३ " नानखटाई " ,, श्री. बाळकृष्ण नारायण पांडे.

# १ क्षमा

वृद्ध उपासक अरिमित्र नुकताच विहारांतून परत येऊन आपल्या कुटीच्या दाराशीं धर्मदेशनेचें चिंतन करीत बसला होता. विहारांतील अत्यंत पूज्य धर्मानंद स्थविरानें त्या पौर्णिमेस आपल्या अधिकारी वाणीनें 'मैत्रा' या विषयावर धर्मदेशना केली होती.समाजाच्या मध्यभागीं काषाय वस्त्रें परिधान करून बसलेल्या त्या भव्य आकृतीच्या स्थविराचा भेरीच्या-सारखा दणदणीत आवाज त्याच्या कानांत सारखा घुमत होता.

"गृहस्थांनो, तुम्ही द्वेष, क्रोध, शत्रुत्व या भावना वर्ज्य करून मैत्रेची भावना दृढ करा. एकाद्या विशिष्ट व्यक्तीविषयीं आपला अनुराग आपण 'मैत्री' या शब्दानें व्यक्त करितो पण 'मैत्रा' शब्दाच्या योगें सर्व जगतांतील व जगताबाहेरील सर्व प्राणी, मग ते मनुष्यें असोत, पशू असोत, पक्षी असोत, मत्स्य असोत, सर्वांविषयीं कल्याणाची इच्छा व्यक्त होते.

जे प्राणी निरुपद्रवी आहेत त्यांविषयींच काय परंतु हिंस्र श्वापदांविषयीं सुद्धां हीच सद्भावना हृदयांत धरा. आपल्याला दण्ड करण्यास आलेले राजपुरुष, लुटण्यास आलेले चोर, खाऊन टाकण्यास आलेला सिंह किंवा आपला वध करणारा चाण्डाळ या सर्वांविषयीं हीच भावना ठेवा. द्वेषानें द्वेष वाढतो, वैरानें वैर वाढतें; परंतु प्रेमानें द्वेष विझतो, वैराचा बीमोड होतो. म्हणून आपल्या तीव्र रिपुजनांचा नाश अक्रोधानें करा, अवैरानें करा. नाळागिरि हत्ती भगवन्तास वधण्याकरितां वेगानें सोंड वर करून धांवत आला, त्याचेविषयीं भगवन्तानें मैत्राभावना भावित केल्यानें त्याची मनोवृत्ति पालटली. त्यानें भगवन्ताच्या चरणाशीं येऊन मस्तक लवविलें.

क्षमा हें या मैत्रेचें एक उच्च उदात्त स्वरूप आहे. जो आपल्यावर उपकार करितो त्यावर प्रत्युपकार करणें, जो आपल्यावर प्रेम करितो त्यावर प्रतिप्रेम करणें हा साधा व्यवहार झाला. व्यवहारी वाणी लोक दिलेल्या धनाची फेड धान्य, तेल, गूळ इत्यादि पदार्थांनीं करितात, त्यापेक्षां यांत वेगळें कांहीं झालें नाहीं. परंतु शत्रूंनीं अपकार केले असतां ते विसरून

जाऊन त्यांचें भलें होईल असें चिंतणें, किंबहुना असा प्रयत्न करणें हें बुद्धाच्या प्रत्येक भिक्षूचें आणि उपासकाचें कर्तव्य आहे. असें भगवन्तानें 'ककचूपमसुत्त' यांत म्हटलें आहे.

"भिक्षांनो, जरी तुमच्या दोन बाजूंस दोन शत्रु उभे राहिले आणि त्यांनीं तुमच्या डोक्यावरून करवत चालविण्यास प्रारंभ केला, तरी त्यांच्या-विषयींसुद्धां द्वेष न बाळगतां त्यांचें कल्याण चिंतन करा. फार काय, पण तुमच्या एकुलत्या एका मुलाचा वध करणाऱ्या मनुष्याविषयींदेखील मनांत प्रेम ठेवा. कारण विषारी बाण, तीक्ष्ण खड्गें, जड मुद्गल या सर्व शस्त्रांनीं शत्रूंच्या देहाचा नाश होत असला तरी क्षमेच्या शस्त्राशिवाय त्यांच्या दुष्ट भावनेचा नाश होणार नाहीं. वैरी नाहींसा करणें सोपें आहे, वैर नाहींसें करणें ह्यांतच पुरुषार्थ आहे."

धर्मानंदाच्या या उपदेशाची चिंतनिका करीत अरिमित्र बसला होता, एकीकडे हातानें पानाचा विडा करण्याचें कामही चालू होतें. इतक्यांत समोरील झाडींतून कोणीतरी वाट काढीत येत असल्याची चाहूल लागल्या-वरून त्यानें पान करण्याचें काम बाजूस ठेवून तीरकमठा हातांत घेतला, तोंच गुडघ्याइतकें धोतर नेसलेला, पायांत वहाणा, खांद्यावर गळूं नये म्हणून ज्याचीं टोकें गांठी मारून बांधलेलीं होतीं असें उपरणें पांघरलेलें, डोकीस तांबडें वेष्टन बांधलेला असा एक धिप्पाड बांध्याचा काळसर पुरुष कुटीच्या दाराशीं धापा टाकीत प्राप्त झाला.

"तात ! मला दडवा—मला वांचवा. आरक्षपुरुष मला पकडण्या-करितां माझा पाठलाग करीत आहेत !" तो पुरुष म्हणाला.

"बकुला ! तूं नेहमींप्रमाणें वनांत मृगया करून राजदंडाला पात्र झाला असशील. अशोक महाराजांनीं केलेले नियम न पाळण्याचा तूं निश्चयच केलेला दिसत आहे—"

"तात, तुमच्या पायां पडतों. पुन्हां आजच्या दिवस माझें रक्षण करा. मी यापुढें कोणत्याही प्राण्याचा घात करणार नाहीं." तो पुरुष कुटींत शिरण्याचा प्रयत्न करीत म्हणाला.

"चल, हो आंत," कुटीचें दार उघडून बकुलाला प्रथम आंत जा-ण्यास लावून स्वतः आंत शिरण्यापूर्वी अरिमित्र म्हणाला.

" आतां याला कोठें लपवावें बरें ? " असें आपल्याशीं पुटपुटत आपल्या कुटींतल्या वेगळाल्या जिनसांचा तो विचार करूं लागला. पळून आलेला बकुळही धडधडणाऱ्या छातीनें आपल्या बचावाची तजवीज करण्याच्या चिंतेंत होता. त्यांच्या कानीं कांहीं अस्पष्ट आवाज येऊं लागले. हळुहळू ते आवाज स्पष्ट झाले. 'इकडून गेला असेल.' 'या झाडावर किंवा या जाळींत लपला असेल.' 'नगराकडे पळाला असला पाहिजे, तेथें त्याची बहीण आहे, तिच्या घरीं दडून राहील,' असे वनपाळांचे शब्द त्यांनीं ऐकिले. बकुल झाडावर चढून बसला असला तर त्याला खालीं उतरावयास लावावें म्हणून वनपाळांनीं झाडांवर दगड फेंकलेले धडाधड खालीं आदळत होते.

शेवटीं 'अरे या अरिमित्राच्या झोपडींत बसला असेल' असें वनपाळांचें बोलणें या दोघांच्या कानीं पडतांच हे घाबरून गेले. झोपडींत एक भोंक पडलेला रांजण होता, त्यांत शिरण्याची अरिमित्रानें बकुळास खूण केली. पुष्कळ वेळ विचार करून जी युक्ति त्याला सुचली नाहीं ती आगामी संकटानें तत्काळ त्याच्या डोक्यांत आली. बकुळ त्यांत शिरला. आंत कांहीं विंचूकांटा नव्हता किंवा तो मिरच्याबिरच्यांचा रिकामा रांजण नव्हता हें बरें झालें. नाहीं तर आरडण्याची किंवा ठसक्याची पाळी येऊन तो उघडकीस आला असता. रांजणावर एकदोन माठ घाईघाईनें ठेवून अरिमित्र वनपाळांचें स्वागत करण्यास दाराशीं गेला.

" अरिमित्रा, तुझा जय असो ! " वनपाळ नमस्कार करून म्हणाले.

" वनपाळांनो, तुमचें स्वागत असो, कोणाचा बरें तुम्ही इतका कसून शोध चालविला आहे ? " अरिमित्रानें विचारलें.

" दुसऱ्या कोणाचा ? " वनपाळांचा नाईक सुजात म्हणाला, " तो आपला बकुळ ! वनाचे नियम मोडून पक्षी आणखी पशु यांचा वध करण्यांत तो पटाईत झाला आहे. इकडे अशोकमहाराजांचें अहिंसेचें वेड वाढत आहे, नित्य नवे निर्बंध होत आहेत आणि आम्हां वनपाळांच मात्र काम बिकट होत चाललें आहे. परंतु आम्ही तरी काय करावें ? "

रांजणांत बसलेल्या बकुळास हें सगळें बोलणें खडा न् खडा ऐकूं येत होतें. त्याची छाती धडधडत होती.

" परंतु बकुल केवळ प्राणिवधाचाच अपराध करतो असें नाहीं. राजकीय मर्यादा ओलांडून राजवाड्यांतल्या स्वयंपाकाकरितां राखलेले पशुपक्षी चोरून मारण्यासाठीं त्याला पंचवीस वेळा दंड भोगावा लागलेला आहे. आज तर त्यानें कडी केली ! " एक वनपाळ म्हणाला.

" ती काय ! " अरिमित्रानें स्मितपूर्वक पुसलें.

" मनुष्यवध "—

" काय ! मनुष्यवध ! मग तर हा अक्षम्य अपराध झाला ! अशोकमहाराजांच्या लहरीकरितां त्यांनीं प्राणिवध बंद केला, त्यामुळें कदाचित् प्राणिवधाचा अपराध क्षम्य मानतां येईल. तथापि मनुष्यवधाचा अपराध घोर तर खराच !" अरिमित्राचे हे उद्‌गार ऐकून रांजणांत लपून राहिलेल्या बकुलची खूपच चलबिचल उडाली.

" कोणता मनुष्य बकुलानें मारला ? " अरिमित्रानें विचारिलें.

" कोणता तें अद्याप निश्चित सांगतां येत नाहीं. एक वनपाळ त्याला पकडण्याकरितां त्याच्या जवळ जाऊं लागला तोंच त्यानें बाण मारला. वनपाळ मोठी किंचाळी फोडीत भुईवर पडला, हें पाहून राजश्रींनीं पळ काढला. त्याचा पाठपुरावा करण्याकरितां आम्ही फिरत आहों. इथें तर जवळपास नाहीं ना दिसला ? " या सुजात नाइकाच्या प्रश्नाचें अरिमित्र काय उत्तर देतो इकडे बकुळाची उत्सुकता लागली. अरिमित्रानें मानेनें नकार दिला आणि म्हटलें, " नाहीं बुवा. पण चला मी येतों तुमच्यासह शोध करायला ! "

" जाऊं दे, आर्या ! तूं म्हातारा आमच्या बरोबरीनें चालूं शकणार नाहींस. परंतु येथेंच राहून पाळत ठेव आणखी बकुळाला धरून ठेव. आणखी हें बघ बकुळासारख्या अपराध्यांना पकडून देणाऱ्यांना महामात्यांनीं मोठा उपहार ठेविला आहे, त्याचा वांटा तुला मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. चलारे, आपण त्याचा कसून शोध काढूं... अरिमित्रा, नमस्ते ! " सुजातानें असें बोलून आपल्या हाताखालच्या वनपाळांसह प्रयाण केलें.

वनपाळ बरेच दूर गेलेले पाहून अरिमित्रानें रांजणावर झांकण घातलेलीं मडकीं दूर केलीं व बकुळास बाहेर येण्यास सांगितलें. बकुळानें तसें

केल्यावर अरिमित्र त्यास बोलला, "बकुळा, तुझा अपराध घोर आहे. त्यांतून तो तूं छपवण्याचा यत्न केलास. आपल्या हातून मनुष्यवध झाला आहे हें तूं सांगितलें नाहींस."

बकुळ हात जोडून म्हणतो, "तात, क्षमा करा. मला सर्व वृत्त सांगण्यास वेळ नव्हता, परंतु मी आपल्यापासून छपवीत नाहीं. माझ्या अंगावर–मी एका मोरावर बाण सोडीत होतों, इतक्यांत–एक वनपाळ माझ्या अंगावर आला. त्याच्यापासून स्वतःला सोडविण्याकरितां तोच बाण मीं वनपाळावर सोडला, तो त्याच्या वर्मी लागला. तो किंचाळला तेव्हां मीं आत्मरक्षणाकरितां हें केलें, इतकें सांगतों. मला क्षमा करा..." पुनः समोरील झाडींतून मनुष्यांचा आवाज ऐकूं येऊं लागला.

"तात! मला वांचवा–तीं पहा माणसें येत आहेत. माझ्या अपराधाकरितां तुम्ही मग वाटेल तें शासन करा; पण या राजपुरुषांपासून वांचवा–" बकुळ कांपत म्हणाला.

"बाळ, भिऊं नको. मीं तुला एकदां अजाणतां कां होईना पण अभय दिलें आहे. आतां तुझा अपराध कितीही मोठा असला तरी तुझें पारिपत्य होऊं देणार नाहीं. लप या रांजणांत पुनः" असें म्हणून अरिमित्रानें तो रांजणांत शिरतांच त्याच्यावर मडकीं ठेवून दिलीं.

एवढयांत पांचसात माणसें झोपडीच्या दाराशीं येऊन थडकलीं. त्यांनीं आपल्याबरोबर एक प्रेत आणिलें होतें, तें झोपडीच्या दारीं आणून उतरविलें. अरिमित्रानें "कोण हा?" असें सर्वांस विचारिलें.

कांहीं वेळ कोणीही बोलला नाहीं. नंतर एका वनपाळानें अस्पष्ट स्वरांत "वीरक," या नांवाचा उच्चार केला.

"काय? माझा वीरक! अरे, पाणी–फडकं–आणा. आंत आणा!" असे विसंगत शब्द घांदलीनें अरिमित्रानें उच्चारले, तेव्हां एका वृद्ध वनपाळानें त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याचें सांत्वन करीत म्हटलें, "भाऊ, आतां पाणी किंवा उपचारांचा उपयोग होणार नाहीं. तुझा वीरक हें जग सोडून निर्वाणाला गेला आहे."

"अरेरे, शेवटीं याचा मृत्यु पहाणें माझ्या कर्मांत यावें ना? बुद्धा, तुझी इच्छा!"

" भाऊ, त्या बकुळाला क्षमा न करतां आजन्म कारागृहांत ठेवावें असा आमचा यत्न होता पण तूंच त्याच्या मार्गांत येऊन त्याची दोन-तीनदां सुटका केलीस. ती केली नसतीस तर आजचा प्रसंग आला असता काय ! "

" म्हणजे ? "

" भाऊ, बकुळानें नेहमींप्रमाणें अहिंसेचा नियम मोडून वनांतील मोर मारला. वीरक हा वनपाल असल्यानें अपराध्याला धरणें हें त्याचें कर्तव्यच आहे—तें करण्याला तो जाऊं लागतांच बकुळानें त्याच्यावर बाण सोडला. आम्ही त्याची आरोळी ऐकून जवळ जाऊं लागलों तेव्हां तो दुष्ट पळूं लागला. आमच्यापैकीं सुजात नाईक कांहीं माणसांना घेऊन त्याचा पाठलाग करावयास त्याच्यामागें लागला. आम्ही घायाळाची शुश्रूषा करण्यास तेथेंच राहिलों. परंतु बाण वर्मी लागून इतकें रक्त गेलें कीं तो शुद्धीवर आलाच नाहीं ! " वृद्धानें सांगितलें.

" किती चांगला माणूस होता ! गेला बिचारा ! त्या दुष्ट बकुळाला दृष्टीस तर पडूं द्या, कीं दगडांनीं ठेचून त्याचा प्राण घेतल्याशिवाय रहात नाहीं, " एका तरुणानें शेवटचें वाक्य हावभावासकट म्हटलें.

वरील सर्व संवाद रांजणांत बसून राहिलेल्या बकुळाला स्पष्ट ऐकूं येत होता. आपल्या हातून अरिमित्राचा मुलगा मारला गेला आहे असें त्याला माहीत नसल्यामुळेंच त्यानें त्या वृद्धाचा आश्रय केला होता. परंतु आतां आपण चांगलेच त्याच्या तावडींत सांपडलों. अगदीं त्याच्या घरांत या रांजणरूपी बंदिशाळेंत आपण अडकलों आहों, त्याचा मारलेला मुलगा समोरच भुईवर पडलेला आहे व त्याचे मित्र भोंवतीं गोळा झाले आहेत, तेव्हां याचा परिणाम कोणत्या प्रकारचा होणार हें त्याला स्पष्ट दिसून त्याचें काळीज इतकें जोरानें धडधडूं लागलें व त्याचा इतका थरकांप झाला कीं, त्याची बंदिशाळा डोक्यावरील झांकणासकट हालूं लागली.

" काय वाजत आहे तें ? " एकानें विचारलें व त्याची पावलें रांजणा-कडे वळत असल्याची चाहूल बकुळास लागली. आपली शंभर वर्षे भरलीं असें त्यास वाटलें, परंतु अरिमित्राचे, " उंदीर खडबड करीत असतील, तिकडे जाऊं नको, " असे शब्द कानीं पडून त्याचें भय कमी झालें.

सर्वांनीं आतां मृताच्या संस्काराची तयारी चालविली. पुत्रहीन झालेल्या म्हाताऱ्यास दुसरा म्हातारा सांत्वनाच्या गोष्टी सांगत होता. अरिमित्रानें हृदयांत कोंडलेलें दुःख एकदोनदां आक्रंदन करून मोकळें केलें, व नंतर त्याच्या नेत्रांतून आसवें वाहू लागलीं. ताटी तयार झाल्यावर अग्नि सिद्ध केला, मृतास स्नान घालून ताटीवर बांधलें. "चल बाबा, तूं मला अग्निसंस्कार देण्यापेक्षां मींच तुला द्यावा असें विपरीत ओढवलें आहे," असें म्हणत अरिमित्र उठला आणि अग्निघट घेण्याच्या आधीं "जरा मी घरांत जाऊन येतों, तुम्ही बाहेर असा" असें त्यानें सर्वांस बजावलें.

अरिमित्र झोंपडींत रांजणाजवळ आल्याचें बकुळानें ओळखलें. रांजणावरील मडकीं दूर झालीं, व अरिमित्राचें तोंड त्याच्या दृष्टीस पडलें. पुत्रनिधनाची बातमी कळल्यापासूनच्या अर्ध्या घटकेंत दहा वर्षांच्या इतका फरक त्या वृद्धाच्या तोंडावर दिसला. पश्चात्ताप व भीति यांनीं बकुळ स्तंभित राहिला.

"चल हो बाहेर," अशी अरिमित्राची आज्ञा बकुळाच्या देहानें मानिली. तो बाहेर येऊन कांपत हात जोडून अपराधविषयापुढें उभा राहिला. त्याला वाटलें, आतां हा सर्वांना बोलावून आपल्याला इहलें... अंतरवणार आणि तीच शिक्षा आपणास योग्य आहे.

अरिमित्रानें कांहीं वेळ त्याच्याकडे विस्फारलेल्या नेत्रांनीं पाहून घेतलें आणि मग त्यानें झोपडीचें मागील दार उघडून टाकून त्या दाराकडे आपली थरथर कांपणारी तर्जनी करून म्हटलें, "जा, एकदम चालता हो. नाहीं तर माझ्या मनावर क्रोधाचा पगडा बसेल आणि माझ्या हातून भगवन्ताची आज्ञा भंग पावेल. जा नीघ!"

बकुळानें एकवार त्या वृद्धाकडे कृतज्ञतेनें कटाक्ष टाकला आणि जड मनानें त्या दारानें बाहेरची वाट धरली. धर्मानंद भिक्षूचे शब्द अरिमित्राच्या अंतःकरणांत प्रतिध्वनित होत होते.

"तुमच्या एकुलत्या एका मुलाचा वध करणाऱ्या मनुष्याविषयींसुद्धां द्वेष न बाळगतां त्याचें कल्याण चिंतन करा."

# २ विश्वनाथ

"बाबा, अहो बाबा, तें बघा काय दिसतें आकाशांत. किती मोठा चांदोबा आहे हो।" सुधा आपले कुरळे केस दोन्ही हातांनीं सांवरीत म्हणाली. "हें बघ सुधे, तो किनई आकाशांत, मोठ्या आकाशांत देवानं दिवा लावलाय. असा दिवा माणसांला लावतां येणार नाहींग. हा दिवा गरिबाच्या झोंपडीपासून तों थेट राजाच्या घरांतही शिरून प्रकाश देतो. याला लहान, थोर, जात पात, किंवा अमुकच स्थळ असा निर्बंध नाहीं. तुला आवडतो कां हा दिवा?" "हो, हो, बाबा!" सुधा आपले चिमुकले हात बापाच्या मानेभोंवतीं गुंडाळून उत्तरली. "किती आवडतो हा देवाचा दिवा मला. असं वाटतं तासच्या तास बघत बसावं य ग्याकडे एकसारखं टक लावून; आणि बाबा तुम्ही पण हवेत माझ्या ज्वळ अगदीं. एकटं मला बघायला आवडत नाहींहो!" आज पौर्णिमा . त्यामुळें चंद्र धवल चांदण्याच्या प्रकाशाचा जणुंकाय पृथ्वीवर ...च करीत होता. त्या प्रकाशाचा हेवा करणारेंही कोणीतरी असेल क वाटत होतें. सुधा अवघी पांच वर्षांची बालिका. तिचें तें साखरेहूनही गों ड भाषण ऐकून जन्मदात्या पित्याला आनद वाटला तर नवल काय! सुधेचे वडील या वेळेस तिला गच्चीवर घेऊन बसले होते. त्यांचा एक मात्र आधार व आनंद फक्त सुधा होती. त्यामुळें मुलीच्या जिवाला दुःख होईल असें ते कधींच करीत नसत; आणि तिच्या मनाला दुःख झालें, तर सुख कुठें उरलें? आईबापाच्या या प्रेमा । मोठीं झाल्यावर मुलें जाणतात काय? कर्तव्यतत्पर मुलें पुंडलिकाचा पश्चात्ताप झाल्यानंतरचा, आवतारच समजलीं पाहिजेत. चंद्राकडे आपलें लहानसें बोट करून सुधा म्हणाली—"बाबा हा रात्रभर असा आकाशांत राहील ना?" "हो, बाळ," मग पेंढारकरांचा बाबू निजला असेल पाळण्यांत त्याला दिसेल कां हा, बाबा?" "छे, छे," तो जर निजला असेल तर कसा दिसणार बाळ. समज, तूंच निजली अस-

तीस तर मग तुला तरी कसा दिसला असता ग? हें पहा, बाबू लहान मूल आहे, त्याला अजून पुरतेपणीं बोलतांसुद्धां येत नाहीं, तो कसा जागा राहणार? मग मी मोठी आहें बाबूपेक्षां!" सुधा आनंदानें उद्गारली. "होय बाळ, बाबूपेक्षां तूं वयानें मोठी हं." "पण बाबा, मी तुमच्याएवढी मोठी कधीं होईन हो? आतांच जर मोठी झालें तर मग बाबा?" सुधेच्या या प्रश्नानें तिच्या बाबांना मनापासून हसूं आलें. बालकाच्या भाषणानें कोणाच्या मनाला आनंद होणार नाहीं, आणि त्यांतही तें स्वतःचें अपत्य असावें, मग त्या प्रेमाला मोल नाहीं. आवडीला किंमत नाहीं, आणि कौतुकाला पारावार नाहीं, असेंच प्रत्येक अपत्यवत्सल मातापित्याना वाटत असतें. सुधेचे बाबा तरी त्याला कसे अपवाद ठरणार? त्यांनाही आपल्या लाडक्या सुधेला कुठें ठेवूं आणि कुठें न ठेवूं असें वाटत होतें. चांदण्याच्या सुंदर रात्रीं मुलाचें आधींच मन प्रसन्न असतें. कोणालाही विचारिलें कीं, तुम्हांला अंधेरी रात्र आवडते कीं चांदणी रात्र, तर चटकन् उत्तर येईल, चांदणी रात्र आवडते म्हणून। "पण बाबा, आजोबा कधींहो परत येणार?" "येतील उद्यां. कां, त्यांच्याशिवाय करमत नाहीं वाटतं?" "नाहीं म्हटलं, हा चांद्रोबा आजोबांच्या गांवीं दिसत असेल काहो?" "हो, दिसतो." तर मग चांदोबाला सांगा कीं, आजोबांना मी बोलावतें आहें म्हणून! सांगा बाबा, कद [illegible] सांगा नां?" सुधेची कल्पना झाली कीं, दगडू गडी जसा बाबांच्या आईचा, निरोप सांगितल्याबरोबर बोलावून आणतो, त्याचप्रमाणें चांदोबाही, त्याला जर बाबांनीं निरोप सांगितला, तर आजोबा अधिक लवकर येतील. लहान मुलांच्या कल्पना, जितक्या रम्य तितक्याच कधीं कधीं कळण्यास अगम्य वाटतात. मुलाचे प्रश्न आणि त्यांचें समाधान होईल असें उत्तर अनेकवेळां देतां येत नाहीं. सुधेची वृत्तिही बालच होती. तिचे आजोबा आपल्या नातीचें कौतुक म्हणून सांगत. एक दिवस आजोबा खिडकीजवळ उभे होते. कडेवर लहान सुधा होती. तिला खिडकींतून दिसणारा चांदोबा दिसत होता. आजोबाच्या डोळ्यावर हात ठेवून सुधा म्हणाली.

"आजोबा, त्या चांदोबाला तुम्ही बघू नका. फक्त मी एकटी बघणार!" सुधेच्या या चमत्कारिकपणाचें त्याना कौतुक वाटलें; आणि लहान मुलांची

कल्पना कशी मजेदार असते, म्हणून त्यांना मोठा विस्मय वाटला. सुधेचे वडील चांदण्याची अनुपम शोभा अवलोकन करण्यांत व सुधेला जवळ घेऊन लडिवाळपणानें तिच्याशीं बोलत होते. या वेळेस सुधा त्यांची शिक्षक व ते तिचे अज्ञ विद्यार्थी असा प्रकार चालू होता. एखाददुसरा पक्षी भुर्रकन उडून जात होता. झाडाचीं पानें वाऱ्यानें डुलत होतीं. इतक्यांत उमाबाई वर आल्या. त्यांनीं " जेवायची तयारी झाली आहे, चलायचं ना खालीं " म्हणून विचारलें. " हो हो, चलायचं तर! लवकर जेऊं या म्हणजे सुधेला लवकर निजतां येईल, खरं ना सुधा " सुधा हासली. जणुं काय त्या हास्यांत तिनें आपली संमति प्रगट केली होती. हासण्याबरोबर तिची दंतपंक्ति आकाशांत चमकणाऱ्या नक्षत्रपंक्ति-प्रमाणें शोभली. तो देखावा बघून मातापित्यांचें मन प्रसन्न झालें. माता-पित्यांच्या आशा बालकाच्या रूपानें प्रत्येक घरांत वावरत असतात, असें त्यांना घटकाभर वाटलें. तीं त्रिवर्गही गच्चीवरून खालीं आलीं. सुधा खालीं गेल्याचें बघून चंद्रदेव एका लहानशा ढगांत निराशेनें लपला. त्याच्या विरहानें दुःखी होऊन तारांगणांनीं खेद प्रगट केला. सुधेची माता-पिता स्वतःच्या सुखाबद्दल देवाजवळ कृतज्ञ होती. सुधेच्या वडिलांनीं—त्रिंबकरावांनीं खालीं आल्यावर हातपाय धुतले, संध्या केली, आणि देवाला वंदन करून ते पाटावर येऊन बसले. सुधा त्यांच्याजवळच एक निराळी ताटली घेऊन बसली. त्रिंबकराव भात कालविणार इतक्यांत त्यांना कसली तरी आठवण आली; व त्यांनीं विचारलें " विश्वनाथ आला कां बाहेरून?" त्यावर " मी कांहीं बघितला नाहीं, " असें उमाबाई म्हणाल्या. " हें पहा, त्याची आठवण अधिक ठेवावी बरं का ! तो फार संकोच बाळगतो. म्हणून आपण त्याची जास्त काळजीनें चौकशी केली पाहिजे. " आतांपर्यंत जेवणांत गढलेली सुधा म्हणाली, " बाबा, विसु. दादा आला आहे केव्हांचा! तो किनई बाबा, माडींत लिहीत बसला आहे, हें मला ठाऊक आहे बाबा. " मुलीच्या चौकसपणाबद्दल त्रिंबकरावांना अभिमान वाटला. भात उकरण्यांत गर्क झालेल्या उमाबाईकडे त्यांनीं एकवार दृष्टिक्षेप केला. त्या दृष्टींत जणुं काय कशी मुलगी हुषार आहे, हाच भाव बघणाराला स्पष्ट दिसला

असता. "आतांशी की नाहीं त्याचा संकोच फार वाढला आहे. बहुतेक रोज संध्याकाळीं तो मला भूक नाहीं म्हणून सांगत असतो, त्या भरंवशावर मी आज चौकशी करायला विसरलें हो. मामंजी असते तर ते काय बरें म्हणाले असते?" "विसराळू सूनबाई हें नांव त्यांनीं दिलें असतें." त्रिंबकराव चेष्टेच्या स्वरानें म्हणाले. "इश्श. कांहीं तरी बोलायचं झालं. मी मुद्दाम कांहीं चुकणार नाहीं, हें मामंजींना छान ठाऊक आहे ना! तेव्हां ते मला कांहीं बोलणार नाहींत, पण माझं मला वाईट वाटतं. तो अनाथ पोर आहे. दोन दिवस आपल्या घरीं आहे तर जपावं झालं. नाहीं तर तो लहर लागली कीं जाईल निघून हवा तिकडे. पण मामंजींची भीड पडते म्हणून तो जरा टिकून आहे." उमाबाई कळवळून म्हणाल्या. दोघांचीं जेवणें झालीं. हात धुवून झाल्यावर सुधा तडक माडीवर गेली. तेथें विसूदादा कांहीं तरी वाचतो आहे, असें तिला दिसलें. सुधा त्याच्या-जवळ जाऊन बसली; त्यानें जेवायला चलावें म्हणून तिनें त्याचा हा धरला. विश्वनाथानें पुस्तक खालीं ठेवलें आणि सुधेला जवळ घेऊन म्हणाला "का सुधाताई, झालं का जेवण?" "हो हो! विसुदादा केव्हांच झालं. तुला आई जेवायला खालीं बोलावीत आहे!" "मला भूक नाहीं बाळ,'! त्यानें उत्तर दिलें. 'तुला भूक कां नाहीं रे? आम्हीं सगळीं जेवलों, आणि तुला बोलवायला मीं आलें! चल खालीं.' इतक्यांत सुधा कुठें आहे, हें बघावयास त्रिंबकराव वर आले. विश्वनाथाजवळ सुधेला नीट बसलेली पाहून त्यांना बरें वाटलें. वडिलांना पाहतांच सुधा तडक उठून त्यांच्याकडे गेली; व 'विसुदादा जेवीत नाहीं बाबा,' असें सांगू लागली. 'कायरे विश्वनाथ, जेवीत कां नाहींस,'? आतां विश्वनाथाला संकट पडलें. सुधेला उत्तर देणें सोपें होतें. पण तिच्या वडिलांचें समाधान करणें कठीण वाटलें. 'भूक नव्हती म्हणून जेवलों नाहीं.' 'पण रोजच्या-सारखें दुपारीं जेवलास, मग रे कां लागली नाहीं. खालीं जा, आणि थोडा-साच खा, जा;' विश्वनाथ मुकाट्यानें उठला. वाचीत असलेलें पुस्तक त्यानें उचलून नीट ठेवलें, आणि तो स्वयंपाकघरांत उमाबाई होत्या तेथें आला. अभागी विश्वनाथाला जगांत मायेनें खा, पी, म्हणणारें कोणीच नव्हतें तेव्हां त्रिंबकरावांच्या घरची प्रेमळ रीतभात बघून त्याला उपकाराचे डोंग-

वाटत होते. तो स्वयंपाकघरांत आला, पण मला वाढा म्हणण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं. उमाबाईचें लक्ष चुलीजवळचीं भांडीं आवरण्यांत होतें. त्यांची दृष्टि विश्वनाथाकडे गेली, व त्यांनीं वाढतें हं, असें गोड शब्दांत म्हटलें. विनयशील विश्वनाथाचा जीव खालीं पडला. संकोचाचें मोठें संकट एकदांचें दूर झालें. आपल्याकरितां कोण हा माउलीला त्रास. तोंच ताटांत भात वाढिला. विश्वनाथानें जेवावयास सुरवात केली. दयेनें दिलेलें अन्न घशाखालीं उतरत असेल काय? किंवा त्याच्या मनाला यातना होत असतील? काय होत असेल तें विश्वनाथासारख्या दुर्दैवी प्राण्यालाच ठाऊक. संकोच, खेद, परिस्थिती, याचें चित्र जेवतांना विश्वनाथाला दिसत होतें. चटकन जेवून तो हात धुऊन स्वयंपाकघरांतच बाजूला उभा राहिला. 'उमाकाकू तुम्ही जेवा मी तोंपर्यंत येथेंच थांबतों.' उमाबाई बरं म्हणाल्या. आणि त्यांनीं आपलें ताट वाढून घेऊन त्या जेवावयास बसल्या. मधून मधून एखादा प्रश्न त्य त्याला करीत. पण गोष्टीपेक्षां काम केव्हांचें उरकेल याचा विचार त्या करीत होत्या. आणि विश्वनाथ शून्य मनानें तेथें उभा होता. त्याला आपल्या मातेची आठवण झाली नसेल ना!

जेवण उरकलें; आणि चुलीजवळचें सामान आंवरून भांडीं मोलकरणीला देण्याकरितां दूर गोळा करून ठेविलीं. काम ऐवढेंसेंच पण त्यांत किती वेळ मोडतो, हें काम करावयास लागणारालाच विचारलें पाहिजे.

आतां आपण विश्वनाथाच्या हकीगतीकडे वळूं या. त्रिंबकराव बोरगांवकराचे वडील खाऊन पिऊन सुखी मनुष्य. फार श्रीमंत नव्हे, परंतु अति गरीबीही नाहीं, असें तें मध्यम प्रतीचें घर होतें. परंतु घराचा नांवलौकिक वागणारांच्या धोरणावर कमी किंवा जास्त दिसतो. परंतु आला गेला, अतिथि, बैरागी, संन्यासी वगैरे लोकांना आपल्या घरीं भक्तिभावानें आणून ठेवावयाचें व त्यांची मनोभावानें सेवा करावयाची, असा सुधेच्या आजोबांचा नियम असे. आणि जातांना मग शक्तीप्रमाणें उपरणें, धोतरजोडा किंवा दक्षणा देण्याची वहिवाट होती. हे सगळे कशाकरितां तर भूतमात्राची सेवा घडावी आणि कांहीं हातून धर्म व्हावा हीच मनापासून त्याची इच्छा होती. त्यांत हांव, कीर्ति किंवा दंभ याचा लेश नव्हता. त्या वागणुकीला त्या पेठेंतले अनेक लोक नांव ठेवित असत. पण सुधेच्या

आजोबांनीं तिकडे कधीं लक्षच दिलें नाहीं. सरळ मनाला सरळ दिसेल तें करावयाचें, त्यांत कोणी स्तुति करोत किंवा निंदा करोत; त्याकडे लक्ष म्हणून द्यावयाचें नाहीं; कुटुंबांत माणसें काय तीं फक्त चारच. एवढ्या माणसांना कुटुंब तरी कसें म्हणावें ? असाही प्रश्न वाटे. आणि या अतिथिपाहुणचारांत फक्त कळकळ आणि प्रेम आढळून येई. बोरगांकराचें घर जुनें व संभावीत म्हणून त्या गांवांत प्रसिद्ध होतें. सहज थट्टेनें कोणी म्हणत कीं, बोरगांव-कराच्या घरीं जा, म्हणजे तुमची सोय होईल चटकन. बरं पाहुणे फार आले म्हणून कधीं उमाबाईना कंटाळा येईल, हरीचें नांव. उलट मामंजीच्यामुळें हें घडतें असें ती माऊली नेहमीं म्हणत असे. आणि अधिक काम पडतें म्हटल्याची कधीं कुरकुर नसावयाची. सदा आनंदी, व भोळी वृत्ति. थोड्यांत समाधान आणि असलेल्या स्थितींत सुखाची परमावधि समजण्याची साधी संवय. त्यामुळें एखाद्या श्रीमंताला लाजवणारा परोपकार आणि भूतदया या कुटुंबाच्या हातून घडत होती. पण हृदयांत अहंमन्यतेचा ताठा नव्हता. वर्तनांत कधीं विशेष आपण कांही करतों, असें दिसत नव्हतें. आणि वाचेनें तर अमुक केलें अशी ताठरवृत्तिही नव्हती. पण घराण्याच्या पद्धतीप्रमाणें गाजावाजा न करितां हीं माणसें परोपकाराचें कार्य करीत होतीं. अशा प्रकारचीं हीं दयाळू अंतःकरणाचीं व बाळबोध वळणाचीं माणसें होतीं. बरें गोसावी बैरागी जमले म्हणून आपलें केलें कसें तरी, असें त्यांना होत नसे तर इच्छा भोजनाप्रमाणें त्यांना विचारून स्वयंपाक करावयाचा. त्यामुळें उमाबाईना दग-दगही पडे. पण त्यांच्या तोंडून कंटाळलें मीं यांना, अशी वाणी कधीं निघावयाची नाहीं. उलट मामंजी करतात खर्च; आपण आपली मेहनत करावी, म्हणजे तेवढीच सेवा घडेल. अशा उत्साही अंतःकरणानें त्या वागतांना दिसत. अशाच प्रकारानें विश्वनाथाचें आगमन यांच्या घरीं झालें होतें. विश्वनाथ कोठला राहणारा व त्याच्या घरचीं माणसें कोण आहेत, तो गांवीं कसा आला इत्यादि माहिती अज्ञातच होती. आणि तोही आपली माहिती फारसा कोणाला सांगत नसे. एका गुरुवारची गोष्ट आहे. नेहमींच्या नियमाप्रमाणें सुषेला बरोबर घेऊन उमाबाईचे मामंजी दत्ताच्या मंदिरांत दर्शनाला गेले असतांना, तेथें एका बाजूच्या कोपऱ्यांत विश्वनाथ

बसलेला त्यांना आढळला. त्यांच्या दयाळू स्वभावाप्रमाणें त्यांनीं देवदर्शन घेऊन मग त्याची विचारपूस केली. परंतु मी फार दूरच्या गांवांहून आलों आहें. यापलीकडे अधिक माहिती तो सांगेना. या गावांत कोणी ओळखिचें आहे कां तुझ्या! म्हणून त्यांनीं विचारलें. तर उत्तर—फक्त दत्ताच्या पायाजवळ आलों आहें, तोच आश्रय देणार समर्थ आहे. सगळें खरें, दुपारच्या वेळीं हा येवढासा मुलगा अनोळखी शहरांत करणार काय! अन्नपाण्यावांचून हा तळमळेल ना! सुधेच्या आजोबांना—त्यांच्या दयेच्या अंतःकरणाला ही कल्पना सहन होईना.

कोणातरी आईबापाचा हा हरवलेला मुलगा मायेच्या माणसाशिवाय एकटा कसे दिवस काढणार? त्यांनीं ममतेनें विश्वनाथाला 'आमच्या घरीं चल' म्हणून आग्रह केला. तेव्हां निरुपाय जाणून त्यानें मोठ्या कष्टानें रुकार दिला. आशेच्या गोड कल्पना गरीबांना असतात काय! नसतील असें म्हणणाऱ्यांना कोणत्या कोटींत घालावें बरें! सुधेचे आजोबा विश्वनाथाला बरोबर घेऊन घरीं आले. त्याला एक खोली दिली व 'येथें तूं खुशाल रहा' असे ते मोठ्या प्रेमानें व आदरानें त्याला म्हणाले. अफाट जगांत एकट्या विश्वनाथाला एकटपणाच्या हक्कानें समाजांत वागणें आणि जगणें भागच होतें. कोणी त्याच्यावर ममता करा किंवा तिरस्कारानें बघा, त्याला दोनही गोष्टी सारख्याच होत्या. प्रेमाचें जवळचें असें माणूस जगाच्या पाठीवर हक्कानें सांगावयास त्याला कोणीच नव्हतें. कुळामध्यें तरी हा आमचा असें सत्तेनें म्हणणाऱ्या व्यक्ति सुदैवानें कमीच सांपडतात. कित्येकांना जेथें माणसाची कमतरता तेथें अगत्याचा (सुकाळ सुळसुळाट) असावयाचा. व जेथें माणसें भरपूर—कुटुंबांत त्यांतल्या लोकांना चार दिशा कमीच वाटून ते सोळा कां नाहींत म्हणून दुर्मुखलेले असावयाचे! असल्या विपरीत वृत्तीला काय म्हणावें, हेंच कळत नाहीं. विरोधी सृष्टि ती हीच का! असें मनात वाटू लागतें. अर्थ एवढाच कीं, दांत आहेत तर चणे नाहींद आणि चणे मिळाले तर दांत पडून गेलेले. उपयोगाच्या दृष्टीनें सर्वच निरुपयोगी झालं विश्वनाथाच्या घराची माहिती कोणालाच कधीं मिळाली नाहीं. विश्वनाथाच्या जन्माबरोबरच त्याच्या आप्तांनीं त्याला सोडून दिलें काय! किंवा मायेचें माणूस कसें असतें

याचा त्याला अनुभवच नव्हता ! तेव्हां अशा परिस्थीतींत तो दुर्मुखलेला, उदास, आणि जगाविषयीं बेफिकीर राहिला तर तें साहाजीकच म्हणावयाचें. एकचवेळां जेवावयाचें. रात्रीं जागून खूप अभ्यास करावयाचा आणि शक्यतोंवर दुसऱ्याला त्रास होईल अशी कोणतीही गोष्ट करावयाची नाहीं. हा त्याच्या मनाचा पक्का निर्धार होता. आणि त्याप्रमाणें तो वर्तनही करीत असे. जन्मभर दुसऱ्याच्या दयेवर अवलंबुन जेवढें सुख मिळेल तेवढेंच काम त्याच्या नशिबी लिहिलेलें होतें ! भवितव्यतेच्या पोटांत काय होतें कोणास ठाऊक ! दुसऱ्याच्या घरचीं पंचपक्वानें आणि स्वतःच्या घरांतील सत्तेची कोरडी भाकरी. याची योग्यता जास्त असते. कपडे बिछाना वगैरे सामान त्याच्याजवळ कुठलें ! मग अन्नाचा कण नाहीं तेथें वस्त्राचा तुटवटा सहजच असावयाचा आणि त्याबरोबर मायेचा शब्द आणि केलेला आदर याचें तर विळाभोपळ्या एवढेंच सख्य समजावयाचें. विश्वनाथ संस्कृत शिकण्याकरितां म्हणून अवंतिकेला आला होता. अवंतिकेचें प्राचीन वैभव आणि विद्येची महती आज प्रत्यक्ष दिसत नसली तरी आजही हें शहर पवित्र आणि उद्यमी म्हणून प्रसिद्धच आहे. त्याच हेतूने तो महांकाळेश्वराच्या बाजूच्या पडवींत एका बाजूला रहावें आणि विद्याध्ययन करावें, अशी त्याची इच्छा. त्याच हेतूनें तो येथें आला होता. बोरगांवकराची मंडळीही त्याच ठिकाणीं रहात असत. अप्पासाहेबसुधेचे आजोबा आपले पेनशनीचें शेवटचें आयुष्य येथेंच घालवीत होते. संसार आणि परमार्थ या दोनही गोष्टींचा उपभोग ते एकाच वेळीं घ्यावयास सापडांवा म्हणून ही जागा त्यानी पसंत केली होती. साधुसमागम इतरत्र घडणें दुर्लभ म्हणून ते तेथेंच राहिले होते. त्रिंबकरावानाही सुभ्याच्या आफिसांत हेडक्लार्कची जागा मिळाली होती. परंतु पितृभक्त पुत्राला पित्याच्या मानसिक इच्छेंतच स्वतःच्या इच्छा सांगितलेल्या असल्या कारणानें आप्पासाहेबांना ज्यांत आनंद वाटेल तेच त्यांच्या मनालाही गोड वाटत असे. ऑफिसांत जातांना रोज वडिलांना नमस्कार केल्याशिवाय ते घराच्या बाहेरच पडत नसत. आजकालच्या मुलानां हें चमत्कारिक वाटणार आहे. परंतु खरी हकीगत लपवून ठेविण्यांत अर्थ कसला ? त्याचप्रमाणें पहिल्या तारखेला पगार आला की वडिलांच्या जवळ

द्यावयाचा. स्वतःला फक्त पांच रुपये खर्चाला ठेवावयाचे. काय हा करारी पणा. साधुसमागम प्रिय घरांत विश्वनाथ आला होता. सरळ भाषण शांत वागणूक आणि भेदाला दूर सारलेली अशी त्या लोकांची वृत्ती बघून कोणालाही आदर्श गृह वाटणें साहजिक आहे. तसेंच विश्वनाथालाही कां वाटूं नये! परंतु विश्वनाथाचा त्या घरावर काय अधिकार! आपले पणानें फक्त त्यानें लोभानें वाटेल त्याला आपले म्हणण्याकरितांच त्यास हक्क! इतर हक्क सर्व देवानें हिरावून घेतलें होते. त्याला तो काय करणार! एखादे प्रसंगी नव्हे अनेकवार त्याला आपल्या हीन स्थितीबद्दल वारंवार स्मरण होऊन दुःख होत असे. पण त्याचें दुःख ऐकणारा कोण! त्याच्या दुःखानें दुःखी होणारा प्राणी जगांत जन्माला आला नव्हता. त्याबद्दल खिन्न होण्यांत तरी अर्थ कसला! एकंदरींत सृष्टीच्या अफाट समाजांत वागणें आणि निःसहाय असणें यासारखी गोष्ट जगाच्या पाठीवर नसेल. धर्मभावना आणि दयाबुद्धि याच्या योगानें त्याला आप्पासाहेबांनीं जवळ केला.. तरी हृदयाला नित्य टोंचणारी अनाथ जाणीव विश्वनाथाच्या मनाला तापदायक वाटल्याशिवाय राहात नसे. जेथें आपलेपणाची सत्ता नाहीं, तेथें कुबेराचें वैभव नांदत असलें तरी कामाचें काय! जगांत या अनेक वस्तूंचें अस्तित्व आहे म्हणून त्या वस्तू विचारी मनुष्य सर्व आमच्याच आहेत असें कोणी म्हणू शकेल काय! कधींच म्हणणार नाहीं. त्याच न्यायानें बोरगांवकरांच्या घरीं आल्यापासून विश्वनाथ सुखांत राहतो असे जर कोणी सांगू कोणी सांगू लागले तर तें विश्वनाथाच्या परिस्थितीला व्यक्तीला समाधान पूर्ण आहे असें वाटेल काय! अशक्य गोष्ट शक्य आहे म्हणण्याइतकेंच हास्यास्पद आहे. कुठेंच आश्रय नाहीं तो येथें आल्यावर मिळाला, हें खरें आहे. पण तो आश्रय, हें कसें विसरलें जाणार! हजार विंचू डसल्याच्या वेदना सुद्धां एकवार कमी वाटतील पण दया बुद्धीनें दिलेला आश्रय पदोपदीं एकप्रकारच्या वेदनेनें अंतःकरणाला पीडा देत असतो. पण स्वतःला अंतःकरण आहे, एवढी मनाची खाली खात्री पाहिजे. विश्वनाथाला अंतःकरण होतें, पण या भावना गरीबीच्या ओझ्यानें दबल्या गेल्या होत्या. स्वाभिमान जागृत होता, पण त्यांतलें तेज मानवी कठोरतेमुळें लुप्त

होण्याची भीति होती. आणि प्रेमळपणा तर त्याच्या अंगीं उपजतच होता. तरी त्याच्यावर ओढवलेल्या दारुण आपत्तीमुळें माणसांत प्रेमभाव वाढतो, असें म्हणण्यास तो तयार नव्हता. धर्माच्या नांवावर माजलेलीं बंडें व त्याचा होणारा ऱ्हास तो आपल्या डोळ्यांनीं रोज बघत होता. मग त्याला धर्म-बुद्धि आहे असें सांगणार कोणाला आणि कधीं! त्याला निक्षून फक्त एकच सांगतां आलें असतें कीं, सगळ्यांमध्यें गरीब माणसांला राहण्याला सुरक्षित व सौजन्यपूर्ण एकही स्थळ नाहीं. एकही आश्रयस्थान नाहीं, आणि दुःखाची गोष्ट तर त्याहून हीच आहे कीं, गरिबाचें दर्शन घ्यावयालाच माणसाचे डोळे अगोदर भितात, मग आदर, प्रेम, सौजन्य, दया, यातर फार दूरच्या गोष्टी आहेत. जवळच्या गोष्टी सोडून मनुष्यांनीं इतक्या दूर तरी कां जावें! जाणारांचा अपराध दुसरें काय! विश्वनाथाला आश्रय मिळाला. पण पुढें काय! हा विचार त्याच्या डोक्यास त्रास देत असला पाहिजे. तें तरी सांगणार कुणास व ऐकतो कोण बरें! शेवटीं कांहीं महिने तरी येथें रहावयाचेंच हा निश्चय त्यानें मनाशीं केला. गरीब माणसाचा निश्चय तो, त्याला महत्व काय! प्रशंसा कुठली! आणि अगत्य, अगत्य हा शब्द सुद्धां ऐकूं येणें कठीण. विश्वनाथ तेथें राहिला, पण त्याचें अंतःकरण सुखी होतें काय! मनास प्रसन्नता वाटली असेल कां! अनाथ जीव, पोरका मुलगा, निर्जिव हिंदी समाजांतील एक व्यक्ति; पण समाजाला पर्वा कोठें आहे! मानवी धर्म, धर्मसिंधूंत राखलेला आहे. आणि प्रत्यक्ष कर्म-पण पारतंत्र्यांत गढलेल्या देशांतील व्यक्तींना कर्मच कसलें! सगळेंच अकर्म, सगळा धर्म, सबंध शास्त्र, आणि सर्व बुद्धीचें आमचें दिवाळें कां निघालें आहे! किंवा याची खरेदी ही परकीय, परंतु स्वतंत्र देशांनीं केली आहे! झालें आहे काय! किंवा सर्वच होऊन गेलें आहे! विश्वनाथासारखे दुर्दैवी तरुण समाजाच्या वातावरणांत नकळतच गडप होऊन किती तरी जात आहेत त्यांची गणती नाहीं. जेथें फिकीरच नाहीं, तेथें विवेक तरी कोठून सांपडणार! अशा परिस्थितींत आत्मगौरव तरी कसला आणि कां! विश्वनाथ तेथें निश्चयानें राहिला, परंतु एकच आठवण्यानें त्यानें "आज मला भूक नाहीं, उद्यां काय बरें वाटत नाहीं, परवां

आणखी तिसरेंच निमित्त सांग" असें करून, तो जवळ जवळ एकच वेळ जेवी. कधीं कधीं त्याला जेवण्याचें निमंत्रण येत असे. त्या दिवशीं मिळणारी अल्पदक्षणा तो कधीं कधीं चुरमुरे खाऊन राहण्यांत खर्च करीत असे. अशा प्रसंगीं तो घरांतल्या लहान सुधेला मुद्दाम बोलावून आणून तिच्या हातावर खाऊ म्हणून ठेवीत असे. प्रेमळ मनाच्या सुधेला तो खाऊ फार आवडे. घरांत ती आजोबांना नेऊन दाखवी आणि विसूभाऊनें दिला म्हणून आनंदानें सांगे. आज अमावास्या, क्षेत्राच्या ठिकाणीं तर भिक्षुक वर्गाची कोण धांदल! क्षिप्रेचें पवित्र स्नान आणि महांकाळचें पुण्यदर्शन गमवणारा मनुष्य विरळाच. विश्वनाथही घाईघाईनें स्नान करण्याच्या इराद्यानें घाटावर आला होता. किती तरी भाविक स्त्री–पुरुष प्रातःस्नान आटपून घरीं परत जाण्याच्या विचारांत होते. सकाळची रम्य वेळ समोर क्षिप्रा नदीचा पवित्र प्रवाह आणि आसपास साधूसंतांचा मधून मधून ऐकूं येणारा 'महांकाळ' की जय. हा नादघोष ऐकून नास्तिकालाही आस्तिक होणें बरें वाटलें असतें मग आमच्या विश्वनाथाची काय कथा! मूळचाच तो भाविक. त्यांतूनही दुःखानें गांजलेला. दारिद्र्यानें पिडलेला व नात्यागोत्याच्या माणसाचा अभाव असल्यामुळें साहजिक तो खिन्न. त्याला हा मनोहर देखावा बघून तेवढ्या वेळाकरितां तरी तो आपलें स्वतःचें दुःख विसरून गेला, तर नवल कसलें बरें? तो तरी मनुष्यच ना! एकसारखी निराशा व रात्रंदिवस विवंचना ह्या तरी कुठपर्यंत त्यानें सहन करावीं? त्याला तरी आळा पाहिजेच ना? दुःखाच्या अतिरेकांत परमावधीची चिन्ता ही सुद्धां एक घटकाभर मनाला आळा पडावयास कारणीभूत होते खास. विश्वनाथानेंही उल्हासानें स्नान केलें धोतर पिळून टाकलें; आणि जवळ असलेलें गंध लावून तो तडक महांकालेश्वराच्या दर्शनाला चालला. दुःखी जीवाला देवाच्या नांवानें आणि त्याच्या दर्शनानें आराम वाटतो. कारण सुखाचे आणि आशेचे दुसरे सगळे मार्ग त्याला बंद असतात. जणुं काय सगळ्याशीं असह–कारिता ठरलेलीच. अशा परिस्थितींत करणार काय? एकच मार्ग. फक्त शान्त मनानें ईश्वराला आळवणें. त्याच्याशिवाय गति नाहीं. त्याच्याशिवाय सहायक नाहीं हेंच तत्त्व नजरेसमोर ठेवून अनाथ माणसानें समाजांत वागलें पाहिजे.

तरच त्याला धैर्य येणार. एरवीं शब्दांची व्यर्थ बडबड ऐकून त्याला शब्द-सृष्टीचा एखादे प्रसंगीं तरी कंटाळाच यावयाचा! शब्दांच्या सुखावर विश्वासणाऱ्या जीवाला प्रत्येक सुखाची बाजू कधींतरी लाभते काय? मग त्यानें शब्दांवर विश्वास तरी कसा ठेवावा! आणि त्याचें अर्थाकडे लक्ष तरी कसें जावें. सगळेंच असत्य, सगळेंच अर्थशून्य आणि सगळेंच कृत्रीम. यानें जीवाचें समाधान होणार कोठून? अनंत जीवांनीं दुर्लक्ष केलेला अनाथ जीव! त्यानें विचाराच्या प्रवाहांत असेच गोते खात राहावें काय? दुसरा मार्ग कुठला सुचवणार? अशा समाजाला प्राचीन समाज हें नांव कोणी दिलें असेल? सगळ्या थोर भावना विसरलेला समाज. दुर्बल मनाच्या लोकांच्या समाजाला किंमत काय? शिस्तीचा अभाव. उदारतेचें नांव नाहीं. घटनेचा अर्थ कळेना. अशा समाजाकडे पाहणाऱ्या व्यक्तींनीं पहावें तरी काय? आणि आशा तरी करण्याला साधन काय? विचाराच्या खळबळीनें विश्वनाथ क्षिप्रेच्या वाहत्या प्रवाहाकडे शांतपणानें पहात होता. वेगानें वाहणारा तो नदीचा प्रवाह कुठें बरें जात असेल? सतत प्रवासानें ही नदी थकत नसेल काय? एकना दोन अनंत विचार त्याच्या मनांत घोळत होते. त्याच्या मनःस्थितीचा भंग करणारें त्या वेळीं तरी तेथें कोणी नव्हतें. आपणही ह्या प्रवाहाप्रमाणेंच या अफाट जगांत भटकत आहोंत. आपल्यालाही कोणाचाच आधार नाहीं. मायेनें जवळ ये म्हणणारें एकही माणूस नाहीं. स्वतः जीवनप्रवाहांत सुखापेक्षां दुःखच अधिक भासतें. असाच कां मी जन्मभर राहीन! छे एकटेपणाची एवढी कां मला भीति वाटावी. त्याबद्दल विषाद कां व्हावा? जगांत मनुष्य एकटाच येतो. परंतु बरोबर स्मरणांत काय राहातें. फक्त त्यानें केलेलें सत्कृत्य. मग मला कां वाईट वाटावें? मी एकटा कसा! या समाजांत अनेक व्यक्ति आहेत. त्यांचें माझें कांहीं नातें नाहीं काय? एकाच स्थळीं राहाणें. एकाच समाजांत वावरणें आणि त्यांच्याच शेजारीं जीवन व्यतीत करावयाचें, तर त्यांचें माझें नातें नाहीं असें कां जाणावें? जाणणाराचा अपराध. दुसरें काय. विश्वनाथाला आश्रय मिळाला. पण पुढें, पुढें काय? हा विचार त्याच्या डोक्याला त्रासच देत असला पाहिजे. तरी सांगणार कोणाला व ऐकतो कोण बरें. शेवटीं कांहीं महिने तरी येथें राहावयाचेंच, हा निश्चय त्यानें

मनाशी केला. येथें विचारांची सांखळी बंद झाली. कारण घरीं गेलें पाहिजे. आप्पासाहेबांना उशीर होईल. ते आपली वाट पहातील. पण घरीं हें शब्द मनांत येतांच, तो पुनः खिन्न झाला. कुणाचें घर! त्या घरावर माझी काय सत्ता बरें! उदारपणानें तें रहा म्हणतात, तो पर्यंत तें माझें घर आहे. पण उद्यां जर त्यांनीं मला दुसरीकडे जा म्हटलें तर मग माझा काय इलाज आहे. मग तें माझें घर कसें म्हणूं बरें! त्यानें विवेकानें विचाराला स्थिर केलें व तो घरीं येण्याला निघाला. वात्सलवान पिताही जितक्या काळजीनें स्वतःच्या मुलाची वाट पाहणार नाहीं, त्यापेक्षांही अधिक उत्सुकतेनें आप्पासाहेब दारांत उभे होते. अद्याप विश्वनाथ कां आला नाहीं! म्हणून जुन्यापुराण्या लोकाना नांवें ठेविणाऱ्या आधुनिक सुशिक्षितांना यापासून पुष्कळच शिकता येईल. जुन्या संस्कृतीमध्यें काय जास्त आहे म्हणणाऱ्यानीं इकडे अवश्य लक्ष द्यावें, हें योग्य आहे. दारांतून विश्वनाथाला येतांना बघून त्यांना आनंद वाटला. घरांत आल्यावर तें म्हणाले 'कारे वेळ लागला, इतका वेळ तूं घाटावर' पोहत होतास कीं काय! सर्दीचे दिवस. ह्या दिवसांत कशाला फार पोहावें बरें! आपल्याबद्दल त्यांची ही इतकी काळजी करण्याची पद्धती बघून विश्वनाथ तर आश्चर्यचकित झाला. सगळेच दाते जर इतके दयाळू असतील तर दानाचें महत्व खात्रीनें त्रिकालाबाधीत राहील. येण्याला उशीर झाला. या संकोचामुळें विश्वनाथ फक्त, 'जरा झाला उशीर खरा;' एवढें वाक्य बोलून चटकन माडीवर गेला. धोतर नीट वाळत घातलें व मुकटा नेसून तो खालीं जेवणाकरितां आला. स्वयंपाक घरांतच ताटांत चटण्या भाज्या वाढून तयारी केलेली होती. अतिथी पूजन व सत्कार हें घर जाणत होतें. साधें जेवण व जेवणारी मंडळी ही साधीच, पण खऱ्या सद्गृहस्थांच्या कुलांतली! विनाकारण जुन्या पद्धतीच्या नावानें ओरड करणाऱ्या गृहस्थांनीं हा गृहस्थाश्रम पाहावा. येथें शिकण्यासारखें बरेंच दिसेल. कदाचित् कृत्रिमतेचा सुळसुळाट येथें सांपडणार नाहीं. सरळ मनाच्या व साध्या वृत्तीच्या गृहिणींना याचें श्रेय नसेल काय! फुकट अतिथीचा सन्मान कोण करणार! आणि त्याला तो पात्र असतो हें तरी किती जणांच्या लक्षांत येत असेल! हिन्दु समा-

जांतील अतिथी सत्कार ही पद्धती आमच्या मुलींनीं फक्त पुस्तकांतून वाचावी एवढेंच. गृहशाळेंतील उत्तमांतील उत्तम पद्धती समुळ नाश करण्याचें कोणी केलें! दुसऱ्याचें अनुकरण करण्यापूर्वी स्वत: तरी तें कितपत उपयुक्त आहे यांचा विचार करा आणि विचार करूनही जर तें तुम्हांला पटलें नाहीं, तर खुशाल दुसऱ्याच्या अनुकरणाला प्रारंभ करा झालें. आपली रीतभात, आपलें देव धर्म, आणि आपली जुनी चाल वाईटच म्हणून तरी कां समज करून घ्यावी बरं!

त्यांचा अनुभव घ्या, नफा तोटा किती यांचा विचार करा आणि मग, अनुकरणाला अयोग्य ही चाल! असें वाटलें तर द्या टाकून ती पद्धति, पण अविचारानें प्रारंभ केलेली कोणतीही गोष्ट परिणामीं घातुकच ठरत असतें, हें तत्त्व विसरून चालणार नाहीं. सगळयांचीं जेवणें झालीं. गृहाची गृहलक्ष्मी उमाबाई जेवावयास बसल्या, त्या एकट्याच जेवतात हें पाहून विश्वनाथ हळूच त्यांच्यासमोर येऊन उभा राहिला. त्याचा तो नम्र पण विनयशील व्यवहार पाहून उमाबाईंच्या मनाला समाधान वाटलें. 'तुम्हांला मी कांहीं वाढू काय?' विश्वनाथानें नम्रपणानें विचारलें. कांहीं नको बरें! मी सगळें एकदमच वाढून घेतलें आहे, कांहीं लागलें तर मागेन मी! विश्वनाथ समोर स्तब्ध उभा होता. त्याच्या अंत:करणांत विचाराची खळबळ तर उडाली नसेल! तर्कांनी काय समजणार! जेवण संपत आलें तसें उमाबाई म्हाणाल्या, "आतां जा वरती हं' झालें माझें जेवण!! कर जा आपला अभ्यास आतां' मातेच्या आज्ञाधारक पुत्रांप्रमाणेंच विश्वनाथानें तेथून गंभीरपणानें प्रयाण केलें. तो माडीवर गेल्यावर कुणाचा बरें हा मुलगा असेल; किती शांत सरळ व नम्र स्वभावाचा हा. धन्य त्याची आई म्हटली पाहिजे. विचारांत वेळ घालविण्यापेक्षां, त्यांनीं चटकन् हात धुऊन स्वयंपाकघरांतील वस्तू आवरण्यास सुरवात केली. विश्वनाथ आपल्या खोलींत आला. थोडा वेळ विश्रांती घेऊन त्यानें बाहेर पडण्याचा निश्चय केला. इतक्यांत त्यांच्या खोलीसमोर सुधा येऊन उभी राहिली. 'विसूदादा येऊं कां मी आंत तुझ्याजवळ!' हातांत एक लहानशी बाहुली घेऊन सुधा आली होती. नकळतच दुसऱ्याला त्रास न देण्याची बुद्धी त्या मुलींत होती. विश्वनाथ आनंदानें म्हणाला "ये हं सुधाताई!"

पाहूं तुझी बाहुली ! वा !! काय ग छान डोळे आहेत तिचे. मला देशील कां ही !" "तुला रे काय करावयाची बाहुली ! मला ती खेळावयाला लागते !! तूं तर मोठा आहेस, तुला इच्याशीं कसें खेळतां येईल ?" सुधा शहाणपणाचा आव आणून म्हणाली. विश्वनाथाला भगिनीप्रेमाचा अनुभव, सुधेला पाहून घेतां येत असे. पण सख्ख्या भावाची सर त्याला मिळेल कां ? अनाथ विश्वनाथाच्या मनांत, वरील विचार चटकन येऊन गेला. खिन्न विचाराचें चिन्ह म्हणून, त्यानें एक दीर्घ निश्वास सोडला. स्वतःच्या दुःखी व खिन्न विचाराला दूर लोटण्याचा तो प्रयत्न करीत होता. अग ! तुझ्या बाहुलीला नवे नवे कपडे घालूं या ! जा !! आणि तुझी कपड्यांची पेटीसुद्धां आण ! सुधा विजेसारख्या वेगानें पळाली आणि आपल्या बाहुलीच्या कपड्यांची पेटी घेऊन परत आली. विसूदानानें त्यांतील छान् छान् झबलीं बघून एक पसंत केलें, आणि तें बाहुलीच्या अंगांत घातलें सुधेच्या खेळांत बाहुलीच्या कपड्यांचा संग्रह उमाबाईच्या गाठोड्यांत ठेवलेला होता. कोणाचेही कपडे घेतण्यास दर्जी आला कीं, सुधेनें हळूंच उमाबाईजवळ, स्वतःच्या बाहुलीबद्दल मागणी करावयाचीच, आणि सुधेसारख्या गोड मुलीला नाहीं कोण म्हणणार बरें ! यामुळें तिच्याजवळ पुष्कळ तऱ्हेचे कपडे होते. उत्तम कपडे घातल्यावर सुधेची बाहुली सुंदर दिसूं लागली. बाहुलीचा सुंदरपणा बघून सुधा आनंदानें नाचूं लागली. लहानपणीं थोड्याशा आनंदानें मन संतुष्ट असतें, आणि वाढत्या वयाबरोबर, असंतुष्टताच शिल्लक राहते, त्याचा अर्थ काय ? बराच वेळ विश्वनाथ सुधेबरोबर खेळत होता. बालकाच्या आनंदी सहवासाचा कंटाळा कोणाला येईल ! शेवटीं इतर नित्य कार्याला लागलें पाहिजे, या भावनेनें विश्वनाथ म्हणाला "सुधे तुझी बाहुली खेळून खेळून फार थकली आहे, तर तिला आतां जरा विश्रांति घेऊं दे. तिला निजूं दे जरा आतां." "हो ! बाहुली थकली. तिनें काय काम केलें रे विसूदादा ? कपडे घातले, येवढेंच ना ? दिवसां मुळींच निजूं नये असें नेहमीं आई म्हणत असते; मग ही जर निजली, तर आळशी होईल." आतां या पेचांतून कसें सुटावें हा प्रश्न विश्वनाथासमोर उभा राहिला. इतक्यांत त्याला कसलें तरी स्मरण झालें तो म्हणाला "सुधा !! लहान

मुलांनीं लवकर विश्रांती घ्यावी, असा एक नियम आहे, म्हणून तुझी बाहुली लहान आहे, तर तिला विश्रांती घे म्हणावें. उगीच आळसानें निजवून ठेव असें नाहीं मी कांहीं म्हणत बरं!" सुधेची समजूत पटली असें वाटतें, कारण तिनें बाहुलीला उचलून घेतली, आणि ती तडक आजोबाकडे गेली. मुलांच्या कल्पना दाखवितांना थोड्या असतात, परंतु अर्थानीं मोठ्या माणसांपेक्षां गंभीर असतात. विश्वनाथ कपडे करून घराच्या बाहेर पडावयास व उमाबाई काम आटोपून त्याच बाजूस येण्याला एकच गांठ पडली. दुपारचें कडक ऊन पडत होतें. निरुपाय म्हणूनच एकटें दुकटें माणूस रस्त्यावर फिरतांना दिसत असे. अशा त्या प्रखर उन्हांत, न पायांत जोडा, न हातांत छत्री, असा विश्वनाथ जातांना बघून त्यांच्या मनाला वाईल वाटलें. स्वतःच्या आपल्यावरून त्यांना विश्वनाथाच्या आईचें स्मरण झालें. जगाच्या पाठीवर अशीं किती तरुण मुलें हिंडत असतात, पण त्यांची विचारपूस हिंदु समाज करतो तरी काय? जीवदया मंडळें आहेत. जनावरांकरितां, पण एकटा अनाथ व अशा हिंदी व मानवी तरुणांचें संरक्षण करणारी संस्था अद्याप अस्तित्वांत येणार असेल अशा प्रकारचे विचार एखाद्या सुपीक मेंदूंत आले तर दोष कुणाचा इतक्या अव्यवस्थित व बेफिकीर समाजाबद्दल जर कळकळीचा अभाव दुसऱ्यांनीं दाखवला तर तो अपराधी तरी कां म्हणावा! दुसऱ्यांचे दोषांचें विवरण करतांना स्वतःचें निरिक्षण करण्यास जरूर शिकलें पाहिजे. आणखी किती तरी विचार उमाबाईच्या मनांत येऊन गेले. अशिक्षित व सुशिक्षित यांत हाच भेद आहे, कीं अशिक्षित विचार तरी करीतात, पण सुशिक्षांच्या नांवाखालीं दुसऱ्यांची सुखदुःख जाणण्याची भावना साक्षर ते बरोबरच मावळत जाते हें खरें विश्वनाथाचा संस्कृताचा अभ्यास चालू होता. एका कालीं संस्कृत अध्ययन करणें म्हणजे चरीतार्थ आणि मान्यता मिळविण्याचें तें एक साधन होतें. तथापि बराच काळ आणि अतिकष्ट केल्याशिवाय ही विद्या साध्य करितां येत नसे अवंतिक नगरीची या बद्दल सर्वत्र कीर्ति अशा जागीं राहात असतांना विश्वनाथासारख्यां मुलांचे विद्याध्ययन सुरळीत चालल्यास नवल नाहीं! सात्वीक आश्रय, एका सज्जन कुटुंबांचा सहवास आणि पवित्र

अवंतिका शहर इतकें सगळें योग जमल्यावर विश्वनाथासारखा गुणी मुलगा लक्ष लावून अभ्यास करील यांत आश्चर्य कसलें! असल्या सगळ्या सुखांत त्याला एक नित्य चिंता वाटत होती कीं येथे राहावयाचे किती दिवस! एकाद्या व्यक्तीवर आपला भार तरी किती व कसा टाकावयाचा! या तळमळीनें त्याला अनेक वेळां झोंप सुद्धा चांगली लागत नसे. पण ही मनोव्यथा सांगणार कुणाजवळ. हृदयांतल्याहृदयांतच ती नष्ट होणार. हृदयांचे बोल ऐकण्याइतकें मृदु हृदय व वात्सल्य त्याला आठवत नव्हतें. बोरगावकरांच्या मंडळीना तो नित्य कृतज्ञतेच्या स्मरणानें आशीर्वाद देत होता आणि सुधा गोडबालिकेच्या सहवासांत तो भगिनी प्रेमांचे मोल समजत होता. सगळया स्वकीय माणसाना पारखा झालेला विश्वनाथ मनाच्या अस्वस्थ स्थितींत माशाप्रमाणें तळमळत होता. काय करावे म्हणजे संधी मिळेल. जीवनकाल पर्यंत असेंच कां दुसऱ्यांच्या सुखानें, आणि दयेच्या आश्रयानें मी अयुष्य कंठित राहणार! या खेदकारक विचारानें तो अस्वस्थ व्हावयाचा. पण समाधान कोण करणार! बाबा रे असें नाहीं तसें वाग, हें तरी सुखाचें व साधे शब्द ऐकणार कोठून! असल्या खिन्न विचारांचा त्याच्या शरिरांवर जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. त्याला भूक चांगली लागेना. झोंप स्वस्थ येईना, आणि सगळें सुखाचें साधन, जो विद्याभ्यास तोही नीट घडेना. अशा प्रसंगीं मायेनें विचारपूस करणार कोण! आणि जरी दुसऱ्यांनीं केली, तरी पण मायेच्या हक्काचें म्हणून, अधिकारानें त्यानें कोणास सांगावें; अशींच परिस्थिती राहिली तर जरा कठीणच प्रश्न आहे म्हणावयाचा! तेव्हां यांतून सुटण्याची काय बरें युक्ति काढावी! विचार केला कीं योजना कळते. ध्येय ठरविलें कीं मार्ग सांपडतो. व्यवहाराचें हें साधे नियम मनुष्याला रोज अडचणींत टाकतात खरे! विश्वनाथानेंही लवकरच बोरगांवकरांचें घर सोडण्याचा निश्चय केला. माझ्या अशा वागण्यानें, ही मंडळी दुःखी होतील हें खरें आहे, पण मला तरी माझ्या जीवनाचें कांहीं पाहावयास नको का! समाजांत इतकीं माणसें आहेत, त्यांचा व्यवहार चालूच आहे; त्यांतील किती माणसांनीं माझ्यावर प्रेम केलें! माझी परिस्थिती, माझा चरितार्थ, किंवा माझें संरक्षण करण्याची जबाबदारी

या समाजावर नाहीं का ! मग हा समाज माझा तरी कां म्हणून मीं समजावें ! नव्हेच हा माझा !! मग मी कोणाचा, हें कोडें त्याला सुटेना; अखेर त्याचा निश्चय झाला कीं, ज्यानें मला निर्माण केला, त्या प्रभूच्या चरणाचा आश्रय घ्यावयाचा. या सगळ्या भानगडी व आपत्तींतून सोडविणार प्रभू समर्थ आहे.

माणसें कृतघ्न झालीं तरी देव दुष्ट होणार नाहीं. देवाच्या कृपाकटाक्षानें सगळें मिळतें. माणूस देऊन, देऊन तें काय देणार बरें ! माझ्यासारख्या अनाथानें त्यालाच शरण गेलें पाहिजे. तोच आश्रयदाता. तोच रक्षणकर्ता. विश्वनाथाचें दुःखी मन देवाच्या श्रद्धेनें भरून आलें. जणुं काय अज्ञात तत्त्व प्रत्यक्ष पटलें. समाधानाचा सुस्कारा सोडून, तो नित्य कार्याला लागत असे. त्याच्या मनाप्रमाणें विचाराची सांखळी जुडली गेली. दुःखाच्या प्रसंगीं देवाची व धर्माची श्रद्धाच उपयोगी पडत असते, म्हणूनच वडील माणसें धार्मिक बना म्हणून उपदेश करीत असतात. सत्यधर्माचरणाच्या संवयीनें आत्मबल वाढत असतें. प्रसंगीं मन कच खात नाहीं. संकटाला धैर्यानें तोंड देण्याची तयारी, धार्मिक वृत्तीच्या माणसांतच आढळते. श्रद्धाहीन माणसाला कसलाच आधार नसतो. व्यवहारांत प्रत्येक गोष्टीबद्दल अश्रद्धा दाखवीत गेल्यास मनुष्याच्या अंतःकरणांत कसलीच उच्च भावना शिल्लक राहात नाहीं. विचारशून्य हाडांचा सांपळाच तेवढा शिल्लक राहतो. तेवढ्याकरितां, धर्मबल अवश्य मिळविलें पाहिजे. समाजाचीं आर्जवं करा तरीं तो बेफिकीरच. पण ईश्वरास जरी विसरलों तरी तो हृदयांत वास करितो; मग माणसानें देवाला कां बरें विसरावें ! असें वागण्यांत मनुष्य हीनवृत्तीचा व देव थोर मनाचा हें सहज कळतें. विश्वनाथही स्वतःबद्दल विचार करी, तेव्हां त्या विचारामुळें त्याला खिन्नताच वाटत असे, या विशाल जगांत माझें असें कोणाला समजणार ! आणि समजलोंही तरी त्यानें मला आपला समजले पाहिजेना ! कांहीं नाहीं. धैर्य धरलें पाहिजे. शांतपणानेंच विचार करण्याची मनाला संवय लावून घेतली तर, समाधान जवळ हजर आहे. जगांत मनुष्य एकटाच येतो, आणि जातांनाही एकटाच जातो. मनुष्य सगळ्यांना आपला समजतो, तरी सगळे त्याला, मनांतून दूरच ठेवितात; मग माणसांच्या

आराधनेपेक्षां देवाची प्रार्थना कां करूं नये! एक ना दोन; अनेक विचार डोक्यांत येत व जात होते. इतकें करूनही त्याला शांतता भासेना अशा प्रसंगीं, मायेनें त्याला विचारणारें कोण होतें! नव्हतें कोणीही, असें तरी त्यानें कां समजावें.

आज आमावस्या होती. संस्कृत पाठशाळा बंद होती. विश्वनाथाला एकाच्या घरीं, दर्शाचा ब्राह्मण जावयाचें होतें. आपण बाहेर जेवणास जाणार म्हणून, अगोदर त्यानें उमाबाईंना कळविलें होतेंच. दुसऱ्याला होईल तोंपर्यंत त्रास न देण्याची त्याची पद्धती बघून उमाबाईंला त्याच्या-बद्दल धन्यता वाटली. दयेची देवी, व्यवहारकुशल गृहिणी, आणि कुटुंबाचा आधारस्तंभ माऊली उमाबाई, जणूं काय खडतर सेवाव्रत, कुटुंबांतल्या माणसांकरितां करावयाचें, हाच तिचा निर्धार, वागणूकींत दिसून येई. जेवणाच्या कारणामुळें विश्वनाथ दिवसभर बाहेरच होता. अगदीं संध्याकाळ झाल्यावर तो घरीं आला. तेव्हां अप्पासाहेब म्हणाले, "कां रे! आज दिवसभर दिसला नाहींस तूं! येवढा वेळ बाहेर काय करीत होतास." विश्वनाथ स्तब्ध आज्ञाधारक मुलाप्रमाणें, तो खालीं मान घालून उभा होता. आज त्याला अप्पासाहेबांच्या प्रश्नांचें उत्तर सुद्धां देववेना. गळा भरून आला. खिन्नपणानें सर्व विचार एकवटून, तो म्हणाला "आज जेवावयांस गेलो होतों, म्हणून परत घरीं जरा उशीरांच आलों, झालें. वरील उत्तरानें त्यांचे समाधान झालें. विश्वनाथ तडक आपल्या खोलींत आला. दाराला आंतून कडी लावून घेतली. थोडा वेळ स्तब्ध बसून तो मग आपल्या सामानांची बांधाबांध करूं लागला. विश्वनाथाचें सामान एक पासोडी, थोडींशीं पुस्तकें, एक लोटा व एक फुलपात्र. संपलें सामान त्याचे. पायांत घालावयास जोडा नाहीं. उन्हाचें संरक्षण करण्यास छत्री नाहीं, अंधारांत उपयोगीं पडावी म्हणून एकच अर्धी मेणबत्ती व एक काड्याची पेटी त्याच्याजवळ होती. अंगांत एक जाडा सदरा व फाटका कोट. त्या सर्व वेशाला शोभेल असेंच एक धोतर नेसलेला होता. कंबरेला खोंचलेले रुपये त्यानें काढून मोजले तर ते तीन होते. येवढींच पुंजी त्याला प्रवासांत आधार म्हणून जवळ होती. विश्वनाथासारख्याला आणखी इतर सामानाची आवश्यकता नव्हती काय!

किंवा त्यालाही फ्याशनेबल सूट केस, उत्तम बेडिंग, फराळाचा डबा, इत्यादी वस्तु नको का होत्या? पण भारतवर्षांच्या अनेक लोकाना हीं साधनें मिळणें शक्य नाहीं, म्हणून विश्वनाथाला हसूं नका! त्याला जर हसाल तर, समाजांतील बेफिकीर वृत्तीला हसावे लागेल. तिचा तिरस्कार करावा लागेल. आहे कां येवढें धैर्य कोणाला? मनुष्याच्या समाजाला कर्तव्यशून्यतेमुळें, कुणाचा हा समाज, अशी म्हणण्याची पाळी ज्यांच्यावर आली, त्या समाजांचें निरीक्षण करा! विचारांच्या खिन्नपणानें त्याला थकवा आला. अशा स्थितींतही, त्यानें एक पत्र लिहून, तें बंद केलें, व तो झोंपी गेला. झोंपेंतही त्याला कसले स्वप्न पडले असेल! निष्ठुर समाज!! त्यांतील स्वतःच्या स्वार्थानें अंध झालेलीं माणसें जीवनकलहानी त्रस्त, अर्धपोटीं व लज्जानिवारणार्थ आडेंभरडें वस्त्र, असला देखावा त्याला दिसत होता. स्वप्न तरी चांगलें पडलें तर बरें वाटतें, पण उलट अनुभव आला तर भीतीनें झोंप उडून जातें; शिवाय आज कृष्णवर्ण रात्र, असुरी वृत्तीचा तावा जिकडे तिकडे पसरलेला होता. त्याचा थोडासा परिणाम निराश मनाच्या विश्वनाथावर झाला असला तर आश्चर्य कसलें. तशाच मनाच्या अस्वस्थ विचारांत कशी तरी त्यानें रात्र काढली व पहांटे लवकर स्नान करून तो नित्यक्रम आटपण्याकरितां आपल्या व्यवसायाला लागला. त्याचा नित्यक्रम चालूच होता पण मन मात्र विचाराच्या अनेक दिशांनीं भडकत होते. आज अप्पासाहेबांचा निरोप घेऊन आपण जाणार पण ते परवानगी देतील काय? त्यांनीं नाहीं जावयाचे म्हटलें तर त्याचा प्रत्येक शब्द मला पूज्य व पवित्र वाटतो. जगाच्या पाठीवर अशीं साधुवृत्तीचीं माणसें आहेत म्हणून आमच्यासारख्या निराश्रीत अनाथ माणसाना आश्रय आहे.

त्याला परवानगी विचारतांना मनाचें धैर्य दृढ ठेविलें पाहिजे. दहा वाजतां जेवणाची नित्याप्रमाणें पानें वाढून तयार होतीं उमाबाई स्वयंपाक घरांत निमग्न होत्या. सगळी मंडळी पानावर येण्याचाच अवकाश होता; कारण, जेवण उरकून कोणी कचेरीला, कोणी शाळेला जाणारी, असा प्रकार होता. पानावर मंडळी येऊन बसल्यावर. उमाबाईनीं भात वाढला. सगळी मंडळी जेवणांत गर्क झालेली. पण विश्वनाथ पाटांवर बसून अस्वस्थ

अंतःकरणानें, नित्यासारखे त्यांचे जेवणांत लक्ष नव्हतें. उलट सगळ्यां-समोर येऊन बसण्याचीच त्याला लज्जा वाटत होती. भाषणाला प्रारंभ कसा करावा, इतक्यांत अप्पासाहेब सुधेशीं कांहीं तरी विनोद करावा म्हणून म्हणाले "सुधे! उद्यां बघ हरेश्वराची जत्रा आहे. तुला पहावयास नेऊं अं! जत्रेचें नांव ऐकतांच, सुधा जेवण देखील विसरली, व आतांच न्या असे तिनें आनंदानें म्हटले. विश्वनाथाला वाटलें कीं ही संधी आपले कार्यास चांगली आहे; तो खाली मान घालून नम्रपणानें म्हणाला, मला उद्यां गांवीं जावयाचे आहे तर परवानगी द्यावी. अप्पासाहेब हें ऐकतांच चकितच झाले. विश्वनाथ जाणार आणि कोठे! त्यांचे दयाळू हृदय कळवळलें. किंचित विचार करून ते म्हणाले, "अशी काय अवश्यकता आतांच वाटली रे" कांहीं काम आहे तिकडे? कां कोणी मित्र आहे; त्यानें बोलाविले आहे! विश्वनाथ यांचें उत्तर देणार, परंतु स्तब्ध विचारांच्या खळबळीमुळें आत्मसंयमनाचा पराजय झाला. गोंधळलेल्या मनांत विचार आला कीं, गरिबाचा कोणी मित्र झाला आहे काय? मित्र, गरिबाला पाहून दूरच राहतो. मग मी यांना कारण काय सांगू?

जरा काम आहे तिकडे आणि कांहीं गुरुचरित्राची पारायणें करण्याचा मी संकल्प केला आहे, तेव्हां तेही अनायासें साधेल झालं!! अशा दुहेरी हेतूनें मी जात आहे. "पण गांव कोणतें तें तरी सांग मला" "गाणगापूर" विश्वनाथानें उत्तर दिले. महाब्रह्मचारी व योगपरायण श्रीदत्तांचें निवासस्थान गाणगापूरचें नांव ऐकून, भक्तिभावानें आप्पासाहेब स्तब्ध झाले. आणि एवढा प्रवास तूं एकटांच करणार असें आप्पासाहेबांनीं त्यांस विचारले. 'सोबत कोणी तरी वाटेत मिळेलच' असे विश्वनाथानें उत्तर दिलें. परंतु आप्पासाहेबांच्या एकटा याप्रश्नावर त्याला खिन्नता वाटली. कर्मानीच जर एकटे रहावयास भाग पडलें तर करणार काय असा विचार, ओझरता त्याच्या मनांत येऊन गेला. "बरें! पण दिवस तरी आज चांगला आहे काय?" आप्पासाहेबांनीं विचारलें रस्त्यांत भटकणारा भणंग भिकारी आणि त्याला शुभ दिवस. दुर्दैवीपणानें हिंडण्यांतच ज्यांचा जन्म जाणार, त्यांनीं शुभाशुभाची पर्वाच कशाला करावी. दिवस ठीक आहे येवढेंच विश्वनाथानें उत्तर दिलें. अखेर जेवणें

संपत आली, सर्व मंडळी आचमन करून पानावरून उठली व हात धुऊन माडीवर गेली. विश्वनाथही कपडे करून बाहेर पडला. थोडेसें सामान होतें तें बरोबर घेतलें, आणि सगळयांना एकवार नमस्कार करावा व निरोप घ्यावा म्हणून तो खालीं आला. आप्पासाहेबांच्या पायावर त्यानें डोकें ठेविलें त्यांचा गळा भरून आला. पुत्रवात्सल्यानें सांभाळलेल्या एका अनाथ मुलांचा तो श्रद्धायुक्त नमस्कार पाहून त्याचे दयाळू मन कळवळून आलें. पण एकही शब्द त्यानीं उच्चारला नाहीं. विश्वनाथाचा निश्चयी स्वभाव त्याना माहीत होता. त्यानीं "पोचल्यावर पत्र पाठीव" म्हणून सांगितलें. हो! एवढें कसेंबसें म्हणून तो उमाबाईकडे गेला. विश्वनाथ जाणार या कल्पनेनें त्याना वाईट वाटतच होते. कारण जेवतांना झालेले भाषण त्याना कळलेच होते. मातृवात्सल्यानें भरलेल्या उमाबाईचें डोळे भरून आलें. हा जाणार कुठें आणि याचें पाहील कोण, या कल्पनेनें त्याना मुळींच सुचेना. विश्वनाथ दूर येऊन उभा राहिला व नमस्कार करणार, इतक्यांत त्या म्हणाल्या "विश्वनाथ! तुला काय वाटतें म्हणून तूं येथून निघालास" कांहीं तुझें कमी पडतें कां येथें! म्हणून तूं जातोस. मनोधैर्याची कसोटीची वेळ ही. विश्वनाथ बळेंच उत्साह आणून म्हणाला, "मला तर येथेंच घर वाटतं" पण मला गुरुचरित्राची पारायणें करावयाची आहेत, व ती तेथेंच केली पाहिजेत म्हणजे एकांत व पावित्र्य दोन्ही अनायासें साधेल म्हणून जाणार झालें."
"अरे! अस खडतर व्रत करण्याचें दिवस तुझे आहेत काय विश्वनाथ" असें सरळपणानें त्या म्हणाल्या. पोरका तरुण, लहानपणापासूनं एकटाच वाढलेला, स्वतःचे सुखदुःख येवढेंच त्याची भावना, कारण इतराविषयीं विचार करावयास, त्याला गोड शब्द सुधा रिकामा कोणी बोलला आहे हें आठवेना. सगळी परिस्थिती त्याला भयाणच वाटत होती. तरी सुद्धां उमाबाईना समाधान वाटावें म्हणून तो म्हणाला; थोडेसें अनुष्ठान केलें म्हणजे, मनाला बरें वाटेल, म्हणून जात आहे झालं! आर्य स्त्रीहृदय धर्माच्या कामांत अडथळा करणार नाहीं हें तत्व ठरलेलें आहे.

उमाबाई त्याला अपवाद कशा असतील! त्याही बरं तर जा बाबा, पण पोंचल्यावर पत्र पाठीव येवढेंच बोलल्या. विश्वनाथानें त्यांना नम-

स्कार केला. कुठेही सुखी रहा हा आशिर्वाद मिळाला. आणि फराळाचा एक लहानसा डबा त्याच्या हाती दिला. सुधा तेथेंच खेळत बसली होती. तिच्या हातांत एक रुपया घालून, तिच्या गोड गालांचा पापा घेतला. हें काय रे विसुदादा! खाऊं कशाला रे हा मला. तूं कोठें जाणार आहेस! नको जाऊं तूं; आईजवळ इथेंच रहा. सुधेनें हात धरून त्याला खालीं बसविलें. बालिकेचे ते सरळ व सत्य बोल ऐकून, विश्वनाथाला भडभडून आले. भगिनीप्रेमाची कल्पना तो सुधेवरून करीत होता. पण विचारानें मन ताळ्यावर आणले, व तिला दुसऱ्यांच नादांत गुंतवून तो माडीवर जाऊन खाली आला, आणि तडक घराच्या बाहेर पडला. त्याची या वेळची मनःस्थिती त्याचा तोच जाणें.

अफाट हिंदु समाजांत असले किती तरी तरुण मातापित्याच्या दुर्दैवी निधनामुळें, आप्तइष्टांना पारखें होऊन, घरादारांचा त्याग करून भटकत असतात. त्यांच्या जिवांचे मोल व काळजी कोणी केली आहे काय? त्यांतलाच एक आपला विश्वनाथ समजून त्यांचें पुढें काय झालें हें फक्त काळालाच ठाऊक!!



# ३ विरहिणी

हो ना करितां करितां अखेर एकदांची चंद्रावतीला अनंगराजाची भेट घ्यावयाची सुवर्णसंधि तर मिळाली.

आज कित्येक दिवस चंद्रावती अनंगराजमहाराजांच्या मुलाखतीसाठीं धडपडत होती. अमरपूरचें अनंगराजांचें राज्य कृष्णदेव सोडून गेल्याला जवळजवळ वर्ष लोटून गेलें होतें. राज्य सोडण्यास तसें विशेष कांहींच कारण घडलें नाहीं. एके दिवशीं अनंगमहाराजांना लष्करी अधिकारी ह्या नात्यानें एका लढाईचा मनसुबा समजावून सांगण्याकरितां कृष्णदेव गेला असतां त्याचें म्हणणें महाराजांच्या गळीं उतरेना व त्यामुळें महाराज त्रासून कांहीं तरी उपमर्दकारक शब्द त्याला बोलले झाले, तेवढ्यानें कृष्णदेवाची तब्येत गरम झाली. मानी इसम एक वेळ शत्रूचा तलवारीचा घाव सहन करील, पण मित्राचादी अपमानकारक शब्द सहन करणार नाहीं. कृष्णदेवानें तावडतोब राज्यत्याग करावयाचें ठरविलें. दुसऱ्या राज्यांत चांगली असामी लागण्याबरोबर तावडतोब चंद्रावतीला अमरपुरच्या राज्यांतून हलविण्याचें आश्वासन देऊन आपल्या प्रिय पत्नीच्या मोहांतून स्वतः-ची सुटका करून घेऊन कृष्णदेव अमरपुरांतून निघाला. विद्वानांची विद्या व वीरांची तलवार यांचा चोहोंकडे सारखाच सन्मान होतो. लवकरच कृष्णदेवाला दुसऱ्या एका राज्यांत रमापूर राज्यांत अधिक मानाची अशी नोकरी मिळाली व त्यानें चंद्रावतीला आपणाकडे पाठवून देण्याविषयीं अनंगराजमहाराजांना लिहिलें. अनंगपाळाच्या मनांत चंद्रावतीला कृष्णदेवाकडे पाठवावयाचें नव्हतें असें नाहीं. पण त्याचा बेत निराळा होता. कृष्णदेवाला टाकून बोलल्याबद्दल त्याला पश्चाताप होत होता. तो परत राज्याची सेवा करील तर बरें, असें त्याला वाटत होतें; खुंटाला बांधलेलें जनावर ज्याप्रमाणें एका विवक्षित क्षेत्रा बाहेर जाऊं शकत नाहीं. त्याप्रमाणें कितीही अंतरावर पुरुष असला तरी त्याचें मन त्याच्या संसाराच्या आजूबाजूलाच घुटमळत असतें, असा अनंगपाळाचा ग्रह असल्यानें चंद्रावतीला जर लवकर जावयाची परवानगी दिली नाहीं

तर बायकोच्या मोहानें तरी कृष्णदेव अमरपूरला परत येईल व ह्या वेळीं त्याची आपण समजूत घालूं अशी अनंगपाळाची अपेक्षा होती. व त्यामुळें जरी चंद्रावतीनें अनंगपाळाची ह्या बाबतींत मुलाखम घेण्याचा प्रयत्न केला तरी त्यानें तो सफल होऊं दिला नाहीं.

पण जेव्हां शेवटीं एकदांची अनंगपाळाची व चंद्रावतीची गाठ पडली तेव्हां मात्र अनंगपाळाचे हे मांडे मनांतल्या मनांतच विरघळले. त्यानें जेव्हां झुरणीला लागलेल्या चंद्रावतीची कृश देहलतिका; बसलेले गाल, खोल गेलेले डोळे व फिकट चेहरा पाहिला; तेव्हां त्याला सूर्योदयाच्या वेळीं आकाशांत आढळणाऱ्या दीनवाण्या चंद्राची आठवण झाली. त्याच्या मनाला जबरदस्त धक्का बसला. "तुमची अशी स्थिति कशानें झाली ?" हा एकच प्रश्न त्यानें विचारला. चंद्रावतीच्या जिव्हेनें प्रश्नाचें उत्तर न देतां डोळयांनीं दिलें. तिनें एकदां केविलवाण्या नजरनें अनंगपाळाकडे पाहिलें. व तिच्या डोळयांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. आपल्या हवल्याशा बोटांमध्यें वस्त्राचें टोक घेऊन डोळे पुसतांना तिला पुरेवाट झाली. पण चंद्रावतीच्या युक्तिवादांनीं किंवा कोटिक्रमांनीं जें तिचें कार्य साधण्यास कठिण गेलें असतें, तें तिच्या डोळयांतील अश्रूंनीं अचुक केलें. चंद्रावतीच्या नेत्रांतील पाण्यानें अनंगपाळाच्या अंतःकरणाचें पाणी पाणी होऊन गेलें. तो स्वतःशींच उद्गारला, 'केवढा मी मूर्ख ! राजकारणाच्या रामरगाड्यांत ही कोमल कळी मी चिरडून टाकीत होतों ! झाला तेवढा अविचार बस्स झाला. आतां हिला हिच्या नवऱ्याकडे ताबडतोब पाठविली पाहिजे.'

नंतर कांहीं काळ गेल्यावर तो म्हणाला, "बाई ह्या पूर्वीच मीं तुम्हाला कृष्णदेवाकडे पाठवावयास पाहिजे होतें—ह्या पुढें तरी आतां मी विलंब लावणार नाहीं. रामपूर राज्यांतील रामपूर शहरींच कृष्णदेव नोकरीला असून त्या शहराशीं आपल्या शहराचा मोठा व्यापार सुरू असतो. येथून एखाद्या व्यापाऱ्याचा मोठासा तांडा निघाला कीं त्या सोबतीनें मोठ्या बंदोबस्तानें मी तुमची रवानगी करून देईल.' वरील प्रकारचें आश्वासन देऊन उंची वस्त्राभरणें व मूल्यवान् अलंकार नजर करून त्यानें चंद्रावतीला निरोप दिला. संभाषणांत अल्पांशानेंहि भाग न घेतां चंद्रावतीचें कार्य पूर्णांशानें सफल झालें. व त्या आनंदांतच गर्क होऊन ती परत गेली.

परंतु चंद्रावतीच्या मनावर संजीवनीप्रमाणें परिणाम करणारे शब्द उच्चारीत असतां अनंगपाळानें एक घोडचूक केली होती. ती घोडचूक बोलण्याच्या भरांत त्याच्या लक्षांत राहिली नाहीं. वास्तविक पहातां कृष्णदेव रमापूर शहरीं नोकरीस होता. रामपुरास व रमपुरास जावयाचा रस्ता एकच होता व रमापुरास जातांना रामपुर शहरहि लागत होतें. अमरपुराहून रामपुरास जाण्यास जवळ जवळ महिन्याचा प्रवास करावा लागे तर रमापुरला जाण्यास पुढें आणखी पंधरा दिवस रस्ता चालावा लागे. बोलण्याच्या भरांत अनंगपाळानें रमापूरचें रामपुर करून कृष्णदेवाचें निवासस्थान १५ दिवसांनीं अलीकडे खेंचलें पण प्रत्यक्ष कृष्णदेव मात्र रमापुरांत नोकरी बजावीत होता. शहरांतील नांवांपैकीं एक ' कान्हा ' त्यानें अलीकडे ओढून त्यानें रमापूरचें रामपूर केलें पण त्यायोगें रमापुरीं राहाणारा चंद्रावतीचा ' कान्हा '-कृष्ण मात्र जवळ येऊं शकला नाहीं. चंद्रावतीनें मात्र अनंगपाळाच्या शब्दामुळें कृष्णदेव रामपूरला रहात असावा अशी ठाम समजूत झाली.

लवकरच सोबतही मिळाली, एका व्यापाऱ्याचा बैलांचा मोठा तांडा रमापूरला जावयाचा होता, त्यांच्या सोबतीनें चंद्रावतीनें जावें असें ठरलें. चंद्रावतीला वाहून नेण्याकरितां सर्व सुखसोईनीं परिपूर्ण असा मेणा, त्याचे चार भोई, संरक्षणाकरितां सैनिकांची लहानशी तुकडी व चंद्रावतीच्या मालकीच्या वस्तू वाहून नेण्याकरितां चार बैल असा लवाजमा अनंगपाळानें तिला दिला होता.

प्रयाणाचा दिवस जसजसा जवळ येत चालला तसतसें चंद्रावतीचें मन अधिकाधिक गडबडून गेलें. वास्तविक संसारकर्त्या स्त्रीला आपल्या घरांतील बोराएवढें भांडेंहि अत्यंत उपयुक्त व मोलाचें वाटत असतें ! पण चंद्रावतीचें मनच थाऱ्यावर नव्हतें. एक कृष्णदेवाखेरीज इतर विषयांना तिच्या अंतःकरणांत वावच मिळत नव्हता. घरांतील दासींना शेवटची भेट म्हणून वस्त्रें व अलंकार देतांना ज्या वेळीं जो जिन्नस डोळयासमोर आला तो त्या वेळीं हजर असलेल्या दासींना मिळाला. नोकराच्या बक्षिसीच्या बाबतींत हीच स्थिति. कांहींना भरमसाट बक्षिसें मिळाली तर कांहींना त्यांच्या

दर्जांच्या मानानें कांहींच मिळालें नाहीं. चंद्रावती आतां अमरपुराहून कायमची जाणार म्हणून तिला भेटावयास आलेल्या प्रतिष्ठित बायकांच्या आगतस्वागताच्या बाबतींत हाच प्रकार. मनमिळाऊ म्हणून नांवाजलेल्या चंद्रमुखीकडून त्या स्त्रियांच्या प्रश्नांना तुटक उत्तरें मिळूं लागली; कांहीं वेळां तर त्यांचा सहवास तिला असह्य होऊं लागला. त्यांनीं आणलेल्या मूल्यवान नजराण्यांकडे, ती सोने मातीसमान मानणाऱ्या साधूच्या निरिच्छ नजरेनें पाहूं लागली. तिला कशाचेंच कौतुक वाटेनासें झालें. चंद्रावतीच्या घरचें सामान नेण्यास चार बैल कसे पुरतील अशी अनंगपाळाला चिंता होती. पण चंद्रावतीनें निवडलेल्या आवश्यक व मूल्यवान वस्तूंचा बोजा दोन बैलांनाही पुरेसा होईना! शेवटीं दासींनीं आपल्या समजुतीप्रमाणें मूल्यवान वाटणाऱ्या वस्तू उरलेल्या बैलांवर लादल्या. चंद्रावती मात्र मनांतल्या मनांत म्हणावयाची, "रामपुरला काय कमी आहे म्हणून येथून सामान न्यावयाचें! तेथें त्यांच्या सौख्यांत सांप्रत एकच उणीव त्यांना भासत असली पाहिजे, व ती उणीव मी गेल्यानंतर आपोआप भरून निघेल." प्रयाणाच्या दिवशींची धांदल तर विचारूंच नये! तिला जेवणखाणही सुचेना, मग निरोप देण्यास आलेल्या मैत्रिणींचे आभार मानणें किंवा त्यांचा योग्य गौरव करणें तर दूरच राहिलें!

चंद्रावतीच्या प्रवासास सायंकाळ उलटून गेल्यानंतर सुरुवात झाली. ७-८ महिन्यांच्या अवधीनंतर चंद्रावती आपल्या कृष्णदेवाकडे जावयास निघाली होती. निघतांना तिच्या मनांत काय भावना उचंबळून आल्या असतील हें सांगावयास का पाहिजे? मनांतील उत्कृष्ट विचारांची छाप आपल्या आवडत्या वस्तूंवर पडते असें जें म्हणतात तें खरें असल्याचा तिच्या बाबतींत पुरेपुर अनुभव येत होता. प्रवासास सुरवात झाल्यावर थोड्या अवकाशांत तिच्या मेण्यानें शहर मागें टाकलें व व्यापाऱ्यांचा बैलांचा जो मोठा तांडा चालला होता त्याला ही मंडळी मिळाली. शहरांत कधींहि अनुभवावयास न मिळणारा वहाता शीतल वायू आपल्या रोमांचकारी स्पर्शानें सर्वांस आनंद देऊं लागला. उमलत्या फुलांचा चोहोंकडे दरवळणारा सुवास घ्राणेंद्रियांना संतुष्ट करूं लागला. त्या पौरजनांच्या दर्शनानें संतुष्ट होऊनच की काय गांवाबाहेरील वनांतील वृक्ष आपणास वेटा-

ळणाऱ्या वेलीसकट डोलूं लागलें. त्या डोलण्यामुळें वृक्षांवरील पक्षांच्या घरट्यांतील पिलें जागीं होऊन मधुर असा आवाज करीत, व त्यायोगें जणूं ते वृक्षच आपला आनंद व्यक्त करण्याकरितां बोलत आहेत असें वाटे. आकाशांत उडणारे काजवे पाहून रजनी देवीनें धारण केलेल्या अलंकारांतील हिरेमोतींच चमकत आहेत असें वाटे. आकाशींचा पुर्ण चंद्र ह्या सर्व गोष्टी आपल्या स्निग्ध तेजानें अधिकच खुलवीत होता चंद्रावतीच्या बरोबरोबरीची इतर सर्व मंडळी ह्या निसर्ग सौंदर्याचा पूर्ण आस्वाद घेत चालली होती. पण चंद्रावतीचें लक्ष ह्या निसर्गाकडून होणाऱ्या स्वागताकडे बिलकुल नव्हतें. ती सारखी कृष्णदेवाचाच विचार करीत होती व त्यामुळें समोर दिसणाऱ्या प्रत्येक वस्तूच्याठायीं तिला कृष्णदेवाचाच साक्षात्कार होई. वहाणाऱ्या वायूच्या स्पर्शानें तिला कृष्णदेवाच्या हस्तस्पर्शाची स्मृति होई. पुष्पांचा सुगंध सुटला कीं, प्रियाराधनाकरितां कृष्णदेव बरोबर आणीत असलेल्या पुष्पहाराचा हा सुवास असावा असें तिला वाटे, व पुढें पडणाऱ्या दरएक पावलाबरोबर आपण व आपले भ्रतार यांजमधील अंतर कमी होत आहे असें पाहूनच वृक्ष डोलत आणि आनंदाचा चीत्कार करीत आहेत व चंद्र हंसत आहे असें तिला वाटे !

हळुहळू एक दिवस पार पडला, व व्यापारी प्रवासी मंडळी टप्प्याटप्प्यानें पुढें जाऊं लागली. दिवसा एखाद्या सोईच्या गांवाबाहेर, शक्य तर धर्मशाळेत, नाहीं तर झाडाखालीं मुक्काम ठोकावा. आपले नित्यक्रम पार पाडून दुपारीं यथेच्छ झोंप काढावी किंवा गांवांत भटक्या माराव्यात व रात्रीं पुढला मार्ग आक्रमावा असा त्यांचा क्रम होता. एखादे वेळीं पुढल्या मुक्कामाला जाऊन पोहोंचण्यास मंडळींना २०—२५ मैल जावें लागे तर एखादे दिवशीं बारा पंधरा मैलांनंतर त्यांना थांबावें लागे. चंद्रावतीसाठीं धर्मशाळेंत खास जागा राखण्यांत येई. तेथें ती आपला स्वयंपाक, स्नान वगैरे पार पाडी. प्रवासाच्या दगदगीमुळें इतरांच्या चेहऱ्यावर दिसणारा थकवा तिच्या ठिकाणीं बिलकूल दिसत नव्हता. उलट मोकळी हवा व अंतःकरणांत उचंबळलेला आनंदसागर ह्यांनीं तिच्या शरीराची कांति अधिकच वाढली होती.

सायंकाळीं प्रवासास निघतांना व प्रातःकाळच्या वेळीं मुक्कामाला

जाऊन पोहोंचल्यावर ती भोयांच्या मुख्याला असा प्रश्न अचुक विचारत असे, "बाबारे, तुझ्या धर्माला व देवाला स्मरून खरें खरें सांग, रामपूरला पोहोंचावयास आणखी किती दिवस लागतील?" त्यावर तो भोयांचा मुख्यही तिला अंदाजें किती दिवस लागतील त्याची संख्या सांगत असे. जसजसे दिवसामागून दिवस जाऊं लागले तसतशी तो सांगत असलेली दिवसांची संख्याहि कमी होऊं लागली व त्याबरोबरच चंद्रावतीच्या छातीवरचें दडपणच जणुं हलकें होऊन ती अधिकाधिक मोकळेपणानें समाधानाचा सुस्कारा सोडूं लागली.

पण भोयांच्या मुख्याला तिच्या ह्या प्रश्नाचें प्रयोजनच कळेना. तिनें रमापूरची चौकशी करणें साहजिक होतें, पण ही रामपूरची चौकशी काय म्हणून? शेवटीं त्यानें चंद्रवतीकडून प्रवासाच्या सुरुवातीस ठराविक शब्दांत नेहमींचा प्रश्न आल्यावर ठरल्याप्रमाणें उत्तर दिलें व विचारलें "पण बाई तुम्ही हा प्रश्न इतक्या उत्सुकतेनें कां विचारतां? तुमचा कोणी आप्त रामपूरला आहे काय?"

भोयांच्या मुख्याचा हा प्रश्न ऐकून चंद्रावतीला गोड गुदगुल्या झाल्या. तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तिची नजर खालीं वळली, चेहऱ्यावर लाली आली व हंसऱ्या चेहऱ्यानें ती मेण्यांतील एका रेशमी गोंड्याबरोबर खेळूं लागली.

भोयांच्या मुख्याला ह्या प्रकारचा अर्थच कळेना. शेवटीं एके दिवशीं त्यानें आपलें आश्चर्य सैनिकांच्या तुकडीच्या मुख्याजवळ व्यक्त केलें. तो एके दिवशीं म्हणाला, "जमादार, ह्या बाईनें रामपूरचें काय खूळ घेतलें आहे?"

"काय, काय म्हणणें आहे तिचें?"

भोयांच्या मुख्यानें नेहमीं होणारीं प्रश्नोत्तरें त्याला सांगितलीं व म्हणाला, "हें असें दररोजचें चाललेलें असतें. तिचा कोणी रामपुरला आप्त आहे किंवा कसें कोणास ठाऊक?"

जमादारानें उत्तर दिलें, "पण ती चौकशी तुला मला काय करावयाची! तिला रमापूरला पोहोंचवावयाचा हुकूम आहे तेवढें करावयाचें! आणि हें पहा, ऋषीचें कूळ, नदीचें मूळ व स्त्रियांचें खूळ यांची चौकशी करण्या-

च्या मरांत कोणी पडूं नये! शिवाय त्या सुंदर स्त्रीचें व तुझें बोलणें चाल-लेंहि होतें ह्याचा गाजावाजा तुला करावयाचा होता तो झालाच! आतां जास्त खोलांत कशाला जातोस!"

जमादारानें डोळे मिचकावीत वरीलप्रमाणें उपहास केल्यावर भोयांचा मुख्य बिचारा गप्प राहिला. पण त्याच्या मनांतील कुतूहल मात्र कायमच राहिलें होतें.

चंद्रावतीच्या प्रवासास सुरुवात होऊन पुरा महिना होत आला होता. कृष्णपक्षाचा काळोखांतील पंधरवडा जाऊन वर्धिष्णु चंद्राचा प्रकाश अधिकाधिक आल्हादकारक असा होत होता, व चंद्रावती अमरपुराहून निघाली त्या दिवशींचें स्वरूप चंद्रानें पुन्हां धारण केलेलें होतें. रामपूरला पोहोंचण्यास फक्त एकच दिवस आतां बाकी राहिलेला होता व रमापूरला पोहोंचण्यास आणखी पंधरा दिवस लागणार होते. नेहमींप्रमाणें चंद्रावतीनें विचारलें, "बाबारे, तुझ्या धर्माला व देवाला स्मरून खरें खरें सांग राम-पूरला उद्यां सकाळीं आपण नक्की पोहोंचूं ना?" भोयांच्या मुख्यानें उत्तर दिलें, "होय बाईसाहेब, जर वाटेंत कांहीं अडचण उपस्थित झाली नाहीं तर उद्यां सकाळीं आपण रामपूरच्या धर्मशाळेजवळ पोहोंचल्याचें तुम्हांस आढळेल!" चंद्रावतीनें एक लांबलचक सुस्कारा टाकला. तिच्या अंतःकर-णांतील आनंदसागर पुन्हां उचंबळून आला व जणुं त्याचेच तुषार आनं-दाश्रूंच्या रूपानें तिच्या नेत्रांतून बाहेर पडूं लागले. "तुमचे व अनंगराज-महाराजांचे उपकार मी कधींहि विसरणार नाहीं बरें!" एवढे शब्द तिनें कसेबसे उद्गारले व आपल्या हातांतील एक आंगठी तिनें त्याच्या अंगावर टाकली. आंगठीकडे पाहून ह्यापेक्षां दुसऱ्या कोणत्याही मार्गानें तिला आपले आभार अधिक चांगल्या रीतीनें मानतां आले नसते असें भोयां-च्या मुख्याला वाटलें.

मेणा चालूं झाला. भोयांचे पाय धपधप वाजत होते. चोहोंकडे वाहा-णारा वायू मधूनमधून मेण्याचा पडदा दूर सारून चंद्रावतीची हालचाल घेत होता. कांहीं कालानंतर तिला गाढ झोंप लागली असल्याचें वायूला आढळलें.

बाहेर चाललेल्या कसल्या तरी गडबडीनें चंद्रावती एकदम जागी

झाली. पडदा बाजूला सारून पाहिलें तेव्हां उजाडलें असल्याचें व आपला मेणा एका प्रासादतुल्य इमारतीसमोर उभा असल्याचें तिला आढळलें. ती जागी झालेली पहातांच भोयांचा मुख्य चटकन पुढें झाला व मस्तक लववून म्हणाला, "बाई, आपलें चिरवांछित स्थळ आलें. कृष्णदेवाचें हेंच रहातें ठिकाण!" चंद्रावती शक्य तितक्या लगबगीनें उठली. तिनें एकदां हंसून भोयांकडे पाहिलें व उभ्या असलेल्या नोकरांकडे नजर टाकली. तिच्या नजरेबरोबर सर्वांनीं तिला अभिवादन केलें. दरवाज्यावरील पहारे-कऱ्यांनीं खडी तालीम दिली व एकानें वाड्यांत प्रवेश करण्याविषयीं सुचविलें. महाद्वाराच्या आंत शिरल्याबरोबर एक दासी चटकन् पाऊलें टाकीत पुढें आली व तिनें चंद्रावतीचा हात धरून चंद्रावतीकरितां खास शृंगार-लेल्या अंतर्महालांत तिला नेलें. महालांत गेल्यावर एक मऊशा आसनावर ती आरूढ झाली व आजूबाजूस तिनें नजर टाकली. महालांत तिच्या सेवेला सुंदर चेहऱ्याच्या दासी होत्या. उंची वस्त्रांच्या घड्या दोऱ्यांवर टाकलेल्या दिसत होत्या. एका तबकांत हिऱ्यामोत्यांचे चमचम करणारे अलंकार होते. अत्यंत कौशल्यानें काढलेलीं सुंदर चित्रें व मोठमोठे आरसे चोहोंकडे लावलेले होते. बाहेरील थंड वारा आंत येऊं नये म्हणून खिडक्यांना किन-खाबी पडदे लावलेले होते. आपल्या पतीचें वैभव सुचविणाऱ्या ह्या वस्तु पाहून चंद्रावतीच्या चेहऱ्यावर समाधानाचें चिन्ह दिसेना; तिनें अस्वस्थ अंतः-करणानें पुन्हां चोहोंकडे पाहिलें व शेवटीं नाइलाजानें आपली निराशलेली नजर पापण्यांच्या आड दडविली. तिच्या खालचें मऊ आसन तिला टोंचूं लागलें; सभोंवतालच्या दासींचे आदरपूर्ण नेत्रकटाक्ष तिच्या काळजास सुरीप्रमाणें खुपूं लागले. भिंतीवर लटकावलेल्या चित्रांचे मनमोहक रंग आपल्या सुखाचा बेरंग करीत आहेत असें तिला वाटलें; व इतस्ततः विखुरलेले वस्त्रालंकार आपल्या व प्रियकराच्या भेटींत आडवे येत आहेत असा तिला भास झाला. दासदासींच्या श्वासोच्छ्वासानें तिला गुदमरल्या-सारखें झालें तिनें डोळे उघडून विचारलें, 'ते कुठे आहेत?'

दासीनें उत्तर दिलें 'बाईसाहेब, यजमानांची स्वारी महाराजसरकारांना भेटण्यास गेली आहे. आपण आल्याची वर्दी त्यांजकडे गेली आहे, व पाव घटकेनें ते परत येतील.'

चंद्रावतीला आपल्या मस्तकावर कोणी तरी जोराचा प्रहार केल्यासारखें वाटलें. ती मनांत म्हणाली, "इतके दिवस मी विरहांत काढले. कशी बशी परवानगी मिळवून क्षणही न दवडतां येथें आलें. पण येथें आल्यानंतरही त्यांच्या आगमनाची वाट पहात अर्धी पाव घटका बसणें भाग पडावें अं! त्यांच्या भेटीकरितां माझे प्राण कसे कासावीस होत आहेत. मी येथें आल्याचें कळल्यानंतर त्यांचाही जीव मीलनाकरितां खालींवर झाल्यावांचून राहाणार नाहीं. मग आम्हाला परस्परांपासून कोण बरें दूर ठेवीत आहे! माझ्यासभोंवतीं नानाप्रकारचीं स्वरूपें घेऊन वावरणारी ही लक्ष्मी सवती-प्रमाणें माझ्या सुखाच्या आड येत असावी. खरेंच सुखांत भर पडावी म्हणून संपत्तीचा अभिलाष करावयाचा! पण त्याच संपत्तीच्या प्राप्तीकरितां जर दोन प्रेमी जीवांची ताटातूट होऊं लागली तर काय करावयाची ती संपत्ती! त्यापेक्षां वनांतील वृक्षांच्या सांवलीखालीं झऱ्याचें पाणी व सृष्टीदेवतेच्या ओटींतील फळें यांचा आस्वाद घेत परस्परांच्या सहवासाच्या आनंदाचा निर्वेधपणें उपभोग घेणें चांगलें नव्हे काय!"

कांहीं वेळ चंद्रावतीनें तसाच काढला. नंतर तिनें पुन्हां व्याकूळ होऊन विचारलें, " आले का ग ते ! "

दासीनें उत्तर दिलें, "नाहीं बाईसाहेब, पण आणखी पांच सात पळांत येतील असा निरोप आला आहे."

आणखी पांचसहा पळें! चंद्रावतीला आतां धीर निघेना! " अग बाई, आणखी पांचसात पळें! प्रत्येक पळागणिक माझा एकेक प्राण ही कुडी सोडून जाईल असें मला वाटत आहे. देवा, ते येईपर्यंत तरी मला जिवंत ठेव!" चंद्रावतीला आपली शुद्धि जात आहे असें वाटलें व ती धाडकन् बेशुद्ध पडली.

शुद्धीवर येऊन चंद्रावतीनें डोळे उघडून पाहिलें त्या वेळीं आपणा-सभोंवतीं दासदासी किंवा राजवाड्याच्या भिंती नसून आपण आपल्या मेण्यांतच निजलेल्या आहोंत असें तिला आढळलें. तिनें मेण्याचा पडदा दूर करून आसमंतांत नजर फेंकली त्या वेळीं आपण एका नागमोडी रस्त्यांत एक डोंगर उतरत आहों असें तिला आढळलें. पुढें जाणारे माल लादलेले बैल, त्यांचे मागून गाड्यांतून किंवा चालत जाणारी मंडळी,

तिला चंद्रप्रकाशांत स्पष्ट दिसत होती. पूर्ण चंद्रानें पश्चिमाकाशाचा अर्धा-मुर्धा प्रवास संपविला होता. बैलांच्या तांडयाच्या अनुरोधानें भोई लोक दाणदाण पावलें टाकीत मेणा नेत होते; चंद्रावतीनें पर्वताच्या खालच्या बाजूस नजर टाकली तेव्हां तेथें एक छोटेंसें शहर असल्याचें चंद्राप्रकाशानें तिला दिसलें. दाट धुकें पडलेलें असल्यानें शहरावर एक प्रकारचें शुभ्र आवरण घातल्यासारखें दिसत होतें. धुक्यानें आच्छादलेल्या त्या शहराकडे पाहून तिला क्षीरसागराची आठवण झाली. शहरांतून अस्पष्ट डोकावणारी कौलारें तिला क्षीरसागरांतील कमळपुष्पाप्रमाणें वाटलीं व आजुबाजूंची वनराजी तिला कमलाच्या पानांप्रमाणें भासली. ती मनांत म्हणाली, "क्षीरसागरांत शयन करणाऱ्या विष्णुप्रमाणें माझे पतीही ह्या क्षीरसागरांत एकाद्या कमलाच्या पानावर अगदीं एकाकी असे ह्या वेळीं पडलेले असतील. हो, त्यांच्या आजुबाजूस आणखी कितीही मंडळीं असली तरी माझ्याशिवाय त्यांना एकटे एकटेच वाटणार! पण उद्यांपासून मीही लक्ष्मी-प्रमाणें त्यांचे सहवासांतच सतत राहीन. आमच्या परस्पर वियोगाचा आजचा शेवटचा दिवस!" इतक्यांत तिला नुकत्याच पडलेल्या स्वप्नाची आठवण झाली आपण गेलों, आणि त्यांची आपली गांठच पडली नाहीं तर? असा प्रश्न तिच्या मनांत उद्भवला. ह्या शंकेच्या भयानें ती व्याकूळ झाली. तिला दरदरून घाम सुटला. ती म्हणाली, "स्वप्नांत मला पांच पळें त्यांच्यावाचून काढणें अशक्य झालें तेथें गेल्याबरोबर ते मला भेटले नाहींत तर माझी काय अवस्था होईल! पण सैतानाच्या सुद्धां मनाला शिवणार नाहीं ती शंका प्रेमीजनांच्या मनांत नांदत असते हेंच खरें. हा दुःखाचा डोंगर ओलांडून सौख्यसिंधूच्या इतक्या नजीक मी गेल्यावर त्यांची व माझी गांठ पडणार नाहीं असें होणेंच शक्य नाहीं." चंद्रावतीनें पुन्हां एकदां डोंगराच्या पायथ्याजवळील गांव पाहिलें, क्षीरसागराच्या उपमेनें व विष्णूशीं कृष्णदेवाची तुलना करून बराच वेळ तिनें आपलें मन रंजविलें. नंतर ती परत मेण्यांत झोंपी गेली. सकाळीं ती जागी झाली त्यावेळीं मेणा डोंगराखालीं उतरला होता व तो गांवानजीक पोहोंचला होता. मुक्कामाचे स्थळीं मेणा उतरविण्यांत आला. मेण्यांतून बाहेर येऊन तिनें आसमंतांत नजर टाकली. कोणत्याहि वस्तूस रमणीय स्वरूप देणारा

चंद्र अस्तास जाऊन सृष्टीचे सत्य स्वरूप प्राणीमात्राच्या नजरेस पाडण्याकरितां सूर्य उदयाचलावर आलेला होता. रात्रीचा सुखदायक क्षीरसागर धुकें व चंद्र यांच्या अभावीं आटून गेलेला होता. रात्रीं दिसणाऱ्या कमलांच्या जागीं उन्हानें आणि पावसानें काळवंडलेली कळकट कौलें दिसत होती व लांबून हिरव्यागार पानांनीं भरदार दिसणाऱ्या वृक्षाजवळ गेल्यावर झाडावरील वाळलेल्या फांद्या, गळलेली पानें व कोमेजलेलीं फुलें नजरेस पडत होती. गांवांतील गोधन गांवाबाहेर हांकून नेण्यांत येत होतें. मेण्यांतून उतरल्यानंतर चंद्रावतीनें हा फरक न्याहाळला व एक दीर्घ सुस्कारा सोडला. कल्पनासृष्टींतील रमणीय स्वप्न संपलें होतें व प्रत्यक्ष परिस्थितीला तोंड देण्याची पाळी आली होती!

तिला धर्मशाळेंत उतरवून नेहमींच्या पद्धतीप्रमाणें तिच्या बरोबरचे सैनिक व भोई गांवांत भटकण्याकरितां गेले. चंद्रावतीला वाटलें आपल्या पतीच्या निवासस्थानाची चौकशी करण्याकरितांच ते गेले आहेत. दुपारनंतर ते परत आले व विश्रांति घेऊन सायंकाळच्या वेळीं ते पुढील मुक्कामास निघण्याची तयारी करूं लागले. हे आपणास आपल्या पतिगृहीं केव्हां पोहोंचवतात ह्याची वाट पहात चंद्रावती बसली होती.

सायंकाळ होत आली. चंद्रावतीला आतां धीर निघेना. शेवटीं तिनें हिय्या करून भोयांच्या मुख्याला विचारलें "मला माझ्या घरीं केव्हां पोहोंचविणार ?"

"बाईसाहेब, आपला येथें कोणी आप्तसंबंधी आहे काय? असल्यास कळवावें म्हणजे चौकशी करतों" मुख्याकडून उत्तर आलें.

चंद्रावतीला आपल्या हातापायांना मुंग्या येत आहेत असें वाटलें. तिचें मस्तक सुन्न झालें. तिनें एक आंवढा गिळून उत्तर दिलें, "ज्यांचेकरितां मी येथपर्यंत इतके हाल सोसून आलें व ज्यांच्या हवालीं मला करण्याचा महाराजांनीं तुम्हांला हुकूम दिला आहे त्यांच्या घरीं मला पोहोंचवा."

भोयांचा मुख्य एकदम दचकला. त्यानें कापऱ्या आवाजांत उत्तर दिलें, "बाईसाहेब आपला गैरसमज झालेला दिसतो. कृष्णदेव रामपुरांत रहात नसून रमापुरांत रहातात."

चंद्रावतीचा आपल्या कानांवर विश्वास बसेना. आपल्या कानांत शब्द

पडत नसून कोणी तरी गरळ ओकत आहे असें तिला वाटलें. आपलें मस्तक नकारार्थी हलवून ती अत्यंत गडबडीनें व अधीरतेनें म्हणाली, “प्रत्यक्ष महाराजांनींच रामपूरला ते रहात असल्याचें मला सांगितलें आहे.”

भोयांचा मुख्य आपली चूक दुरुस्त करील अशा अपेक्षेनें ती त्याच्याकडे अत्यंत आतुरतेनें पहात असतां पुन्हां तिच्या कानांत अग्निवर्षाव झाला. “बाईसाहेब, आपली ऐकण्यांत किंवा महाराजांची सांगण्यांत चूक झालेली दिसते. महाराजांनीं मला दिलेल्या लेखी हुकुमांत रमापूर हें नांव चक्क आहे. हा पहा तो हुकूमनामा!” मुख्यानें हुकूमनामा पुढें केला. त्यांतील रमापूर हीं अक्षरें पहातांच तिच्या डोळ्यापुढें अंधेरी आली.

आपल्या शरीरांतील सर्व रक्त हृदयाच्या रोखानें जोरानें वहात आहे, असें चंद्रावतीला भासलें. जणूं काय तें फुटूं नये म्हणूनच वक्षस्थळावर हात ठेवून केविलवाण्या मुद्रेनें तिनें विचारलें, “देवाला व धर्माला स्मरून खरें सांगा, रमापूरला पोहोंचण्याला आणखी किती दिवस लागतील?”

“बाईसाहेब, येथून रमापूर आणखी पंधरा दिवसांच्या अंतरावर आहे” तितक्यांत तेथें आलेल्या सैनिकांच्या जमादारानें उत्तर दिलें.

चंद्रावतीच्या अंगाचा थरकांप झाला. पाय मोडल्याप्रमाणें ती मटकन् खालीं बसली. व आकाशाकडे नजर लावून अस्पष्ट आवाजांत उद्गारली, “आणखी पंधरा दिवस,! काल स्वप्नांत त्यांना येण्यास पांच पळें विलंब होणार असल्याचें कळल्याबरोबर माझे पंचप्राण गोळा झाले—आणखी पंधरा दिवस माझे या जगांत कसे जातील? आतांपर्यंतच्या विरहांतच माझे प्राण कंठाशीं आले आहेत.”

तिचे ते अस्पष्ट शब्द ऐकून जमादार उद्गारला. “दिवस न जायला काय झालें? इतके दिवस नाहीं काढले? तसे आणखी पंधरा. उगीच मनाला लावून घेण्यांत काय अर्थ?”

चंद्रावती शून्य दृष्टीनें त्याचेकडे पाहात म्हणाली, “खरेंच! इतके दिवस काढले तसे आणखी पंधरा. त्यांत काय विशेष?”


जमादाराचे शब्द चंद्रावतीच्या हृदयावर आदळून त्याचाच प्रतिध्वनि तिच्या मुखाच्या द्वारें बाहेर पडला असावा. पण त्या शब्दांना प्रतिध्वनी तरी कसें म्हणावें? प्रतिध्वनींत जोर आढळतो तोहि आत्तांच्या चंद्रावतीच्या

शब्दांत नव्हता. चंद्रावतीनें हे शब्द कळून सवरून उद्गारले किंवा नाहीं ह्याचीही आजूबाजूच्या मंडळींना शंका वाटली.

"बाईसाहेब, आतां मेण्यांत जाऊन बसावें" एका भोयानें सुचविलें. चंद्रावतीचे पाय गळले होते. गळा दाटला होता व तेज निस्तेज झालें होतें. तिच्या ओंठांच्या हालचालीवरून ती कांहीं तरी बोलत असावी असें दिसत होतें. भोयाची सूचना मिळतांच मोठ्या कष्टानें ती तेथून उठली. पायांवर पृथ्वीचें ओझें पडल्याप्रमाणें जड पावलांनीं ती मेण्याजवळ गेली व मेण्यांत तिनें धाडकन् अंग टाकलें.

इतर मंडळी निघाल्यावर भोयांनीं मेणा उचलला व ते चालूं लागले, कालांतरानें रामपूर शहर दिसेनासेंही झालें.

एका उघड्या मैदानांतून जाणारा रस्ता चंद्रावतीचा मेणा वहाणारे लोक इतरांबरोबर ओलांडीत होते. ती संधी साधून वायूच्या सहाय्यानें चंद्रानें मेण्याचा पडदा दूर सारून आंत डोकावलें. चंद्रावती आपल्या आसनावर मान मागें टाकून बसल्यासारखी दिसत होती. पण तिचें शरीर काळाप्रमाणें गार पडलें होतें; श्वसनक्रिया बंद झाली होती. रक्तवर्ण अधरोष्ठ परस्परांपासून किंचित् दूर झाले होते व त्यांतून सुबक दांत अर्धवट दिसत होते. ह्या दंतपंक्तीच्या खड्या पहाऱ्याला न जुमानतां अधरोष्ठांनीं अलग होऊन करून दिलेल्या मार्गानें चंद्रावतीचा आत्मा त्या देहाचा त्याग करून कृष्णदेवास भेटण्याकरितां तांतडीनें पुढें निघून गेला होता.



# ४ विजय

चावडीसमोरील पिंपळाच्या पारावर सात आठ शेतकऱ्यांचा अड्डा गप्पा मारण्यांत दंग होऊन गेला होता. गांवांतील धर्मशाळा दुरुस्त नसल्यामुळें प्रवाशी संन्याशांचा एक तांडा चावडींतच उतरला होता. तेव्हां त्या गडबडींत भर न घालतां या शेतकऱ्यांनीं पारावरच बैठक मांडली होती. कासराभर दिवस वर आला तरी या मंडळींपैकीं कुणी शेतावर जाण्याची घाई करीत नव्हता. एक दोन दिवसाखालीं झालेल्या उरुसांत यांच्यापैकीं प्रत्येकानें अंग मोडून काम केल्यामुळें त्यांचा शीण अजून गेला नव्हता. वेसकऱ्यानें आणून टाकलेला रुईच्या पानाचा चुड्डा करून कांहींजण ओढत होते तर कांहींजण पाटलाच्या बटव्यांतील, पानतंबाखूचा यथास्थित समाचार घेत होते. त्यांच्यापैकीं एक उंचेला दिसणारा गृहस्थ पान चुना कात वगैरे सर्व कांहीं मिळालें कीं नाहीं म्हणून प्रत्येकाची आस्थापूर्वक चौकशी करीत होता. जणूं काय तो बटवा स्वत:चाच आहे अशी त्याची समजूत असावी. इतक्यांत पलीकडच्या पडक्या वेशींतून एक रुबाबदार उतार वयाचा माणूस येतांना तिकडे मंडळींचें लक्ष गेलें. त्याबरोबर बहुतेकांनीं गडबडीनें उठून या नाईक—या सावकार—असें म्हणून त्याला उत्थापन देऊन घोंगड्याच्या त्या बैठकीवर आणून बसविलें. वस्तुस्थिती अशी होती कीं गांवांत पाटलाला कुणी विचारत नव्हतें. पण धनाजी नाईकाला मात्र सगळेजण 'सावकार' 'सावकार' म्हणून त्याचा नेहमीं उदोउदो करीत. आणि धनाजीनेंही असा वचक गांवकऱ्यावर बसवला होता कीं सगळेजण त्याला वांकून असत. प्रत्येक महत्वाच्या कामांत, मग ते सार्वजनिक असो कीं खाजगी असो—सगळेजण याचा सल्ला घेत. धनाजी सावकारापुढें उणा शब्द बोलण्याची हिम्मत त्याच्या कट्ट्या शत्रूला देखील होऊं नये.

धनाजी सकाळीं उठून आपल्या एका मळ्यावर फेरी टाकून आला होता. तो तेथें येऊन बसल्यावर कांहींजणांनीं त्याच्या या संवयीची तारीफ

केली. कुणी त्याच्या प्रकृतीचे पोवाडे गाइले, कुणी त्याच्या खादगीबद्दल धन्यवाद दिले. अशा रीतीनें त्याच्यावर चोहोंकडून स्तुतीचा वर्षाव झाला. पाटलाला धनाजीचें वैषम्य वाटत असलें तरी त्यालाही तोंडावर हसूं आणावें लागलें. पानतंबाखूबद्दल आस्था बाळगणाऱ्या मघाच्या गृहस्थानेंही–हा पाटलाच्या पुढयांतला होता–अशी साखर पेरली कीं कुणाला वाटावें हा धनाजीचा अगदीं जिवलग स्नेही आहे. त्यांच्यापैकीं एक तरुण दिसणारा माणूस मात्र कांहीं विशेष बोलत नव्हता. त्याच्याकडे पाटलाच्या मित्राचें लक्ष गेलें व तो म्हणाला "काय सातप्पा, तूं आज अगदीं तोंडबी उघडत नाहीं."

"मालकापुढें अदबीनें वागावें म्हणूनशानी नसेल बोलत." एकजण म्हणाला. सातप्पा धनाजीचा वांटेकरी होता. आणि ते दोघेजण कधीं अघळपघळ बोलत नसले तरी त्या दोघांचें परस्पराविषयीं चांगलें मत होतें हें सगळयांना ठाऊक होतें.

याच सुमारास नदीच्या पाणोठ्यावरून कांहीं बायका पाणी भरून घेऊन डगर चढून येत होत्या. त्यांच्यापैकीं एक तरुण व सुंदर स्त्री त्या खेड्यांत नुकतीच आलेली असल्यामुळें पिंपळाच्या पारावरच्या मंडळींचें लक्ष तिकडे गेलें. ती तरुण सुंदर दिसणारी स्त्री सातप्पाची मेव्हणी होती. तिचा नवरा नुकताच वारला होता. तिच्या सासरीं व माहेरीं कुणी दुसरें माणूस नसल्यामुळें सातप्पानें त्या अनाथ स्त्रीला आपल्या घरीं आणून ठेवलें होतें. त्या बायका पारावरून पुढें जातात न जातात तोंच त्यांना ऐकूं येईल अशा आवाजांत एकानें 'केळीच्या गाभ्या'प्रमाणें दिसणाऱ्या त्या पोरीबद्दल चौकशी केलीच. पाटलाला सातप्पाचा तडफदार स्वभाव माहीत असल्यामुळें या प्रश्नाची जास्त चर्चा नको म्हणून पाटलानें सातप्पाचें व त्या स्त्रीचें नातें सांगून टाकलें. ती ज्या बाजूनें गेली तिकडे किलकिल्या डोळ्यांनीं पाहून धनाजी थोडासा हसला. धनाजी परवांच्या उरुसापासून अलीकडे मोठ्या खुशींत असे. त्यानें थोडें हंसून मोठ्या धूर्त नजरेनें सातप्पाकडे पाहिलें व म्हटलें "तरीच सातप्पा आपल्यासंग अलीकडे फार बोलत नाहीं बरं का! अरे तुम्हांला नाजूक नात्यांतलीं माणसं मिळालीं. त्यांच्या म्होरं आम्हा म्हाताऱ्यासनी पुसतया कोण!" हें

बोलणें ऐकल्यावर मंडळींनीं "लई बेस" म्हणून मान डोलावून आपला हसण्याचा सूर धनाजीच्या सुरांत मिळवून दिला. पण सातप्पाचे लाल झालेले डोळे पाहतांच त्यांचें हसणें खाडकन् थांबलें. आपण जरा अतिप्रसंग केला असें सावकारासही वाटलें. पण आपण इतरासारखें बोलण्याचें थांबलों तर आपण सातप्पाला घाबरलों असा लोक अर्थ घेतील व आपल्या इभ्रतीस कमीपणा येईल असा विचार करून कसें तरी सावरून घ्यावें म्हणून तो म्हणाला. "समदीं माणसं तरुणपणांत अशींच वागायचीं, त्यांत वावगें काय ?"

"समदे लोक तरुणपणांत शेण खात नाहींत. मी कुणाची आवा घरांतून उठवूनशानी आणली नाय्. अन् तिच्यासंग म्हातरपणांतबी चघळपणा करीत बसलों नाहीं." सातप्पा म्हणाला.

धनाजीच्या मर्मावर नेमका आघात सातप्पानें घातला म्हणून पाटलाला व पाटलाच्या त्या दोस्ताला मनांतून फार आनंद झाला. धनाजी सावकारानें तरुणवयांत रंगेलपणानें आणून ठेवलेली बाई अजून त्याच्या घरांत नांदत होती हें सगळा गांव उघड्या डोळ्यांनीं पहात होता. पण धनाजीच्या तोंडावर चुकूनदेखील त्या गोष्टीबद्दल कुणी उल्लेख करीत नसे. मग हेटाळणीचें तर नांवच नको. त्याला अशा गोष्टी इतराकडून ऐकण्याची कधींच संवय नव्हती. त्याला सातप्पाचे वाक्प्रहार सहन होणें अशक्य होतें. त्याचा अभिमान—इभ्रतीचा अभिमान—दराऱ्याचा अभिमान—पददलित झाला. झाल्या प्रकारांत स्वतांचीच चूक असल्यामुळें हा प्रकार मनावर न घेतां तसाच उडवून द्यावा असें त्याला एकवार वाटलें. पण पाटील व त्याचा स्नेही हंसू दाबून "जाऊं दे सातप्पा—जाऊं दे" असें सातप्पाला समजावीत आहेत हें पाहतांच मात्र धनाजी अगदीं उसळून गेला. खवळलेल्या सिंहाप्रमाणें चवताळून जाऊन तो ओरडून बोलूं लागला. सातप्पाही मेल्या म्हशीचें दूध प्याला नव्हता. धनाजीच्या पुढ्यांतल्या सातप्पानेंच त्याची शोभा केली म्हणून पाटलाला हर्षवायु होण्याची वेळ आली. अशा प्रसंगीं देखील पैशाचाच जोर अधिक ठरला. तिथल्या बहुतेक लोकांनीं सातप्पाला मूर्खांत काढलें. "तरुण आहे, उतावीळ आहे, पोराचें मनावर घेऊं नका" म्हणून त्याच्या वतीनें कांहीं लोक नसतां

मध्यस्थी करूं लागले. इकडे धनाजी "चार लोकांसमोर पायां पडून मुकाट्यानें चुकलों म्हणून तोंडांत मारून घे–नाहींतर माझा हंगा तुला कळेल" अशा प्रकारच्या धमक्या देत होता. आणि सातप्पाही उलट "प्राण गेला तरी तुझे पाय धरणार नाहीं. चुकी तुझी आणि मीच माफी मागायची–मी वाकणार नाहीं; जा, काय वाटेल तें करून घे माझें" असें त्याला आव्हान देत होता.

बोलाचाली संपली तरी या भांडणाचा परिणाम काय होणार इकडे गांवकऱ्यांचें लक्ष लागलें. सामर्थ्यवंतांचा राग रामचंद्राच्या बाणाप्रमाणें कधीं वायां जायचा नाहीं हें अनुभविक गांवकरी ओळखून होते म्हणूनच त्यांना सातप्पाबद्दल सहानुभूति वाटूं लागली. विशेषतः सातप्पाची सांपत्तिक स्थिति ज्यांना माहीत होती अशा चार वृद्धांनीं सातप्पाला समजावून सांगितलें व विनाकारण अभिमानाला पेटून स्वतांचें नुकसान करून घेऊं नकोस असें बजावलें. धनाजीच्या रागाची झळ सातप्पाला बडवल्याखेरीज राहणार नाहीं हें ते जाणून होते. कारण, सातप्पा धनाजीचें एक शेत वांट्यानें करीत होता. सातप्पाचा बापही धनाजीच्या बागापासून त्याचा वांटेकरी असल्यामुळें धनाजीनें सातप्पाला बरीच सवलत दिली होती. धनाजीला सातप्पाचें वर्तन–स्वभाव वगैरे सर्व कांहीं पसंत असल्यामुळें हा पोरगाही बापाप्रमाणेंच आपल्या उपयोगीं पडेल, याला मदत करणें आपलें कर्तव्य आहे असें धनाजी समजत होता, म्हणूनच त्यानें वर्षाखालीं सातप्पाचा बाप अखेरच्या दुखण्यानें आजारी असतांना सातप्पास हातावर दीडशें रुपये कर्जही दिलें होतें. पण या नवीन तंट्यामुळें सर्व प्रकार उलटला. या उद्धट पोराला नरम केल्यावांचून सोडायचा नाहीं असा धनाजीनें निर्धार केला. पैशाची कळ धनाजीच्या मुठींत होती; उर्मटपणानें ती दाबल्याबरोबर हा उर्मट पोरगा आपल्या पायां पडत येईल अशी धनाजीला आशा वाटत होती आणि त्याला तसें वाटणें साहजीक होतें. ऋणको कधीं धनकोबरोबर वागला आहे काय ! धनाजीचा आजपर्यंतचा अनुभव त्याला हेंच सांगत होता. आपलें देणेकरी आपल्या कैचींत–पकडींत सांपडलेले असतात. आपण त्यांना वागवूं त्याप्रमाणें त्यांनीं वागलें पाहिजे अशी त्याची विचारसरणी होती. आजपर्यंत त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें सगळ्या ऋणकोनां वागवलें होतें

म्हणून त्याला या विचारसरणींत अस्वाभाविक किंवा अशक्य कांहींच वाटलें नाहीं. त्याला म्हणजे सातप्याचें नुकसान करावयाचें होतें असांतला भाग नाहीं. त्याला एकदां चांगला वांकवला म्हणजे पुरे आहे असें त्यानें ठरवलें होतें. पण भांडण होऊन आठ दिवस होऊन गेले तरी आपण होऊन सातप्पा पाय धरावयास येईना. तेव्हां मात्र काय वाटेल तें करून सगळ्या रीतीनें सतावून सोडून त्याला वठणीवर आणावयाचें असा त्यानें निर्धार केला.

धनाजी नुसत्या माफीवरच सातप्पाला सोडून देत आहे–सूडाच्या बुद्धीनें त्याच्या पाठीस लागला नाहीं हें पाहून गांवांतले लोक धनाजीच्या औदार्याची, समंजसपणाची व दयाळूपणाची स्तुति करूं लागले. आणि उलट सातप्पा 'माफी मागावयाची नाहीं' हा आपला हट्ट सोडत नाहीं म्हणून ते त्याला 'हिरवट, हेकेखोर, अविकप्रसंगी, मायेफिरू' इत्यादि शेलक्या शब्दांचा अहेर करूं लागले. सावकाराची चुकी असली म्हणून काय झालें ! कांहीं झालें तरी तो श्रीमंत पडला त्याच्यापुढें अहं–मीपणा बाळगून गरिबांचा कसा निभाव लागावयाचा ! हातापायां पडून थोडक्यांत राग शांत करतां येतो हें भाग्य समजायचें. तें सोडून देऊन हा हरिश्चंद्र–रामराजाचा अवतार मोठ्या दिमाखानें वागत आहे. याला अक्काबाईच आठवली आहे. अशा रीतीनें गांवकऱ्यांच्या विचारांचा वारा आतां वाहूं लागला.

आणि सातप्पाला काय वाटत होतें ! पुढें होणाऱ्या सगळ्या प्रकाराची अटकळ मनांत बांधून तो निश्चिंत बसला होता. आपण एकदां ठरविलें तें ठरविलें. आपल्या निश्चयापासून तसूभरही मागें ढळावयाचें नाहीं असें त्यानें मनाशीं योजिलें होतें. जास्तींत जास्त धनाजी आपलें काय वाकडें करूं शकेल याचा त्यानें विचार केला. धनाजी इतका हलकटपणा करणार नाहीं. पण श्रीमंत माणूस एकदां इरेला पडलें म्हणजे त्याचा काय नेम ! आपल्या कडब्याच्या गंजीला आग लावील–आपलें झोपडें पेटवून देईल–चार दोन माणसें मारपीट करण्यासाठीं आपणावर पाठवील–आपण करीत असलेलें शेत दुसऱ्याला लावील–कर्जाचा तगादा लावील–काय वाटेल तें होवो पण आपण त्याच्यापुढें मान वांकवणार नाहीं असा त्यानें निग्रह केला.

सातप्पाच्या बायकोला त्याच्याकडून त्यादिवशीं ही हकीकत कळण्याच्या अगोदरच गांवांतल्या बायकांनीं तिच्याकानावर सर्व प्रकार तिखटमीठ लावून घातला होता. त्यानीं सावकाराच्या रागाच्या अनेक गोष्टी सांगून तिची व तिच्या नवऱ्याची आतां गांवांत धडगत नाहीं हें तिच्या मनावर उत्कृष्ट रीतीनें बिंबविलें. तेव्हां साहजिकच नवरा घरीं आल्यावर ती मोठया काकुळतीला येऊन, सावकाराच्या हातापायां पडून 'ही भानगड एकदां मिटवून टाका' अशी नवऱ्याची विनवणी करूं लागली. सातप्पानें सगळा प्रकार तिला समजावून सांगून तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण तिला तें पटेना. आपला गरीबीचा संसार–तशांत देणेंपाणी झालेलें. तशांत सावकारानें तगादा लावला आणि शेतावरून हांकून लावलें म्हणजे आपण कसें देशोधडीला जाऊं या विचारानें त्या बिचारीची कंबरच खचली. सावकारानें आपणाकडचें शेत काढून घेतलें आहे–अन्नान होऊन पोटें भरण्यासाठीं आपण शहराच्या वाटेला लागलों आहों ह्या कल्पनेनेंच तिचा ऊर फुटून गेला. तिनें रडून रडून आपला पदर भिजवला. तिनें जात्यापाशीं निजलेल्या आपल्या दोन वर्षांच्या मुलाला हातांत घेऊन सातप्पाच्या मांडीवर आणून ठेवलें. "आपल्या खंडूकडे तरी पाहून तुम्ही हा हट्ट सोडून द्या" असें तिनें विनवलें. अजून सातप्पा शांतच होता. दीड वर्षांखालीं आपला सासरा मरतांना खंडूला जवळ घेऊन त्यानें सातप्पाला जे उपदेशाचे दोनशब्द सांगितलें त्याची आठवण जेव्हां तिनें करून दिली तेव्हां मात्र सातप्पाच्या डोळ्याच्या कडा ओल्या झाल्या. सातप्पाच्या बापानें मरतांना आपल्या मुलास म्हटलें होतें "पोरा तूं फार अभिमानी आणि तापट आहेस–असा स्वभाव ठेवून जगांत चालायाचं नाहीं. नेहमी इरेला पडत जाऊं नकोस. आपल्या खंडोबासारखा तुला मुलगा आहे. मुलाला व बायकोला संभाळ. तुझा स्वभाव असा पडला. भलत्याच इरेला पडून त्यांचें नुकसान करशील एकादे वेळीं. सांभाळून रहा बाबा" हे आपल्या बापाचे शब्द आठवल्याबरोबर आपल्या बायकोच्या खांद्यावर मान टाकून तिच्या आसवांत आपली आसवें मिसळून भरून आलेला

ऊर मोकळा करावा असें त्याला वाटलें. पण लगेच दुसऱ्याक्षणींच त्यानें आलेला उमाळा दाबून शांत मुद्रा ठेवली.

त्या दिवसापासून सातप्पाच्या बायकोनें रोज आपल्या नवऱ्याला दोन गोष्टी सांगून पाहाण्याचा यत्न करावा. पण या विषयावर बोलण्याचेंच सातप्पा टाळूं लागला. या आठ दिवसांत सातप्पाच्या बायकोच्या बहिणीची मात्र मोठी केंविलवाणी स्थिति झाली होती. मनांतल्या मनांत ती दुःखानें चूर होनऊ गेली होती. आपला पायागुणच वाईट. जियें जाऊं तियें आपल्या हातून बरें कांहींच व्हावयाचें नाहीं, वाइटाला मात्र निमित्त व्हावयाचें असें शेवटीं तिनें आपल्या बहिणीजवळ बोलून दाखविलें आपणामुळेंच हा सगळा प्रकार घडला म्हणून ती जिवास खाऊं लागली. सातप्पाची बायको वरून म्हणतांना 'हा सगळा आपल्या नवऱ्याचा हट्टी स्वभाव नडतो, "तुझ्याकडे काय त्याचें" असें बहिणीला म्हणाली. पण मनांतून तिनें आपल्या बहिणीच्या पायगुणाला दोष लावलाच.

पिंपळाच्या पारावर झालेल्या प्रकाराला आठ दिवस लोटले होते. नवव्या दिवशींची हकीकत. सातप्पा आपल्या खोपटांत वाकाचे दोर वगैरे वळत बसला होता. तेव्हां सावकाराकडचा एक माणूस येऊन, "सावकार शेतावर आले आहेत. तुला निकडीनें बोलावलें आहे" असें सांगू लागला. आज कांहीं तरी कमीजास्त प्रकार होणार हें सातप्पानें हेरलें होतेंच. तो मुकाट्यानें उठून शेताकडे चालू लागला. त्याच्या पाठोपाठ त्याची बायकोही मुलाला कडेवर घेऊन निघाली.

घनाजी सावकार व त्याच्या बरोबरचीं दोन माणसें विहिरीच्या बारीपाशीं बसलीं होतीं. खालच्या बाजूला सातप्पा आणि त्याच्या मागें त्याची बायको उभी होती. सावकारानें सातप्पाला आज शेवटची संधि दिली होती. आज घनाजी सातप्पाशीं बोलत नव्हता. घनाजीच्या वतीनें त्याच्या बरोबरचा एक गृहस्थ सातप्पाशीं बोलत होता. त्या गृहस्थानें शेताबद्दल लेखी करार नसल्याचें सातप्पाला सांगितलें व उदसाच्या आधींच साल संपल्यामुळें सावकारास आपलें शेत दुसऱ्यास लावतां येतें ही गोष्ट सातप्पाला समजावून सांगितली. गांवांतलीं बाकीचीं करण्यासारखी जीं शेतें होतीं तीं आधींच दुसऱ्यांनीं केल्याचेंही सातप्पास कळविलें अशा परिस्थि-

त्रींत सावकाराच्या शेतिवर सातप्पानें लाथ मारूं नये असें सुचविलें. शेतकऱ्याला प्राणापेक्षां शेताची किम्मत जास्त असते असें त्यानें सातप्पास सांगितलें. सातप्पानेंही सर्व गोष्टी कबूल केल्या व आपण सावकाराचें शेत नेहमीं प्रमाणें करण्यास तयार आहोंत म्हणून म्हटलें. " मग चावडीसमोर चार लोकांदेखत सावकाराच्या पायां पडून चुकलों म्हणा म्हणजे झालं " एवढी गोष्ट मात्र करण्यास सातप्पा तयार नव्हता. सावकाराच्या वतीनें बोलणाऱ्या गृहस्थानें सातप्पाला हें शेत मिळालें नाहीं तर त्याचें कसे हाल होतील, संबंध वर्ष कसें कष्टांत काढावें लागेल याचें वर्णन केलें आणि ही संधि वाया घालवूं नको म्हणून बजावलें. "शेतकऱ्यांना प्राणांहून शेत प्यार असतें " तो म्हणाला. यावर सातप्पा म्हणाला " खरें आहे—पण शेताहून ही मला अभिमान प्यार आहे—"

आतां धनाजी सावकाराला दम धरवेना. त्यांनीं आपल्या माणसास हुकूम दिला. "आतांच्या आतां हें शेत ताब्यांत घ्या आणि या उर्मट पोराचीं जनावरें, बारदान वगैरे बाहेर काढून टाका." त्यानंतर आपल्या वतीनें बोलणाऱ्या गृहस्थाला कर्जाबद्दल कसें करावयाचें असा सूचक प्रश्न विचारला. त्याबरोबर त्या गृहस्थानें तुझे दोन्ही बैल आम्ही कर्जाबद्दल ठेवून घेणार म्हणून कळविलें. यावर सातप्पानें आपण बैल विकूनच तुमचे पैसे देणार होतों—तुम्ही श्रम हलके केले असें उत्तर दिलें. सावकाराच्या लोकांनीं सातप्पाचे बैल आपल्या ताब्यांत ठेवून एक गाय होती ती बांधापलीकडे सोडली. तेव्हां सातप्पाच्या बायकोस फार वाईट वाटलें. आपल्या दोन्ही ढवळ्या बैलाची ताटातूट होणार म्हणून तिचे डोळे भरून आले. आपण जाऊन सावकाराचे पाय धरावे. आणि आमच्यावर आग पाखडूं नकोस म्हणून करुणा भाकावी असें तिच्या मनांत आलें. तिच्या मनांतला हा भाव सातप्पानें तिच्या मुद्रेवरून ताडला. तेव्हां त्यानें आपल्या बायकोकडे डोळेवटारून पाहिलें. त्याबरोबर तिनें तो विचार दूर सारला आणि मुकाट्यानें बिचारी उभी राहिली.

धनाजीची मात या सगळ्या प्रकारामुळें फार निराशा झाली. सातप्पा एथपर्यंत ओढून धरील अशी त्याची कल्पना नव्हती. चावडीसमोर नाहीं तर नाहीं इथल्या इथें जरी त्यानें 'चुकलों' असें म्हटलें असतें तरी या गोष्टीचा

आपण पुकारा करून आपण सातप्पावर मेहेरनजर केली आहे असें जाहीर केलें असतें. त्याच्या अपेक्षेप्रमाणें हा प्रसंग रंगला नाहीं. निदान सातप्पाची बायको तरी पुढें होऊन आपले पाय धरील असें त्याला वाटत होते. पण तसेंही झालें नाहीं. आपण त्याच्याकडून शेत हिसकावून घेतल्यावर व बैल ताब्यांत घेतल्यावर तरी हा वठणीवर येईल अशी त्याची अपेक्षा होती. पण तीही व्यर्थ ठरली. सातप्पाच्या थंड वर्तणुकीनें सगळयांत त्याला जास्त चीड आली. आपणांस बैल देण्यास तो हरकत करील—शिवीगाळ होईल—आपण आपल्या लोकांकडून जबरीनें ते बैल ताब्यांत घेऊं असें एक मिनिटापूर्वी त्याला वाटलें होतें. पण याही बाबतींत निराळा अनुभव आल्यामुळें तो अगदीं संतापून गेला. इतका वेळ तो उघडपणें सातप्पाशीं बोलत नव्हता. पण सातप्पा बांधाच्या बाजूनें संथपणें गाय व वांसरू घेऊन बायकोबरोबर जाऊं लागला तेव्हां धनाजी ओरडून म्हणाला "इतक्यावरच तुझा माझा संबंध तुटला नाहीं, या उर्मटपणाच्यापायीं तुला टाळकं फोडूनही घ्यावें लागेल"

"टाळकं फुटलं तरी तुझ्यापुढें डोस्कं वांकवणार नाहीं." बांधावर उभा राहून सातप्पा म्हणाला "इतकं करूनशानी काय मिळविलं तेंच माझं टाळकं फोडूनही तुला मिळणार आहे—"

तो गेला त्या दिशेकडे पहात धनाजी बराच वेळ विचार करीत होता.

× × × × × ×

आज सकाळीं गांवाच्या वेशीपाशीं गांवकऱ्यांची गर्दी जमली होती. वेशीच्या बाहेरच्या बाजूला एक बैलगाडी उभी होती. सातप्पा आपलें सगळें कुटुंब घेऊन शहरच्या वाटेला आज लागणार होता. गांवकऱ्यांना त्याचा अभिमानी स्वभाव ठाऊक असल्यामुळें आपण कितीही मन वळविण्याचे प्रयत्न केले तरी ते व्यर्थ आहेत असे वाटून ते मुकाट्यानें दुःखित मनानें उभे होते. पुरुष वर्गाची विशेष गडबड दिसत नव्हती. पण बायकांच्या घोळक्यांत हुंदके देत सातप्पाची बायको उभी होती आणि तिला निरोप देणाऱ्या बायकांपैकीं बहुतेकजणी तिच्याबरोबर अश्रु ढाळीत होत्या. कांहींजणी तिला खंडूची काळजी घेण्याबद्दल बजावत होत्या. त्यांची ती माया पाहून आपण माहेर सोडून सासरला चाललों आहों

असेंच तिला वाटलें असेल. तेथें जमलेल्या बायकांपैकीं एकदोन म्हाताऱ्या बायांनीं सावकाराच्या घराकडे वरचेवर हात करून त्याच्यावर शिव्यांची पुष्पांजली वाहण्यास सुरवात केली. हा तमाशा वाढवयाला नको म्हणून सातप्पा गाडीकडे चलण्याविषयीं घाई करीत होता. सातप्पा आणि त्याची बायको व मेव्हणी वेशींतून जाऊं लागलीं तेव्हां गांवकऱ्यांचा जमावही त्यांच्या पाठोपाठ येऊं लागला. एका म्हाताऱ्यानें सातप्पाला रामाची उपमा देऊन तो वनवासाला निघाला आहे असें सुचविलें. दुसऱ्या एकानें रामाप्रमाणें पुरुषार्थ गाजवून खेड्याला परत ये म्हणून त्याला सांगितलें. तिसऱ्या म्हाताऱ्यानें " सातप्पा अगदीं बापाप्रमाणें स्वाभिमानी निघाला आहे. अशा माणसाचें आम्ही म्हाताऱ्यांनीं देखील पाय धरले पाहिजेत " असें सातप्पा पायां पडत असतांना म्हटलें. इतक्यांत सावकार गडबडीनें त्या ठिकाणाकडे येऊं लागला. त्याला पाहतांच सगळयांच्या मुद्रेवर तिरस्काराचा भाव उमटला. त्याला सगळयांनीं वाट दिली. पुरुष सगळे स्तब्ध उभे होते. बायकांत कुजबुज चालू झाली. त्या गर्दीतून सातप्पाच्या जवळ येऊन सावकार म्हणाला " समदी माझीच चूक हाय तूं आपल्या गांवामंदी परत चल " आणि असें म्हणत असतां त्यानें खरोखरीच हात जोडले. हा अनपेक्षीत प्रकार पाहून सगळेजण थक्क होऊन गेले. हरिश्चंद्राप्रमाणें सातप्पाचें केवळ सत्त्व पाहाण्यासाठींच सरकारनें हा प्रकार आरंभला होता काय? कांहीं कां असेना—पण ज्या सावकाराविषयीं एका क्षणापूर्वीं त्यांना तिटकारा वाटत होता, त्याच्याकडे ते सगळेजण आश्चर्यानें व अभिमानपूर्वक प्रेमानें पाहूं लागले. सातप्पालाही आपण जागे आहोंत कां हें स्वप्न आहे असा क्षणभर प्रश्न पडला. धनाजीनें त्यांना फार वेळ घोटाळयांत ठेवलें नाहीं. " शेत व बैल हिसकावून घेऊन काय मिळालें तेंच माझें टाळकें फोडूनही मिळणार आहे " हें सातप्पानें बांधावर उभें राहून शब्द उच्चारले होते त्यांचा धनाजीच्या मनावर फार परिणाम झाला. सातप्पाच्या निग्रहाविषयीं त्याची पक्की खात्री पटली. अशा माणसाचा अंत आपण कितीही पाहिला तरी त्यांत आपणच हरणार आणि त्या निग्रही माणसाचा जय आहे अशी धनाजीची पक्की समजूत झाली. शिवाय त्यानें जो अभिमान धरला तो कोणत्याही वाईट गोष्टीबद्दल नव्हता. त्याची

चूक नव्हती तर त्यानें माफी कां मागावी ? उलट आपणच त्याची माफी मागावयास पाहिजे होती. ती सोडून आपण भलत्याच अभिमानाला पेटलों व ज्या माणसाची सदाचरणाबद्दल वाहवा करावयाची त्याचा उलट आपण छळ आरंभला. अशा तऱ्हेच्या विचारांनीं धनाजीच्या मनाला धक्के दिले व नव्या दृष्टीनें तो सातप्पाच्या वर्तुणुकीकडे पाहूं लागला. तेव्हां त्याचें आचरण सगळ्या दृष्टींनीं कौतुक करण्यासारखें त्याला वाटूं लागलें अशा थोर माणसाला आपण अंतर न देतां त्याला ठेवून घेतलें पाहिजे असें त्याला वाटूं लागलें. पण अभिमान या विचाराच्या आड येऊं लागला. धनाजीचें मन सांगत होतें तूंच सातप्पाची माफी माग— निदान आपण होऊन हें सगळें प्रकरण गोडीनें मिटवून घे. पण संपत्तीचा अभिमान म्हणत होता " नाहीं. तुला वांकावयाचें कारण नाहीं. " या कचाट्यांत आपलें मन सांपडलें होतें असें त्यानें बोलून दाखवलें. पण आतां सगळा गांव सातप्पाला निरोप देण्यासाठीं वेशी- पाशीं लोटला तेव्हां धनाजीचा संपत्तीचा अभिमान पार वितळून गेला आणि तोही गडबडीनें वेशीकडे येण्यास निघाला. " हा तुमचाच खरा जय आहे—माझी चुकी होती तेव्हां मीच माफी मागितली पाहिजे, " असें म्हणून जेव्हां त्यानें पुन्हां हात जोडले तेव्हां सातप्पानें गहिंवरून त्याचे हात धरले आणि वडील माणसांनीं लहानापुढें नम्र होण्याचें कारण नाहीं असें सांगितलें.

# ५ अर्पण-पत्रिका

महायुद्धाच्या समाप्तीनंतर तहाच्या वेळीं झाली नसेल इतकी बाटाघाट त्या वेळीं झाली. प्रत्येक जण आपपाल्यापरी 'प्रचारकाला' सांगत होता. प्रचारक प्रत्येकाचे ऐकत होता. सगळयांच्या सांगण्याचा सारहेतु एकच आणि तो म्हणजे 'प्रचारकानें कांहीं झालें तरी 'विराटा' च्या घरीं जाऊं नये हा होता. ज्यांना कार्यांत विघ्न आणण्याची हातोटी उत्कृष्ट साधली होती असें कांहीं शिष्ट पुढीलप्रमाणें आपलें कार्य साधीत होते-एकजण अगदीं गयावया करून सांगत होता " पहा बुवा-राव-तो विराट म्हणजे नुसता वाघ आहे वाघ-सारखा त्याच्या ओसरीवर इकडून तिकडे येरझारा घालीत असतो. कुणी तरी आपल्या तडाक्यांत सांपडावें आणि नुसते बोलूनच आपण त्याचे तुकडे तुकडे करावे अशा तयारींत असतो "

दुसरा पहिल्याला अनुमोदन देऊन म्हणाला "बरोबर अगदीं बरोबर आहे, आज कांहीं नाहीं तरी दहावर्षें आमच्या गांवांत येऊन त्याला झाले असतील ना-पण शपथ गांवांतल्या एका माणसाशीं बोलला असेल तर-आणि बोललाच-तर एखाद्या कुत्र्यासारखा वसकन् अंगावर येईल-"नंतर प्रचारकाकडे पहात " पहा-बुवा तुमचा विचार काय असेल तो"—

त्यावर तिसरा जणूं कांहीं आपण त्या प्रचारकाला खरोखरच वाघाच्या तोंडून सोडवणार अशा शिफारशीनें म्हणाला "अहो मास्तर-असं करा-तुम्ही तुमच्या जिवाचा तो विमा का काय करतात तो करा-विराटाच्या घरांतून परत न आलांत तरी बायकापोरं अगदींच उघडीं पडणार नाहींत—"

तरी सुद्धां ती शिष्ट-संमत-सर्व-विबोधमाला थांबण्याचें चिन्ह दिसेना. एका बदाद्दरानें पुढील 'पुष्प' गुंफलेंच ! अगदीं नवीन पद्धतीचें लिखाण लिहिण्याचा आव आणून तो सांगूं लागला " तो विराट सत्यशोधक आहे बरं-तुम्ही पांढरपेशाचे-तुम्हाला तर समोर पहातांच नुसत्या नजरेनें तो जाळून टाकायला कमी करणार नाहीं. तुम्ही एवढीं गांवें फिरतां आणि तुम्हाला आम्ही एवढें सांगतों तें ऐकावें इतकें सुद्धां कळत नाहीं. पहा बुवा तुमचा विचार "

प्रचारकानें सगळयांची भाषणें ऐकून घेतलीं आणि शांतपणें त्यानें सर्वांना उत्तर दिलें " तुम्ही सगळयांनीं माझी फार काळजी घेतली आणि कळकळ दाखविली–मी तुमचे उपकार सतत मनांत वागवीन–मात्र मला एवढी एकच गोष्ट मान्य करतां येत नाहीं–माझ्या कार्यांत मला कसूर करून चालणार नाहीं–पहातों एखादें पुस्तक खपलें तर– " इतकें म्हणून पुन्हां त्या लोकाग्रहाला बळी पडून ' जादा खेळ ' करण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून त्यानें आपला 'मुक्काम' बदललाच ! गांवचे शिष्ट लोकांपैकीं कुणी तरी तेवढ्यांच मल्लिनाथी करून म्हणत होता "अहो–एवढें ऐकून जाच–तुमचे पुस्तक नाहीं खपलें तर तुम्ही तरी तेथें खपाल" त्या 'प्रतिभासंपन्न' कोटीनें एकच हंशा पिकला. प्रचारकाच्या कानीं ती हेटाळणी गेली. पण त्याला तिचा पूर्ण अनुभव होता. असल्या साध्या शस्त्रानें तो माघार घेणारा नव्हता. मात्र त्याच्या मनांत एकच विचार आला होता कीं महाराष्ट्राच्या एका खेड्यांत स्वत:विषयीं अशा प्रकारचें विपरीत ग्रह ठेवून राहणारा हा 'विराट' असावा तरी कोण ! केवळ झांकली म्हणून पोकळ मुठीला सवा लाखाची किंमत यावी. तसेंच कांहींसे विराटाच्या बाबतींत झालें. कांहीं कारण नसता त्याच्याभोंवतीं रहस्याचें वलय येऊन पडलें आणि प्रचारक त्या रहस्याचा शोध करण्याकरतां निघाला. गांवाच्या अगदीं एका कोपऱ्याला एका लहानशा उंचवट्यावर 'विराटचें' घर होतें. सकाळची वेळ असल्यामुळें सूर्याचीं कोंवळीं उन्हें त्या घरावर पडलीं होतीं. प्रचारक जसजसा त्या घराजवळ जाऊं लागला तों त्याला त्या घराच्या बारकाया लक्षांत येऊं लागल्या. पुढच्या बाजूला रुंदअसा सोपा होता. सोप्यांतल्या प्रत्येक खांबाला तेलपाणी दिलेलें होतें.आंगण सारवून स्वच्छ ठेविलेलें होतें.फुलझाडें विशेष नव्हतीं.कदाचित् घराच्या मागच्या बाजूला असल्यास प्रचारकाला दिसणें शक्य नव्हतें. आपल्या हातांतली पुस्तकांची 'बॅग' सरसावून नीट धरून आपल्या ' धंद्याची ' सर्व नियमावली आठवून–मन अगदीं शांत करून प्रचारक 'विराटाच्या घराच्या दारांत येऊन थबकला.

××गांवांतली मंडळी प्रचारकाला विरोध करीत होती,त्याच वेळीं विराट आपल्या घरीं प्रचारकाच्या 'स्वागताची अपूर्व तयारी'करीत होता.ओसरीवर त्याचीं लहान मुलें रडत होतीं. घरांत गृहिणी चहाचीं भांडीं विसळत

होती. स्वतः विराट फार मोठ्या उद्योगांत दंग होता. त्यानें हातांत एक दिवा उचलून घेतला आणि आपल्या संसार-सारांतील खास उतारा म्हणण्यास सुरवात केली. अगदीं तीव्र असा संताप ज्या रीतीनें व्यक्त करतां येणें शक्य आहे त्या रीतीनें तो म्हणाला "मी पापी-मी चांडाळ-जगांत दुष्ट पाजी हरामखोर काय तो मी. मलाच कुठें तरफडायला जागा नव्हती म्हणून परमेश्वरानें ह्या जगांत लोटलें,हरेराम-काय विलक्षण जगहे-किती पाजी-केवढा अन्याय चालला आहे-अरे कारट्यांनो-जरा रडणं थांबवा कीं, माझी कांहीं अगदीं लग्नाची टाळी नाहीं लागत, तर तुम्ही तावातावानें हा बेंडबाजा वाजवून राहिला आहांत-आणि[आपल्या दोन वर्षें वयाच्या मुलीकडे पहात ] काय ग-हा दिवा चांगला त्या कोनाड्यांत होत तो इकडे कुणीं ग ठेवला-वय केवढें पण फार बुवा उपद्याप राम राम. नको हा संसार." विराटानें दिवा एका कोनाड्यांत ठेवला. इतक्यांत त्याचा आठ वर्षें वयाचा मुलगा दिगंबर पुढें येऊन म्हणाला "अन् बाबा-माझी अंकलपी अं-अं" विराटानें आपल्या चिरंजीवाकडे पाहिलें आणि त्याचा कान धरून तो म्हणाला "अरे गाढवा-आठवर्षांचा झाला आहेस तरी माझी अंकलपी-अरे काय आहे कायहे. कां तुम्ही सारे मला असें सतावता ? छे छे-कहर आहे बुवा नुसता. इतक्यांत आंतून आवाज आला " आणि-हें पाहिलंत कां" यावर विराटानें तितक्याच दक्षतेनें (!) उत्तर दिलें " हो हो. जन्म झाल्यापासून मी सारं पाहातोंच आहे बरं. अजून कांहीं माझे डोळे गेले नाहींत अं-तुला पाहातों-तुझ्या मुलांनां पाहातों-सारं सारं पाहातों बरं-घरांत कांहीं जिन्नस नसला तर 'हें पाहिलंत कां' म्हणून दाखवायला कशाला हवं' कळतं मला काय घरांत आहे नाहीं. सगळं कळतं आणि दिसतं. पण त्यानंतर विराट तेथें थांबला नाहीं. त्यानें हातांत पुढील सोपा झाडण्याकरतां म्हणून लक्ष्मी घेतली आणि बाहेर आला. दारापाशींच प्रचारक उभा होता. दोघांनीं एकमेकांकडे पाहिलें. प्रचारकानें घरांतील वाग्युद्धाची 'रम्य वार्ता' श्रवण केली होती. बोलण्याला सुरवात कशी करावी ह्या विचारांत तो होता पण विराटानें तें जाणून त्यास थांबवीत तो म्हणाला "पुरे -पुरे अगदीं चकार शब्द बोलूं नका-मी अगदीं कंटाळून गेलों आहे

ह्या बोलण्याला—असा एक क्षण कांहीं मला आठवत नाहीं कीं जेव्हां जगांत चहूंकडे शांतता असेल—अहो काय आहे काय हें. आपले उठले चालले दारोदार भीक मागायला—आणि तें काय आहे त्या पिशवींत. पुस्तकं वाटतं. वाङ्मयप्रेमी दिसतां—या या आमच्या घरीं या आणि पाहा एखादं पुस्तक खपतं कां—हं चालूं द्या—अहो असे मुखस्तंभासारखे उभे काय राहिलात. करा सुरवात. आमचा देश फार उच्च आहे. आज-काल माला अन् मासिकें फार झालीं आहेत. समाजाला उत्कृष्ट वळण लावण्याकरतां आमच्या मालेचा जन्म आहे" हं चालूं द्या—आमचें नवें पुस्तक—" प्रचारकानें तेवढ्यांत आपलें नवें पुस्तक उघडून विराटाच्या हातीं दिलें. पुस्तकावर असलेलें लेखकाचें नांव वाचून मात्र विराटाची आतांपर्यंत चाललेली बडबड किंचित् शांत झाली. त्यानें पुस्तक उघडून पाहिलें. त्याला काय वाटलें कुणाला ठाऊक. त्यानें हातांतली केरसुणी तिर्यंच टाकली आणि प्रचारकाला आंत बोलावलें. दोघेंही खालीं बसले. प्रचारकानें खोली 'पाहाण्यास' सुरवात केली. भिंतीला तसबिरी अशा तीनच होत्या. त्यांपैकीं मध्यभागीं सरस्वतीचें चित्र होतें. त्याच्याच बाजूला बराच धुराळा बसलेलें कुणाच्या तरी नांवाचे एक सर्टिफिकेट होतें. आणि तिसऱ्या चित्रावर तर अर्धी बाजू कागदानें झकवून टाकल्यामुळेंच एकच उभ्या माणसाचा चेहरा दिसत होता. एका तुळईवर खडूनें जाड अक्षरांत पुढील ओळी लिहिलेल्या होत्या.

"निष्प्रेम चिरंजीवन ते—जगीं दगडालाही मिळतें"

"गोविंदाग्रज"

एक पुस्तकाचें लहानसें कपाट होतें. प्रचारकाची नजर आशेनें प्रथम त्या कपाटाकडे गेली, विराटाला पुस्तकांचा नाद आहे तर त्यापुढें आपलें पुस्तक कसें खपवावें, काय युक्तीनें तें विराटाच्या माथीं मारावें' ह्याचा तो विचार करूं लागला!

विराट पुस्तकाची अर्पणपत्रिका वाचीत होता. नंतर त्यानें तें पुस्तक चाळल्यासारखें केलें आणि पुन्हां आपल्या भाषणाला सुरवात केली. तो पहिल्यासारखाच भरमसाट बोलत होता, पण त्याच्या स्वराकडे अगदीं बारीक रीतीनें लक्ष देणाराला किंचित् फरक दिसला असता. विराट

प्रचारकाला सांगूं लागला "हें आपलें नवें पुस्तक आणि हे आपले नवे लेखक. काय नांव. 'कपोत' मी सांगतों तुम्हांला अगदीं गैरविश्वासाचा माणूस—इतका नीच इसम साऱ्या जगांत नाहीं. हा काय नीतीचीं तत्त्वें सांगणार आणि वाङ्मयांत भर टाकणार. सगळाच पाजीपणा आहे झालें, अगदीं अंधार आहे तुमच्या त्या वाङ्मयाच्या राज्यांत असले लोक जेव्हां लेखक म्हणून मिरवूं लागतात." प्रचारकानें अगदीं अचूक प्रश्न केला "तुम्ही आमच्या 'कपोतां'ना ओळखता तर एकूण?" आतांपर्यंत अस्खलित असलेला विराट गडबडला. तरीपण सांवरून त्यानें उत्तर दिलें. "अहो मी साऱ्या जगाला ओळखतों. जगच मला ओळखीत नाहीं—समजलांत—हा कपोत--आतां तुमच्या मालेचा लेखकच आहे तो--तो जर भेटला तर त्याला खडखडीत सांगा कीं तूं ज्याला मोठ्या गौरवानें हें पुस्तक अर्पण केलें आहेस तो लवकरच ह्या अर्पण--पत्रिकेबद्दल तुझ्यावर बदनामीची फिर्याद करणार आहे." प्रचारकाला विराटाच्या भाषणाचा उमजच पडेना, कारण पुस्तक ज्याला अर्पण केलें होतें त्याच्यामागें "कै." असें लिहिलें होतें. तेव्हां जर तो गृहस्थ जिवंतच नाहीं तर तो फिर्याद तरी काय करणार आणि कशी करणार! हळूच प्रचारकानें आपली शंका पुढें मांडली. "पण सदरहू गृहस्थ मृत आहेत तर मग—!" विराटानें त्याला मध्येंच थांबविलें व म्हटलें "तर मग काय—तुमच्या कपोताला मी पाजी म्हणतों तो एवढ्याचसाठीं बरं. तो गृहस्थ जिवंत आहे कां मेला आहे ह्याची विचारपूस नाहीं. आहे कीं नाहीं तऱ्हा!"

प्रचारकाला कळेना कीं हा गृहस्थ आपण जें म्हणतों त्या प्रत्येक गोष्टीच्या विरुद्ध तर बोलतोच आहे पण शिवाय कपोताविषयींचा विपर्यस्त ग्रह अजब आहे. ह्या ठिकाणीं असल्या रीतीनें आपलें काम साधणार नाहीं, तेव्हां निरोप घ्यावा म्हणून तो म्हणाला "आपलं एकंदर पुस्तकं आणि लेखकवर्ग ह्यांच्याविषयीं फार वाईट मत असावं असं आपल्या बोलण्यावरून अनुमान करायला कांहींच हरकत नाहीं. बरं आहे. आपल्याला निष्कारण श्रम पडले. अधिक कशाचीही अपेक्षा न करतां रजा घेतो." विराटानें त्यावर किंचित् हसून उत्तर केलें "मला तरी तुम्ही फारच हे दिसतां, माझं पुस्तकाविषयीं वाईट मत असेल, स्वतःला लेखक

म्हणून गुडघ्याला बाशिंग बांधून हिंडणाऱ्या पोराटोरांच्या बद्दलही मला नसेल आदर वाटत, म्हणून तुम्ही मला मूर्ख अथवा असभ्य तर समजत नाहीना ? तुम्ही माझ्या घरीं आलांत मला अतिथिधर्म पाळलाच पाहिजे-" आंत आपल्या गृहिणीला उद्देशून "हं एका कपांत दूध आणा पाहूं गरम करून," प्रचारकाला बसणें भाग पडलें मात्र विराटाच्या स्वभावांतला तो विरोध त्याच्या मनाला लागून राहिला. आंतून एका स्त्रीनें दुधाचा पेला आणून ठेवला. प्रचारकाच्या मनांत कां कुणास ठाऊक-एक नाजुक प्रश्न उत्पन्न झाला. सदोदित आपल्या तोंडाची अशी तोफ चालू ठेवणाऱ्या विराटापासून ह्या स्त्रीला कितपत सुख होत असावें हा विचार मनांत येऊन त्यानें शोधक नजरेनें तिच्याकडे पाहिलें. आरोग्य आणि पावित्र्य ह्यांचा तिच्या मुखावर अल्हादकारक संगम झालेला दिसत होता. आणि तिच्या डोळ्यांत—पण तितक्यांत ती स्त्री आंत निघून गेली. प्रचारकाची जिज्ञासा अतृप्त राहिली. त्यानें पेल्यांतलें दूध पिण्यास सुरवात केली. इतक्यांत एक शेतकऱ्याचा आठ वर्षांचा मुलगा हातांत दप्तर घेऊन आला. आपलें आसन त्यानें बरोबर आणलें होतें. ते एका कोपऱ्यांत टाकून तो त्यावर बसला. विराटानें त्याला विचारलें "कायरे—खंड्या एकटाच आलास, बाकीचीं मुलं कुठं आहेत." खंडोबानें उत्तर दिलें, "मास्तर—राम्या गेला बैल चारायला, अन् हरी खेळतोय बेदूल—तव्हां मीच आलो एकलां" विराटानें पुन्हा विचारलें, "बरं कालच्या छड्या राहिल्या आहेत ना—कर हात पुढं" विराटाच्या स्वरांत उल्हास स्पष्टपणें दिसत होता. खंड्याही त्यावर खुषीत येऊन म्हणाला, "नका—मास्तर छडी नका मारूं. माझा बापच शाळेंत नाहीं धाडायचा बगा. आज अभ्यास सांगा, अन् उद्यांच द्या, दोनीबी दिसाच्या छड्या. आपलं दिगुअण्णा कुठं हायती, पण—तेना नाहीं वाटतं लिवायचं आज" विराटानें आपल्या मुलाला पुकारलें. शाळा सुरू झाली. प्रचारक उठला. विराटानें त्याला निरोप दिला. मात्र त्यानें कपोतानें लिहिलेलें पुस्तक भर आकार देऊन विकत घेतलें. प्रचारकाला आपलें एक पुस्तक खपलें याचा आनंद झाला. पण विशेषतः विराटाच्या वर्तनांतले गूढ कांहीं केल्या त्याला चैन पडूं देईना. आपल्या घरीं परत

येईपर्यंत तो तें गूढ उकलण्याचा प्रयत्न करीत होता. एखादं अक्षराचें कुलूप तों एक विशिष्ट शब्द तयार होईपर्यंत उघडत नाहीं त्याचप्रमाणें विराटाच्या जीवनाचें रहस्य हातीं येऊनसुद्धां प्रचारकाला तें उकलतां आलें नाहीं. उलट तो अधिकाधिक घोंटाळतच चालला. एक गोष्ट मात्र त्यानें मनाशीं पक्की ठरवली कीं, कपोताचा ह्या रहस्याशीं कांहीतरी संबंध आहे खास! प्रचारकाला विराटाच्या घरीं टांगलेल्या सर्टिफिकेटाची आठवण झाली. विराट मुंबई विश्वविद्यालयाचा पदवीवर होता. मग इतकें 'उच्च' शिक्षण घेऊन विराट एका खेड्यांत कां येऊन राहिला? प्रचारकाचें रहस्य गूढतर होत चाललें.

विराटानें खंडू आणि दिगंबर ह्यांचा अभ्यास घेतला व नंतर दोघेही खेळण्याकरतां बाहेर पडले. विराट आपल्या ओसरीवरच येरझारा घालीत होती. त्याचें लक्ष तुळइकडे गेलें. "निष्प्रेम चिरंजीवन–" विराटानें त्या ओळी वाचल्या;एक निश्वास सोडला आणि स्वतःशीच तो म्हणाला "झालं हें बरं झालं–मनाचा हौस फिटली एकदांची कपोताला शिव्या देऊन आजपर्यंत मनांत सांठलेल्या आवेगाला वाट मिळाली–बरं झालं.

आकाशाच्या मध्यभागावर आलेल्या सूर्याच्या तापानें सर्व वस्तूमात्रावर प्रभाव गाजवला होता. परंतु एक प्रवासी मात्र तशा उन्हांतही 'विराटाच्या' गांवची वाट चालत होता. खेडेगांवातली वांकडीं तिकडी वळणें त्याच्या परिचयाची नव्हती. मध्यें तो रस्ता चुके पण पुन्हां विचार करून मार्गावर येई. शेवटीं तो मारुतीच्या देवळाजवळ येऊन पोहोंचला. सावलीची जागा आली तरी विश्रांति घेण्याचा त्याचा विचार दिसेना खिशांतून त्यानें घड्याळ काढून पाहिलें. 'साडे बारा' एवढाच उद्गार त्याच्या तोंडांतून निघाला. एक कुणबी आपल्या कानाच्या चाफ्याला गंधाचें टिळे लावून मारुतीला पाणी घालण्याकरतां आला. प्रवाशानें त्याला विचारलें "विराट कुठें रहातात?" कुणब्यानें प्रथम देवाला पाणी घातलें आणि नंतर त्यानेंच उलट प्रश्न केला "आमच्या खेड्याचे मास्तर व्हय?" प्रवाशी गोंधळांत पडला तरी त्यानें होकार भरला. त्यावर कुणबी म्हणाला "लई बेस माणूस–त्या वरल्या अंगास टेकाडावर रहातो जा मोहरं–अन् थोड वळा डाव्या अंगाला–है तथच है–ते घर–!" प्रवाशी निर्दिष्ट मार्गानें

निघाला. विराटाच्या घराजवळ अत्यंत उत्कंठेनें तो येऊन पोहोंचला. घराला कुलूप होतें. परीक्षेचा निकाल पहाण्यास गेलेल्या उमेदवाराला यथ-यादींत आपलें नांव नाहीं हें पाहून त्याचा जसा विरस होतो तशीच प्रवाशाची स्थिति झाली. हताशपणें त्यानें हातांतली वळकटी खालीं टाकली आणि तो खालीं बसला. त्यानें एक सुस्कारा सोडला. स्वतःशीच तो म्हणाला " घर तर हेंच. प्रचारकानें सांगितलेल्या बहुतेक खुणा जुळ-तात. मग आठच दिवसांत ही स्वारी गेली तरी कुठें ? " त्या प्रवाशाचें आत्मगत ' भाषण ' संपतें न संपतें तोंच त्याच्या कानीं कुणीतरी मोठ-मोठ्यानें वाचीत असल्याचें आलें. कुलूप लावून बंद केलेल्या घरांत माणसं असूं शकतात ह्या जाणिवेनें प्रवाशी चपापला. त्यानें बहुधा तुरुंग पाहिले नसावेत किंवा त्या वेळीं तरी त्याच्या ध्यानीं तुरुंगाचा दाखला आला नसावा. तो उठला आणि घराच्या बाजूनें चालू लागला. जाड गज ठोकलेली एक जाळी होती. तेथून प्रवाशानें आंत पाहिलें आणि तो क्षणभर स्तब्ध उभा राहिला. त्याच्या नजरेला जें दृश्य पडलें त्यामुळें त्याच्या वृत्ति उचंबळून गेल्या असाव्यात. आंतल्या बाजूला विराट आनं-दांत तल्लीन होऊन एक पुस्तक वाचीत होता. मधूनच स्वारी पुस्तकां-तल्या एखाद्या कल्पनेवर खूष होई आणि आनंदानें मान डोलवी. पुन्हां वाचन सुरूं होई. विराटानें सहज त्या जाळीकडे पाहिलें. कुणीतरी व्यक्ति तेथें उभी असावी असा त्याला भास झाला. पण तो भास इतका चम-त्कारीक होता किं विराटाचा त्या भासावर विश्वास बसेना. त्याला वाटत होतें कीं ' कपोत ' उभा असावा. विराटानें डोळे ताणून पाहिलें आणि अत्यंत चकित होऊन प्रश्न केला " कोण आपण ? "

प्रवाशानें उत्तर दिलें " मी कपोत ! "

दोघेही किंचित्काल स्तब्ध झाले. एकाच प्रश्नोत्तरानें दोघांच्याही मनांत प्रचंड खळबळ उडाली असावी. पुन्हा तुटक प्रश्नोत्तरें सुरू झालीं.

विराटानें विचारलें " कपोत–मग इथें कां आलांत ? "

कपोतानें प्रश्न करूनच उत्तर दिलें " आपण इथें कां राहिलांत ?"

हा झाला कुशलसमाचार ! विराट मनांतल्या मनांत अगदीं क्षुब्ध झाला

होतां. मग तो रागानें अथवा अनुरागानें हें समजणें शक्य नव्हतें. पुन्हां प्रश्नोत्तरें सुरू झालीं.

विराटः—आपण ही अर्पणपत्रिका लिहिलीत !

कपोतः—हो.

विराटः—आणि ज्याला पुस्तक अर्पण केलें तो जिवंत नाहीं. असें आपल्याला वाटत होतें हें कशावरून ?

कपोतः—मला ज्या अर्थी गेल्या दहा वर्षांत तो भेटला नाहीं—

विराटः—त्या अर्थी तो मेलाच असला पाहिजे. जगांतल्या तुम्हांला न भेटणाऱ्या माणसांना जिवंत राहायचा हक्कच नाहीं वाटतें ?

कपोतः—पण मी त्याचा पुष्कळ शोध केला—

विराटः—हरवलेल्या मुलाची वर्तमानपत्रांतून जाहिरात देतात तशी एखादी त्याच्या नांवाची जाहिरात नाहीं दिली कां ! खासा न्याय—

कपोतः—पण तूं ह्या खेड्यांत का राहिलास—? स्वतःला एकेरीपणानें संबोधलेलें पाहून विराट एकेरीवर आला. अगतिक होऊन त्यानें कपोतोला विचारलें " मी खेड्यांत येऊन राहिलों. तेथें सुद्धां माझा छळ करायला तूं हजर आहेसच ? छे छे. इतका दीर्घद्वेषी माणूस मीं जन्मांत पाहिला नाहीं. दहा वर्षांपूर्वी माझ्या कवितांची टर करून मला जगांतून उठवलंस—?

त्याला थांबवून कपोत म्हणाला, "तुझी चूक होते आहे. तो लेख माझें नांव घेऊन दुसऱ्यानेंच लिहिला—तुझ्या माझ्या स्नेहांत बिब्बा घालण्याकरितां 'शिखंडी' नें तो पाजीपणा केला. इतक्या वर्षांनंतर सुद्धां तुला माझ्या शब्दाची खात्री पटत नाहीं कां ! " कपोताच्या स्वरांतली कारुण्याची झार विराटाला झोंबली असावी. त्यानें आपलें आसन सोडलें जाळीच्या तोंडाशीं येऊन अगदीं आतुरतेनें त्यानें प्रश्न केला, " हें खरं कां " कपोतानें उत्तर दिलें, " अगदीं—खरें—शपथ तरी कशाची वाहूं म्हणजे तुझी खात्री पटेल. " विराटानें जाळींतून आपला हात बाहेर काढला. कपोतानें एखाद्या बुभुक्षिताप्रमाणें तो हात धरला. कपोताच्या डोळयांतून अश्रू वाहात होते. विराटाच्या डोळयांच्या कडा ओलसर झाल्या होत्या. भावनेचा आवेग किंचित् कमी होतांच विराट म्हणाला "पण तूं

घरांत येना !" तशा स्थितींतही कपोताला हसूं आलें. आपण स्वतः आंत कोंडले गेलों आहोंत ह्याचा विचारच विराटाच्या डोक्यांत नव्हता. कपोतानें सहजपणें सांगितलें "दाराला कुलूप आहे" विराटाच्या डोक्यांत प्रकाश पडला. घरांतली चीजवस्त घराला पारखी होऊं नये म्हणून नदीवर जातांना आपल्याला कोंडून ठेवून जाण्याचा आपल्या स्त्रीचा रोजचाच परिपाठ असल्याचें त्याच्या ध्यानांत आलें.

दहा वर्षांनंतर दूर झालेलें मनोमालिन्य दोघांनाही सुखकर झालें. दोघांच्याही वृत्ति दहावर्षांपूर्वीच्या रमणीय स्मृतींत उल्हासानें हंसूं लागल्या. दोघांनाही तीव्र इच्छा उत्पन्न झाली कीं, एकमेकांना कडकडून भेटावें. पण एक बंदिवान तर दुसरा मोकळा असूनही बंदिवानच होता. प्रेमानें बेहोष झालेल्या हृदयांना असं आडवण्यांतच जगाला मौज वाटत असेल काय ?

दुर्गाबाई—विराटाची स्त्री—नदीवरून परतली. तिच्या कमरेवर धुण्याचा 'डोंगर' होता. दिगंबर पायाला चटके बसत होते तरी आईला 'सोबत' करीत होता. दुर्गाबाई दाराशीं येऊन पोहोंचल्या. वळकटी पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. त्यांनीं घाईघाईनें कुलूप काढलें. ओसरीवर विराट बसला होता आणि कोणाशीं तरी बोलण्यांत तल्लीन झाला होता. दुर्गाबाईनें धुणें आंत ठेवलें आणि थोडा वेळ वाट पाहिली. नंतर विराटाला उद्देशून त्या म्हणाल्या "हें काय तें—पाहुण्यांना आंत नाहीं वाटतं बोलवायचं—आपलं खुशाल त्यांना उन्हांत उभं करून बोलणं चालवलं आहे—बाई बाई शर्थ झाली हो आतां मात्र—बोलून बोलून घरांतलीं माणसं छळतां तें थोडं झालं आणि आतां— !" इतक्या भाषणानें विराट 'सावध' झाला. त्यानें हसून आपल्या बायकोकडे पाहिलें. दुर्गाबाईच्या सर्व श्रमांचे परिमार्जन झालें. आपल्या बायकोचाच दोष असून ती आपल्याला बोलते हें त्याला पटलें नाहीं. त्यानें कपोताला आंत बोलावलें आणि तो दुर्गाबाईला म्हणाला "बाहेरच्या दाराला आपण कुलूप लावून जायचं मग बाहेरच्या माणसांनीं आंत यावं कसं—हा माझा मित्र दहा वर्षांनीं माझ्याकडे आला आणि तुझ्यामुळें त्याला उन्हांत तिष्ठत राहावं लागलं—" दुर्गाबाई तयारच होत्या. त्यांनीं पण उत्तर दिलें. "पुरे हो—मागचं दार नव्हतं का उघडं ठेवलेलं. आपल्याच नादांत असा-

यचं न् दुसऱ्याला बोलायचं!" पतिपत्नीसंवाद थांबला. दुर्गाबाई पाहुण्याकरितां जेवणाची तयारी करूं लागल्या.

इतक्यांत दिगंबर हातांत एक पुस्तक घेऊन आला व म्हणाला "बाबा-बाबा, हा शब्द काय हो–" विराटानें पाहिलें तों कपोताच्या पुस्तकांतल्या अर्पण-पत्रिकेंतला तो पहिला शब्द. विराट म्हणाला "हं वाच. मी सांगतों तसं तसं वाच. आपल्या काकाला दाखव आपलं ज्ञान–हं–अर्पण-पत्रिका." दिगंबर वाचूं लागला.

"माझा अत्यंत जिवलग स्नेही आणि अभिजात कवी कै. विराट.

तुझ्याच सहृदयतेनें आणि रसिकतेनें माझें वाङ्मय जन्मास येत आहे. तेव्हां तें अत्यंत प्रेमादरपूर्वक तुलाच अर्पण असो."

कपोत.

दिगंबर ती अर्पणपत्रिका वाचून म्हणाला–"बाबा, इतकं अवघड पुस्तक नको. मला आपली अंकलिपीच द्या. विराट त्यावर म्हणाला, "अरे–तुझा हा लेखक काका आला आहे ना. आतां अंकलिपीच काय–ज्ञानकोश माग–आणून देतों. ह्यापुढें अगदीं चैन करायची बरं कां"

त्याला मध्येंच थांबवून कपोत म्हणाला "पण विराट, आधीं तुझ्या कविता—"

विराट उठला आणि त्वेषानें म्हणाला "पुन्हां माझ्या कवितेचें नांव घेशील तर तुला ह्या घरांत थारा मिळणार नाहीं. समजलास"

कपोताला कळेना कीं ह्या स्वभावाला औषध काय!

# ६ चांडाळीण !

— १ —

रविवारचा दिवस. सकाळची वेळ. सातसाडेसातांचा सुमार असेल. तासाभरापूर्वीच विष्णुपंत आपलं सगळं आन्हिक आटोपून कांहीं कामासाठीं म्हणून बाहेर गेले होते. लक्ष्मीबाई आंत इकडचं तिकडचं काम आवरीत होत्या. हपीसाची घाई नव्हती म्हणजे जेवायचीही घाई नव्हती त्यांत विष्णुपंत बारा साडेबारा वाजतां येणार होते, म्हणून आज त्यांनीं थोडंसं अडगळीचं काम काढलं होतं. सातआठ वर्षांचा नाना बाहेरच्या खोलींत खेळत बसला होता. विष्णुपंतांनीं सातआठदिवसांपूर्वी त्याला एक किल्लीची आगगाडी आणून दिली होती. त्याला एकच डबा होता. आणि नानाला तर "ह्या गांवापासून त्या गांवापर्यंत लांबच्या लांब आगगाडी पाहिजे होती. तेव्हां विष्णुपंतांनीं त्याला युक्ति सांगितली कीं, इंजनाच्या पाठीमागें काड्यांच्या पेट्या लाव म्हणजे झालें. ते तुझ्या गाडीचे मालाचे डबे म्हणावेत बरं का ! नानाला तें पटलं. तसं करून लांबच्या लांब गाडी झाल्यावर तो एकदां दोन्ही हात वर करून होः होः होः करीत हंसला. आतांसुद्धां तो बाहेर आगगाडीच जोडत बसला होता. " आगगाडी आमची लांब लांब ! आगगाडी आमची छान छान ! आगगाडी आमची छुंदर छुंदर ! आगगाडी आमची–आमची–" असें त्याचें तोंडानें कांहीं तरी बडबडणंही चाललं होतं. मध्येंच तें गाणं बंद पडून " कश्शासाठीं इंग्रज्जाच्या पोटासाठीं, कश्शासाठीं–" असलं कांहींतरी सुरू होई.

तोंच विष्णुपंतांचे अगदीं लहानपणापासूनचे अतीशय जिव्हाळ्याचे स्नेही माधवराव " अरे विष्णुपंत अरे विष्णुपंत " असं बाहेरूनच मोठमोठ्यानें ओरडत घरांत शिरले. त्यांच्या त्या हांका ऐकून लक्ष्मीबाई दोन्ही कानांवर हात ठेवीत आणि नाकाला मुरकुत्या घालीत अगदीं त्रासल्या-

सारखा चेहरा करून म्हणाल्या " रामा–रामा–रामा" काय कर्कशशा तरी ! कानठळया बसून गेल्या अगदीं, पहिल्या जल्मीं कुठल्या आगगाडीचं इंजन होता कुणाला ठावूक म्हादेव भावजी ! "

" आहो इतका ओरडत आलों तुमच्या कानठळयासुद्धां बसल्या तरी पंत्या लेकाचा ओ देतो आहे काय पाहा कीं—म्हणजे कुठं बाहेर गेला वाटतं ! मी त्याला मुद्दाम सांगितलं होतं. मी आल्याशिवाय कुठं जाऊं नको म्हणून—तें कांहीं नाहीं. आतां माझ्या एकट्यासाठीं चहा केला पाहिजे तुम्हाला लक्ष्मीवहिनी. हा पळून जाईल म्हणून मी घरांत चहा सुद्धां घेतला नाहीं—"

" एवढंच—"

" एवढंच नाहीं न् तेवढंच नाहीं. अगोदर चहा ठेवा, पोहे भिजवा न् मग बोलायला लागा—तें हातांतलं कामसुद्धां राहूं दे तसंच. किती वेळ झाला चहा घेऊन तुम्हांला कांहीं कल्पना आहे. काल पांच साडे पांच वाजतां एकदां चहा घेतला होता, त्यावर अझून नाहीं—आतां उगीच हसूं नका—"

लक्ष्मीबाईनीं चहा ठेवला. इतक्यांत नानानें त्यांना विचारलें. "महादेव काका तुम्ही पहिल्या जन्मीं इंजन होता मग माझ्या या इंजनांतनं भक् भक् भक् असा धूर कसा निघेल सांगा बरं—"

लक्ष्मीबाई आंतूनच थोडें मोठ्या स्वरानें म्हणल्या. " हं नान्या, असं म्हणूं नये—माणसं कधीं इंजनं असतात काय !

आईचा राग भरण्याचा सूर ऐकून नाना गप्प बसून तो पुन्हां आपल्या आगगाडींत रमला. माधवराव लक्ष्मीबाईला उद्देशून म्हणाले, मोठ्या माणसांनीं सांगितल्यावर लहान पोरं तसं म्हणायचींच ! "

" खापरांच्यापुढं बोलायची अगदीं सोय नाहीं कशी ती ! "

" नाहींच नाहीं. 'माधवराव म्हणाले' "अहो सासूसासऱ्याला भ्यायला नसाल किंवा विष्णुपंतांशीं सुद्धां जितकं मर्यादेनं वागला नसाल तितकं थोरांनीं मुलांना भ्यायलं पाहिजे किंवा त्यांच्यापुढं मर्यादेनं वागलं पाहिजे"

" तर–तर– " म्हणत लक्ष्मीबाईनीं माधवरावांच्या पुढें कप ठेवला आणि त्या आपल्या कामाला लागल्या.

चहा वगैरे घेऊन झाल्यावर माधवराव घरीं जाण्यासाठीं उठले. पायांत पायताण घालून बाहेर जातां जातां दारांत उभे राहून ते लक्ष्मीबाईंना म्हणाले. "विष्णुपंत येण्याबरोबर त्याला आमच्या घरीं पाठवा बरं का! इतकं सांगितलं असून माझी वाट न पाहातां निघून गेला त्याचा त्याला जाब विचारणार आहे."

"बरं आहे. विचारी. शिक्षासुद्धां योजून ठेवा."

— २ —

तास दीड तास झाला. लक्ष्मीबाईंनीं काम बरेंच आवरलें. केरवीर काढून झाला. आतां चुलीपुढचें मांडून घ्यायची वेळ झाली. इतक्यांत नाना आला आणि म्हणाला, "आई भूक लागली मला, जेवायला वाढ, नाहींतर कालचा लाडू दे."

"बरं देतें हं एक घटकाभर खेळ. एवढं चुलीपुढचं काढून घेतें हाता-सरशी. मग तुला रात्रींचा भात आहे तो घालते."

"अँ अँ मला शिळा भात नको. मला आपला लाडूच दे"

"बरं लाडू देतें. एक घटकाभर खेळ."

हंऽ हंऽ हंऽ आई लाडू देतेऽ देते लाडू देतेऽ" असें सुरावर म्हणत म्हणत नाना पुन्हां आगगाडीकडे गेला.

लक्ष्मीबाई चुलीपुढचं काढूं लागल्या. विष्णुपंतांनीं काल भाजी आणली पण मिरच्याकोथिंबिर आणली नाहीं. "भाजी आणल्यावर मिरच्याकोथिं-बीर आणायला सांगायला कां पाहिजे असतं! जिन्नस मातर चांगले चांगले पाहिजेत आणि त्याला लागणारं सामान मातर आणायचं नाहीं. मग बायकोनं काय रडायचं त्या जिनसापुढं बसून. नाना, नाना, अरे नाना—"

"ओ ऽ काय आलों हं."

"नान्या, अरे नान्या, ऐकूं येत नाहीं वाटतं!"

"मी ओ दिली आणि आलों म्हटलं ना"

त्याच्याकडे थोडसें डोळे वटारून पाहिल्यावर लक्ष्मीबाई म्हणाल्या, " फाजील. हांक मारल्याबरोबर पुन्हां ओ तरी देऊं नको म्हणजे मग सांगतें—"

नाना यावर कांहींच बोलला नाहीं. त्यानें आपलं हिरमुसलें झालेलें तोंड खालीं केलं. लक्ष्मीबाई पुढें म्हणाल्या. " हे दोन आणे घे. एक पैशाचं मिरच्या आण, एक पैशाची कोथिंबीर आण, आणि दोन पैशाचा एक लिंबू आण. लिंबू चांगलं बघून आण. जिन्नस झाले चार पैशांचे. चार पैसे परत येतील. जा नीट जपून आण हरवूंबिरवूं नको. लिंबू वाईट लागलं तर परत देईन म्हणावं. जा."

" मला भूक लागली कीं. लाडू खातों न् मग जातों अंऽ"

कांहींशा काकुळतीनें तर कांहींशा लाडिकपणें मान वांकडी करीत नाना म्हणाला.

" नको. अगोदर आण जा. आतां येशील धांवत. तुला येण्याबरोबर देतें. इथं काढूनच ठेवतें बघ. जा."

" मला भूक लागलीय कीं ग. खरंच, बघ पाहिजेल तर लाडू खाण्याबरोबर पळत पळत जाऊन तुला मिरच्या लिंबू, कोथिंबीर सगळं लवकर आणून देतों."

नानाच्या त्या साध्या बोलण्यांत केवढा आर्जवीपणा दिसत होता. पण मुलांच्याच मर्जीप्रमाणं वागलं तर पुढं तीं डोक्यावर मिरीं वाटायचीं— आणि शेजारच्या बळवंतराव रमाकाकूसारखी स्थिति व्हायची म्हणून लक्ष्मीबाई पहिल्यापासून मुलांबरोबर फार जपून वागत होत्या. नानाची ती आपली आवज्ञा करण्याची बुद्धि त्यांना अगदीं सहन झाली नाहीं. त्याला लगीच डोळे मोठे करून नानावर थोडं खें कसून म्हणाल्या,

" उगीच फाजीलपणा करूं नकोस. मुलांनीं सांगितलं तसं ऐकावं. जा अगोदर बाजारांतनं आल्याशिवाय तुला लाडूही मिळायचा नाहीं, आणि जेवायलाही मिळायचं नाहीं. उलट गेला नाहींस म्हणून एक तोडांत मातर मिळेल. सांगून ठेवतें जा. ठावूक आहे मला. इतकीं कांहीं आंतडीं तुटायला लागलीं नाहींत भुकेनं. खेळायच्या नादांत असतास पर

आणखी तासभरसुद्धां रमला असतास—जा. सांगितलं तें अगोदर घेऊन ये..."

लक्ष्मीबाईंनीं नानाच्या हाताला धरून दाराच्या बाहेरही उभा केला. नानाच्या चेहऱ्यावर संताप आणि निरुपाय दिसत होता. बाहेर गेल्यावर सुद्धां थोडंस तो कुन्हकुरळ पण गेल्याशिवाय इलाज नाहीं हें त्याला समजलें आणि घराच्या बाहेर गेल्यावर घरांतलं सगळं विसरून मांजरासारखी एक टुण्दिशी उडी मारली आणि बाजाराकडे निघाला. आगगाडी त्याच्या मनांत घोळत होतीच. उडी मारल्याबरोबर त्याला आगगाडीसारखं पळत जाण्याची हुकी आली. लागलीच त्यानें तोंडानं इंजनच्या शिळीसारखा आवाज काढला. आणि चाके फिरवणारा दांडा म्हणून कोपरापासून दोन्ही हात मागेंपुढें फिरवीत तोंडानें ' भक् भक् भक् ' करीत नानाची आगगाडी धावूं लागली.

नानाची ही आगगाडी बाजाराच्या निम्या रस्त्यावर आली न् आली तोंच तिचा वेग वाढला. वेग वाढण्याबरोबर चाकांचा दांडा जोरानें फिरला. त्या वेगांत नानाच्या हातांतील चवली एकदम निसटून कुठें भिरकावली गेली. नानाची चर्या एकदम गंभीर व कावरीबावरी झाली. तो एकदम थबकला. इकडे तिकडे पाहिलं. चवली एकदम कांहीं कुठें दिसली नाहीं. तो बारीक नजरेनं काळजीपूर्वक बघूं लागला.

पंधरावीस मिनिटें झाली. नानानें चवली किती शोधली. पण सांपडेना. त्याचे डोळे पाण्यानें डबडबून गेले होते. त्याच्या चर्येवर गांगरल्याची आणि घाबरून गेल्याची कळा आली होती. त्याच्या तोंडावरचा क्षणापूर्वीचा तजेला कुठल्याकुठें नाहींसा झाला होता. त्याच्या त्या एवढ्याशा मनांत कसले भयंकर विचार येत होते हें कुणाला सांगातां येईल ? चवली सांपडत नाहीं असं झाल्यावर त्याला एक हुंदका आला पण त्यानें तो आवरला डोळे पुसले, पुन्हां एकदां सगळं शोधलं. चवली कांहीं सापडली नाहीं. मग स्फुंदत स्फुंदत तशाच पाण्यानें डबडबलेल्या डोळ्यांनीं, अतीशय हळुहळू पावलें टाकीत तो घराकडे निघाला.

घराचं दार उघडंच होतं; पण नानाला कांहीं आंत पाऊल टाकवलं

नाहीं. तिथें आल्यावर तर त्याला अधिकच रडूं येऊं लागलें तें तो आवरीत होता पण तें कांहीं त्याला फारसं जमत नव्हतं. तोंच,

" किती वेळ झाला, गेलं आहे पोरटं, तासभर झाला असेल! इथल्या इथनं यायला इतका कां वेळ लागतो? बसला असेल मधेंच कुठंतरी खेळत, मग घरची तरी शुद्ध कशाला राहते न् पोटाची तरी शुद्ध कशाला राहते—"

असं म्हणत म्हणत तो आला काय हें पाहण्यासाठींच लक्ष्मीबाई दारांत आल्या, तों नाना तिथें रडत उभा असलेला दिसला. त्याला पहाण्याबरोबर लक्ष्मीबाई जरा करवल्या आणि मोठ्याच स्वरानें म्हणाल्या.

" कायरे नान्या किती वेळ लावायचा एवढ्याशा कामाला! आणि असा रडतोस कां!— जिन्नस कुठं दिसत नाहींत ते—कुणी मारलं काय तुला? नीट काय तें सांग. नुसत्या रडण्यानं मला नाहीं कांहीं समजत–पैसे कुठं आहेत?—बोल कीं, तोंड उघडूं दे एकदा कीं आणूं पळी दांताखिळीं उचलायला—"

" पै–से–र–स्त्यां–त–सां–ड–ले—" नाना हुंदके देतदेतच म्हणाला.

" पैसे सांडले—सगळे सांडलेस–कुठं सांडलेस–हुडकावेस कीं नाहीं तिथं—"

" हुडकले—"

" तर–तर–हुडकले ' लक्ष्मीबाई मध्येंच त्याच्या अंगावर ओरडल्या ' हुडकल्यावर जिन्नस सांपडत नाहीं असं कुठं झालं आहे काय? चवली काय पाताळांत गेली नाहीं कीं उडून आकाशांत गेली नाहीं. मला ते असले लाड चालायचे नाहींत—ते दोन आणे हुडकून आण मग घरांत ये—त्याच्याशिवाय पाय टाकूं देणार नाहीं उंबऱ्यांत. आज दोन आणे गेले उद्यां दोनशे रुपये जातील. जा ते हुडकून आण जा—"

बोलतां बोलतां लक्ष्मीबाईंनीं त्याच्या खांद्याला धक्का देऊन ढकलल्यासारखं केलं.

त्याबरोबर नानाला इतकावेळ आवरलेलं रडं आणि इतका वेळ कोंडून ठेवलेलं दुःख आतां आवरतां येईना. त्याला उत्तर कांहीं देतां आलें नाहीं. पण तो मोठ्यानें रडूं लागला. त्याच्या त्या रडण्यानें लक्ष्मीबाईला

जास्तच राग आला. त्यांनीं दांत खात आवेशानें पुढें चार पावलें टाकून नानाच्या कानशिलांत दिली. लक्ष्मीबाईच्या हाताला झणझण्या आल्या. " वा वा अगदीं मारल्यासारखं रडतोस कीं ! जा. इथं माझ्या दारांत रडत बसूं नकोस—लांब तिकडं गांवाच्या बाहेर जाऊन पोटभर रड—जा—" त्यांनीं आणखी त्याच्या दंडाला धरून बाहेर ढकललं, आणि घरांत जाऊन त्यांनीं दार लावून घेतलं. आईची ती कानशिलांत थप्पड बसण्या बरोबर नाना एकदां मोठ्यानें ओरडला. पण आईचे डोळे बघून त्यानें पुन्हां एकदम तोंड मिटलं पण कळवळून ओळन उमाळा तो असा तोंड मिटून रहाणार आहे ! लक्ष्मीबाईनें दार लावलं तेव्हां ' लावूं नको ' असं सांगण्यासाठींच कीं काय, तो आईकडे पाहात एकदां मोठ्यानें रडला. " ओरड—तुझं पुरतं रडून होऊं दे मग पैसे घेऊन ये " असं म्हणत लक्ष्मीबाईनीं कडी लावून घेतली.

— ३ —

मग नाना तिथें किती वेळ होता कुणास ठावूक बारा वाजून गेले. बिष्णुपंत आले, त्यांनीं नानाची चौकशी केली. लक्ष्मीबाईनीं त्यांना अर्धी कच्ची हकीकत सांगून " येईल तो कुठं जातो आहे मरणांत " असं थोडं बेमुर्वतीनंच म्हणाल्या पण आतां त्यांना थोडीशी चिंता वाटूं लागली असावी असं त्यांच्या बोलण्याच्या स्वरांतनंच ओळखायला येत होतं. विष्णुपंतही कांहीं अधिक बोलले नाहीं.

" मुलांशीं जरा शहाणपणानं आणि विचारानंच वागावं लागतं. तूं त्याला इतकं हें करायचं नव्हेस. मग त्याच्याबरोबर आपण तरी पैसे हुडकायला जायचं—"

असें कांहींतरी अर्धवट बोलून त्यांनीं जेवण वगैरे आटपून झोप आली तर पाहावी म्हणून एक पुस्तक घेऊन अंग आडवं केलं. त्यांनीं लक्ष्मीबाईच्या मनाची स्थिती थोडी ताडली असावी असं दिसत होतं. विष्णुपंताच्या त्या बोलण्यावर यावेळीं लक्ष्मीबाईही कांहीं बोलल्या नाहींत एकदां त्यांच्याकडे त्यांनीं रोखून मात्र पाहिलं. लागलीच विष्णुपंत म्हणाले.

असं मारक्या म्हशीसारखं बघतेस काय ? मी आपलं सांगतों. तुला वागायचं तसं वाग. ”

लक्ष्मीबाई जेवली नव्हती. ती कांहीं तरी काम काढून वेळ काढीत होती. मधून मधून दार उघडून बाहेर डोकावत होती. एक वाजला, दोन वाजले, तीन वाजले, नानाचा पत्ता नाहीं. लक्ष्मीबाईच्या मनांत मघांपासूनच कसं कसं होऊं लागलें होतें. एकदां त्यांचे डोळेही किंचित् ओले झाले होते. चेहेरा तर अगदीं उतरून गेला होता. सात दिवसाच्या उपाशी माणसाची त्यावर कळा आली होती.—आतां नाना आला तर याबद्दल त्याच्याशीं अवाक्षरही काढायचं नाहीं. त्याला अगोदर काखेंत घेऊन एक पापी घ्यायची मग अगोदर लाडू द्यायाचा मग जेवायला घालायचें त्याच्याबरोबर गोडगोड बोलायचें——असें लक्ष्मीबाई मनाशीं किती तरी ठरवीत होत्या. अडचाच्या सुमाराला विष्णुपंत निजून उठले. तरीही पुढें अर्धा तास लक्ष्मीबाई कांहीं बोलल्या नाहींत. विष्णुपंतही वाचण्यांत गुंग झाले. तीन वाजून गेले, तेव्हां लक्ष्मीबाईलाच धीर धरवेना त्या अखेरीला विष्णुपंतांना म्हणाल्या. “ नाना अजून आला नाहीं. तो म्हादेव भावजींच्या घरांत असेल वाटतं. येण्याबरोबर त्यांनीं बोलावलंही होतं. ”

“ म्हणजे नाना एकदां सकाळीं गेला आहे तो अजून आला नाहीं ! मी समजतों तो येऊन जेऊन पुन्हां कुठं तरी खेळायला गेलाय. मी येतांनाच माधवरावांच्या घरीं गेलों होतों. त्या वेळीं तरी नाना कांहीं तिथें नव्हता—काय जी एकेक व्याद असते—पुन्हां एकदां बघून येतों पाहिजेल तर—”

विष्णुपंतही किंचित् घाबरल्यासारखे दिसले त्यांनीं हातांतलें पुस्तक तसेंच टाकून शर्ट घातला, टोपी घातली व ते माधवरावांच्या घरीं निघाले. जातां जातां ते लक्ष्मीबाईला म्हणाले. “ तूं जेवलिस कीं नाहीं ?—”

“ नाना आल्याशिवाय मला कसं जेवण जाईल ? ”

“ चांगलं——”

असें कांहीं तरी म्हणत विष्णुपंत दाराच्या कोपऱ्यांतलें पायताण घालूं लागले तोंच माधवराव “ अरे विष्णुपंत आहेस काय घरांत ” असें बाहेरच्या बाहेरूनच ओरडत आंत आले. त्यांना पाहाण्याबरोबर पायताण

काढीत विष्णुपंत म्हणाले. " बरं झालं, आलास. मीं तुझ्याकडेच निघालों होतों. आमचा नाना तुझ्या घरीं आला आहे काय? सकाळपासून आमचा नाना कुठं बाहेर गेला आहे. अझून आला नाहीं. "

" नाहीं. " माधवरावांच्या चर्येवर आश्चर्य आणि चिंता एकदम दिसूं लागलीं.

— ४ —

माधवरावांचं तें उत्तर आणि त्यांची ती चर्या बघून लक्ष्मीबाई अधिकच गांगरून गेली. माधवरावांच्या घरांतही नाना नाहीं. मग तो कुठें गेला असणार? आणि कुठें गेला असला तर जेवण नाहीं खाण नाहीं असा किती वेळ कुठें राहाणार? अंगावर दोन दागिने! हातांत सोन्याचीं कडीं न् कानांत मोत्याची चौकडी. कुणी चोरानें त्या आशेनें फूस लावून तर नेला नाहीं? आपण त्याला राग भरत होतों. त्या वेळीं एक कैकाडीण भीक मागत दारापुढें आली होती हें आतां त्यांच्या लक्षांत आलें. हीं माणसं रुपया दोन रुपायाच्या दागिन्यासाठीं सुद्धां मुलाला फक्यांत नाहींतर एकाद्या विहिरींत नाहींतर ना माणूस ना काणूस अशा रानांत फेंकून देतात. असल्या किती तरी गोष्टी त्यांनीं ऐकल्या होत्या, त्या त्यांना आतां सगळ्या आठवूं लागल्या. मग त्यांच्या मनांत फारच काळवूं लागलं डोळ्यांत पाणी भरलें आणि वाहूंही लागलं. माधवरावांनीं अगोदर पोलीस ठाण्यावर वर्दी दिली. व पांचसात घरें धुंडाळून ते परत आले. ते दारांत दिसले नाहींत तोंच लक्ष्मीबाईनीं रुद्ध कंठानें विचारलें " सांपडला नाना?—"

" छे पोलीसला वर्दी देऊन आलों आहे. लागलीच त्यांनीं चौकशीसाठीं शिपाईही पाठविले आहेत. नानाला घेऊन आम्ही ज्या ज्या स्नेह्यांकडे जात होतों तेथेंही जाऊन आलों. तिथें तो कुठेंच नाहीं. त्यानें हरवलेले दोन आणे मात्र येतांना मला सांपडले ते घ्या—"

माधवरावांनीं ती चवली लक्ष्मीबाईच्या पुढें टाकली. ती पाहून लक्ष्मीबाईला उमाळाच आला. तो आंवरून डोळे पुसत पुसत रुद्ध कंठानें अत्यंत रागानें लक्ष्मीबाई म्हणाल्या,

"काय चांडाळ आहांत हो!—" पुढें त्यांना बोलतांच आलें नाहीं.

विष्णुपंतापेक्षां देखील माधवरावांनाच लक्ष्मीबाईचा राग अधिक आला होता असं दिसलं. त्यांच्या दीन आणि दुःखी मनाची त्यांना कांहींच करुणा आली नाहीं. ते लागलीच कांहींसा रागीट तर कांहींसा गंभीर चेहरा करून लागट कुजक्या वाणीनें म्हणाले. "खरं आहे. मींच चांडाळ नाहीं ? आणि पोटच्या पोराला उपाशी तापाशी असल्या उन्हांत रस्त्यावर लोटणारी आई—छे छे, ती आई—ती काय चांडाळीण काय !—दोन आणे आणल्याशिवाय तुम्ही नानाला घरांत सुद्धां घेणार नव्हता ना ! झालं तर त्यानं सांडलेले दोन आणे सांपडले आहेत; आतां देवदयेनें नाना सांपडला तर त्याला घरांत घ्यायला—" लक्ष्मीबाईनीं कानावर हात ठेवले. त्यांनीं तोंड फिरवून डोळे पुसले. हातांत पदर धरून त्यांनीं हुंदका गिळला. त्यांची ही स्थिति बघून विष्णुपंत माधवरावांना म्हणाले,

"अरे माधव, थोडा वेळ काळ बघून बोलायला पाहिजे. या वेळीं तिची काय स्थिति झाली आहे ती तर पहा."

"अरे होय. मोठा आला बायकोचा कैवार घेऊन ! नानानं दोन आणे हरवले. ते कांहीं त्यानं मुद्दाम हरवले नाहींत. आपल्याकडून त्यानं ते खूप हुडकले, ते त्याला सांपडले नाहींत. आतां आई राग भरणार म्हणून तो मनांतल्या मनांतच किती घाबरून गेला असेल. दारांत येऊन दिखील तो किती तरी वेळ आंत आला नाहींना ! याच्यावरनंच तो मनांत किती भेदरून गेला होता हें तूंच पहा कीं, अशा वेळीं त्याला गोंजारून धीर द्यायचा कीं, थप्पड देऊन 'सांपडलेले पैसे घेऊन आलास तर घरांत घेईन' असं म्हणायचं ? त्या वेळीं नानाच्या मनाची स्थिति किती भयंकर झाली असेल याची लक्ष्मी वहिनींनीं थोडी तरी कल्पना केली ? त्यापेक्षां कांहीं वहिनींची आतांची स्थिति भयंकर नाहीं. नुसतं डोळ्यांतनं पाणी चाललं आहे एवढंच कीं नाहीं ? नानाच्या डोळ्यांतून पाणी चालतं नव्हतं तर तो सारखा आरडत होता. मी खरं खरं सांगतो मला आज ही गोष्ट ऐकल्यापासून वहिनीचा फार राग आला आहे. मींच तिला चांडाळीण म्हणणार होतों. पण म्हटलं असं म्हण-

ण्याची ही वेळ नव्हे तर उलट त्यांनींच मला चांडाळ ठरवलं. परमेश्व-राच्या घरचा न्याय आहे म्हणायचं झालं."

माधवरावांचे ते निष्ठुर शब्द ऐकून आपल्या कानांत कोणी कडकड-लेलं तेलच ओततं आहे कीं काय असें लक्ष्मीबाईला वाटलें पण त्यांना बोलायला या वेळीं तरी कांहीं तोंड होतं —!

— ५ —

मनांत वाईट गोष्ट आली तीच खरी होणार काय तर ! दुष्ट गोष्टी खोट्या झाल्या असत्या तर आणखी काय पाहिजे होतें ? संध्याकाळ झाली, रात्र झाली, प्रहर रात्र उलटून गेली तरी नानाचा पत्ता नाहीं म्हणजे काय म्हणायचें ? तो कुणा तरी राक्षसाच्याच हातांत सांपडला. त्या चांडा-ळानं त्याचं काय काय केलं आहे कुणास ठाऊक ! लक्ष्मीबाईच्या मनांत आतां कुठल्याकुठल्या गोष्टी उभ्या राहूं लागल्या. न् कल्पल्या कसल्या कल्पना येऊं लागल्या. हंड्यांत उभी करून खालूनं जाळ लावावर तशी त्यांची अवस्था झाली होती.

माधवराव आणि विष्णुपंत पुन्हां एकदां पोलीसकचेरींत कीं कुठेंसें जाऊन नानाचा तपास करून परत आले होते. लक्ष्मीबाईनीं त्यांना कांहीं विचारलें नाहीं.पण आतां दुसऱ्यादिवशीं सकाळपर्यंत कांहीं एक करण्यांत किंवा हिंडण्यांत अर्थ नाहीं असं त्यांनी ठरवल्याचं त्यांच्या आपापसांतल्या बोलण्यावरूनं त्यांनीं ताडलं. कांहींशा अस्वस्थ आणि विषण्ण मनानेंच विष्णुपंतांनीं बैठकीवर आंग टाकलं. तास अर्ध्या तासांत तिथेंच त्यांना झोंप लागली.

पण लक्ष्मीबाईला झोंप कशी लागेल ? झोंपहि लागेना, करमेनाही. अंगाची सारखी तलखी होऊं लागली. मनापुढें आणि डोळ्यांपुढें त्यांना आतां नानाशिवाय कांहीं दिसेनासं झालं. आतां कसला नाना येतो आणि आलातर घडपणीं कसला येतो, असं लक्ष्मीबाईच्या मनांत आलें, आपणच नानाची अशी दशा केली हें मनांत येऊन तर त्यांना अधिकच दुःख होऊं लागलं. त्यांनीं स्वतःच्या स्वतःलाच किती

शिव्याशाप घेतले त्याची गणतीच नाहीं. आतां कांहीही केलं म्हणून काय नाना येणार आहे !

रात्रींचे आकरा वाजून गेले असतील. त्या दारांत येऊन उभ्या राहिल्या. चहूंकडं शांतता झाली होती. चांदणं कसं पिठासारखं पडलं होतं 'असल्या भीषण काळीं नाना घरीं यायचं म्हणाला तरी त्याला कोण भीति वाटेल,' असें सहज त्यांच्या मनांत आलें. त्या घराबाहेर पडल्या. जणूं काय नानाला शोधण्यासाठींच छे: तो अमुक ठिकाणीं आहे आणि त्याला घरीं येण्यास—असल्या भीषण काळीं घराकडे येण्यास भीति वाटते म्हणून त्याच्या सोबतीला जाण्यासाठींच त्या घराबाहेर पडल्या. आपल्याला अमुक ठिकाणींच जायचं आहे असं ठरल्याप्रमाणें त्या नेमक्याच रस्त्यानें निघाल्या. रस्त्यानें येतांना कोठें तरी चवली पावली हरवावी, आणि ती लक्षांत येतांच आलेल्याच रस्त्यानें इकडे तिकडे पहात परत फिरावें त्याप्रमाणें लक्ष्मीबाई जातांना इकडे तिकडे पहात होत्या, जणूं काय नाना असाच कोठें तरी मुद्दाम लपून बसला आहे. आपला हा वेडेपणा एकदां लक्ष्मीबाईच्या ध्यानांत आलाही. लागलीच त्यांनीं एक दीर्घ उसासा टाकला व पदरानें डोळे टिपले; म्हणून काय वात्सल्याचा तो वेडेपणा असा नाहींसा होतोय थोडाच !

जातां जातां त्यांना गस्त घालणारे शिपाई भेटले. ते गस्त घालणारे आहेत असं लक्ष्मीबाईनीं तेव्हांच ओळखलं. त्यांना पाहून त्या कांहींशा आनंदल्या. त्यांच्या डोळयांत आणि त्यांच्या तोंडावर आशेचं किंचित् तेज दिसूं लागलं. त्यांनीं मोठया अधीरपणानें त्या गस्तवाल्यांना विचारलं.

"तुम्ही कुठून कुठून गस्त घालीत आलांत शिपाईबुवा ! सगळ्या गांवांत तुमची गस्त झाली असेल. तुम्ही माझे धर्मांचे भाऊ हं ! मला सांगा शिपाईदादा, एक सातआठ—हो आठच वर्षांचा मुलगा, काळासावळाच आहे, त्याचं तोंड वाटोळं आहे, कपाळ मोठं आहे, केंस कुरळे कुरळेसे आहेत, भिंवया चांगल्या धनुष्यासारख्या कमानदार आहेत. डोळे कसे तेजस्वी आहेत. इतका इतका उंच आहे. अंगबांधा कसा जिथल्यातिथें आहे. काळासावळाच असला तरी राजबिंडाच आहे. हातांत

सोन्याचीं कडीं आहेत. कानांत मोत्यांचीं चौकडीं आहेत असा मुलगा तुम्हांला कुठें आढळला.—"

"नाहीं बाई, आम्ही आतांच कामावर निघालों—"

"तुम्ही पोलीस चौकीवरनं आलांत ना? तिथं कांहीं समजलं आहे? पोलीस ठाण्यावरसुद्धां आम्हीं वर्दी दिली आहे!"

"मग आम्हांला माहीत नाहीं बाई. अगोदर तिथंच जाऊन तपास करा. उगीच असं फिरून तुमच्या मुलाचा कसा तपास लागेल?"

"तिथं पोलिस ठाण्यावर तपास लागेल म्हणतां?—"

लक्ष्मीबाई त्यांचें उत्तर ऐकायला राहिली कुठें? ती तडक पोलीस ठाण्याकडे निघाली. ती दहावीस पावलें गेली असेल नसेल तोंच—

"लक्ष्मीवहिनी इतक्या रात्रीं इकडं कुणीकडं निघालात?"

असं कांहींसं आश्चर्यानें तर कांहींसं दरडावणीनें माधवरावांनीं विचारल्याचा आवाज त्यांच्या कानीं आला. त्या आपल्या नादांत होत्या. तो आवाज ऐकण्याबरोबर त्या एकदम चपापून थांबल्या. त्यांच्या चर्येवर एकदम कांहींशा भीतीची उत्पन्न झालेली छटा मात्र माधवरावांना पाहतांच नाहींशी झाली. पण या वेळीं माधवराव भेटले हें त्यांना बरं वाटलं नाहीं. लक्ष्मीबाईनीं उत्तर देण्याच्या आधींच माधवराव पुढें म्हणाले.

"आतां पोलिस ठाण्यावरून आमच्याकडे एक शिपाई आला होता. मी पोलिसाला दिलेल्या वर्णनाचा एक मुलगा मोटारखालीं सांपडून मेला. तो आमचाच मुलगा काय हें ओळखण्यासाठीं पोलीसनीं मला बोलावलं होतं. मी पाहून आलों. तो आमचा मात्र नव्हे. दुसरा कोणाचा तरी मुलगा आहे."

लक्ष्मीबाईच्या अंतःकरणांत चर्र झालं. त्यांचं अंग थरारून सर्वांगावर कांटा उभा राहिला. पोरगं रस्त्यावरून जात असेल, नाहीं तर आपल्याच तंद्रीत कुठें तरी उभं राहिलं असेल, मोटारीचा कर्णा वाजण्याबरोबर इकडं जावं कीं, तिकडं जावं असा घोटाळा उडाला असेल—धांवत आलेली मोटार अशी काय थांबवतों म्हटलं तरी एकदम थांबते असं लक्ष्मीबाईच्या मनांत आलं. आणि पाण्यांत ढेंकूळ टाकल्याप्रमाणें त्यांचं अंतःकरण विरघळलं. हातापायांतली शक्ति नाहींशी झाल्यासारखी झाली. डोळ्यांत पाणी

भरून आलं " काय तरी मी चांडाळीण, कुठल्या जन्मींचा मी नानाचा दावा साधला " असले विचार त्यांच्या मनांत आले. त्या करुण दृष्टीनें माधवरावाकडे पहात अगदीं केंविलवाण्या स्वरानें म्हणाल्या.

" नानाचा कांहींच शोध लागणार नाहीं, महादेव भावजी—!"

लक्ष्मीबाईची त्या वेळची ती स्थिति पाहून, माधवरावांचंही अंतःकरण कळवळलं. दोनप्रहरचा त्यांचा तो बोलण्यातलाच कां होईना पण निष्ठुरपणा गेला. लक्ष्मीबाईला धीर वाटण्यासाठीं ते म्हणाले.

" नानाचा शोध लागेल तर. त्याला कांहीं अपघात वगैरे झाला नाहीं मी आणि विष्णुपंत संध्याकाळीं ज्योतीषाकडं गेलों होतों. त्यानं सांगितलं. मुलगा सुखरूप आहे. लवकरच तो तुमच्या घरीं येईल. "

" साखर पडो बिचाऱ्याच्या तोंडांत. आमचा नाना घरीं सुखरूप आला म्हणजे मी त्याला शेलापागोटें देईन. "

माधवराव घरीं निघाले, 'चला वहिनी' म्हणतांच लक्ष्मीबाईही त्यांच्या-बरोबर निघाल्या. रस्त्यानें त्या नानाबद्दल माधवरावांना कांहीं तरी सांगत चालल्या. माधवराव नुसतं हुं हुं करीत होते.

दोघेही माधवरावांच्या घरीं आले. दोघेही सोप्यावर बसले. इतक्यांत कांहींसे घाबरलेले विष्णुपंत तिथें आले. लक्ष्मीबाईकडे पहातांच त्यांचा घाबरेपणा गेला. ते म्हणाले,

" सांगितलं नाहींस सवरलं नाहींस अशी एकदम उठून आलीस म्हणजे समजायचं काय मीं ? मध्यें जागा होऊन बघतों तर दार आपलं सताड उघडं आणि ही कुठंच नाहीं. म्हटलें आतां हिला शोधायची तरी कुठं ? काळजींत आणखी काळजीची भर. सांगायचं नाहीं. मी इथें येतें म्हणून. " मी शुद्धीवर कां आहें ?" लक्ष्मीबाई एवढंच म्हणाल्या. " लक्ष्मीवहिनी, मी आतां विचारतों तुम्हांला." 'माधवराव मध्येंच म्हणाले," तुमचें हें एवढं पुत्रप्रेम सकाळीं नानाला घराच्या बाहेर घालवतांना कुठं गेलं होतं ?"

लक्ष्मीबाईनीं माधवरावाकडे एकदां तीक्ष्ण नजरेनें पाहिलं आणि त्या म्हणाल्या," मी काय लास आहें काय म्हादेवभावजी ! कां तो माझा पहिल्या जन्मींचा दावेदार होता म्हणून या जन्मीं मला त्याचा दुष्टावा साधायचा

होता. त्यालाच चांगलं वळण लागावं म्हणूनच ना मी अशी निष्ठूरासारखी वागलें. आतां हें पुढचं कुणाला माहीत ? "

"तेंच तुम्हांला समजायला पाहिजे होतं. गाड्याघोडीं आहेत, मोटारी आहेत, चोर आहेत, पोर पळवून त्यांना ठार मारणारे आहेत त्यांत आणि आपल्या मुलाच्या अंगावर दोन जिन्नस आहेत, हें सगळं तुम्हांला माहीत नव्हतं ? पण इतका विचार कोण करत आहे ? बरं त्यानं पैसे हरवले ते काय मुद्दाम हरवले ? हें पहा वैहिनी परवांच्याच दिवशींची गोष्ट विचारतों. तुम्ही चुलीवरून दूध उतरीत होता, तें तुमच्या हातांतून निसटून सांडलं. भांड्यांत एक थेंबसुद्धां राहिला नव्हता. त्यावेळीं चहालादेखील लागलीच चार पैसे टाकून विकत आणावं लागलं. तसंच त्याच्याच आदल्या दिवशीं गार पाण्याचा माठ धुतां धुतां हातांतून निसटून फुटला. तें कांहीं तुम्ही मुद्दाम केलं नव्हतं ना ? त्या वेळीं विष्णुपंतांनीं तुम्हांला हाताला धरून घराच्या बाहेर काढलं असतं आणि 'तुझ्या बापाकडून पैसे घे, तो माठ आण–तें दूध आण तर माझ्या घरांत पाऊल टाक' असं म्हटलं असतं तर तुम्हांला काय वाटलं असतं सांगा बरं ! तसंच आणखी एक सांगतों. महिनाभर झाला असेल त्या गोष्टीला विष्णुपंतांनीं चांदीचा करंडा आणला होता. तुम्ही मोठ्या हौसेनें तो घेऊन देवाला गेलात. तिथं कुणाबरोबर तरी बोलत बसलात आणि रोजची संवय नसल्यामुळं आलात तिथंच विसरून ! मग आठवण झाली; पण त्याचा काय उपयोग ? आठ रुपयांचा करंडा होता "आण जा तुझ्या बापाकडून करंडा आणि मग ये घरांत" असं म्हणून रात्रींच्या रात्रीं विष्णुपंतांनीं तुम्हांला बाहेर ढकलली असती तर तुम्हांला काय वाटलं असतं ? आतां विष्णूच्याऐवजीं मींच म्हणतों नानाचे दोन आणे सांपडले आहेत. तो करंडा, तें दूध तो माठ आणा आणि मग जा घरीं. बघतों विष्णुपंत तरी त्याशिवाय तुम्हांला कसा घरीं घेतो तें. माणसानं निदान आपल्यावरून तरी जग पारखायला पाहिजे—"

माधवरावांचे ते शब्द ऐकून लक्ष्मीबाईनां वाटलें यापेक्षां आपल्या अंगाचं कुणीं कातडं सोललें असतें नाहीं तर अंगाची चाळण करून त्यांत विष भरलें असतें तरी इतक्या वेदना झाल्या नसत्या. लक्ष्मीबाईची

ती स्थिति बघून विष्णुपंतांनींही एक उसासा टाकला. पण माधवराव आज पक्के बेरड झाले होते. ते पुढें म्हणाले, "मी जर विष्णुपंतांच्या जागीं असतो तर निदान या वेळीं तरी तुम्हांला घरांत ठेवून घेतलं नसतं. "नानाला तूं हाकलून दिलासना ! आतां त्याला घेऊन आलीस तरच घरांत ये नाहीं तर तुला दाही दिशा मोकळ्या आहेत" असं स्वच्छ सांगितलं असतं."

लक्ष्मीबाईला आतां हुंदका आवरेना, ती लहान पोरासारखी ओक्साबोक्सी रडूं लागली. तिला बसेवनाहीं, ती तिथेंच लवंडली. दोनतीन मिनिटें कोणी कांहीं बोललें नाहीं. पुन्हां माधवरावच म्हणाले.

"हें पहा लक्ष्मीवहिनी, तुम्हांला खरा खुरा पश्चात्ताप झाला असेल तर पुन्हा नानाशीं असं अविचारानं कधीं वागणार नाहीं म्हणून विष्णुपंताच्या पायाची शपथ घ्या; तर तुम्हांला नाना आतां भेटवतो."

लक्ष्मीबाई ताड्दिशी उठली. विष्णुपंताच्या पायांवर हात ठेवून माधवरांवाकडे अश्रुपूर्ण नेत्रांनीं पाहात गद्गद स्वरानें म्हणाली. "अगदीं अगदीं पायावर हात ठेवून सांगतें पुन्हां, अगदीं या घटकेपासून नानाशींच काय पण कुण्णा कुण्णाशीं अशा अविचारानं वागायची नाहीं. कुठं आहे नाना ! एकदां गाईला पाडसाची भेट करवाहो भावजी."

तिघेही माडीवर गेले. रमाबाईजवळ नाना निजला होता. त्याला चांगली गाढ झोंप लागली होती. नानाला असा शांत आणि सुखरूप निजलेला पाहून, लक्ष्मीबाईचें अंतःकरण भरून आलें, पाण्यानें डोळे अंध झाले, त्यांना एक शब्दही बोलवेना, त्या नानाजवळ जाऊन बसल्या, त्या त्याच्या तोंडावरून हात फिरवूं लागल्या. पण त्यांना हाक कांहीं मारवेना. नाना अगदीं गाढ झोंपेंत होता. माधवराव त्याच्या दुसऱ्या बाजूला गेले आणि नानाच्या अंगावरून हात फिरवीत म्हणाले.

"नाना, बाळ नाना, ती पहा तुझी आई आली आहे. ती तुला बोलावते आहे."

नाना खडबडून उठल्यासारखा उठला आणि माधवरावांच्या बाजूला

जाऊन कांहींशा रडक्या स्वरांत म्हणाला. "नको-नको आई मला मारते, दोन आणे सांपडल्याशिवाय ती मला घेणार नाहीं—"

नानाचे ते शब्द ऐकून लक्ष्मीबाईचें हृदय पुन्हा फुटलें. त्यांनीं एक हुंदका दिला. डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. त्यांच्या मनांत नानाशीं बोलून त्याला कवळून धरायचें होतें पण त्यांना बोलतांच येईना. माधवरावच म्हणाले.

" नाहीं हं नाना. तुला आई आतां मारणार नाहीं. ते दोन आणे सांपडले. आई तुला घरीं बोलवायलाच आली आहे. "

" दोन आणे सांपडले, ' नाना आनंदानें म्हणाला ' कुठं आहेत ते ! मी देतों आईला ! म्हणजे ती मला मारणार नाहीं. "

" हे बघ." माधवरावांनीं नानाच्या हातांत चवली दिली. नानानें ती पाहून घेतली. आणि आईच्या हातांत देऊन कांहींशा लाडिकपणानेंच म्हणाला, " दोन आणे सांपडले बघ आई–आतां मला मारणार नाहींस ! घेशीलना घरांत आतां !"

लक्ष्मीबाईच्यानें एक शब्दही उच्चारवला नाहीं. त्यांनीं नानाला विळखा घालून आपल्या मांडीवर ओढून घेतलें, त्याची पापी घेतली. आणि " नाहीं हं बाळ, मी आतां तुला कध्धी मारणार नाहीं " एवढेंच कसें तरी म्हणाल्या.

माधवराव पुन्हां लक्ष्मीबाईला उद्देशून म्हणाले, " खरोखर आज तुमचा फार राग आला मला लक्ष्मी वहिनी, नानाला तुम्हीं हाकलून दिलात त्यावेळीं त्याला बोलतां सुद्धां येत नव्हतें इतका तो दुःखानं आणि भुकेनं कळवळला होता. मी पुन्हां तुमच्याच घरीं यावयास निघालों होतों, तों रस्त्यांत आपला नाना रडत बसलेला. त्यावेळीं त्याची दीनवाणी मुद्रा पाहून,तुम्हांला काय करावं अन् काय नाहीं असं मला होऊन गेलं. नानानं भिकाऱ्यासारखे माझ्या जवळ दोन आणे मागितले. जवळ समजा त्यावेळीं मीच होतों म्हणून बरं झालं,दुसरा एकादा चोर नाहींतर वाटमाऱ्या असता आणि दोन आणे देतों म्हणून नानाला लांब कुठें नेलं असतं, दागिने काढून घेतले असते व कुठं तरी फेंकून दिलें असतें तर काय करणार होतां ! तेव्हां तुम्हांला चांगली अद्दल घडवल्याशिवाय भागायचें नाहीं

असंच मी ठरवलं. मीं देखील तिथं नानाची चवली हुडकली पण सापडली नाहीं. तेव्हां त्याला आमच्या घरीं आणून लपवून ठेवला. हिला अगदीं बोलायचं नाहीं म्हणून ताकीद दिली विष्णूलाही घरीं जाण्याच्या आधीं रस्त्यांत गाठून ताकीद दिली. आणि पुढचं हें सगळं नाटक केलं तुमच्या माराचा आणि घरांतनं हांकलून देण्याचा नानाच्या मनावर केवढा परिणाम झाला होता पाहिलात ! झोपेंत सुद्धां तो तुमच्याकडं येत नव्हता. आतां तरी थोडं विचारानं वागत चला. बाकी आतां कांहीं तें सांगायची जरूर नाहीं म्हणा. मारकुटल्या आईचं एकादं मूल मेलं म्हणजे तिचा हात आपोआप आंवरतो म्हणतात. लक्ष्मीवहिनी आतां बहुधां अविचार करणार नाहीं होय ना ! ''

लक्ष्मीबाईची दृष्टि नानावरच खिळलेली होती. ती दृष्टीच पुन्हां तशी शपथ घ्यायची जरूर नाही असं सांगत होती.

# ७ ह्याकरितां इतकं रागवायला नको कांहीं ! !

कांहो, सुमनबाई, आज नाहीं कां फिरायला यायचं ? कां कांहीं काम बीम आहे विशेष ! मी येऊं का मदत करायला ! आज आपल्याला त्या गांवाबाहेच्या मारुतिला जायचंय ना ! असे सारखे प्रश्न करीत विमला-बाई, घरांत सुमनबाई एका खिडकीशीं उभ्या होत्या तेथें आल्या. नुकताच चहा वगैरे झालेला दिसत होता. सुमनबाई व विमलाबाई ह्या अगदीं सख्या बहिणीप्रमाणें प्रेमानें वागत असत. सुमनबाईचे यजमान एक सर-कारी नोकर असून त्यांना ४०० रुपये पगार होता. उभयतांचा विवाह एकमेकांच्या सम्मतीनें प्रौढ वयांत झाला होता. माधवराव यांचा स्वभाव प्रेमळ होता परंतु सुमनबाई शिस्तीच्या भोक्त्या होत्या. प्रत्येक गोष्टींत शिस्त हें त्यांचें ध्येय होतें. एरवीं सर्व संसाराची जबाबदारी सुमनबाईचे-वरच होती. त्यांची वडील मुलगी हेमलता ही नुक्तीच पुण्यास बोर्डिंगांत गेली होती, व धाकटा नित्यानंद अजून अगदींच लहान ४ वर्षांचा होता. हें कुटुंब अगदीं पूर्ण आनंदी व समाधानी होतें. फक्त केव्हां केव्हां सुमन-बाईच्या शिस्तीच्या तंत्रांत कांहीं बिघाड झाला म्हणजे बारीक सारीक खटके उडत, पण तेही थोडक्यांत संपत कारण माधवराव अगदीं प्रेमळ-पणानें त्यांची समजूत घालीत.

विमलाबाई ह्याही सुशिक्षित ( इंटरमध्यें कॉलेज सोडून संसारांत पड-लेल्या ) व सुस्वभावी होत्या. त्यांचे यजमान एक प्रसिद्ध वकील असून कोल्हापुरांत त्यांचें बस्तान चांगलें बसलें होतें. जवळ जवळ एक हजार रुपयांचे त्यांचें प्रॅक्टीस असे. उभयतां शिक्षणप्रेमी असून वसंतरावांच्या सहवासानें विमलाबाई पुष्कळच उद्योगप्रिय व बोलक्या झाल्या होत्या. ज्या विमलाबाई पूर्वी क्वचित् एकादा शब्द बोलायच्या त्याच आतां दुस-ऱ्यास बोलण्यास अवसर देत नसत इतकें बोलत. उभयतांच्या संसारांत

आनंद उत्पन्न करण्याकरितां नुकतीच अरविंदाची स्वारी आगमनकर्ती झाली होती. विमलाबाई लग्नाचे वेळीं ६ व्या इयत्तेंत होत्या परंतु वसंतरावांची घरची स्थिति साधारण असल्यामुळें दूरदृष्टीनें त्यांनीं आपल्या पत्नीचें शिक्षण निदान इंटरपर्यंत व्हावें, ह्या हेतूनें तिला माहेरींच ठेविली होती. असो, वसंतराव व माधवराव कॉलेजांत असल्यासूनच त्यांची दाट मैत्री होती. व माधवरावांनीं सरकारी नोकरी धरल्यावर, एका ठिकाणीं राहतां यावें ह्या हेतूनें २ वर्षांनीं वकिलीची परीक्षा पास झाल्यावर वसंतरावांनींही कोल्हापूरासच वकिली करण्याचें ठरवून त्याप्रमाणें बिऱ्हाड थाटलें.

असो, त्या पहा उभयतां मैत्रिणी बाहेर जाण्याच्या तयारीनें पुढच्या दरवाज्यांत झाल्या.

" काय सांगू विमलाताई, मला किनई अगदीं ज्या गोष्टीचा तिटकारा त्याच गोष्टींत हार खावी लागली म्हणजे असा राग येतो अन् तिकडे अगदीं उलट ! तुम्हाला ठाऊकच आहे मला वावगं अगदीं आवडतच नाहीं. आज असाच दोघांचा मतभेद झाला अन् मला तर त्यांचं म्हणणं पटत नाहीं, " सुमनबाई म्हणाल्या.

"येवढा कशाबद्दल झाला वाद ? विशेष कांहीं होतें कारण ? कां उगीच हौस म्हणून ?" "छे हो आज हेमाचं पत्र आलं होतं कीं नुकत्याच गुजराथेंत झालेल्या प्रलयांत अनाथ झालेल्या लोकांना मदतीकरितां शाळेंत फंड गोळा करताहेत म्हणून; आणि आपण त्याला १५ रुपये देण्याचें कबूल केलंय ! आतां तुम्हीच सांगा विमलाताई आमचें चालेल का अशा मोठमोठ्या रकमा वर्गण्यासाठीं देऊन ? पुरुषांची म्हणून वेगळी, माझी म्हणुन आतां हवीच निराळी द्यायला उद्यांच्या सभेत, आणि हे या मुलीनें कशालाहो द्यायला हवेत १५ रुपये ? फार तर ४–२ दिले म्हणजे झाकं. हिचा बोर्डिंगचा खर्चच महिना ३० रुपये येतो, पुन्हां पुण्यास गेल्यापासून आमक्या तऱ्हेचा पोलका हवा, तमक्या तऱ्हेचं पातळ हवं म्हणे गाइडिंग करितां, हें आहेच सुरूं !"

विमलाबाई मुकाट्यानें हें ऐकत होत्या. पण त्यांच्या चेहऱ्याचें सूक्ष्म

निरीक्षण करणाऱ्यास त्या मुलीनें कांहीं विशेष अन्याय केला आहे असें त्यांना वाटत नसावें असें दिसून आलें असतें.

त्या म्हणाल्या, “ हात्तेच्या येवढ्यावरच का झाला तुमचा वाद ? अहो, तुम्हाला १५ रुपये म्हणजे इतके का जास्त वाटतात ? पण हें मला कबूल कीं तीन ठिकाणीं निरनिराळीं वर्गणी द्यावी लागणार तेव्हां हेमानें नको होती इतकी द्यायला. पण खरें सांगू का, सुमनाताई, राग येऊं देऊं नका हो. पण मला तरी बाई असं वाटतं कीं तुम्ही इतकं आतां रागागू नये मुलीवर, बाकीच्या मुली देत असतील म्हणून हिनें घातलान् आंकडा तिला काय हा विचार कीं १५ रुपये म्हणजे फार होतील म्हणून”

“ इतके न कळायला काय झालं तिला ? आपली स्थिति पाहून मगच माणसानें दुसऱ्याची बरोबरी करावी. उद्यां हीच मुलगी सासरीं जर असें करूं लागली तर काय म्हणतील बरं लोक ? मी चांगले एक पत्र खरडलें आज कीं तूं फारच जास्ती वर्गणी दिलीस. इतकी द्यायला खरोखर नको होती. अन् त्यावरच तर तिकडचा माझा वाद झाला मघाशीं. त्यांचं म्हणणं काय कीं ह्यावेळीं मुळींच बोलायचं नाहीं. वेळ निघून गेल्यावर काय उपयोग हो बोलण्याचा ! मला अगदीं गैरशिस्त खपत नाहीं आणि माझ्याच मुलांनीं असें वागल्यावर नाहीं का मला राग येणार ! तिकडेही शिस्तीची इतकी आवड नाहीं आणि मुलांना त्या करितां बोललें म्हणजे मलाच आणखी बोलायचं होतं. त्यामुळें नेहमीं असेच तंटे होतात.

गांव संपून आतां दोघीही उघड्या मैदानाच्या रस्त्याला लागल्या होत्या. सायंकाळचीं रम्य वेळ. नुकताच सूर्यनारायण क्षितिजाला टेंकला असून उन्हाळीं कोंवळीं किरणें मनाला आल्हाद देणारें रम्य दृश्य दाखवीत होतीं. शेतें हिरवीं असल्यानें जिकडे तिकडे हिरवेंगार दिसत असून संध्या-समयींचा मंद वारा वहात होता. मनुष्य स्वभाव असा आहे कीं, डोक्या-ला त्रास झाला तर एकदा मोकळेपणानें दुसऱ्यापाशीं बोलल्यानें हलकें वाटतें. व आतांही तसेंच झालें.सुमनबाईनीं एकदां सर्व ओकून टाकल्यानें जरा त्यांचा रागही कमी झाला होता; व सृष्टीच्या प्रसन्न देखाव्याचाही मनावर अनुकूल परिणाम झाल्यानें डोकें शांत झालें. “ तो पाहिला का

आकाशाचा रंग किती गमतीदार दिसतो आहे!" आपल्या मैत्रिणीचें मन दुसऱ्या विषयाकडे जावें म्हणून विमलाताई म्हणाल्या.

मारुतीचें देऊळ आलेंच होते. दोघींनीं देवाचें दर्शन घेऊन अनन्य भावानें ईश्वराची प्रार्थना केली व बाहेर आल्यावर ओट्यावर येऊन बसल्या. आतां मघाचा विषय काढण्यास बरी वेळ आहे असें पाहून विमलाताई म्हणाल्या, "ताई," कधीं कधीं त्या सुमनबाईंनां ह्याच नांवानें हाक मारीत, कारण मुलें त्यांना ताईच म्हणत, " मी तुम्हाला राग येणार नसला तर बोलणार आहे एक गोष्ट, " "अहो,राग काय यायचा ! आणि त्यांतून तुम्हीं एकादी गोष्ट बोललांत तर मुळींच नाहीं यायचा राग. त्यानीं ओळखलेंच कोणत्या विषयाची ही प्रस्तावना आहे हें.

" मघाशीं तुम्हीं रागांत होता म्हणून मी कांहीं बोललें नाहीं; पण तुम्हीं इतक्या कां शिस्तीची काच मुलीच्या पाठीमागें लावतां ! बाल-स्वभाव आहे, वाटलं असेल मनाला आपणही गरिबांना करावी मदत आपल्याला अनुकूल आहे तर असें नाहीं का ! अन् तिचें वय तरी आहे कां इ-तका पोक्त विचार करून वागायला ? माझें असें मत आहे कीं लहानपणीं मनें इतकीं भावनाप्रधान असतात कीं ज्या वेळीं एकादी गोष्ट कराव-याची मनांत येते त्याच वेळीं ती करून टाकावीशी वाटत असते आणि जर त्यांत कांहीं अडथळा आला तर निराशाही तीव्र होते. तुम्हांला नाहीं का असें वाटत ?"

" तें खरे हो, पण हळूहळू नको का जरा विचार करायला यायला ? आमची एक गोष्ट सोडून द्या पण हेमाच्या वयाच्या थोडया का मुली लग्न होऊन सासरीं जातात ? माझें म्हणणें इतकेंच कीं जरा थोडें ह्या वेळींच तिला जाणवावें कीं असें करून मागावयाचे नाहीं आपलें ! पण आमच्या येथें काय वाटतें कीं उगीच एवढ्यावरून काय बोलायाचें पोरीला. आज जर आपणांस शक्य आहे तर उगीच कां दुखवा तिला !"

" बरोबर ! माझंही मत असं आहे कीं आज तरी तुम्ही तिला कांहीं न बोलतां स्वस्थ बसावं व पुढें केव्हां तरी समजावून सांगावं. माझीच गोष्ट सांगतें. अनुभवामुळें मला हेमाची जास्ती कींव येते. मी शिकायला असतांना असाच एकदां महापूर येऊन लोक निराधार झाले, तेव्हां आम्ही

कांहीं कपडे व पैसे जमा करून त्यांना दिले. त्यावेळीं इकडची परिस्थिती कशी होती व त्या स्थितींतही मला शिकायला ठेविली होती हें तुम्हांला ठाऊकच आहे. त्या स्थितींत मी एक १० रुपये उचलून द्यावे इतकी कांहीं माझी परिस्थिती नव्हती. पण मी विचार न करतां ते दिले व तिकडे कळविलं. त्या वेळीं तिकडे सुद्धां असं वाटलं कीं, एकदां हिला जरा आठवण करून द्यावी आपल्या स्थितीची. पण विचारांतीं अगदीं न बोलतां स्वस्थ बसणं झालं! व नंतर एक वर्षानं एकदा ते आमचे नारायणराव कुळकर्णी नाहींत का त्याच्याजवळ उद्गार निघाले, सहज वाद करितांना. तेव्हां मला तरी कळलं किती मी अविचार केला तो!"

"बाकी भाऊजींची तरी धन्यच हो! नाहीं तर तर किती रागीट आहेत, पण तेव्हांच बरा इतका विचार सुचला! बाकी आहेत इतके प्रेमळ कीं, एकदा रागाचा झटका गेला कीं मग जसे कांहीं प्रतीधर्मच! पण तुमचं बोलणं तसंच राहिलं! असा काय त्यांना विचार सुचला कीं त्यामुळें राग गेला!"

"तेंच तर सांगणार आहे. तिकडून त्या नारायणरावांना त्यांचा तो मुलगा आहेना मेडिकलमध्यें, त्याच्याबद्दल सांगणें चाललं होतें कीं जरी पांच रुपये त्यानें जास्ती खर्च केला तरी उगीच त्याच वेळीं बोलत जाऊं नका; कारण लहानपणीं क्षुल्लक गोष्टीवरून फार वाईट वाटून त्याचा परिणाम असा होतो कीं आपल्या आईबापांबद्दल एक प्रकारचा जो विश्वास असतो तो कमी होऊन त्यांच्याबद्दल अनादर वाटूं लागतो. व मोठेपणीं या गोष्टी आठवून काय थोडक्याशा गोष्टीकरितां मला बोलणीं खावीं लागलीं अन् त्यांनीं त्रास दिला अशी अढी उत्पन्न होते. इतका विचार करूनच मागें मी अशी वेळ आली असतां आमच्या वाईफला कांहीं बोललों नाहीं. कारण एक तर जो पैसा खर्च झाला तो सत्कार्यीं लागला ह्यांत वाद नाहीं व दुसरें, जो आनंद परोपकारापासून वाटला त्यांत त्या वेळींच जर बोलतों तर मिठाच्या खड्याप्रमाणें घाण केली असती, व परिणामही वाईटच! तेव्हां उगीच तुमच्यामधील प्रेमांत क्षुल्लक गोष्टींनीं कमीपणा आणूं नका. असं तिकडचें बोलणें ऐकून मला तर

खरोखरच धन्यता वाटली माझ्या नशिबाची ! धन्य मी ! कीं अशा थोर व्यक्तीशीं संबंध आला पूर्व पुण्याईनें ! आतां तरी तुम्हाला असे नाहीं कां वाटत ताई कीं मुट्टीला येईपर्यंत हेमाला कांहीं न बोलतां फक्त तिचं कौतुक करावं असें ? मग एकादे वेळीं दुसऱ्या कांहीं गोष्टी बोलतां बोलतां हळूच करावा उपदेश ?"

"खरंच ! मी इतका दूरवर विचार केलाच नव्हता. लहानपणीं मुलें आपल्या ताब्यांत असतात ह्या जोरावर आपण जर त्यांना वाटेल तसं वागवलं तर पुढं मोठेपणीं प्रेम राहायचं नाहीं, ही गोष्ट अगदीं अनुभव सिद्ध आहे. पण भाऊजींच्या सारखे इतका विचार करून प्रत्येक गोष्ट करणारे किती असतात ? बरं झालें—बाई, तुम्ही तरी या बद्दल बोललांत मधाशीं रागाच्या भरांत कोठले इतके विचार करायला सुचणार ! खरं म्हणजे मुलांशीं वागायची जी एक ठरावीक पद्धत पडून गेली आहे त्याच्या पलीकडे आम्ही सुशिक्षित म्हणवणारीं माणसं सुद्धां जात नाहीं. त्यामुळं मागच्यापेक्षांही हल्लीं बापलेकांत, आईमुलींत जास्तीच परका भाव उत्पन्न होत चाललेला दिसतो ! असंच मला वेळीं सावध करा म्हणजे कांहीं तरी विचारानें गोष्टी करीन, नाहींतर माझ्या शिस्तीच्या अतिरेकानें मुलांच्या प्रेमाला मुकेन."

"हें कांहीं तरीच तुमचं ताई ! एकाद वेळीं असं झालं म्हणून काय नेहमीं का अशा गोष्टी होतात ? तुम्ही दोघं किती प्रेमानें आणि काळजीनं मुलांना वागवतां ! असो चला ! हेमाच्या शिव्या चुकल्या म्हणून गुलाम परत आली म्हणजे पेढे मागणार आहे मी !"

इतकें बोलणें झाल्यावर संध्याकाळ झाली म्हणून घाईनेंच त्या उठून घरच्या रस्त्याला लागल्या तोंच समोर उभयतां मित्रांची दुक्कल फिरायला बाहेर पडलेली त्यांना दिसली. ह्या घरीं परतायला व पुरुष बाहेर निघायला एकच गांठ पडली.

बहुधा त्याही दोघांचे बोलणें त्याच विषयाबद्दल नुकतेंच झालें असावें. कारण माधवराव जवळ येतांच म्हणाले, कां विमलावहिनी "आज बरीच संध्याकाळ झाली फिरून यायला ! कांहीं महत्त्वाचा वादाविवाद झाला वाटतं !" असें म्हणून त्यांनी बायकोकडे पाहून डोळे मिचकावले."

विमलाबाईंच्या उत्तराची वाटच न पाहतां सुमनबाई म्हणाल्या, " हो, इतका आड पडदा कशाला ? झालाच मुळीं वाद आजच्या महत्त्वाच्या विषयावर आणि इकडच्या पेक्षांही हेमाची वकिली तिच्या काकूनें चांगली केली हो."

" ते का विचारायला पाहिजे ? आमच्या वकिलांची इतक्या वर्षांची संगत फुकट जाणार ? बरं असो तुम्ही आतां घरींच जाणार ना ? का फिरून आमच्या बरोबर यायचें आहे चांदण्यांत फिरायला ?"

" छे ! मुलें घरीं आहेत. अन् आज मी असं ठरविलें आहे कीं आपण फिरून आल्यावर सगळ्यांनीं चांदण्यांत जेवायचं; व मग जेवतांना काय तें सांगायचं आमचं बोलणं" सुमनबाई म्हणाल्या.

" बरं बोवा, आमचं काय, हुकुमाचे ताबेदार आम्ही !" असें म्हणून दोघेही पुढें झटकले व दोघी मैत्रीणी घरीं येऊन संध्याकाळच्या तयारीस मोठया उत्साहानें लागल्या.

# ८ हे शिकलेले पति !!

" शुभलग्न सावधान " हे शब्द ऐकून नारोपंत–राधाकाकू यांना अत्यानंद झाला तो त्यांच्यापरीनं योग्यही होता. लीला हें त्यांचे शेंडेफळ तिला मनाप्रमाणें जसं पाहिजे तसं घर मिळालं याबद्दल त्याना आनंद वाटणें स्वाभाविक होतें. मनाजोगता जांवई नारूकाका फार दिवस शोधीत होते व तसा तो मिळाला व लीला पराची झाल्याचें " शुभलग्न सावधान " या शब्दांनीं वाद्यांच्या प्रचंड कडकडाटांत जाहीर झालं तेव्हां त्यांच्या अंतः–करणांत दुःखानंदाच्या संमिश्र भावना स्वाभाविकच उठल्या.

" कन्या धन वराचें " याचा अनुभव नारूकाका–राधाकाकू यांना आतां खराखुरा आला. लीला फार गोड पोरगी होती. स्वभावानें आनंदी, अत्यंत विनयशील, गृहकामांत दक्ष, व हजारांत जरी नसली तरी शंभरांत उठून दिसेल इतकी सुस्वरूप खास होती. तिचा भाऊ मधू तरी आपल्या काव्याच्या भरांत आला म्हणजे "•माझी लीला हें अर्ध विकसित सौगंध-युक्त नयनहारी असं सुंदर कुसुम आहे. तिला पतीही तसाच रसिक मिळाला पाहिजे म्हणजे या कुसुमाच्या आमोदलहरींनीं ही जीवनसृष्टी कशी हासूं लागेल. नाहीं? प्राण कुसुम नव्हे लीला ! " असें मोठ्या अभि-मानानें व कौतुकानें म्हणे व हें त्याचें म्हणणें यथार्थ असलें तरी त्यांतील रहस्य लीलेला समजतें का नाहीं कोण जाणें !

सुदैवानें लीलेला अनुरूप असा पति, नारूकांकाना पाहिजे तसा जांवई व मधूच्या कल्पनेप्रमाणें त्याला मेहुणा मिळाला. वसंत वयानें वीस एक-वीस वर्षांचा, नुकताच बी. ए. पास झालेला, देखणाही चांगला, शरीरानें सुंदर व घरची स्थितीही चांगली असल्यानें सर्वांनाच हा संबंध आवडला. व नारूकाकांनीं लग्नही हौसेनें व आवडीनें केलें. सर्वच आनंदीआनंद झाला. शेजारच्या सगुणाबाईंचीं तर 'कसा पण लक्ष्मीनारायणासारखा जोडा शोभतोय. म्हणून १०।५ वेळां तरी दृष्ट काढून टाकली असेल !

लीलेचें सर्वांनीं मंगल चिंतलें. मनापासून चिंतलें. खुद्द तिलाही खूप

आनंद झाला. बरं वाटलं. लग्नाबद्दल म्हणजे तिच्या कांहीं विशिष्ट कल्पना होत्या असें नव्हे; बोलूनचालून बारावर्षांची अजाण अल्लड पोर ती तिच्या अशा कसल्या कल्पना असणार! पण तिला आनंद मात्र वाटला खरा. तो कां वाटला हें तिच्या स्थितींत असणारांनाच समजून येणार आहे. सर्वजण आनंदानें हांसले. तिचें दैवही तिकडे हांसत होतें. परंतु त्या रहस्याच्या भेसूर लहरी कोणालाच उमगल्या नव्हत्या व त्या उमगणार तरी कशा! कारण मनुष्य कितीही बुद्धिवान झाला तरी अदृष्टाचे खेळ त्याला थोडेच आकलन होणार!

संगीताच्या मधुर आलापांनीं वसंतरावांचें निवासस्थान आज प्रफुल्ल झालें होतें. त्यांतच हास्याच्या लहरींची भर मधून मधून पडत असल्यानें एकंदर वातावरणांत एक प्रकारचा उन्मादकारी उत्साह उत्पन्न झाला होता. आपल्या विवाहा निमित्त वसंतरावांनीं आपल्या निवडक मित्रपरिवारास आज मेजवानी दिली होती व त्यामुळें हे रंगाचे फवारे उडत होते. मनसोक्त थट्टाभस्करींत व आमोदप्रमोदांत बराचसा वेळ गेल्यावर एकानें सिनेमा पाण्यास जावें असा बूट काढला. मिस तारा या प्रसिद्ध अभिनयकुशल नटीचें काम असलेला एक श्रृंगारिक चित्रपट लागला होता. तेव्हां सिनेमाची कल्पना काढल्याबरोबर ती सुचविणाराचे जंगी आभारप्रदर्शन होऊन मित्रमंडळीसह वसंतरावांनीं आपला मोर्चा सिनेमागृहाकडे वळविला. गर्दी असतांही सर्वांना जागा चांगल्या मिळल्या व लवकरच चित्रपटास सुरुवात झाली. उत्तान श्रृंगाराचा एक अस्सल नमुना असा तो चित्रपट असून त्यांत नायिका आपल्या वल्लभास प्रसन्न करण्यासाठीं अभिनयपूर्ण रीतीनें अविर्भाव करीत असल्यामुळें सिनेमागृह टाळ्यांच्या निनादानं अगदीं गर्जून जात होतें. आमचे मित्रमंडळही त्यांत अगदीं रंगून गेलें.

सिनेमाचा कार्यक्रम आटोपला. सर्वजण परत निघाले. परंतु वसंताच्या डोक्यांत चित्रपटाचे देखावे एकसारखे फिरूं लागले. मिस ताराच्या अभिनयकौशल्याची मुक्तकंठानें तो स्तुती करू लागला. कोणास तिचे हावभाव रुचले, कोणास भावना उद्दीपित करणारे तिचे पदन्यास आवडले, कोणास तिच्या भावविकार दर्शविण्याच्या हतोटीनें वेडावून सोडलें, तर कोणास तिच्या नेत्रांच्या हृदयंगम हालचालींनीं चटका लावला, तर कोणी वस्त्रपरि-

घान करण्याच्या तिच्या कौशल्याची स्तुती करूं लागले व अशा अनेक बारिकसारिक गोष्टींबद्दल वसंत व त्याच्या मित्रमंडळींत इतकी कांहीं चर्चा झाली कीं, ते सर्वजण जणु तारामय झाले. तरुण वसंताच्या मनावर या गोष्टीचा विलक्षण परिणाम झाला. ती राहते कोठें, कशी काय, तिला पगार काय मिळतो, ती या कंपनींत कशी शिरली इत्यादि अनेक प्रश्न त्यानें विचारले व ज्याला जशीं त्याचीं उत्तरें देतां आलीं तशीं त्यानें दिलीं. परंतु वसंताची जिज्ञासा एवढयानेंच तृप्त होणारी नव्हती हे त्यांतील एका धूर्त व चाणाक्ष स्नेह्यानें ओळखलें. व त्या गोष्टीचा त्यानें पुरा फायदा घेण्याचें ठरविलें. दुसरे दिवशीं सायंकाळीं जणु काय सहज वसंताला भेटलो अशा रीतीनें वसंताला गांठून ' ओ हो वसंतराव, इकडे कुणीकडे हिंडायला ? चल मलाहि पण आज करमेनासें झालें आहे. चला कुठें तरी फिरायला जाऊं ! असें म्हणून वसंतरावांसह स्वारी हिंडा-यला निघाली. हिंडतांना दोघांच्या पुन: कालच्या सिनेमाच्याच गोष्टी सुरूं झाल्या. बोलण्याचा ओघांत मिस् ताराशीं आपली ओळख झाली तर बरें एवढें त्यांच्या चाणाक्ष स्नेह्यानें काढून घेतलें. पुढें जातां जातां सहज आपल्या एका मित्रालाच भेटावयास जातो तशा प्रकारें सदर मित्रवर वसंताला घेऊन एका घरांत शिरले; आपण कोठें जात आहों याची कल्पनाहि वसंताला नव्हती व कदाचित कल्पना असती तरी ती त्यानें अमान्य केली असती कीं काय ? याचें उत्तरहि देणें कठीण आहे.

वसंतराव तेथें जातांच एखाद्या माहितगार चिरपरिचित माणसाप्रमाणें त्याचे मित्रवर त्या घरांत शिरले व वसंतास एका सुशोभित अशा खोलींत खुर्चीवर बसवून तो आंत शिरला. थोडक्याच वेळांत, जिची ओळख झाल्यास बरी अशी इच्छा वसंतानें दर्शविली ती तारा, ती अभिनयकुशल तारा, त्यांच्या समोर उभी असलेली वसंताच्या दृष्टीस पडली. इच्छा व तृप्ती यांत इतकें अल्प अंतर असेल अशी वसंताची कल्पना नसल्यानें आतां मात्र तो गडबडला, त्याचा गोंधळ उडाला, त्याच्या चेहऱ्यावर एकदम लाली चढून त्यांवर घर्मबिंदु चमकूं लागले. तारा सहास्य मुद्रेनें त्याची ही गोंधळलेली स्थिति पाहात होती. त्यामुळें तर वसंताची फारच त्रेधा उडाली व आपला स्नेही तेथें नाहीं याचेंहि त्यास स्मरण राहिलें

नाहीं. तो अगदीं कावराबावरा झाला. तारेला हा प्रसंग नवा नसल्यानें ती अत्यंत मधुरवाणीनें म्हणाली, 'कोण रंगरावना' येतील आतां, मीच त्यांना कांहीं काम सांगितले आहे. येतील ते थांबा तोंपर्यंत" अशा रीतीनें संभाषणास प्रारंभ होतांच हळूहळू वसंताची भीड चेपत गेली. इतक्यांत रंगरावहि एका ट्रेमधून चहाचे तीन कप घेऊन तेथें आला. मग संभाषणास बराच रंग आला. चांगल्या दोन तास गप्पा झाल्या व अखेरीस निरोप घेतांना फिरून येण्याचें अभिवचन घेऊन तारानें वसन्तास जाऊं दिलें.

वसंत घरचा पिढिजाद श्रीमंत, त्यांतून हुशार, तेव्हां घरीं सर्वांचाच लाडका असल्यास त्यांत मोठेसें आश्चर्य नव्हतें. आईबापांच्या संमतीनें वसंतरावांनीं लवकरच पुण्यास आपलें बिऱ्हाड थाटलें व आतां वसंतानें लॉ कॉलेजमध्यें नांव दाखल करावें असें ठरलें. पुण्यास बिऱ्हाड करायचें ठरलें पण वसंत व लीला दोघेहि अल्पवयी अजाण व प्रपंच दोघांचाच असला तरी इतक्या लहानपणीं त्यांजवर संसाराचा सर्व भार टाकणें बरें नाहीं अशी वाटाघाट निघाली परंतु त्याचेंहि निराकरण झालें. वसंताची वडील बहीण आक्का या घरीं आल्या होत्या. घरीं आल्या होत्या म्हणजे रूढार्थानें नव्हे. त्यांच्या कांहीं गैरवर्तनानें त्यांचा पती त्यास बाळगीत नसल्यानें त्या माहेरल्या होत्या. त्यांची नेमणूक वसंतरावांच्या संसारावर वडिलकीच्या नात्यानें झाली.

पतीनें टाकलेली स्त्री म्हणजे एका अर्थानें समाजाच्या टीकेला पात्र झालेली. आपल्यावरील दोष आपल्या शुद्ध वर्तनानें व प्रशंसनीय चारित्र्यानें तिनें धुवून टाकण्याचा प्रयत्न करावयास हवा. सर्वांशींच गोडीनें, ममतेनें आपलुकीनें वागून आपलें दुःख कमी करण्याचा प्रयत्न करून सर्वांकडून बरें व हवें हवें म्हणवून घेण्याचा प्रयत्न करावयास हवा व आपलें आयुष्य सत्कारणीं लावून प्राप्त स्थितीचा स्वतःस नसला तरी लोकांस तरी विसर पाडावयास हवा. परंतु आक्काबाई या नांवाप्रमाणें खरोखरच आक्काबाई होत्या. त्यांच्या पतीनें त्यांस कां टाकल्या याबद्दल अनेकांचे अनेक तर्क होते. अशा स्थितींत माहेरी सर्वांशीं गोडीनें वागून सर्वांकडून बरें म्हणवून घ्यावयास पाहिजे कीं नको, परंतु आक्काबाईचा

सर्वच प्रकार उलटा. आईचें आक्कावर बरेंच प्रेम होतें व त्यांतून नवऱ्यानें टाकलेली म्हणून आईला तर आपल्या आक्काला कुठें ठेवूं व कुठें न ठेवूं असें होई. तिचे वडील माधवरावांनीं तिला सासरीं पाठवून देण्याचा चांगला ३।४ वेळां प्रयत्न केला. परंतु स्वतः आक्काबाईच आपल्या घरीं जाण्यास नाखूष व तिची आई रमाबाई यांनीं तिचीच कड घेऊन जांवईबुवांच्या अनेक पितरांचा उद्धार करण्यास सुरवात केली. त्या बरोबर बिचारे माधवराव, कोर्टांत मोठमोठ्या मी मी म्हणणाऱ्या वकिलाबरोबर यशस्वी. पणें लढणारे माधवराव, घरीं गोगलगाय बनत. अशा स्थितींत वाढलेली आक्का वसंताच्या संसारावर सर्वाधिकारी नात्यानें नेमली गेल्यावर तिचें वर्तन कसें असावें याचा अंदाज सहज होण्यासारखा आहे.

वसन्तरावांचा ताराछंद कमी न होतां तो वाढतच चालला होता. ते आतांशा घरांतहि फार नसत. त्यामुळें त्यांचें अभ्यासावरील लक्ष स्वाभाविकच कमी होऊन एक वर्ष वायां गेलें. एरवीं कोणत्याहि परीक्षेंत आजपर्यंत अपयश न घेतलेल्या वसंतास वकिलीच्या पहिल्याच परीक्षेंत थप्पड बसली. वसंत याचें कारण समजला. पण उमजला मात्र नाहीं. आक्कानें पुण्यास येतांच थोड्याच दिवसांत सर्वस्थिती टेहेळली. तिला एक प्रकारचें समाधान वाटलें. एका प्रकारचा आसुरी आनंद झाला. मनुष्य स्वतः एका दुःखानें पिचत असतां दुसऱ्यास तरी तें दुःख होऊं नये असें इच्छित असतो; पण हा झाला सामान्य मनुष्यस्वभाव. परंतु अपवादाखेरीज सिद्धान्त सिद्ध होत नाहीं म्हणतात ना. दुर्दैवानें लीलेच्या बाबतींत असाच अनुभव आला.

वसंताला लागूं नये तो छंद लागला. त्याच वेळीं लीलेच्या नशिबाला ग्रहण लागलें. नेहमीं हंसतमुख प्रफुल्ल वदनाची थट्टेखोर स्वभावाची लीला आतां पूर्वीचा राहिली नव्हती. तिच्या दुर्दैवानें तिच्या अंगीं अकाली प्रौढपणा आणला; तिच्या हसतमुखाऐवजीं तेथें गंभीरभाव प्रगट झाला. थट्टेखोरपणा जाऊन त्या जागीं दीर्घ निःश्वास निघतांना चाणाक्ष दृष्टीस दिसूं लागलें. आपल्यांत होत असलेलें हे परिवर्तन लीलेस समजत नव्हतें असें नाहीं व आपल्या मोहरच्या माणसाच्या तें लक्षांत येऊं नये अशा बद्दल ती फार प्रयत्न करी. ती तरी करणार काय? व तक्रार तरी करायची

कोणाबद्दल! आपल्याच माणसाबद्दल वावगा शब्द उच्चारणें ही गोष्ट मुळीं गैर—अकुलिनपणाची. पति हेंचि दैवत अशी जन्मापासून शिकवण. मोठ्या अनुभवी माणसाप्रमाणें तिच्या हृदयांत असे अनेक विचार येत. पण ते बोलून तरी दाखविणार कोणाजवळ! आपलेच दांत व आपलेच ओठ. स्वतःची निंदा स्वतःच्या तोंडानें करायची हे; ही कल्पनाच मुळीं तिला पटत नसे. विचारी लीला असह्य वेदनेनें आंतल्या आंत करपत चालली होती. खायचं प्यायचं हासण्या बागडण्याचें तिचें वय, व आतां वन्स इथं आल्या म्हणजे मी असं करीन अमकं शिकेन इतकं विणकाम करीन तिकडची भरताची तसबीर अशी भरीन अशीं किती तरी मनोराज्यें लीलेनें केलीं पण...

लीलेची अशी स्थितीपाहून वन्सनां मनांतून आनंदाचे लोटच्या लोट येऊं लागले. परंतु एवढ्यानें त्यांची राक्षसी इच्छा तृप्त होण्याजोगी नव्हती. लीला सुस्वरूप, सुगुणी, सर्वांची आवडती, सुशील हें पाहून वन्संचा संतापाचा पारा अस्मानांत चढे. वसंताचं आपल्या पत्नीकडे लक्ष नाहीं. तें कां याचा आक्काबाईनीं कधीं चुकून तपास तरी करायचा होता! रामाशिवा गोविंदा. कधीं प्रेमानें दोघी बसल्या आहेत बोलल्या आहेत. ज्याचं नांव तें. तिच्याकडून एक प्रेमाचा शब्द मिळाला असतां तरी लीलेला ब्रह्मानंद वाटला असता इतकी लीला त्याला हपापली होती. परंतु आक्काबाईची करणीच वेगळी. लीलेबद्दल वसंताचें मन जितकं विटेल तितके प्रयत्न तिनें सुरू केले. असं करण्यांत अक्कांचा कांहीं डाव होता. त्यांना वाटे माझ्याप्रमाणं वसंतानें लीलेला टाकून द्यावी. तिला चांगली म्हटल्याचं हिला ऐकवत नसे. कोणी लीलेला जरा बरं म्हटलं कीं, 'हो असेल तर काय चांगली! पण या तुमच्या फुशीनं ती इकडे आमच्या डोकीवर मिरी वाटतें तें मात्र कोणास दिसत नाहीं. मिन्या एवढी लीला तिला अशा प्रकारें सदैव घालून पाडून बोलणं ऐकून घ्यावं लागत असे.—

एखादां काय झालं कीं मधु—लीलेचा भाऊ—तिच्या दारावरून चालला होता. त्याला वाटलं सहज आंत डोकावून जांव. लीलेची चौकशीही केल्यासारखं होईल. भेटले तर वसंतरावहि भेटतील. म्हणून तो आतां शिरला. घरांत जातो तों जिकडे तिकडे शुकशुकाट असेर. माडीवर गेला तों ती

आंतून बंद व आंतून वन्सं अपरिचितावरोबर बोलत आहेत असा त्याला संशय आला तेव्हां तो कांहीं न बोलतां तसाच परत फिरला. मधूला घरांतून बाहेर पडतांना इकडे आक्कांनी पाहिला की काय कोण जाणे. पण त्यांच्या मनांत पाप.लीलेनेंच मधूला अशा रीतीनें घरीं पाठविला असला पाहिजे असा तिला संशय आला. परंतु लीलेला असले ढंग कांहींच माहित नसल्यानें वन्सं आपणास इतक्या पाण्यांत कां पाहतात याचा तिला कांहीं केल्या उलगडा होईना. अखेरीस एक दिवस मनाचा हिय्या करून तिनें मोठ्या धाडसानें वन्संशीं अत्यंत विनयानं बोलण्याचा हिय्या केला. वन्सं अशा संधीची वाटच पाहत होत्या. लीलेनें बोलण्याचा उपक्रम करतांच त्यांनीं तिचें बोलणेंहि पुरं ऐकून न घेतां तिजवर एकदम असा गहजब केला कीं कांहीं बोलून सोय नाहीं. आपण कुठून बोललों असं लीलेला झालं.

बाई ! बाई ! बाई ! बरीच किंग आहेस. गोगलगाय अन् पोटांत पाय ! मला नव्हत हे माहीत बाईसाहेब इतक्या आंतल्या गांठीच्या आहेत म्हणून ! तरी बरं मी एका अक्षरानं बोलत नाहीं. बसा मेल्यानों तीं पुस्तकं उरावर घेऊन! नाहींतर बागान् मारा चोविसतास बाजारबसवीप्रमाणं खिडक्यांत राहा उभ्या. मला काय करायचं! वाटेल तशी कां वागेनास. तरी मी आईला सांगितलं होतं कीं या बयाचा पायगुण कांहीं चांगला नाहीं. नाहींतर आमच्या वसंताची कधीं नाहीं ती यंदाच परीक्षा कशी नापास झाली ! बाईच गुणाची. ही मेली घरांत आल्याबरोबर त्याला नापाशीचा टिळा लागला. करा वाटेल तशी थेरं करा. लोकांवर पाहरे करा. पण मी काय तुझ्यासारख्या चिमुरडीला भिणार आहे थोडीचं ! " असं एकना दोन. तोंडाला येईल त्याप्रमाणं वंन्सनीं मारा केला. लीलेनें असला गहजब कधींच ऐकला नसल्यानें ती हरिणीप्रमाणं थर थर कांपत कोपऱ्यांत बसून मुळुमुळु रडूं लागली. ती तरी या पलीकडे काय करणार!

लीलीच्या स्वभावांत इतकें परिवर्तन झालें तरी इतर कोणाच्या फारसें लक्षांत आलें नाहीं पण मधूच्या शोधकदृष्टींतून मात्र तो फरक निसटला नाहीं. त्यानें तिला एका बाजूला नेऊन अनेक प्रकारें छेडली. परंतु "कांहीं नाहीं रे. तुला आपलं उगीच तसं वाटतं झालं. मी अगदीं पहिल्यासारखी

आहे." असं म्हणून ती तोंडावर हसू आणण्याचा प्रयत्न करी. परंतु त्यांतील कृत्रीमपणा मधूनें तेव्हांच ओळखला. लीलेकडून थांग लागत नाहीं असं पाहतांच त्यानें स्वतंत्रपणें शोध करण्याचें ठरविलें. वसंताच्या मित्रमंडळींत याचेंहि कांहीं स्नेही होतेच त्यांच्या द्वारानें मधूनें भेद पाडला. त्याला वसंताचें चारित्र्य समजलें. प्रसंगानें तारा व वसंत यांस एकत्र संभाषण करीत असतांहि त्यास पाहण्यास सांपडलें. त्याचें अंतःकरण चरकलें. त्याला मोठाच धक्का बसला. व लीलेची वृत्ती अशी कां त्याचें कारणहि त्यास उलगडलें. लीलेच्या भवितव्याबद्दल त्याच्या अंतःकरणास काय वेदना झाल्या असतील याची कल्पना सहृदय वाचक, आपणास सहज करतां येण्यासारखी आहे.

लीलेच्या वन्संनीं आतां नवाच डाव रचला. लीलेच्या आयुष्याची जणुं दुर्दशा करण्याचा तिनें विडाच उचलला होता. वसंताच्या डोक्यांत तिनें काय भरवून दिलें कोणास ठाऊक. पण वसंतरावांनीं आजपर्यंत जें केलं नव्हतं तें करण्यास, लीलेवर हात टाकण्यास सुरवात केली. वेली पुष्पभारानें लटकली, परिमलानें दशदिशा सुगंधित होऊं लागल्या. नेत्राला व मनाला आल्हाद देऊं लागली, इतक्यांत कोणी चांडाळानें तिच्या मुळावर प्रहार करावा तशी स्थिति असहाय दीन लीलेची झाली. सुखाचा शब्द राहिलाच परंतु प्रसंगीं उपवास व मारहाणीपर्यंत मजल गेल्यावर तिची काय स्थिति होणार ? कांहीं प्रसंगानं लीला अशीच माहेरीं गेली असतां मधूनें तिला पुनः छेडण्याचं ठरविलं त्यानं तिला प्रश्न विचारतांच तुंबलेल्या प्रवाहाचा बांध एकदम फुटावा त्याप्रमाणं तिची इच्छा नसतांच, तिच्या नेत्रांतून आतांपर्यंत सांठलेले असहनीय दुःख कोसळून वेगानें बाहेर पडूं लागलं. मधु सर्व समजला. त्यानं तिचं सांत्वन करावयाचं तेवढं केलं. पण पुढें काय ?

वर दिलेल्या प्रसंगानंतर वसंतरावांनीं लीलेच्या छळाचे अभिनव मार्ग शोधून काढले. त्याच्या दुर्वर्तनाची व लीलेच्या छळाची हकीगत त्याचे वडील माधवराव यांस समजली व त्यांनीं वसंतास चांगलें खरमरीत पत्र लिहिलें. परंतु त्याचा सुपरिणाम होण्याऐवजीं दुष्परिणाम होऊन त्याचें प्रायश्चित मात्र लीलेस भोगावें लागलें. आतां लीला वसंताबरोबर व्हिक्टोरि-

यांत बसून बंडवर फिरावयास निघाली आहे, तरुण दंपत्यास असा प्रसंग म्हणजे किती सुखाचा व आनंदाचा! कोणा तरुणीला आपल्या पतीबरोबर स्वच्छंदानें विहार करणें आवडणार नाहीं? वसंत लीला गाडींतून जात असतां कित्येकांस तरी तिच्या या सौख्याचा हेवा वाटला असेल लीलेलाहि असंच वाटलं काय? लीलेला छळण्यासाठीं वसन्तरावांनीं शोधलेल्या नव्या नव्या मार्गांपैकीं हा एक मार्ग होता. वसंत व लीला गाडींत बसली. गाडी चालू लागली त्याबरोबर वसंतरावांनीं आपला उपक्रम सुरू केला. चिमटे, गालगुच्चे लाथा, बुक्या यांचा मनसोक्तमार देण्यास सुरवात झाली व तीहि अगदीं संभावितपणें. लीलेला हा गुपित मारा सहन करावा लागे न करून तरी करणार काय? धड रडतांहि येत नाहीं. बोलण्याचं तर नांवच नको. असा तिचा छळ सुरू झाला. वसंत लीलेला घेऊन आज बंडावर तर उद्या चतुःश्रृंगीवर, परवा पर्वतीवर हिंडावयास जातांना पाहून लोकांस मोठं कौतुक वाटे. पण लीलेवर मात्र तें प्राणसंकट होतें हें त्यांला काय नाहीत? 'परमेश्वर माझी सुटका करील तर बरं.' अशा रीतींनं तिनें परमेश्वराची किती तरी प्रार्थना केली.

अशा मार्गांपैकींच एक मार्ग वसंतरावांनीं आज अमलांत आणला. त्यांनीं दौंडापर्यंत सेकंड क्लासचा एक डबा रिझर्व केला. व त्यांतून हें दंपत्य निघालं. हडपसर–स्टेशन गेलें व लीलेच्या छळास सुरवात झाली. त्या नरपशूनें-वसंतानें लीलेला भयंकर रीतीनें मारण्यास सुरवात केली. एखादा चेंडू ज्याप्रमाणें सहज गमतीनें इकडून तिकडे फेंकावा त्याप्रमाणें लीलेला लाथेनें उडवून या बाकावरून त्या बाकावर, त्या बाकावरून खिडकीवर फेकण्यास, हापटण्यास, सुरवात केली. लाथा बुक्या, यांची तर खैरातच सुरू होती. मारानें लीला रक्तबंबाळ झाली. त्या दिवशीं वन्संनीं लीलेस अन्नाचा कणहि दृष्टी पडूं दिला नव्हता. व तशांत या नरपशूचा अशाप्रकारें अमानुष मार. लीलेचें डोकें फुटलें त्यांतून रक्त वाहूं लागलें. त्या नराधमानें एकदा हात पिरगळून तिचीं बोटें कडाडा मोडलीं. लीला बिचारी सोसणार तरी किती! आसन्न होऊन बेशुद्ध झाली. लीलेची शुद्ध गेली. ती कांहींच हालचाल करीत नाहीं, कदाचित् तिनं हें सोंग केलं असेल असेंहि त्या पशूला वाटलें. त्यानं फिरून ×× सोंगें करतेस कां? असें

म्हणून एक लाथ मारली. लीला कांहींच हालचाल करीना! लीलेचे प्राण तिची कुडी सोडून तर गेले नाहींत ना? हा विचार येतांच त्या नराधमाचें हृदय थराथरा कांपू लागलें. तो घाबरा झाला. दुष्टाचें अंतःकरण दुष्ट कृत्य करीत असतांना जितकं निष्ठूर असतं त्या मानानें त्यांत धैर्य नसतें. तितकेंच तें कमकुवत असतें. लीला मेली...पुढच्या चित्रानें वसंतास विलक्षण भेडसावून सोडलं.

परंतु त्याची कुशाग्र कल्पक बुद्धि त्याच्या साहाय्यास धांवून आली. वसंताचें घराणें या टापूंत लोकांच्या चांगल्या माहितीचें होते. त्यानें दौंडवर लीलेला उतरून घेऊन तेथील दवाखान्यांत नेली. डॉक्टरचे औषधोपचार सुरू झाले. तेथें असतांना, 'नकाहो, नका मी तुमचं काय केलं आहे! मला कांहो, छळतां? मी तुमच्याआड कधीं आले का हो." असे तुटक तुटक शब्द उच्चारी, चोवीस तासानंतर लीला शुद्धीवर आली. वसंतास ही हकीकत समजताच तो वाऱ्याच्या गतीनें तेथें धांवत गेला.

हल्लीं लीला त्याच्या शुश्रूषेखालीं आहे. परंतु लीलेचें काय होणार याचें कोडें त्याला अद्यापहि उलगडलं नाहीं. त्यानें तें कोडें कसें सोडवलें हें समजल्यावर वाचकांस अवश्य कळवीन.

वाचक! तुमच्या आसपास असं एखादं उदाहरण तुम्हांला दिसलं का पाहां बरं!

# १ आतां अधिकार नाहीं !

त्यांचें वय लग्नाचें असूनही ते पुन: लग्न किंवा पुनर्विवाह कां करीत नाहींत ! मी या बाबतींत त्यांच्याजवळ गोष्ट काढिली कीं, ते नुसतें हसण्या वारीच माझें बोलणें टाळींत, अथवा दुसरा एखादा विषय काढून माझा प्रश्न विचारांत घेत नसत. पण मी त्यांना भेटलों म्हणजे पहिल्यांदा हाच प्रश्न करी. त्यांचें कुटुंब परलोकवासी होऊन दोन वर्षे लोटलीं होतीं. आणि त्यांचें वयही आज सुमारें अठ्ठावीस वर्षांचें असेल. म्हणजे त्यांच्या वयाच्या सव्विसाव्या वर्षीच त्यांची स्त्री वारली होती. शरीरकाठी सुंदर, सांपत्तिक स्थिति नावाजण्यासारखी, निर्व्यंग आणि निरोगी शरीर असें असतां अशा तारुण्यावस्थेंत ते असे संन्याशासारखे कां राहतात, याचें खरोखरच मला अत्यंत आश्चर्य वाटे व हें काय गूढ आहे कांहीं केल्या उलगडेना. पोटीं मूलबाळही कांहीं नव्हतें. साधारणपणें या वयांत स्त्री, आणि नंतर अपत्य यांची आकांक्षा मनुष्याच्या ठिकाणीं तीव्रतेनें असल्याचा नित्याचा अनुभव आहे. त्यांना एक मुलगी होऊन ती त्यांच्या पत्नीच्या पूर्वीच दोन महिने दोन वर्षांची होऊन वारली होती. ती मुलगी पत्नीच्या आजा-रांत त्यांच्याच अंगावर खेळत असल्याकारणानें तिचा त्यांना फारच लळा लागला होता व त्यामुळें मुलीच्या आकस्मिक जाण्यानें त्यांच्या मना-वर फारच परिणाम झाला होता. इतकें असूनही स्त्रीसाठीं–स्त्री पाहिजे म्हणून–नव्हे तर निदान अपत्याच्या इच्छेनें तरी त्यांनीं लग्न कां करूं नये !

मी त्यांना एकदां या संबंधानेंच विचारलें तेव्हां ते उद्विग्नतेनें हसून म्हणाले:—

" पत्नीनें तर माझें सर्वस्वच नेलें, पण मुलीनें माझ्या अंत:करणावर भयंकर आघात करून ठेवला आहे. पत्नी आतां आपल्याला अंतरणारच. क्षयासारख्या निष्ठुर रोगांतून ती परत उठून बसेल असें मला वाटतच नव्हतें. तिचें भविष्य ठरल्यासारखेंच होतें. त्यामुळें तिची आशा मीं सोडूनच दिल्यासारखी होती. पण मुलगी गोड, गोंडस, गुलाबाच्या टव-

टवीत फुलासारखी सुंदर आणि निकोप होती. तिनें नानाप्रकारच्या लीला करून माझें मन आकर्षण करून घेतलें होतें. तिच्या वयाच्या असणाऱ्या इतर मुलींच्या ज्ञानापेक्षां किती तरी अधिक ज्ञान ती दाखवी. त्यामुळें तिच्या ठिकाणीं मीं माझ्या बऱ्याच आशा बांधून ठेवल्या होत्या. पण–" त्यांच्या तोंडून शब्द निघेना. गळा भरून आला. डोळ्यावाटे अश्रु वाहूं लागले. दोनचार हुंदकेही दिले. मुलीच्या स्मरणानें त्यांचें गांभीर्य सुटून नेहमीं आनंदी दिसणारा तो गृहस्थ लहान मुलासारखा रडूं लागला. मला त्यांना व्यर्थ जुन्या आठवणी काढून त्रास दिल्याबद्दल फार वाईट वाटलें. त्यांचा शोकावेग ओसरून जाईपर्यंत मी स्तब्ध बसलों. कांहीं वेळानें त्यांनीं आपले डोळे पुसून एकवार वर पाहून मोठा सुस्कारा टाकला 'मर्जी भगवंताची ' येवढेच शब्द उच्चारले, व लागलीच ती शोकवृत्ति गिळून ते नीट सरळ बसले व मला थोड्या आवेशानेंच म्हणाले–

' जाऊं द्या. जें कांहीं होतें तें ईश्वरी इच्छेनेंच होत असतें. कितीही वाईट वाटून घेतलें किंवा कांहींही केलें तरी झालें तें नाहींसें होत नाहीं किंवा नाहींसें झालें तें फिरून घडून येत नाहीं. असो. काय म्हणणें आहे तुमचें !"

या वेळीं त्यांच्या डोळ्यांत एकप्रकारचें तेज दिसूं लागलें. बोलण्यांतील आतांपर्यंतचा उदासपणा जाऊन त्या ठिकाणीं एखाद्या वक्त्याचा आविर्भाव दिसायला लागला. ते नीट सरसावून बसले आणि एकेका शब्दावर जोर देऊन बोलायला लागले–

"ऐका, मी लग्न किंवा पुनर्विवाह कां करीत नाहीं, हें तुम्ही मला वारंवार विचारीत असतां. त्याचें उत्तर मी तुम्हांला आज देऊनच टाकतों. मुख्य उत्तर म्हणजे मला आतां लग्न अगर पुनर्विवाह करण्याचा अधिकारच राहिला नाहीं हें होय. मला स्त्रीसुखाची इच्छा नाहीं अथवा अपत्यस्नेहाची माझी वासना मावळली अशांतला कांहींच भाग नाहीं. या वयांत तर स्त्रीच्या सहवासाची आणि आपल्या निर्दोष आणि मधुर लीलांनीं वातावरण दुमदुमविणाऱ्या बालकांच्या प्रेममय समागमाची आकांक्षा अत्यंत तीव्र असते. पण उपाय काय ! मला हें सगळें फिरून जमवितां येण्यासारखें आहे. घरवात करून स्त्री व अपत्यें यांनीं घर भरवून नष्ट झालेलें सौख्य आणि आनंद मला पुनः प्राप्त करून घेतां येण्या-

सारखा आहे. मला सर्व परिस्थिति अनुकूल आहे. वय, वित्त, वपु, विद्या सर्व कांहीं मजजवळ आहे. पण मजजवळ नाहीं ती एकच गोष्ट नाहीं. आणि ती म्हणजे अधिकार. मला हें सर्व करावयाला अधिकार नाहीं. त्या एका गोष्टीमुळें मी पंगु आहे. लाचार आहे. मीं फिरून काय म्हणून लग्न करावें ? मी कोणत्या अधिकारानें पुनः अपत्यस्नेहाचें कुसुम कोमल आणि अत्यंत सुखदायक प्रेमबंधन आपल्या भोंवतीं वेढून घ्यावें ! माझा अधिकार संपला. अहो ! एका गोष्टीचा तुम्ही कधीं विचार केला आहे काय ! झाली हीच गोष्ट उलट झाली असती, पत्नीच्या आधीं मीच मेलों असतों, तिचेंहि दोन वर्षांचें तिच्या सुखाचा स्कंद असें अपत्य नाहींसें झालें असतें, तर तुम्ही किंवा तुमच्याचसारखे सद्गृहस्थ यांनीं तिच्याबद्दल तुम्ही दाखवितां अशी कळकळ दाखविली असती काय ! तिचेंहि वय तरुणच असतें, तिच्याहि अंतःकरणांत त्या वयाला अनुसरून पतिसौख्य आणि अपत्यस्नेह यांचीं आकांक्षा तीव्रपणें असतीच. पण कोणीहि तिच्या त्या तरुण वयाची, तिच्या आकांक्षाची आणि तिच्या तळमळीची काळजी घेता ना. इतकेंच नव्हे तर चुकून तिनें तशी इच्छा प्रदर्शित केली असती तर तुम्ही आणि तुमच्याचसारख्या कळकळीच्या सज्जनांनीं, समाजाच्या आधारस्तंभांनीं, धर्ममार्तंडांनीं शास्त्र प्रवीणांनीं, मारे अब्रह्मण्यम् म्हणून हलकल्लोळ उठवून दिला असतां आणि धर्मावर प्रचंड आघात म्हणून तुम्हीच शंख करीत सुटला असतां. मी माझ्या पत्नीच्या आधीं मरण पावलों असतों तर तिनें काय केलें असतें ! अथवा तिला काय करावयाला भाग पाडलें गेलें असतें ! तिला एकांतांत एखाद्या अंधाऱ्या खोलींत आपलें उरलेलें आयुष्य कंठावें लागलें असतें. समाजांत ती पतिव्रता असूनहि अपशकुनी गणली गेली असती. तिच्या थोड्याशाहि नीटनेटकेपणाचा भलभलता अर्थ करून तिच्यावर अर्वाच्य शब्दांचा भडीमार उठविला गेला असता. तिच्या निर्दोष आनंदी वृत्तीवर अनेक निंद्य आरोप लादले गेले असते आणि तिच्या निष्कलंक चारित्र्याला विपरीत रूप देऊन तिच्या जीवनांतील उरला सुरला आनंदहि तुम्ही नष्ट करून टाकला असता. माझ्या मरणानें असहाय आणि दीन झालेल्या त्या अबलेला समाजांतील श्रेष्ठ म्हणविणारांनीं तर

छळलेंच असतें. पण समाज कंटकांनींहि तिच्या जीवाला नको नकोसें करून सोडलें असतें. समाजांत अशा प्रकारच्या अहोरात्र घडत असलेल्या नेहमींच्या घटनांनीं, माझ्या मृत्यूमुळें माझ्या पत्नीची काय काय अनन्वित दशा झाली असती याचें मूर्तिमंत चित्र मला स्पष्ट दिसत आहे. माझ्याच घरच्या माणसांनीं, माझ्या आईनें, वडिलांनीं, भावांनीं तिला 'पांढऱ्या पायाची, राक्षसीण, माणसें खाणारी' अशा अनेक, हृदयाला आरपार घरें पाडणाऱ्या जहरी शब्दकंटकांनीं टोंचून टोंचून रक्तबंबाळ करून टाकलें असतें. पण तें रक्त जगाला दिसावें कसें! माझ्या-तिच्या सर्वस्वाच्या चिरकाल वियोगानें आधींच तिच्या देहांतील रक्ताचें पाणी झालेलें असणार. तें अश्रूंच्या रूपाखेरीज दुसऱ्या रीतीनें कसें दिसावें! शब्दांच्या तीक्ष्ण मारानें अंतःकरणाच्या चिंधड्या उडवून दिल्यावर तरी ही मंडळी स्वस्थ बसली असती काय! छे! नांव कशाला घेतां! तिच्या बाह्य सौंदर्यालाहि छिन्नविच्छिन्न—तेंहि एका परक्या, अस्पृश्य मानलेल्या घाणेरड्या इसमाकडून करून टाकले असतें. अशा अनेक अत्याचारांतून तें कुसुम कसें वांचावें! पण वांचलेंच तर त्याच्या कपाळीं पुनः रात्रीं आणि दिवसां धगधगित अग्नीचा सहवास जी केवळ माझीच नव्हेतर माझ्या साऱ्या कुळाची भाग्यलक्ष्मी म्हणून समजली गेलेली, पण माझ्या पश्चात् तिची किती विटंबना झाली असती हें आतां, या वेळीं, मला स्पष्ट दिसत आहे. मी तिच्या पायाला खडाहि लागूं नये म्हणून तत्पर. तिचें अंतःकरण नेहमीं आनंदी आणि प्रसन्न असावें म्हणून माझे अखंड प्रयत्न. तिच्या मनाचा विकास व्हावा, म्हणून म्या नाना खटपटी कराव्या. पण माझ्या पश्चात् हाय! हाय! तिची काय अवस्था! ती आपल्या जन्मदात्यांचें घर सोडून जेथें ती जन्मली, वाढली, हसली, खेळली, तें घर सोडून आमच्या घरीं आली आणि आमचें घर तिनें आपलें मानलें. माझ्या घराचा, माझ्या लौकिकाचा, माझ्या प्रत्येक गोष्टीचा अभिमान तिला जन्मदाते आईबाप, हसली खेळली तें घर, बालपणींच्या जिवलग मैत्रिणी हीं सर्व तिनें परकें मानून, मी, माझें घर, माझे नातलग, माझे मित्र हीं आपलीं मानली. किंबहुना ती मीच सर्वस्वी बनली. इतका त्याग, इतकें आत्मसमर्पण, येवढा संन्यास तिनें केला असतांहि केवळ माझ्या मृत्युमुळें

तिच्या स्थितींत केवढें अंतर! ती पांढऱ्या पायाची बनते, राक्षसीण ठरते, माणसें खाणारी लाव गणली जाते. घराचें सौभाग्य वाढविणारी लक्ष्मी क्षणांत अवदसा होते. मी पत्नीच्या आधीं मेलों तर इतक्या आपत्ति तिच्या शिरावर आदळल्या असत्या. मग ती मेल्यावर माझ्या शिरावर त्या आपत्ति कोसळत नाहींत, समाजाच्या दुर्व्यवस्थेमुळें, माझी तशी विटंबना होऊं शकत नाहीं, म्हणुन काय मीं फिरून लग्न करावें? समजा, समजाची अशी घटना झाली कीं, पत्नीच्या मृत्यूनंतर जशी पत्नीची दुर्व्यवस्था होते तशीच पत्नीच्या मृत्यूनंतर पतीची होऊं लागली, त्याच्या मनांत पुनः लग्नाचा विचार आल्याबरोबर त्याच्यावर पतितपणाचा आरोप येऊं लागला, तर तो पुनः लग्न कां करीत नाहीं, म्हणून त्याला विचारण्याचें तुम्हांला नेहमीप्रमाणें धैर्य होईल काय? बारा वर्षांच्या कोमल वयांत ज्या मुलीच्या कपाळीं वैधव्याची कुऱ्हाड पडली तिच्यावर आग पाखडणाऱ्या धर्ममार्तंडाच्या तोंडाला, पांसष्ट वर्षांचा थेरडा क्षणिक कामवासनेला बळी पडून बाशिंग बांधून बोहल्यावर चढतो त्या वेळेस खीळ बसते. अशी आज आपली सामाजिक दुर्घटना असल्यामुळेंच तुम्ही मला वारंवार लग्न कां करीत नाहीं म्हणून प्रश्न करीत असता. माझें सुख संपलें. माझा सुख भोगण्याचा अधिकार ईश्वराच्या इच्छेवरून माझी पत्नी आपल्याबरोबर घेऊन गेली. मी आतां लग्न करणें म्हणजे तो व्यभिचार होईल, तो अत्याचार होईल, तो मीं पत्नीला लग्न प्रसंगीं दिलेल्या 'नातिचरामि' या वचनाचा भंग होईल. मी लग्न केल्यास मी बेभान ठरेन मी पातकी ठरेन. माझी आजची स्थिति म्हणजे अपशकुन्यासारखीच नाहीं काय? मीहि माणसें खाणारा खवीस नाहीं काय? ज्या वेळेस मी मेल्यावरहि माझी पत्नी उजळमाथ्यानें, आज मी जसा समाजांत वावरतों, मला समाजांत जो मान मिळतो त्याप्रमाणें सन्मानपणें वावरूं शकेल अशी समाजाची घटना होईल, अशा तऱ्हेचे समजाचे व्यवहार सरळ होतील, त्याच वेळेस माझ्यासारख्याला पत्नी मेल्यावर पुनः लग्न करण्याला अधिकार प्राप्त होईल."

इतकें बोलून त्यांनीं मौन धरलें व यानंतर माझेंहि समाधान झाल्यामुळें मींहि त्यांना या बाबतींत पुनः प्रश्न विचारला नाहीं.

# १० अनाथ

— १ —

किर्लोस्कर नाटकगृह आज इतकें चिकार भरून गेलें होतें कीं त्यांत अर्ध्या तिकिटाचें अगर बिन तिकिटाचें एक मूलदेखील अधिक मावणें शक्य नव्हतें. नाटकगृहांतील गर्दीवरून खाडिलकरांचें नवें नाटक अगर गांधीजींचें कायदे भंगावरील व्याख्यान तिथं असावें असाच कुणींही तर्क केला असता. परंतु नाटकगृहांत लोटलेल्या या जनसमुद्राला आकर्षण करणारी खरी चंद्रिका 'भ्रमर' कवींचें काव्यगायन ही होती. सदरहू कवि मासिकांतून व सभास्थानांतून अलीकडेच उदयाला येऊं लागले होते. त्यांच्या काव्यापेक्षां गळयांतच नादमाधुर्य जास्ती आहे. कल्पनेच्या भरारीपेक्षां आवाजाच्या खडेपणानेंच ते लोकप्रिय झाले आहेत, गीतांतील भावापेक्षां हावभावांनींच त्यांनीं नागपूर, मुंबई वगैरे ठिकाणीं श्रोत्यांचीं मनें काबीज केलीं वगैरे अनेक आक्षेपांची चर्चा यापूर्वी पुण्यांतील काव्य-प्रिय मंडळींनीं केली होती. पण कीर्तनांत द्रव्य विषवत् मानणारा हरिदास तबक फिरविण्याच्या वेळीं त्याच विषाला अमृत मानून त्याच्याकरितां राहू-प्रमाणें आपलें डोकें गमवायला ज्याप्रमाणें तयार होतो त्याप्रमाणें 'भ्रमरां'च्या कवितांविषयीं उपहासानें व अनादरानें बोलणारेलोक देखील त्यांच्या पुण्यांत होणाऱ्या या पहिल्याच काव्यगायनाला आज मोठ्या उत्सुकतेनें आले होते. भ्रमरांच्या बहुतेक लोकप्रिय कविता सामाजिक असून आजचें त्यांचें काव्यगायन मुद्दाम तिकीट लावून करण्यांत आलें होतें. या काव्य-गायनाचें सर्व उत्पन्न पंढरपूर येथील अनाथबालकाश्रमाला द्यावयाचें ठरलें होतें. चंद्रभागेच्या कांठीं पोरकेपणानें रडणाऱ्या अनाथ अर्भकांसाठीं नाटकगृहांत जमलेल्या श्रोत्यांपैकीं कितीनीं एरवीं पैसे खर्च केले असते हा प्रश्नच आहे; पण स्त्रीचें सौंदर्य पहातांना तिच्या कुळाकडे जसें पुरु-षाचें लक्ष जात नाहीं; त्याप्रमाणें गोड कविता ऐकण्याच्या आशेनें जम-लेल्या पुणेरी श्रोतृवृंदाचेंहि काव्यगायनाच्या हेतूकडे लक्ष नव्हतें.

प्रथम ‘ भ्रमर’ कवींचा श्रोत्यांना परिचय करून देण्यांत आला. नाटक मंडळींतील सूत्रधाराप्रमाणें पुण्याच्या सभेंतील हे परिचयकारही ठरलेले होते. त्यांनीं प्रतिभासंपन्न, कविताकामिनी कंठमणि, रससागर वगैरे पदव्या भ्रमरांना बहाल केल्या. भ्रमर अनेक पुष्पांचा आस्वाद घेत असला तरी कमलिनीच त्याला सर्वांत प्रिय असते; त्याप्रमाणें भ्रमर कवींनीं ‘हिंदुस्थानचा जयजयकार’ यासारखीं राष्ट्रीय, ‘ प्रातःकाळ, माध्यान्ह, सायंकाळ ’ वगैरे सृष्टिवर्णनपर, ‘ फाटका सदरा, ’ ‘ खोटा अधेला ’ वगैरे वेदांतपूर्ण काव्यें जरी रचलीं असलीं तरी त्यांची खरी कुशलता सामाजिक काव्यांतच दिसून येते, असें या परिचयकारांनीं जाडया शब्दांत श्रोत्यांना बजावून सांगितलें. लक्ष्मी व सरस्वती यांचें अनादिसिद्ध वैर भ्रमर कवींनीं मोडून टाकलें असल्याचेंहि रसभरित वर्णन जेव्हां त्यांनीं श्रोत्यांनां केलें तेव्हां कवितेप्रमाणें कापडांचीही एकादी गिरणी सदरहू कवींनीं काढली असावी अगर उपमा उत्प्रेक्षाप्रमाणें गोटपाटल्या वगैरे अलंकारांचा ते व्यापार करीत असावेत अशी श्रोत्यांपैकीं अनेकांना शंका आली.पण परिचयकारांच्या पुढल्याच वाक्यानें तिचें निरसन झालें. भ्रमर कवींचें मामा वऱ्हांडातले मोठे जमीनदार असून त्यांनां मूलबाळ कांहीं नसल्यामुळें त्यांची सर्व जिंदगी कविवर्यांनाच मिळणार होती. परिचयकारांचें हें लांबट चऱ्हाट एरवीं लोकांनीं मुळींच ऐकून घेतलें नसतें. पण चलच्चित्रपट पहाण्यासाठीं अंधारांत बसल्याशिवाय जसें गत्यंतर नसतें तसें गोड गाणें ऐकण्यासाठीं आधीं रुक्ष गद्य ऐकल्यावाचून सुटका नाहीं असा विचार करून त्यांनीं फारशी गडबड केली नाहीं.

भ्रमरांनीं ‘ शिवाशिव ’ ‘ हत दैवा मी ’ ‘ कोण पुसतो जातिला ’ वगैरे कविता गोड गळ्यानें व नाटकी हावभावांनीं म्हणून दाखविल्या. ‘ शिवाशिव ’ हें कवितेचें नांव ऐकल्याबरोबर एका कोपऱ्यांतून शिटा व टाळया यांचा ध्वनि उठला. पण शेवटीं ती कविता अस्पृश्यतेवर आहे असें आढळून आल्यामुळें या रसिकांचा विरस झाला. ‘ हतदैवा मी ’ या कवितेंत हिंदु बालविधवेच्या मनाचें करुणाचित्र रेखाटलें होतें. कुणाकडे तरी पाहून गालांतल्या गालांत हंसावें असें मनाला वाटतें, पण डोळ्यांना अश्रुपाताशिवाय दुसरा मार्गच मोकळा नाहीं; हातांनीं कुणाची तरी प्रेमळ सेवा

करावीशी वाटते, पण तो कपाळावर मारून घेण्याखेरीज दुसरी गतिच राहिली नाहीं; तुंबलेल्या तळ्याप्रमाणें हृदय उत्कंठेनें व रम्य कल्पनांनीं भरून गेलें आहे, पण त्याला पाट फोडतां येत नसल्यामुळें तेंच आंतल्या-आंत फुटून जात आहे अशा प्रकारचें वर्णन या काव्यांत होतें. गातां गातां भ्रमरांची दृष्टि खुर्चीवर बसलेल्या एका सोळा सतरा वर्षांच्या मुली-कडे गेली. काप जाऊन राहिलेल्या भोंकाप्रमाणें, मंदिर ढांसळून पडल्या-नंतर त्या ठिकाणीं दिसणाऱ्या भग्न अवशेषाप्रमाणें, त्या मुलीच्या कपाळा-वर कुंकुमतिलकाच्या जागीं फिकट असें हिरव्या रंगाचें गोंदणें त्यांना दिसलें. त्या बालिकेच्या डोळ्यांतील अश्रूंचा अर्थ त्यांना कळला. इतर लोक माना डोलवीत होते, टाळ्या देत होते, तोंडानें वाहवा म्हणत होते; पण ती बालविधवा एखाद्या चित्राप्रमाणें निस्तब्ध, निश्चल बसली होती. काय असेल तें असो, तिच्या डोळ्यांतील अश्रुबिंदूंचें मोल भ्रमरांना श्रोतृ-वृंदाच्या चेहऱ्यावरील आनंदलहरीपेक्षां शतपटींनें अधिक वाटलें.

'वाऱ्यावर' या कवितेंत अनाथ अर्भकाची कहाणी वर्णन केली होती. पतंगाची दोरी तुटली म्हणजे तो आकाशांत वर वरही जात नाहीं, अगर सरळ जमिनीवर खालींही उतरत नाहीं; त्याच्या मृदु हृदयाच्या वाव-टळींत चिंधड्या उडतात; अनाथ बालकाची स्थितिही तशीच असते; असा या काव्याचा प्रारंभ होता. चिखलांतून कमळ निघालें म्हणून तें देवावर वहावयाचें कुणी सोडलें आहे का? कृष्णनिशेच्या पोटीं उषा जन्म घेते म्हणून तिचा कुणीं तिरस्कार केला आहे का? इत्यादि प्रश्न विचारून कवींनीं काव्याचा मध्यभाग सजविला होता. शेवटीं एकाच्या चुकीबद्दल दुसऱ्याला प्रायश्चित देणें हा न्याय नाहीं, अनाथांच्या कानांना प्रेमाचे शब्द ऐकावेसे वाटतात, अनाथांच्या डोळ्यांना आपल्याला पाहून हसरा चेहरा करणारीं माणसेंच पहावींशीं वाटतात, अनाथांच्या हृदयांना कुणींतरी आपल्याला हृदयांत स्थान द्यावें असेंच वाटत असतें असा या कवितेचा समारोप केला होता. गातां गातां भ्रमरांची नजर खुर्चीवर बस-लेल्या स्त्रियांच्या रांगेकडे पुन्हां गेली. मघाशी वर्षाकाळांतील आकाशा-प्रमाणें दिसत असलेल्या त्या बालविधवेचा चेहरा आतां शरदृतूंतील गगनश्रीप्रमाणें भासत होता. तिच्या पलीकडे पांच दहा खुर्च्या सोडून

बसलेल्या एका तरुणीवर आपल्या या गीताचा परिणाम होत आहे असें आतां भ्रमरांना वाटलें. ती तरुणी ढळढळां रडत नव्हती, पण तिच्या चेहऱ्यावरून तिच्या अंत:करणांत मुके कढ येत होते असें दिसलें. तिनें आपले ओंठ घट्ट दाबून धरले होते आणि वाऱ्याच्या मंद झुळकीनें हालणाऱ्या कोमल लतेप्रमाणें तिचें शरीर थरथर कांपत होतें.

काव्यगायन संपलें. टाळयांच्या कडकडाटानें नाटकगृह कोसळून पडतें कीं काय असें वाटूं लागलें. परिचयकार आभारांची सरबत्ती करण्याकरतां पुढें सरसावले. भ्रमरांच्या अनाथावरच्या दोन गाण्यानीं—एक अनाथ विधवेवरील व दुसरें अनाथ बालकावरील—मराठी भाषा सनाथ झाली असल्याचें ते सांगूं लागले. त्यांच्या अप्रासंगिक कोटीमुळें श्रोतृवृंदांत गलबला सुरू झाला. तिकिटविक्रीचें उत्पन्न पांचशें रुपये झालें असें कुणींसें मधेंच ओरडून सांगितलें. नौकेवरील होकायंत्राचें लक्ष भोंवतालच्या सृष्टिशोभेऐवजीं ध्रुवाकडे जसें असतें त्याप्रमाणें भ्रमरांचें लक्ष या सर्व प्रकारांपेक्षां त्या दोन तरुणींकडे होतें. आळशाकडे गंगा यावी त्याप्रमाणें त्यांतील दुसरी तरुणी ते बाहेर जावयाला निघालेले पाहून त्यांच्याजवळ आली व म्हणाली, 'वाऱ्यावर' ही कविता अद्यापि कुठें छापली नाहीं वाटतें?'

'नाहीं, ती अद्यापि अप्रसिद्धच आहे' भ्रमरांनीं स्मितपूर्वक उत्तर दिलें.

'सुप्रसिद्ध होऊनही अप्रसिद्धच वाटतें!'

भ्रमरांनीं फक्त स्मित केलें.

'मला ती कविता उतरून घ्यायची आहे. आपली वही मला द्याल कां? मी काव्याच्या वाटेला आजपर्यंत गेलेलें नाहीं, आणि माझा कुठल्याही मासिकापाशीं वशिला नाहीं. तेव्हां आपल्याला चोरीची भीति मुळींच बाळगायला नको. अप्रसिद्ध कविता न् अविवाहित मुली यांना फार जपावें लागतें असें परवांच कुठल्याशा चुटक्यांत वाचलें होतें म्हणून म्हटलं हं.'

'तुम्ही खुशाल वही घेऊन चला, रसिक व चोर यांतलें अंतर न कळण्याइतका कांहीं कवि वेडा झालेला नसतो.'

'उद्यां परत कोणत्या पत्त्यावर करूं ही?'

'मीच येईन न्यायला. तुमचा पत्ता देऊन ठेवा म्हणजे झालं'

'संध्याकाळीं सहाच्या सुमाराला या म्हणजे बाबासाहेबही भेटतील' असें म्हणून तरुणीनें आपला पत्ता कविराजांना लिहून दिला.

'कमळाताई कुळकर्णी
डॉक्टर देशपांडे, यांचे घरीं.
हौदासमोर, सदाशिव पेठ'
पुणें.'

'कमळाताई कुळकर्णी, डॉक्टर देशपांडे यांचे घरीं. हौदासमोर, सदाशिव पेठ, पुणें' हें रूक्ष गद्य एखाद्या लोकप्रिय चालींत बसत नव्हतें अगर लोकांच्या डोळ्यांतून टिपें काढण्याइतका करुणरसही त्यांत भरला नव्हता. पण तिकडचें पहिलेंच पत्र पुनः पुनः वाचणाऱ्या नववधूप्रमाणें भ्रमरांनीं त्या पत्त्यांचीं किती पारायणें केलीं असतील याची गणतीच नाहीं. 'कमळ किती नांव सार्थ आहे. कमळाताई कुळकर्णी. नांवांत अनुप्रासदेखील आहे' असेंही ते स्वतःशीं पुटपुटले. मोहिनीविद्येनें भारल्या गेलेल्या मनुष्याप्रमाणें त्यांची स्थिति झाली. या वेळीं ती आपली वही काढून कविता वाचीत बसली असेल, त्यांतली आवडलेली कविता ती गोड गळ्यानें म्हणतही असेल, वाऱ्याला तें सूर गुप्तपणानें घेऊन येण्याची शक्ति असती तर आपण त्याला वाटेल तें आमिष दाखवून त्याच्याकडून तें काम करून घेतलें असतें, असे विचार त्यांच्या मनांत घोळूं लागले. खिडकींतून बाहेर पडलेलें स्वच्छ चांदणें पाहून त्यांना कमळेच्या हास्याची आठवण झाली; क्षितिजाच्या कडेला चमकणाऱ्या दोन चांदण्या पाहून तिचे डोळे त्यांच्या दृष्टीपुढें उभे राहिले; निशिगंधाचा सुगंध येणारी वायूची झुळूक तिच्या मनोहर बोलण्यासारखी त्यांना वाटूं लागली. आजपर्यंत भ्रमरांनीं पुष्कळ प्रेमविषयक कविता लिहिल्या होत्या. पण त्यांच्या मनाला इतकी गोड हुरहुर कधींच लागली नव्हती.

मनाच्या उड्डाणाला काळ अगर दिशा कोणींच प्रतिबंध करूं शकत नाहींत. कमळा व आपण बोहल्यावर उभे राहिलों आहों असें सुखस्वप्न त्यांना पडूं लागलें. पण पक्ष्यांचा प्रातःकालीन गोड किलबिलाटांत कुठून तरी घुबडाचा घुत्कार ऐकूं यावा त्याप्रमाणें 'मामांना हें लग्न आवडेल का?' या विचारानें त्यांच्या गोड तंद्रीचा भंग केला. 'न आवडायला काय

झालं ! मुलगी दाखवितांना कुंकू जरा सढळ हातानें लावलें आणि मुलीला इंग्रजी येत नाहीं म्हणून सांगितलं कीं म्हातारा खूष होईल. जन्माच्या सुखासाठीं घडकाभर जुन्या चालींचें होणें कांहीं कठीण नाहीं ' त्यांनींच आपल्या मनाचं समाधान केलें.

दुसरे दिवशीं देशपांडे डॉक्टरांच्या घरीं जातांना भ्रमरांचें हृदय धड-धडत होतें. युद्धाप्रमाणें प्रेमाच्या कथा रम्य, पण प्रत्यक्ष प्रसंग कठीण असतात. कमळेशीं बोलतांना कोणत्या कोट्या करायच्या याचा ते विचार करीत चालले होते. पुष्करिणीच्या हौदावरून सदाशिव पेठेंत जाण्याकरितां ते वळले तोंच समोरून काल नाटकगृहांत काव्यगायनाच्या वेळीं रडत असलेली मुलगी येत असलेली त्यांनीं पाहिली. त्यांना काय वाटलें कुणाला माहीत. हातांतील हातरुमाल त्यांनीं रस्त्यावर टाकला. त्या मुलीनें तो हातरुमाल पाहिला व तो चुकून पडला असेल असें वाटून चटकन तो उचलून त्यांना दिला. ' ओहोहो, लक्षच नव्हतें माझें हातरुमालाकडे ' ' कविच आहांत आपण ' ती मुलगी जमिनीकडे पाहत म्हणाली.

' मी तुमचा फार फार आभारी आहें. हा हातरुमाल हरवला असता तर मला अतिशय वाईट वाटलें असतं, माझ्या एका जिवलग मित्राची भेट आहे ती. आतां ती मैत्रिणीचीच भेट झाली आहे असें म्हणायला हरकत नाहीं !

त्या मुलीच्या गालावर नकळत लाली चढली. इतका वेळ रस्त्यावर एका परक्या तरुणाशीं आपण बोलत राहिलों ही केवढी चूक केली असें वाटून ' जातें मी ' असें ओंठ चावत ती बोलली व हातांतील पुस्तकें सांवरीत निघून गेली. हातरुमाल टाकल्याबद्दल भ्रमरांचें मनही आतां त्यांना खाऊं लागलें. आपल्या ह्या कृत्यानें केवळ हातरुमालालाच धूळ लागली असें नाहीं तर आपलें मनही मलिन झालें असें त्यांना वाटूं लागलें.

खिन्न विचारांचे हे मेघावडंबर डॉक्टर देशपांडे यांचे घर व त्यांच्या दारांत उभी असलेली कमळेची तेजस्वी मूर्ति दिसतांच नाहींसें झालें. कमळा त्यांना तत्काळ माडीवर घेऊन गेली.

' या कविराज, या ' खुर्ची पुढें करीत डॉक्टर म्हणाले, ' आमच्या

कमळीमुळें तुमची ओळख होण्याचें भाग्य आम्हांला लाभलें. नाहीं तर कडू कोयनेल पाजणाऱ्या डॉक्टरला काव्यामृताचा वर्षाव करणारा कवि भेटायला जातो कशाला!'

'ताप आला म्हणजे' कमळ हंसत हंसत म्हणाली, 'काव्यांत नवरस विपुल असले तरी कोयनेलचा थेंब औषधाला देखील मिळायचा नाहीं.'

कमळेकडे भ्रमरानें प्रसन्न मुद्रेनें पाहिलें. 'काव्यांतले सगळे रोग प्रीतीजन्यचेच असतात. वियोगाच्या तापावर किराइताचा काढा देण्यांत मतलब काय?' कांहीं तरी प्रत्युत्तर द्यायचें म्हणून तो बोलला. 'तुमच्या साऱ्या कविता कमळीनें मला म्हणून दाखविल्या. 'वाऱ्यावर' 'हत दैवा मी' 'कोण पुसतो जातिला' छान कविता आहेत या. अगदीं आगरकरांनीं तुमच्या डोक्यावर वरदहस्त ठेवलेला दिसतो. माझी बालंबाल खात्री आहे कीं सामाजिक सुधारणेवांचून देशाचें पुढें पाऊल पडणें शक्यच नाहीं. 'मलाही तेंच वाटतें. हिंदुमुसलमानांच्या दुहीइतकेंच बालविधवेचें दुभंगलेलें अंतःकरणही आमच्या प्रगतीला अडथळा करीत आहे. अस्पृश्य म्हणून आपल्या देशबांधवांना दूर लोटणाऱ्या लोकांना यशोदेवता तरी जवळ कशी ओढील? 'गृहरत्नानि बालकानि' असें एका तोंडानें म्हणायचें आणि अनाथ बालकांचा तिटकारा करायचा याला कुणी धर्म म्हणेल का?'

कमळा सद्गदित कंठानें म्हणाली 'भ्रमर, तुमचे विचार फार उदार आहेत. मराठी कवितेचें भाग्य मोठें म्हणून तुमच्या सारखे समतेचा पुरस्कार करणारे कवि तिची सेवा करीत आहेत.' 'तुमचे मामा मोठे जमीनदार आहेत म्हणे वऱ्हाडांतले,' डॉक्टरनीं पृच्छा केली.

'होय. त्यांना मूलबाळ नसल्यामुळें त्यांची सारी जिंदगी मलाच मिळणार आहे. मी कवि होण्यापेक्षां वकील झालों असतों तर त्यांना फार बरें वाटलें असतें. पण कायद्याच्या कलमापेक्षां काव्यांतलीं कमळें बरीं असें वाटून मीं तो मार्गच सोडून दिला.'

'तुम्ही नुसते वकील झाला असतां तर समुद्रांतून मोत्यें न काढतां मीठ काढण्यासारखाच तो प्रकार झाला असता' कमळा म्हणाली.

तिच्या बोलण्यांतला मोहक प्रेमळपणा भ्रमरांना अवर्णनीय वाटला.

डॉक्टर म्हणाले 'भ्रमर, तुम्ही सामाजिक काव्येंच लिहीत चला. अनाथ मुलांचीच गोष्ट घ्या ना. दोन विषांच्या मिश्रणानें एखादें चांगलें औषध तयार झालें तर तें विषारी म्हणून फेंकून देणें शहाणपणाचें होईल का? पंढरपूरचा अनाथबालकाश्रम तुम्ही मुद्दाम पाहा. मी त्या आश्रमाचा हितचिंतक असून हरतऱ्हेनें त्याला साहाय्य करीत असतों. [घाणेरड्या किड्यांच्या पोटीं निघालेलें म्हणून रेशीम फेंकून देऊन काथ्या कवटाळायला जाणारा समाज म्हणजे नुसता मूर्खांचा बाजार आहे.] बोलतां बोलतां डॉक्टरनीं कमळकडे पाहिलें. तिनें आपल्या खालील ओठांवर दांत घट्ट रोंवले होते. ती शांतपणें म्हणाली ' बाबासाहेब, त्या बाळंतिणी पाहायला जायची वेळ झाली नाहीं. "

'खरंच विसरलों होतों मी. काव्यानंदीं लागली टाळी, कोण रोग्यातें संभाळी काय भ्रमर, तुमच्या घटकाभरच्या सहवासानें मला एवढी काव्यस्फूर्ति होऊं लागली, मग तुमचा जन्माचा सहवास ज्याला लाभेल तें माणूस सवाई कालिदासच होईल. कमळ, यांना चहा दिल्यावांचून सोडूं नकोस हं. न् भ्रमर तुम्ही पुण्यांत असेपर्यंत संध्याकाळीं आमच्याकडेच चहाला येत चला. '

डॉक्टर हंसत हंसत निघून गेले. कमळ व भ्रमर स्तब्ध राहिलीं, एकमेकांनीं एकमेकांकडे हळूच पाहण्याचा प्रयत्न करावा, पण परस्परांची दृष्टादृष्ट होतांच दुसरीकडे नजर फिरवावी असें एकदोन वेळां झालें. संभाषणाला कांहीं तरी विषय मिळावा म्हणून भ्रमारानें विचारलें ' बाबासाहेबांना रविवर्म्यांच्या चित्रांची फार आवड दिसते. शुकरंभेपासून अर्जुन–सुभद्रेपर्यंत सर्व तसबिरा इथं लटकलेल्या दिसतात. तुम्हांला यांतलें कोणतें चित्र आवडतें ! '

' शकुंतलाजन्म. पुराणकाळीं पक्षी सुद्धां बापडे दयाळू होते. आईबापांनीं दिलेल्या अर्भकाचें त्यांनीं रक्षण केलें. त्या साऱ्या पांखरांचें सध्यांच्या काळीं मात्र कावळ्यांत रूपांतर झालें आहे. बाकी जन्मतः अनाथ म्हणजे जन्माचेंच अनाथ नाहीं ! बिचाऱ्या शकुंतलेला जन्मकाळीं आईबापांनीं टाकली ती टाकली ! पुढें नवऱ्यानें तरी नीट वागवायची होती !

पण म्हणतात ना फुटकें नशीब न् फुटकी कांच ब्रह्मदेवाला–देखील सांधता येत नाहीं.'

शकुंतलेची महाभारतांतील कथा कालिदासाच्या नाट्यकथेपेक्षां फार भिन्न आहे. हे शब्द भ्रमराच्या ओंठापाशी आले होते. पण कमळेच्या चेहऱ्याकडे पाहतांच त्याला बोलण्याचें धैर्यच झालें नाहीं. रविवर्म्याच्या चित्राकडे पाहून तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले होते.

चार सहा दिवसांत भ्रमर व कमळ दोघांची फार दिवसांची मैत्री असल्यासारखीं वागूं लागलीं. 'वचने किं दरिद्रता' या न्यायानें असो, अगर कमळला सामाजिक सुधारणेच्या गोष्टी आवडतात म्हणून असो, पुनर्विवाह, जातिभेदविध्वंसन, अनाथअर्भकांचें संगोपन इत्यादि विषयांवर भ्रमर शिरा ताणताणून बोलत राही. पांचवे कां सहावे दिवशीं डॉक्टरांच्या घरून जातांना तो कमळला एक पत्र देऊन गेला. पत्रामध्यें त्यानें आपलें कमळवरील प्रेम व्यक्त केलें असून मामांचें ताबडतोब निघून येण्याविषयीं पत्र आल्यामुळें उद्यां आपल्या पत्राचें उत्तर द्यावें अशी त्यांत विनंती केली होती. तें पत्र वाचतांच तप्त मरुभूमीवर मुसळधार पाऊस कोसळावा तशी कमळच्या मनाची स्थिति झाली. जीवावरच्या दुखण्यांतून उठलेला मुलगा भेटला म्हणजे आई त्याला जशी घट्ट पोटाशीं धरते तसें तिनें तें पत्र हृदयाशीं धरलें. तिच्या डोळ्यांपुढें भविष्यकाळचीं चित्रें नाचूं लागलीं. भ्रमराचें मन आपल्या सहवासानें अधिक प्रफुल्लित झाल्यामुळें त्याच्या हातून सुंदर प्रेमपर कविता निर्माण होत आहेत, जग त्याचें कौतुक करीत आहे आणि भ्रमर एकांतांत त्या कौतुकाचें सारें श्रेय आपल्याला देत आहे असें गोड स्वप्न तिला पडूं लागलें. समुद्रांत नदी अगर हवेंत गाण्याची लकेर जशी पूर्णपणें मिसळून जाते त्याचप्रमाणें भ्रमराच्या जीविताशीं आपलें जीवित समरस झाल्याचें दृश्य तिनें कल्पनाचक्षूंनीं पाहिलें.

दुसरे दिवशीं भ्रमराचें पाऊल जिन्यावर वाजतांच जणूं काय त्याचा प्रतिध्वनि तिच्या हृदयांत होऊं लागला. भ्रमराला पाहण्यासाठीं ती उत्सुक झाली होती. पण तो दिसतांच तिची मान मात्र दुसरीकडे वळली. 'आमच्या अर्जाचा निकाल कळेल कां आज ! ' भ्रमरानें हंसत हंसत

विचारलें ' खाविंदाकडून अर्जाचा अनुकूल निकाल झाल्यास मी खाविं-दाचा जन्मभर ऋणी राहीन '

' ऋणानुबंध असेल तसें होईल ' कमळ कंपित स्वरानें म्हणाली.

' हा वेदान्त नको बोवा यावेळीं ऐकायला. लग्नाच्या बोलण्यांत वेदान्त म्हणजे भुकेलेल्या मनुष्यापुढं मौल्यवान हिरे ठेवण्यासारखें आहे '

' पण मी आपल्याला शोभण्यासारखी कुठें आहे ! शालजोडी शेजारीं वाकळ ठेवली, तर लोक काय म्हणतील ! '

' विद्या–विनयानें शोभत असली तरी प्रेम कांहीं शोभत नाहीं. तूं स्वतःला वाकळ म्हणून घ्यावयला लागलीस तर आम्हांला फाटक्या चिंधी-चा देखील मान मिळणार नाहीं जगांत. '

' आपल्याला कमळा आज चांगली दिसते आहे, पण जगांत दिसतें तसें नसतें असें म्हणतात.'

' पुष्कळ वेळां दिसतं त्याच्यापेक्षां अधिक देखील असतें. तसें म्हटलें तर मीच तुला शोभणार नाहीं. आईबाप, बहीणभाऊ कोणी नाहीं मला. कवितेच्या पायीं शिक्षण बुडालें–'

' देवासाठीं ध्रुवानें राज्य गमावलं म्हणून त्याला कोणी वाईट म्हणत नाहीं. ' ' मामांची मिळकत त्यांच्या मागून मिळणार एवढाच काय तो माझा गुण.'

' त्या मिळकतीपेक्षां आपण कवि या नात्यानें मिळविलेल्या कीर्तीचीच किंमत किती तरी अधिक आहे. आपली पत्नी होण्याचें भाग्य जिला लाभेल.

' कमळ, सर्वनामांत न बोलतां विशेष नामांत बोललें तर चालणार नाहीं कां ? कां कवितेची सवत व्हायची तुला भीति वाटतें ?'

' मला निराळीच भीति वाटते आहे.'

' माझे मामा जुन्या चालीचे आहेत असें मी परवां एकदोनदां म्हटलं म्हणून तुझ्या मनांत शंका आली कीं काय ? तुझें इथलें वैद्यकीचें शिक्षण पुरें करायचें न् मी जशी साहित्यसेवा करीन तशी तुझ्या हातून समाज सेवा करवायची असें मी आधींच मनाशीं ठरवून टाकलं आहे.'

' आपली उदार मतं मला माहीत आहेत. जाळावांचून कढ नाहीं त्याप्रमाणें कळवळ्यावांचून काव्य नाहीं हें कां मला कळत नाहीं ? समाजा-

साठीं पदोपदीं तुटणाऱ्या आंतड्यांच्या तारा कराव्यांत तेव्हां कुठें सरस्वतीला प्रसन्न करील अशी सतार तयार होते. आपल्याविषयीं मला काय वाटतं तें मी कसें सांगूं—'

'जिभेनें सांगायचं नसलं तर ओठांनीं सांग.'

अंगावर शहारे आल्यासारखें करून कमळ म्हणाली, 'भ्रमर, माझ्या हृदयांत जी कालवाकालव होते आहे ती जर तुम्हांला कळेल—शकुंतलेप्रमाणें—' 'शकुंतलेप्रमाणें तूं सुंदर आहेस म्हणूनच तर हा भ्रमर तुझ्याभोंवतीं घिरट्या घालीत आहे. या भ्रमराला दुष्यंताच्या पदवीला चढविणं तुझ्या हातांत आहे.'

कमळेनें आपलें तोंड दोन्ही हातांनीं झांकून घेतलें. ती सकंप स्वरानें म्हणाली, 'भ्रमर, भिकाऱ्याला पंचपक्वानें खावींशीं वाटतात हा त्याचा अन्याय आहे कां! आंधळ्याला सुंदर उषःकाल पाहण्याची इच्छा उत्पन्न झाली तर तो त्याचा अपराध म्हणतां येईल का! लग्न करायचं नाहीं असा बेत करून मी वैद्यकीचं शिक्षण घ्यायला सुरवात केली; पण प्रेमामुळें उत्पन्न होणाऱ्या हृदयाच्या दुर्बलतेवर वैद्यशास्त्रांत सांगितलेलीं औषधं उपयोगी पडत नाहींत, हा अनुभव मला गेल्या आठवड्यांत आला. एरवींच्या समुद्राला भरतीओहटी तरी असते; पण प्रेमाच्या समुद्राला नेहमीं भरतीच येत असते.'

'भरती नेहमीं पुढें पुढें जात असते. तुझ्याप्रमाणें एक एक पाऊल मागें जात नाहीं.'

'पाणिग्रहणाकरतां आपण माझा हात हातांत घेतला न् त्या वेळीं जर आपल्या कानावर एकच शब्द पडला तर आपण तत्काळ माझा हात झिडकारून द्याल अशी मला भीति वाटते. दुर्दैवी माणसं भित्रीं असतात असं आपण म्हटलें तरी हरकत नाहीं. पण—'

'तुझ्यासारखी गुणांची पुतळी लाथाडून देण्याइतका मला मूर्ख बनवील असा तो शब्द कोणता तें तरी ऐकूं दे.'

'सांगूं का! एक वेळ वाटतं काहीं सांगूं नये. आहे एवढाच स्नेहसंबंध कायम राहिला तरी त्यांत केवढं तरी सुख आहे. सोन्याच्या आशेनं हातचं लोखंड देखील जायचं.'

'कितीही कडू शब्द असला तरी तो मी ऐकेन. सांग माझ्या गळ्याची शपथ आहे तुला.'

'भ्रमर, सांगतें याबद्दल क्षमा करा हं! तो शब्द–तो शब्द–अनाथ–' कमळेचा हुंदका एकदम बाहेर फुटला.

'अनाथ' खुर्चीवरून ताडकनू उठून भ्रमर म्हणाला.

कमळ स्फुंदत म्हणाली 'होय अनाथ, भ्रमर तुम्हीं कृपा केलीत तर उद्यां मी तुमची होईन. पण आतां मी कोणाची आहें, म्हणून सांगू? आईनं वाळवंटांत टाकलेली, कुणा तरी दयाळू मनुष्यानें उचललेली आणि बाबासाहेबांनीं शिकवलेली मी अनाथ मुलगी आहें. 'तूं कुणाची' म्हणून तुम्हीं विचारलंत तर मी काय उत्तर देऊं? 'तुझी जात काय' म्हणून प्रश्न केलांत तर काय सांगूं? भ्रमर काय सांगूं? मी देवाची आहें आणि माझी जात माणूस ही आहे!'

कमळा स्फुंदस्फुंदून रडूं लागली. तिला मान वर करून पाहण्याचें धैर्य होईना. भ्रमर जवळ येईल, आपल्याला रडूं नको म्हणून सांगेल, हृदय जात पाहत नाहीं, प्रेम पाहतें असें उत्तर देईल, हळूच आपल्या पाठीवरून हात फिरविल अशी तिला फार फार आशा होती. त्यानें पाठीवरून हात फिरवीला तर तो दूर करावयाचा नाहीं असें तिनें मनांतल्या मनांत ठरवलेंही होतें. दरिद्र्याप्रमाणें दुर्दैव्यांचेही मनोरथ चालूं लागण्यापूर्वीच मोडून जातात. थोड्या वेळानें तिनें मान वर करून पाहिलें तों भ्रमर जिच्यावर बसला होता ती खुर्ची रिकामी होती.

— ४ —

आपल्या पायाखालीं काय जळतें आहे हें मनुष्याला दिसत नाहीं; मग हृदयाच्या सागरांत लपून बसलेल्या अहंकाररूपी वडवानलाची त्याला दाद कुठून लागणार? झालेल्या प्रकारांत सगळा दोष कमळेचाच होता असें भ्रमरानें ठरविलें. आपल्या पहिल्या भेटींत कमळनें आपण अनीतीच्या पंकांत जन्माला आल्याची कबुली त्याच्याजवळ दिली नाहीं हा त्याच्या मतें तिचा सर्वांत मोठा गुन्हा झाला. आपल्या कवितेंतील कल्पना दुसऱ्या कवितेंतून घेतल्या आहेत असा आक्षेप ऐकतांच ज्याच्या आंगाची लाही

होत असे त्याच मनुष्यानें एका अठरा वीस वर्षांच्या तरुण कुमारिकेनें आपण होऊन आपल्या अभागी जन्माची कुळकथा दुसऱ्याला सांगत सुटावें अशी अपेक्षा करणें कितीसें न्यायाचें होतें ! पण आंधळ्या स्वार्थाला न्याय दिसत नाहीं हेंच खरें.

कमळाबाई कुळकर्णी या नांवावरून भ्रमर फसला होता. ती बहुधा देशपांड्यांची भाची असेल, डॉक्टर देशपांड्यांचा धंदा चालत असल्यामुळें व त्यांना मूलबाळ नसल्यामुळें ते कमळीला चांगला हुंडा देतील आणि आपले जुन्या चालीचे मामा हुंड्याचें मधाचें बोट लागल्यामुळें कमळचें वय अगर शिक्षण पाहून आंबट चेहरा करणार नाहींत असें त्यानें मनोराज्य केलें होतें. पण कमळेच्या अनाथपणामुळें त्याचें हें राज्य एका क्षणांत बुडालें. जिच्या आईबापांचा पत्ता नाहीं अशा एखाद्या मुलीशीं लग्न करायचें ! घाणेरीचें फूल देवाच्या मूर्तीवर कोणी वाहील का ? रूढिबुद्ध मनानें तिचें हलकें कुळ पुढें काढतांच त्याचें सुसंस्कृत, काव्यमय मन चवताळून उठलें. जगांत गुणाला किंमत असते, कुळाला नसते ह्या तत्त्वावर आजपर्यंत तूंच काव्यें रचलीं नाहींस कां ? वेळूची मुरली होते, म्हणून ती कांहीं कुणी जाळत नाहीं; घोड्यांच्या केसांची चवरी देवादिकांच्या डोक्यावर देखील मिरवीत असते; हिरा कोळशांच्या कुळांत जन्माला आलेला असतो म्हणून सोनार शेगडी पेटविण्याला त्याचा उपयोग कधीं करील का ? एक न् दोन, अनेक उदाहरणें या मनानें पुढें केलीं व 'अनाथ' शब्दाच्या गालबोटानें मनुष्याचें गुणसौंदर्य कमी होतें असें मानणें मूर्खपणाचें आहे हें सिद्ध केलें. हा पुरावा इतका खंबीर होता कीं, भ्रमराचें मन क्षणमात्र डळमळलें. आल्या पावलींच कमळच्या घरीं जावें. रागाच्या झटक्यांत एकदम निघून गेल्याबद्दल तिची क्षमा मागावी आणि तिच्या आसवांत आसवें मिळून त्यांत तिचें हलकें कूळ व आपलें हलकें मन यांच्या पापाचें क्षालन करून टाकावें असा विचार त्याच्या मनांत उभा राहिला. स्वार्थ, व्यवहार, व रूढि कमळला महारोगी मानून तिच्यापासून दूर जावयाला त्याला सांगत होती. प्रेम, दया व समता त्याला कमळला देवता मानून तिच्याकडे धांव घ्यायला सांगत होती. या दोन पक्षांच्या झगड्यांत तो दिङ्मूढ होऊन रस्त्यावर स्तब्ध उभा राहिला. या स्थितींत त्याला कुणी

पाहिलें असतें तर त्याची खास वेड्यांतच गणना केली असती. कमळशीं लग्न म्हणजे मामांच्या आयत्या चालून येणाऱ्या मिळकतीवर पाणी सोडायचें हा विचार त्याच्या मनांत प्रबळ झाला आणि कमळविषयीं रागानें त्याचें मन व्यापून टाकलें. कमळशीं आपण लग्न केलें तर चार दोन फारशीं न खपणारीं सुधारक वर्तमानपत्रें एक दिवस आपला बोलबाला करतील, पण मामा मात्र जन्मभर बोलणें टाकून देतील. एवढेंच नव्हे, तर पुन्हा तोंड देखील पाहाणार नाहींत ही त्याची पक्की खात्री होती. आज किती तरी वर्षें मामांच्या समजुतीसाठीं तो मुंबईला येऊन राहत होता व वकिलीच्या परीक्षेचा अभ्यास करण्याचा बहाणा त्यानें चालविला होता. साध्या परीक्षेच्या बाबतींत मामांची मर्जी मोडणें जर इतकें कठीण तर लग्नासारख्या बाबतींत त्यांना दुखविणें सर्वथैव अशक्यच होतें. पण कमळला मनांतून काढून टाकायचें म्हटलें म्हणून ती थोडीच जाणार होती! कमळशीं लग्न करणें शक्य नाहीं असा ठाम निश्चय होतांच आपल्या अंतःकरणांत पेटलेली आग शांत होईल असें त्याला आरंभीं वाटलें होतें. पण या निश्चयानें त्या आगींत उलट तेलच पडलें. जडजवाहिरानें भरलेल्या निर्मनुष्य बेटावर टाकल्यासारखें आपलें आयुष्य होणार असें त्याला वाटूं लागलें. तारा तुटलेली सोन्याची सतार, हजारों भक्तांकडून पूजिली जाणारी पाषाणमूर्ति, आणि प्रेमविषयाला पारखें होऊन कुबेराच्या संपत्तींत लोळणारें जीवित सारखेंच नाहीं कां असें कोणीसें त्याच्या अंतःकरणाच्या कोंपऱ्यातून विचारलें. त्या विचारणाऱ्याचा त्याला फार राग आला; पण सारें जग धुंडाळूनही हा रोखठोक प्रश्न करणारा निराकार रामशास्त्री त्याला सांपडणें शक्य नव्हतें. आपल्या या मनःसंतापाला कमळाच सर्वस्वीं कारणीभूत आहे असें त्याच्या मनानें घेतलें व तिला एक चांगलें खरमरीत पत्र लिहिण्याचें त्यानें ठरविलें. रस्त्यावरील एका देवळांत जाऊन त्यानें भराभर लिहावयाला सुरवात केली. श्री मायना वगैरे सर्व गोष्टी गुंडाळून ठेवून त्यानें आरंभ केला. 'खरें प्रेम व फसवणूक एकत्र कधींच नांदत नाहींत. कमळ, पहिल्याच भेटींत तूं आपल्या जन्माची घाणेरडी हकीगत जर मला सांगितली असतीस तर अपूर्व स्वार्थत्याग करूनही मी तुझें पाणिग्रहण करावयाला तयार झालों असतों. सौंदर्याचें आमिष दाखवून मला जाळ्यांत

पकडल्यानंतर तुला आपल्या कुळाची आठवण झाली. हें जाळें तटातट तोडून टाकण्याची शक्ति या माशाच्या अंगीं आहे याची तुला कल्पनाही नसेल. कर्ण आणि शकुंतला यांच्या जन्मांच्या दाखल्यांनीं तूं आपल्या जन्माचें समर्थन करशील. पण अशा शकुंतलेशीं लग्न लावायला मी थोडाच दुष्यंत राजा लागून गेलों आहे! वेश्या पुरवल्या; पण तुझ्या-सारख्या सोदेगिरी करणाऱ्या 'अनाथ' बायका नकोत. तुझ्यासारख्या 'अनाथ' माणसाला सनाथ करण्याचें भाग्य मला लाभलें नाहीं याबद्दल मला फार आनंद वाटतो. तुमच्यासारख्या अनाथांना सनाथ करायला एक अनाथांचा नाथ मात्र समर्थ आहे.'

डायरीतून पाकीट काढून वर कमळचा पत्ता लिहून त्यानें तें तात्काळ पोस्टांत टाकलें. शत्रूच्या वर्मी घाव घालणाऱ्या मनुष्याला होणारा आनंद क्षणभर त्याला लाभला. पण दुसऱ्याच क्षणीं मनाची बोंचणी सुरू झाली. रस्त्यावरील स्त्रीपुरुष पाहून यांपैकीं कुणीच अनाथ नसे तर कां, असेल तर नवऱ्याला जन्माची खरी हकीगत समजल्यावर बायकोला व बायकोच्या जन्माचा इतिहास कळल्यावर नवऱ्याला काय वाटेल, अशीं नवराबायको सत्य कळल्यावर पुढें सुखानें नांदतील कीं नाहीं, असले विचार त्याच्या मनांत येऊं लागले. डोकें शांत करण्यांकरतां तो भांबुर्ड्याच्या बाजूला वळला. त्यानें वर पाहिलें. अनाथ सूर्य पृथ्वीला प्रकाशित करून अस्ताला चालला होता. या सूर्याच्या आईबापांची कधीं कुणी चौकशी केली आहे कां! भांबुर्ड्याजवळ जवळ वाऱ्याची एक झुळुक फुलांचा मधुर सुगंध घेऊन आली. त्या झुळुकेनें त्या फुलांच्या कुळाकडे पाहिलें असेल कां! परत गांवांत जाऊन कमळेला लिहून टाकलेलें पत्र परत घ्यावें असें त्याला वाटूं लागलें. पण त्या विचारा पाठोपाठच 'कारट्या, ना कुळ ना शील अशा मुलीचीं लग्न करून माझ्या तोंडाला काळें फासलेंस चल हो चालता, तुला एक फुटकी कवडीदेखील माझ्याकडून मिळणार नाहीं, असें म्हणणारी मामांची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहिली. भ्रमर मागें परतला नाहीं.

संध्याकाळीं मुंबईची गाडी येण्याची वेळ झाली होती. मुंबईहून येणारे जे उतारू आपल्याला गाडीच्या खिडक्यांतून सहज दिसतील त्यांचा आपल्या आयुष्याशीं जेवढा संबंध तेवढाच कमळेचा; अशी कल्पना मनां-

त येऊन ग्रस्त मनःस्थितींतही भ्रमरला हसूं आलें. चुकून जर आपण तिच्याशी लग्न करण्याचें कबूल केलें असतें तर मात्र आगागाडीखालीं सांपडणाऱ्या माणसाप्रमाणें आपली स्थिति झाली असती, अशीही त्या कल्पनेची वाढ झाली. ही दुसरी कल्पना मनांत यावयाला व भ्रमरानें निरखून रुळाकडे पहावयाला एकच गांठ पडली. रुळापाशीं कुणी तरी बाई उभी आहे असें त्यास वाटलें. आत्महत्येच्या विचारानें कमळाच तर इकडे आली नसेल ना ? अशी कल्पना चटकन् त्याच्या मनांत चमकून गेली. खरोखर कमळाच असती तर तिच्या आत्महत्येबद्दल मानवी नाहीं तरी ईश्वरी न्यायासनापुढें आपण जबाबदार ठरण्याचा संभव आहे. असें भ्रमराला वाटूं लागलें. रुळाजवळ जाऊन खरा प्रकार पाहण्याची त्याला तीव्र इच्छा उत्पन्न झाली. पण लगेच ती कमळा असली तर आपण तोडून टाकलेला पाश दुप्पट दृढ होऊन आपल्या गळयाभोवतीं बसेल अशी भीतिही मनांत डोकवूं लागली. भपभप करीत धुराचे सुस्कार सोडित गाडी येत असलेली त्याच्या दृष्टीला पडली. तो गाडीकडे पाठ फिरवून उभा राहिला. गाडी निघून जातांच रक्तानें लडबडलेला छिन्नभिन्न झालेला कमळेचा देह दृष्टीला पडण्याची भीति असतांनाही तो रुळाकडे गेला. एक तरुणी गुडघ्यांत मान घालून तिथें रडत बसली होती. ' देवा, संसाराचें सुख नाहींतर नाहीं पण आत्महत्येचें धैर्य तरी मला कां दिलें नाहींस रे. ' असें त्या तरुणीनें स्फुंदत काढलेले शब्द त्याच्या कानांवर पडले. तो आवाज त्यानें लगेच ओळखला. काव्यगायनाच्या दिवशीं ' हतदैवा मी' या कवितेच्या वेळीं रडणाऱ्या, रस्त्यांत त्याचा हातरुमाल उचलून देणाऱ्या बालविधवा तरुणीचा तो आवाज होता. भ्रमर एकदम मनांत चमकला. पाऊल न वाजवितां परत जावें असें त्याला वाटलें. पण दुसऱ्याच क्षणीं सहानुभूति व जिज्ञासाही प्रबळ होऊन त्यानें तिच्या खांद्यावर हात ठेवला. तरुणीनें वळून मागें पाहिलें तो भ्रमर। आपण काय करीत आहों याचें तिला भानही राहिलें नाहीं. तिनें भ्रमराच्या पायाला विळखा घातला. भ्रमरानें तिला वर उचललें. उचलतांना त्याचा हात निरपेक्ष दयेनेंच पुढें सरसावला होता. तरी तिच्या सुंदर शरीराचा स्पर्श होतांच त्याच्या शरीरांत सळकन् वीज चमकून गेली. सूर्य केव्हांच मावळला होता. अर्धवट

संधिप्रकाशांत तिला वर उचलतांना तिची मूर्ति स्वार्गातून पृथ्वीवर उतरणाऱ्या अप्सरेप्रमाणें त्याला भासली. तिचे अश्रू पुसण्याकरितां त्यानें तिच्या डोळयांवरून हात फिरविला; पण हात फिरविल्यानंतर गालाच्या वरच्या बाजूला चमकणारे तिचे डोळे संध्या तारकांप्रमाणें आहेत हा विचार त्याच्या मनांत आल्याबांचून राहिला नाहीं. त्या बालिकेनें विश्वस्त मनानें त्याच्या खांद्यावर मान टाकली व हुंदके देत देत आपली हकीगत त्याला सांगितली. ' माझें नांव कुमुद. माझ्या लग्नाची मला इतकी थोडी आठवण आहे कीं तें स्वप्नांतच झाल्यासारखें वाटतें. कपाळ फुटल्यानंतर पुण्याला चुलतीच्या घरीं मी शिकायला आलें. पण चुलतीनें अगदीं भाजून खायला सुरवात केली. तोंड दाबून बुक्कयांचा मार झाला, पण तो न खाऊन सांगणार कुणाला ? परवां रस्त्यांत आपला हातरुमाल उचलून दिला. ती गोष्ट तिच्या कानांवर कुठून गेली कुणाला ठाऊक, तेव्हांपासून ती एकसारखी हात धुवून माझ्या पाठीमागें लागली आहे. ' शाळेंत परक्या पुरुषाला मिठ्या मारायला शिकवितात वाटतें ! ' ' नुसता हातरुमालच उचलून दिलास, हातच द्यायचा होतास. ' एक न् दोन. आपल्या कविता फार आवडल्यामुळें मी त्या गुणगुणूं लागलें. त्या बरोबर ' नाटक मंडळींत जा आतां बाई ' असें टोमणे मारूं लागली. आज सकाळीं ' पोटांत दुखतें तेव्हां शाळेंत जात नाहीं ' असें मी म्हणतांच ' तर मग दवाखान्यांत जा. तो हातरुमालवाला करील बाळंतपणाची सोय ' असें बोलली. त्यामुळें जीव देऊन या त्रासांतून सुटण्याचा मी निश्चय केला. वर्तमानपत्रांतून आगगाडीखालीं सांपडून माणसें चटकन मरतात असें वाचलें होतें. म्हणून जीव देण्याकरतां या बाजूला आलें. गाडी आली तशी ओंचा सावरून पुढेंही झालें, पण पाय लटलटां कांपूं लागले; न् आपण मागून हांक मारतां आहां असें वाटलें. ' शेवटलें वाक्य बोलतां बोलतां नकळत तिच्या गालावर लाली चढली. त्या दृश्याचा भ्रमरालाही उन्माद चढला. आणि त्यानें झटकन वांकून तिचें चुंबन घेतलें. मघांचा अंधुक संधिप्रकाशही नाहींसा झाल्यामुळें सृष्टि आतां अनाथासारखी दिसत होती. आकाशांतून खळकन् तुटून येणारा तारा म्हणाला ' हा पहा सूर्याप्रमाणें मी सृष्टीला सनाथ करतों. ' क्षणार्धांत तो तारा दिसेनासा झाला; तो कुठें

गेला हें सृष्टीला कळलें नाहीं, पण त्याच्या निमिषमात्राच्या चमकीनें तिच्या भोंवतालचा अंधार मात्र दुणावला.

— ५ —

‘ कमळाताई, पाहिलंत कां शकुंतलेकडे ! कशी टक लावून माझ्याकडे पाहतें आहे. उद्यां तिला महिना होईल. पण वयाच्या मानानें माझी छकुली कितीतरी शहाणी आहे नाहीं हो !’

‘ शहाणें असायलाच पाहिजे तिनें. अनाथ बालकाश्रमांत जन्माला येणाऱ्या मुलाच्या अंगीं जगांतलीं सर्व विषें हंसत पिण्याइतका शहाणपणा नसला तर या जगांत कांहीं त्याची धडगत नाहीं. ’

‘ पण माझी शकु जन्मभर इथं थोडीच राहणार आहे ! स्वारी आपले मामा वारल्यावर माझ्याशीं लग्न केल्याशिवाय राहायचीच नाहीं. मग शकु माझी म्हणून आमच्याच घरीं राहील. ’

‘ कुमुदताई, तुमच्या असहाय वैधव्यस्थितीचा फायदा घेणाऱ्या नर-पशूला अजूनही तुम्ही देव मानतां—’

कुमुद उठण्याचा प्रयत्न करीत म्हणाली ‘ कमळाताई, इथल्या माझ्या बाळंतपणांत तुम्ही मला अगदीं धाकट्या बहिणीप्रमाणं वागविलं असलं तरी स्वारीसंबधानें असलं भलतं सलतं बोलणं मी मुळींच ऐकून घेणार नाहीं हं ’ कुमुदला अंथरुणांवरून उठतांनाही दम लागलेला पाहून तिला नाजूक हातांनीं बिछान्यावर निजवीत कमल म्हणाली ‘ कुमुदताई, तुमची प्रकृती अगदीं तोळामासा झाली असतांना तुम्ही उठण्याचें श्रम कां बरं करतां ! माझा भावार्थ तुम्हीं लक्षांतच घेतला नाहींत मुळीं. सारे पुरुष इथून तिथून एका माळेचेमणी ! निर्दयपणाचे पुतळे ! गरज सरो न् वैद्य मरो हाच त्यांचा स्वभाव ‘ पण पांची बोटें कांहीं सारखी नसतात हो कमळाताई. तुम्हांला स्वारीचा भरंवसा वाटत नाहींसें दिसतें. तेव्हां तुमची खात्री करण्याकरतां तिकडचें पत्र दाखवितेंच आतां तुम्हाला. मात्र पत्रा-खालची सही नाहीं बघायची हं. माझा प्राण गेल्याशिवाय ती कुणाच्या दृष्टीला पडणार नाहीं असं मी तिकडे वचन दिले आहे. ’ कुमुद उशा-खालीं उजवा हात घालून पत्रें चाचपूं लागली. मुग्ध शकुंतला आईचा

व कमळाताईचा संवाद न कळल्यामुळेंच कीं काय हंसऱ्या चेहऱ्यानें त्यांच्याकडे पाहत होती. कमळेचा चेहरा मात्र सचिंत व गंभीर झाला होता. हिंदुविधवा पत्रें घेऊन कोर्टांत फिर्याद करायला जाणार नाहीं ही खात्री असल्यावर तिला गोड गोड थापा मारून आपल्या जाळ्यांत ओढायला पापी पुरुष कां कमी करतील ? आपल्या संततीला 'अनाथ'पणाच्या नरकांत ढकलून देण्याला तयार झालेला बाप पुढें तरी आपलें लग्नाचें वचन पाळील याची खात्री कुणी द्यावी ? कुमुदला फसविणाऱ्या माणसानें तिला अनाथबालकाश्रमांत पाठविण्याची व्यवस्था केली एवढ्यावरून कांहीं त्याचा सज्जनपणा सिद्ध होत नाहीं. त्यानें वेश्या ठेवली असती तर ती याच्या दसपट पैसे खाऊन गेली असती ! आपल्या पापाला वाचा फुटूं नये म्हणून लहानसा सोन्याचा गोळा त्याच्या तोंडात घालायला कोण नाकार देईल ? कमलेचें हें विचारविमान कुमुदनें दिलेलें पत्र पहातांच एकदम जमनीवर आलें. या पत्राचें अक्षर दृष्टीला पडतांच कुसुम स्तंभीत झाली. दोन वर्षांपूर्वी किर्लोस्कर नाटक गृहांतून आणलेल्या कवितेच्या वहींत हेंच अक्षर तिनें पाहिलें होतें. त्यानंतर आठ दहा दिवसांनीं आलेल्या व अद्यापिही तिच्यापाशीं असलेल्या एका राक्षसी पत्रांत हेंच अक्षर होतें. त्या पत्रांतील एकूण एक अक्षर जणूं काय तप्तमुद्रांनीं तिच्या हृदयावर उमटविलें होतें. 'वेश्या पुरवल्या पण तुझ्यासारख्या संभावित सोदेगिरी करणाऱ्या बायका नकोत. तुझ्यासारख्या अनाथ माणसाला सनाथ करण्याचें भाग्य मला लाभलें नाहीं याबद्दल मला फार आनंद वाटतो.' कमलेनें रागानें दांत ओंठ चावले. अनाथांची निर्दयपणानें थट्टा करणारानें तरी एका अनाथ विधवेला अनीतिपंकांत बुडवून दुसऱ्या एका अनाथ जीवाला जगाच्या रौरवांत एकाकीं सोडायचें नव्हतें. यमुनेच्या काळ्या पाण्याला गंगेच्या पाण्यानें हवेंतर हंसावें; पण डबक्यांतल्या गढूळ पाण्याला त्याला हंसण्याचा काय अधिकार पोंचतो ?

'वाचलंत कां सारं पत्र ? आतां तरी कळलं ना स्वारीचं मन' 'चांगलंच कळलं' कमळ रूक्ष स्वरानें म्हणाली तिच्या स्वरांतील अविश्वास कुमुदला जाणवला. ती म्हणाली 'कमळताई, स्वारी इथं मला भेटायला येण्यापूर्वी जर माझं बरं वाईट झालं तर तुम्ही शकुला

त्यांच्याकडे घेऊन जाण्याचें मला वचन दिलं आहे तें विसरूं नका. बाकी ती पाळी तुमच्यावर येणारच नाहीं म्हणा. आजच्या डांकेनें स्वारीचं पत्र न् उद्यांच्या गाडीनं स्वारी येईलच येईल. स्वारीच्या भेटीचा आनंद असल्या प्रकृतींत मला सहन होईल कीं नाहीं देव जाणे! तूं बाळंतील होतांच मी येईन असं पहिल्यांदां सांगणं झालं होतं. पण नंतर महिन्याच्या आंत भेटून जातों असं कळविलं. आजच महिना होतो तेव्हां—'

इतक्यांत गड्यानें सर्व टपाल आणून कमळाताईच्याकडे दिलें. कमळाताईनीं कुमुदचें त्यांत एक पत्र होतें तें तिच्याकडे दिलें व नवीन आलेल्या वर्तमानपत्रांपैकीं नागपूरचें 'विहंगम' फोडून ती वाचूं लागली. थोड्या वेळानें तिनें पाहिलें तो कुमुदच्या डोळ्यांतून आंसवें वाहत होतीं.

'काय झालं हो कुमुदताई?'

'स्वारीला आणखी सहा महीने यायला फावणार नाहीं म्हणे. तूं मुलीला घेऊन तिकडेच राहा. दरमहा पंचवीस रुपये खर्चाला येतील असं पत्रांत लिहिणं झालं आहे. कमळाताई, रुपयांनीं पोट भरत असलं तरी मनाचं समाधान होईल कां!'

बिचारी कमळा या प्रश्नाला काय उत्तर देणार? कुमुदला आपले अश्रु दिसले तर तिचें दुःख वाढेल म्हणून तिनें 'विहंगम' तोंडापुढें धरला. पण एका क्षणांतच 'अगबाई, निव्वळ कसाब' असे उद्गार तिच्या तोंडांतून बाहेर पडले.

'काय झालं हो!' कुमुदनें विचारलें.

'तुमच्या पतिराजांनीं तुमचा गळा कापला. ही पहा त्यांच्या लग्नाची बातमी.' कुसुमनें कुमुदच्यापुढें अंक धरला. कुमुद अश्रूंच्या पटलांतून वाचूं लागली, 'वऱ्हाड नागपूरकडील सुप्रसिद्ध कवि भ्रमर यांचा विवाह पुढील आठवड्यांत पुण्याच्या सुप्रसिद्ध कवयित्री कलिका यांच्याशीं नागपूर येथें होण्याचें ठरलें आहे. 'समसमां संयोग कीं जाहला' ही कव्युक्ति या प्रसंगीं सर्वांना आठवेल यांत संशय नाहीं. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे भ्रमरांच्या जुन्या चालीच्या मामांचीही या विवाहाला संमति मिळाली आहे. कलिकाबाईचें 'बालविवाह स्तोत्र' हें काव्य वाचूनच मामांसाहेबांनीं या विवाहाला परवानगी दिली आहे. ईश्वर वधूवरांना

आयुरारोग्य देऊन त्यांच्याकडून महाराष्ट्राच्या काव्यसम्पत्तींत मौल्यवान् भर घालवो.' सर्व मजकूर वाचून कुमुदनें डोळे मिटले. 'ही कलिका माझ्या ओळखीची आहे हो! इतरांना अनाथ करून हे भ्रमर आतां तिला सनाथ करायला निघाले आहेत' कमळा रागारागानें म्हणाली. कुमुदला यांतील एक अक्षरही ऐकूं गेलें नाहीं. तो अनाथ जीव, ती बातमी ऐकतांच अनाथांच्या नाथाकडे दाद मागण्याकरितां निघून गेला होता. कमळनें जन्मतः पितृहीन असलेल्या व एका महिन्यांतच मातृहीन झालेल्या शकुन्तलेकडे पाहिलें. तो अनाथ जीव मघाप्रमाणें हसतच होता. ज्याला मातेच्या मरणाचें दुःख नव्हतें त्याला स्वतःच्या अनाथपणाबद्दल विषाद कुठून वाटणार?

—६—

'घटका भरली, घटका भरली' असा लग्नमंडपांत घोष सुरू झाला होता. बोहल्यावर एका बाजूला भ्रमर उभे असून दुसऱ्या बाजूला कलिका उभी होती. प्रातःकालीं विकास पावणाऱ्या कलिकेप्रमाणें तिचें मुख प्रसन्न दिसत होतें. भ्रमरांनीं वधूपरीक्षेच्या वेळीं तिचा चेहरा पोटभर पाहून घेतलेला असल्यामुळें ते 'अन्तरपाट' या विषयावर काव्य रचण्यांत दंग झाले होते. त्यांचे मामाही भाच्याचा लग्नसोहाळा पाहात बोहल्याजवळ उभे होते. इतक्यांत सुमारें महिन्याचें मूल हातांत घेतलेली एक बाई जवळजवळ धांवतच मंडपांत आली. 'वेडी दिसते आहे, द्या हाकलून' असें कुणीसें तिला पाहातांच म्हटलें. पण ती झटकन् बोहल्याजवळ जाऊन उभी राहिली. ती दृष्टीला पडतांच कलिका आश्चर्यानें उद्गारली 'कोण कमळाताई! अग तूं पंढरपूरला असतीस ना? न् हें सोंग कसलें आणलं आहेस? हें हातांतलं मूल कोणाचं?'

कमळेला पाहतांच भ्रमराच्या पोटांत धस्स् झालें—कमळा मोठ्यानें ओरडून म्हणाली 'हें मूल भ्रमरांचें, तुझ्या या भावी पतिराजांचें.'

कमळेचे हे शब्द ऐकतांच भ्रमर मटकन् खालीं बसले. भ्रमरांनीं उत्तर न देतां हातपाय गाळलेले पाहून कलिकेच्या वडिलांनीं मुलीला बोहल्यावरून घरांत नेलें. भ्रमराचे मामा चवताळून म्हणाले 'ए कारटे, काय बडबडते आहेस हें!'

'जें खरें आहे तेंच, ही भ्रमरांची मुलगी. ते नाकबूल करतील तर कुमुदला पाठविलेलीं सगळीं पत्रे त्यांना हें कबूल करावयाला लावतील.'

'कमळ, कमळ, काय केलेंस हें '? भ्रमर कपाळावर हात मारीत म्हणाले.

'तुम्हीं जें केले तेंच. तुम्हीं मला अनाथ म्हणून झिडकारलेत, कुमुदला सनाथ करण्याचें आमिष दाखवून या जगांतून अनाथ स्थितींतच हांकून दिलेत, या अनाथ मुलीला या जगांत अपमानाच्या व दुःखाच्या खाईत पिचत पडण्याकरितां आणलेत. आतां लग्न होऊन कलिका सनाथ होणार होती. तिला मी या घटकेला तरी अनाथ केलं आहे. पण त्यांत तिचें कल्याणच आहे. भ्रमर तुम्हीं अनाथांना हिणवलंत, त्याचं हें प्रायश्चित तुम्हांला अनाथाच्या नाथानें दिलें आहे '

समाजांत बेअब्रू झाल्यामुळें व चिडून गेलेल्या मामांनीं एका कवडीवरही हक्क न ठेवतां घरांतून हांकून दिल्यामुळें भ्रमरही दुसऱ्याच दिवशीं 'अनाथ' झाले.

# ११ " वजिऱ्या ! "

आगोट लागली. मनासारखी मेघराजानें कृपा करायला सुरुवात केली. पहिल्यांदा सर्वांना वाटलें होतें कीं, या सालीं मेघराजा डोळे वटारणार आणि शेतकऱ्यांच्या तोंडचें पाणी पळविणार ! गांवगन्ना शेतकऱ्यांनीं एक जुटीनें पांढरीच्या देवाला कौल लावायला—नवससायास करावयाला आरंभ केला. लहान मुलांनीं करगोटें तोडून, लंगोट्या भिरकावून देऊन पाटावर 'पावसाच्या' देवाची मृण्मयी मूर्ति करून, तीवर गुलाल वगैरे टाकून दारोदार जाऊन " पाऊस पाणी आभाळदाणी ! " असा पाऊस मागावयाला आरंभ केला. घरोघरच्या गृहलक्ष्म्यांनीं मेघराजांनीं कृपा करावी म्हणून दारीं असलेल्या 'पाऊस' मागणाऱ्या डोकविराळ देवावर हंसत हंसत घरांतील सांचवणीचें पाणी ताब्यां ताब्यां आणून ओतलें ! मुलांची मोठ्या माणसांची, बायाबापड्यांची, आतां खात्री झाली कीं मेघराजा आपल्यावर खास कृपा करणार ! भोळा भाव सिद्धीस जातोच म्हणतात ! तसेंच झालें ! पावसाळा लागला ! नद्यानाले भरून वाहूं लागले ! शेतवाड्या गारीगार झाल्या ! शेतकऱ्यांना अत्यंत आवडती अशी शेताला घात आली ! घर धनींनी, " तुकडा पाणी करण्यांत बीबिवळा काढण्यांत गढलेल्या शेतकऱ्यांचा आनंद काय वर्णावा ! त्यांची कोण घांदल उडाली ! काय ती त्यांची गर्दी ! किती ती त्यांची तारंबळ ! जिकडे तिकडे धांवपळ दिसूं लागली. खांद्यावर, डोकीवर शेतीचीं आयुधें, हातांत कासरा धरून घरचे बैल मागेंपुढें चालवीत शेताचा मार्ग धरलेले, त्यांची लहान मुलें गाईगुरें संभाळण्यांत दंग झालेलीं ! किती सुन्दर, उदात्त, आणि जिवंत दृश्य तें ! खरा शेतकरी पाहावयाचा तर याच वेळीं पहावा ! शेतकऱ्याची घाई शेतकऱ्याची चपळाई, शेतकऱ्याची कार्यनिष्ठा, आणि अविश्रांत उल्हास पाहावयाचा असेल तर, आगोटीला, शेताला घात आली असतांना, पेरणीची घांदल चालू आहे अशा वेळींच पाहावा !'

ह्या वेळीं आमच्या म्हादबाच्या घरीं तरी काय हुबेहुब हाच प्रकार चालू होता. म्हादबा सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपल्या वजिऱ्याला

घेऊन पैरेकरी होऊन दुसऱ्याच्या शेतांतून मशागतीकरितां राबत होता. तसाच पैरेकऱ्यालाही आपल्या जमिनींत राबवीत होता ! त्याची घरधनीन गुणाबाई, कणग्यांतून, टोपल्यांतून मडक्यांतून राखेंत मिसळून जपून ठेवलेलें हरतऱ्हेचा बीं–बिवळा चाळून झाडून तयार ठेवण्यांत एकसारखी धडपडत होती ! म्हादबाच्या मनासारखा पाऊस झालेला असल्यामुळें आणि त्यानें आपली जमीन वेळींच नांगरून तापवून तयार केलेली असल्यामुळें शेत पेरतांना म्हादबाचा हुरूप शतगुणीत झाला असल्यास नवल काय ?

× × × × × ×

म्हादबाची तशी पाहिली तर स्वतःची अशी फारच थोडी शेतवाडी होती. पण तो जातिवंत शेतकरी असल्यामुळें रात्रंदिवस मेहनत करून आपल्या शेताचा कोपरान्‌कोपरा असा बहारदार पिकवीत असे कीं बाः ! उभा गांव त्याच्या शेताकडे नुसता टकमका पाहात असे ! जातिवंत शेतकऱ्याला आपलें शेत कसें रंगारूपाला आणावयाला पाहिजे हें सांगावयाला का पाहिजे?

आणि असे म्हादबाच्या पदरीं जीव तरी किती होते ? एक तो स्वतः, त्याची गृहलक्ष्मी गुणाबाई, त्याचा छोटा व लाडका पोर मुरारी ! एक गाय, एक म्हैस, एक शेळी, एक विश्वासु कुत्रा आणि घरच्या गायीचा लहान पणापासून तयार केलेला बैल–वजिऱ्या ! म्हादबाच्या घरीं माणसांत आणि जनावरांत भेदभाव नव्हता. पंक्तिप्रपंच नव्हता ! त्याची जपणूक माणसा-पेक्षांही जनावरांना जास्त असे ! आणि कोणाही जातिवंत शेतकऱ्याचें असेंच असतें ! गायीचें सर्व दूध तिच्या लहान गोऱ्ह्याकरितां जायचें ! म्हशीचें दूधदुभतें घरांतील माणसांना ठेवायचें. शेळीवर, घराची आणि शेताची विश्वासानें जागरूक राहून राखण करणाऱ्या मोत्या कुत्र्याला पोसावयाचा ! आणि **वजिऱ्या** बैल तर काय त्याचा प्राणाहून प्यार ! तो जितका खाईल तेवढा थोडा ! चरेल तेवढा थोडा ! त्याच्याकरितां मार-वेल राखून ठेवलेला असायचा ! पेंढीचा रतीब त्याचा कधींच चुकायचा नाहीं ! वजिऱ्याच्या जिवावर तर म्हादबाच्या शेतवाडीच्या साऱ्या उड्या आणि हौसा मौजा !

वजिऱ्याची जशी निगा राखली जात असे, तसेंच त्याच्याकडून म्हादबाला अव्वल दर्जाचें कामही मिळत असे. कोठेंही नेला तरी त्याला तो धुरीला जोडीत असे. वजिऱ्याला धुरा जशी शोभत असे, तसेच आपल्यावरील तो जबाबदारीचें काम पारही पाडीत असे. म्हादबा संध्याकाळीं वजिऱ्याला कामावरून घरीं घेऊन येत असतां वजिऱ्या वशिंड हालवीत, शिंगांना ऐटदार डोल देत, उमेदीनें चालत गांवांत शिरतांना अशी गंभीर डरकाळी फोडी, कीं तिच्या योगानें म्हादबाच्या अंगावर अभिमानाचे तरारून रोमांच उठत ! त्या डरकाळीचा प्रतिध्वनि गांवभर प्रतिध्वनित होई, तेव्हां गांवांतल्या मुलाबाळांतही एकप्रकारचें नवें कुतूहल निर्माण होई ! डरकाळीचा ध्वनि कांनीं येतांच " ही म्हादबाच्या वजिऱ्याची डरकाळी ! " असे कित्येक जणांच्या तोंडांतून एकदमच उद्गार निघत ! वजिऱ्याची डरकाळी कांनीं येतांच गुणाबाईला केवढी धन्यता वाटे ! तिचे हात, मन, जागच्याजागींच थांबे आणि तिचें लक्ष वजिऱ्याच्या आल्हादायक डरकाळीकडे वेधून राही !

\+ + +

पोऱ्या मुरारी तर काय ! वजिऱ्याची घनगंभीर डरकाळी ऐकतांच घरांतून अंगणांत आणि अंगणांतून एकसारखा नाचतच सुटे ! "आई ! बाबा आला ! आई ! आपला वजिऱ्या कसा डरकाळ्या फोडतोय बघ ! " असें सांगण्यासाठीं त्याची मोठी तारंबळ उडे !

× × × ×

दारीं वजिऱ्या येतांच गुणाबाई लगबगीनें पुढें येऊन त्याच्या अंगावरून प्रेमानें हात फिरवी. मुरारी तर त्याच्यापुढें जाऊन एकसारखा गळ्यांतल्या पोळीला आपल्या डोक्याला, अंगाला लावून गुदगुल्या करून घेई. वजिऱ्याला दाव्यावर नेत असतां म्हादबानें वजिऱ्याचें त्या दिवसाचें गुणवर्णन करूं लागावें. आणि मग गुणाबाईला न राहवून लगोलग तिनें वजिऱ्याची दृष्ट काढावयाला सरसावावें. कोळावर चुलीतला रखरखलेला निखारा ठेवावा, त्यावर मिरच्या वगैरे घालाव्यात आणि वजिऱ्याची दृष्ट काढावी आणि ती दृष्ट गांवाच्या तिवाठ्यावर नेऊन ठेवावी !

× × × ×

अशा त्या कुटुंबाचा आपल्या वजिऱ्यावर सर्व जीव होता. शेतकऱ्याच्या जिण्याला तें सर्वथा उचित होतें. म्हादबानें आपलें लहानपणापासूनचें निम्मेंवय मुंबईंत हमाली करण्यांत घालविलें होतें. वास्तविक त्याची शेतकीची हौस, परंपरा, संस्कार, हीं सर्व सुटली असतांहि केवळ गुणाबाईच्या प्रेरणेने व प्रेमळ हट्टानें म्हादबा शेतकीवर येऊन स्थिर झाला होता. त्यांत त्याला आतां अतोनात आनंदही अनुभवायला मिळूं लागला होता. त्याच्या कृतीचें दृश्य त्याच्या मुरारीच्या बाल मनावर सतत उमटत असल्यामुळें पुढें खराखुरा शेतकरी मुरारी होणार होता, हें भविष्य वर्तविण्यास कोणत्याही ज्योतिष्याची जरूरी नव्हती !

× × × ×

परंपरा तुटल्यामुळें, संस्कृती सुटल्यामुळें शेतीकामाच्या कित्येक अवघड प्रसंगीं कसें वागावें हे म्हादबाला समजत नसे. तो अगदीं घाबरून, गोंधळून जाई. शेजाऱ्यापाजाऱ्याला विचारण्याचें त्याला सुचत नसे आणि विचारण्यांत कमीपणांही वाटे. त्यामुळें कित्येकदा त्याचें बेसुमार नुकसान ही होई. ह्या अशा नेहमींच्या नुकसानीला कारण त्यानें परंपरा सोडली होती—शेतीचा त्याग केला होता, ह्या शिवाय दुसरें कोणतेंच नव्हतें. अशा वेळी म्हादबा अगदीं वैतागून जाई व शेतीचा सन्यास करून मुंबईची वाट धरावी असें त्याला वाटूं लागे. त्याप्रमाणें तो बोले. त्यावेळीं गुणाबाईची मात्र भारी त्रेधा उडे. नवऱ्याला कसें समजवावें हें तिला सुचत नसे. तिची अवस्था कींव येण्यासारखी होई. तरीही ती नवऱ्याच्या मनाला आंवरून धरी. त्याचें मन स्थिर करी. समाधान होईल असें वागे आणि त्याच्या उच्छृंखल झालेल्या मनाला कार्यप्रवण करी ! असें आजकाल सर्व महाराष्ट्रभर प्रत्यही किती तरी शेतकऱ्यांचें होत आहे. ज्याला नशीबानें गुणाबाईसारखी गुणशाली भाग्यदेवता मिळाली असेल, त्यांचें ठीक. इतरांची काय दुरवस्था होत असेल हें एक भगवंत जाणें !

× × × ×

परंपरा व संस्कृती सुटल्यामुळें ज्या अनेक आपत्तींशीं तोंड द्यावयाचे प्रसंग म्हादबावर आजवर आले होते, त्यांपेक्षां अत्यंत बिकट असा प्रसंग

या वर्षी त्याच्यावर अचानक आला. प्रसंगीं काय करावें, कोणाला पुसावें, कोणाला शरण जावें, त्या प्रसंगांतून कोण वांचविणार, हें त्याला कळेना. त्याची मति गुंग झाली. त्याच्यावरील ओढवलेल्या प्रसंगानें त्याच्याच काय, पण गुणाबाईंच्याही तोंडचें पाणी पळालें! असला प्रसंग म्हणजेः—

× × × ×

म्हादबाच्या गांवच्या सर्व रानामाळांतून पेरण्यांची मारे घनचक्कर उडून राहिली होती. म्हणून साऱ्या शेतकऱ्यांना श्वास सोडायला फुरसद नव्हती कीं इकडे तिकडे पहावयाला उसंत नव्हती. एकाद्याच्या घरीं मुडदा पडला असला तरी त्याला मूठमाती द्यावयाला वेळ नव्हता. तो तसाच झांकून ठेवून अगोदर पेरणी साधण्याच्या निकराच्या धांदलीचा तो वक्त होता. त्याला अनुसरूनच लहान मोठें—बायकाही शेतावर पेरणीत गुंतल्या असतां म्हादबावर प्रसंग गुदरला होता!

× × × ×

त्याच्या पैरेकऱ्याकडचें काम संपलें होतें आणि उद्यांपासून त्याच्या शेतांतल्या पेरणीला आरंभ व्हावयाचा होता. गुणाबाईंनीं सारीं बीं-बीयाणी जय्यत ठेवलीं होतीं. म्हादबानें पेरणीचीं आयुधें—कुळव, औत, चाडीं, मोगणी दोरदोरखंड, शिवाळीं सर्व कांहीं जमवून ठेविलीं होतीं. हेतु हा कीं ऐनवेळीं कशाबद्दल नडूं नये, कुळव सुटून कामाची खोटी होऊं नये. रात्रींपासून त्या सर्वांची कोण घाई उडून गेली होती. मुरारीला-देखील पंचाईत पडली होती कीं, उद्यां आपण गुराकडे जावें कीं आगलीवर बसायला म्हादबाबरोबर शेताकडे जावें? शेताकडेच जावें, असा त्यानें आपल्या चिमुकल्या मनाचा निश्चय झोंपतांझोंपतां केला व तो झोंपी गेला. म्हादबालाही लवकरच झोंप लागली. 'भाकरीतुकड्या' ची उद्यांची व्यवस्था कशी कशी करावयाची, आपण शेताकडे केव्हां जावयाचें याचा विचार गुणाबाईनें करून आपलीं कामें उरकून तीही निद्रेच्या स्वाधीन झाली!—

× × × ×

रात्र किती झाली होती कोणास ठाऊक! आभाळांतल्या चांदण्यावरून कळायचें पण काळ्याकुट्ट ढगाआड त्या लपल्यामुळें रात्र किती आहे हें कळ-

ण्यास मार्ग नव्हता ! म्हादबा इराकती करितां मध्येंच जागा झाला. त्याचा नेम असे कीं, मध्यें जागे झाल्यावर एकदां गोठयांत जायचें, वजिऱ्यावरून हात फिरवायचा, त्याच्या गवाणींत वैरणकाडी पहावयाची, एकादी पेंढी सोडून टाकावयाची, त्याच्या अंगाखाली आलेली वैरण काढून एका बाजूस करावयाची, शेण पडलें असेल तें बाजूला सारावयाचें आणि मग झोंपावयाचें ! या त्याच्या नित्याच्या नियमाप्रमाणें तो उठला आणि गोठ्यांत गेला. वजिऱ्याजवळ गेला–तों त्याला काय दिसलें ! हाय ! तेथलें दृश्य पाहून त्याच्या पोटांत धस्स झालें ! त्याची बोबडी वळली ! क्षणभर तो जागच्याजागींच दगडी पुतळ्याप्रमाणें उभा राहिला ! झोंपी गेलेल्या गुणाबाईला हांका मारण्याचें त्याच्या मनांत आलें, पण त्याची जीभच लुली पडली ! त्याला तिला हांकच मारतां येईना !

\+ + + +

वजिऱ्या एकसारखा फुस्–फुस्–फुस् करीत होता. त्याचे डोळे फिरत होते. दाव्यापासून सुटण्याची त्याची एकसारखी धडपत चालू होती. त्याचें पोट तट्ट फुगलें होतें ! त्याची हागमूत बंद झाली होती !

× × ×

म्हादबाला हा भयंकर देखावा दिसला ! त्याचा वजिऱ्या आजारी–हैराण–मरणाच्या वाटेवर दिसला ! बिचारा म्हादबा ! काय करणार ! त्याचे प्राणच गोळा झाले ! त्याच्या डोळ्यापुढें अंधेरी आली. आपला धनी जवळ येतांच त्या वजिऱ्यानें अशा कांहीं करुण नजरेनें त्याच्याकडे पाहिलें कीं म्हादबाच्या काळजाचें पाणी पाणी झालें ! एकाद्या अजाण अर्भकाप्रमाणें त्याला रडूं कोसळलें ! तो प्रथम धांवत त्याच्याजवळ गेला. दाव्यापासून त्याला मुक्त केलें आणि त्याच्या अंगावरून हात फिरवूं लागला ! वजिऱ्याच्या कायेची बेकाया किती थोड्या वेळांत होऊन गेली होती !—

÷ ÷ ÷

गुणाबाई जागी होऊन धांवत तेथें आली. बोलून चालून बाईमाणूस ती ! म्हादबासारखा बापयासारखा बापई जर ल्हान मुलाप्रमाणें रडत होता, तर गुणाबाईचा धीर सुटला असल्यास नवल काय !

पण बायकांना ऐन वेळीं देव धैर्य देतो. गुणाबाईलाही त्यानेंच धैर्य दिलें. तिनें म्हादबाला धीर दिला. तशा रात्रीं ती शेजारींपाजारीं गेली. शेजाऱ्यांना उठविलें. आपल्या वजिऱ्याची स्थिति तिनें सांगितली. सर्वच लोक टणकलेले. कोण उठून धांवत येणार! शिवाय दुसऱ्या दिवशीं कामाची घांदल! गुणाबाईची तिकडूनही निराशेची पाळी आली! एका म्हातारीनें खोकत खोकतच ( अंथरुणावरून न उठतांच ) गुणाबाईला सांगितलें “ कुणी मेल्यानें वजिऱ्याला कांहीं चारलेंबिरलें का काय तें तरी बघ! आणखीं त्याला ताक पाज! चिंचेचा कोळ पाज! ढाळ होतील अन् होईल रिकामा झट्दिशीं! ”

÷ ÷ ÷

म्हातारीनें सांगितल्या उपायांची योजना लागलीच गुणाबाईनें अमलांत आणिली. तिच्या घरीं ताक असें कितीसें असणार? म्हणून तिनें त्या म्हातारीकडील, आणखी दुसऱ्या शेजाऱ्यांच्या घरांत तशा रात्रीं शिरून मिळेल तितकें ताक मिळविलें. चिंचेचा कोळही काढला आणि आजारी ‘वजिऱ्या’ला शिंगाटांतून पाजला. औषधोपायाप्रमाणेंच गुणाबाईनें म्हसोबाला, बिरोबाला, जोतिबाला, खंडोबाला, जारवाईला, जोखाईला हजारों नवससायस मनांतल्या मनांत केले! कोणाला खेटे घालण्याचा, कोणाला नैवेद्य नारळ देण्याचा, कोणाची खणानारळानें ओटी भरण्याचा तर कोणाला घरापासून देवळापर्यंत भर उन्हांत दंडवत घालण्याचा, अशा प्रकारचे किती तरी नवस केले! नित्याप्रमाणें आज वजिऱ्याची दृष्ट काढावयाची ती विसरली होती. ती देखील तिनें तशा वेळीं काढली!

× × ×

त्यांच्या समजुतीप्रमाणें, समजाप्रमाणें, अकलेप्रमाणें करतां येतील ते सर्व उपाय करून पाहिले तरी सुचिन्ह म्हणून दिसेना. ‘ तालुक्याच्या गांवाला जाऊन जनावराच्या डॉक्टराला घेऊन यावें, असा विचार म्हादबाच्या मनांत आला. गुणाबाईला तो तसें म्हणालाही. पण त्याचा उपयोग काय? म्हादबा जाणार केव्हां व येणार केव्हां? त्यापेक्षां वजिऱ्यालाच तिकडे न्यावा. तेंही कठीण. गाडींतून त्याला नेला पाहिजे. अशा वेळीं गाडी मिळेल पण बैल कोण देणार? शिवाय तेथपर्यंत जाईपर्यंत काय

होतें कोण जाणें! डॉक्टर काय सांगतो कोण जाणें! ही भीति! गांवाच्या चावडीवर कोणी तरी सरकारी अम्मलदार आल्याचें कळलें होतें. त्याला जाऊन विचारलें तर तो कांहीं सांगेल ही आशा उत्पन्न झाली. त्याप्रमाणें म्हादबा जायला निघालाही. पण तितक्यांत त्याला वाटलें, हे मोठे शिक-लेले अम्मलदार लोक सांगायचे तर कांहीं नाहींतच, पण उलट खसकन् आंगावर मात्र यायचे! या लोकांना आमच्याबद्दल मुळीं जिव्हाळाच वाटत नाहीं. माणसांबद्दल ज्यांना जिव्हाळा वाटत नाहीं, त्यांना जनावरा-बद्दल काय वाटणार!

× × ×

'आशा सुटत नाहीं, देव भेटत नाहीं' अशी म्हादबाची व गुणाबाईची अवस्था झाली होती. तीं दोघें हताशमुद्रेनें वजिऱ्याजवळ बसून त्याच्याकडे पाहात होतीं, वजिऱ्याच्या आजाराला उतार मुळींच नव्हता. उलट वाढत मात्र चालला होता. त्याच्या वाढत्या आजाराबरोबर म्हादबाच्या आणि गुणाबाईच्या सर्व आशा मावळत चालल्या होत्या!—

× × ×

हर! हर! अखेरीस—अखेरीस काय! म्हादबाचा आवडता—लाडका 'वजिऱ्या' जमिनीवर पसरला. त्याची तडफड वाढली. धडपड चालू झाली. पाषाणालाही पाझर फोडणारी करुण दृष्टि त्यानें आपल्या मालकाकडे लावली. आणि त्या धडपडीचा अंत शेवटीं वजिऱ्याचें प्राणो-त्क्रमण होण्यांत झाला! तो यमयातनांतून सुटला! म्हादबानें आणि गुणाबाईनें एकच हंबरडा फोडला! त्यांच्या जिवाचा जिवलग-त्यांचा प्राण, त्यांच्या संसाराचा एकमात्र आधार त्यांना असा एकाएकी टाकून गेला! बिचाऱ्या कुटुंबावर आकाशाची कुऱ्हाड पडली!

× × ×

त्याच्या हंबरड्यानें लहान मुरारी झोंपेंतून रडतच जागा झाला आणि धांवत आपल्या आईबापांजवळ आला! वजिऱ्या शांतपणें समोर पडला होता आणि त्याच्या गळ्यांत गळा घालून म्हादबा ओक्साबोक्शी रडत होता! गुणाबाईच्या दुःखाला तर पारावार उरला नव्हता! काय झालें हें

नक्की कळलें नाहीं, तरी आईबापांच्या रडण्यामुळें मुरारीलाही एकसारखें रडूं येत होतें. तो आईला बिलगून रडत होता !

\+ + +

उजाडलें. गांवभर हां हां म्हणतां बातमी पसरली ! घाईघाईनें प्रत्येकजण वजिऱ्याला पाहून हळहळून पुढें जात होता !

\+ + +

' वजिऱ्या 'ला घेऊन जाणारे चाण्डाळ आले ! गुणाबाईनें डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालू असतांच वजिऱ्याच्या चारही खुरांवर, मस्तकावर, शिंगावर, कपाळावर, पाणी घातलें हळदकुंकूं वाहिलें. तोंडांत अर्धी भाकर घातली. मग चांडाळांनीं त्याचे चारही पाय बांधून मध्यें वासा घालून त्याला उचललें !

\+ + +

त्या वेळच्या त्या हतभागी शेतकरी कुटुंबाचा आकांत वर्णन करणें अशक्य आहे !

\+ + +

त्या दिवशीं म्हादबा—गुणाबाई, मुरारीच काय, पण त्याचा कुत्रा, म्हशी, गाई, आणि शेळी, यापैकीं कोणींच तोंडांत पाणीदेखील घेतलें नाहीं ! घरचें माणूस—प्राण गेल्यावर कोणाला खायचेंप्यायचें सुचणार कसें ?

\+ + +

कारण प्रसंगीं अजूनही एखाद्या खेड्यावरून जातांना एखादा बैल चाण्डाळ वाहून नेतांना दिसला म्हणजे म्हादबाच्या वजिऱ्याची आठवण होते आणि काळजांत चर्र होऊन " बिचाऱ्या शेतकऱ्या, तुझें आतां कसें होणार ! " हा दुःखदायी प्रश्न विलक्षण वेदना देत असतो !

# १२ कोणाकरतां कोण ?

— १ —

मोहन बिल्डींगमधून आंत शिरलें म्हणजे डाव्या हाताकडील चाळीच्या शेवटल्या मजल्यावरील अगदीं कडेची खोली फार प्रसिद्ध होती. फार प्रसिद्ध होती, म्हणजे ती मोहन बिल्डींग मधल्या पोरासोराळासुद्धां ठाऊक होती. दिवसभर काम करून थकल्यावर बाहेर फिरायला जायचा देखील कंटाळा यायचा अशा वेळीं किंवा रात्रीं जेवणें झाल्यावर निदान दहा साडेदहा वाजेपर्यंत व्हरांड्यांत एकादी खुर्ची टाकून, ताडाचा पंखा एकट्यानेंच हलवीत बसण्याच्या ऐवजीं, किंवा सुटीच्या दिवशीं निव्वळ 'घर कोंबडा' होण्याचा प्रसंग ओढवून घेण्याच्याऐवजीं, 'समानशील समान व्यसन' अशा चार चौघांनीं एके ठिकाणीं जमून मनमोकळेपणानें गप्पागोष्टी करण्या साठीं, त्या बिल्डिंगमधल्या बऱ्याच जणांनीं मिळून ती एक स्वतंत्र खोली मुद्दाम घेतली होती. ते लोक तिला 'आमची क्लबची खोली' म्हणत; पण मोहन बिल्डिंगमध्यें तो क्लब निरनिराळ्या नांवांनीं प्रसिद्ध होता. जी मंडळी त्या क्लबची मेंबर्स नव्हती, किंवा जी मंडळी स्वतःला अधिक पोक्त, अधिक संभावित समजत होतीं ती त्याला 'टोळ भैरवांचा चकाट्या पिटण्याचा अड्डा' म्हणत, कोणी 'छचोर पोरांची मैफल' म्हणत तर कोणी 'धांगडधिंगा आणि कंपनी' म्हणत. 'पुरुषांच्या' तोंडांतील हीं सगळीं नांवें बायकांच्याही तोंडांत होतीच, पण त्या क्लबाला त्यांनीं दिलेलें नांव म्हणजे 'पुरुषपार्लमेंट' हें होतें. 'हिच्या घरच्या' नाहीतर 'तिच्या घरच्या' रिकाम्या उठाठेवी करायला दोन प्रहरच्या वेळीं व्हरांड्यांत किंवा कुणाच्या तरी खोलींत जमलेल्या चार बायकांना पाहून 'स्त्रीयांचें पार्लमेंट' म्हणणाऱ्या या पुरुषांच्या क्लबाला 'पुरुषपार्लमेंट' म्हणून त्यांनीं अगदीं बरोबर सूड घेतला होता.

आणि खरोखरीच बोलायचं झालं तर ज्या कुचाळ अर्थानें हे पुरुष 'स्त्रीपार्लमेंट' म्हणतात त्यांत आणि यांच्या क्लबांत कांहीं तरी फरक

असतो काय ? बायकांच्या जिभेला सौजन्याचं म्हणा किंवा लाजेचें म्हणा थोडेसें तरी हाड असतें, पण क्लबांतल्या पुरुषांच्या जिभेला त्याची कधीं ओळख देखील होत नाहीं. चाळींतल्या बायकांनीं त्या क्लबाला नुसतं ' पुरुष पार्लमेंट ' म्हणूनच मागविलें होतें हें त्या पुरुषांचें भाग्य ! नाहींतर त्यांनीं आणखीही कांहीं उपरोधिक नांव शोधून काढलें असतें, तरी देखील तें कांहीं वावगं झालें नसतें. फार कशाला ? त्या चाळींत क्लबाची प्रसिद्ध असलेलीं तींच नांवें तीं पुरुष मंडळी कितींदां तरी सार्थ करीत होतीं.

आतां क्लबच म्हटल्यावर तिथल्या गप्पांना आणि गप्पांच्या विषयांना कांहीं सुमार असणार, कीं धरबंध असणार ? तो रविवार होता. त्या दिवशींची गोष्ट. दोनप्रहरीं तीन साडेतीन वाजून गेले असतील. जेवणें होण्याबरोबर कांहीं मंडळी क्लबांत येऊन खेळत बसली होतीं. आरंभीं त्यांनीं सहा जणांचें लाडिस सुरू केलें होतें. पण एकदोन डाव होतात न होतात तों गुजराथी खानावळींत जाणाऱ्या दोघांना ' रविवारच्या जेवणा '-चा मद चढू लागला. तिसऱ्या डावाला तर या स्वाऱ्या गळून तिथेंच पडल्या. दुसरे दोघेही या चौघांच्या आग्रहानें हातांत पत्ते धरायला तयार झालेले असल्यामुळें त्यांनाही खेळांत इतकीशी मजा वाटत नव्हती. खेळ-णारांस मजा वाटली नाहीं तर खेळाला रंग कसला येणार ? म्हणून खेळाची खुमखुमी असलेल्या पहिल्या दोघांनीं म्हणजे दिनकररावांनीं आणि गोविंदराव मोध्यांनीं बुद्धिबळाचा डाव मांडला. त्या दुसऱ्या दोघां-पैकीं एकानें वुइकली टाइम्स व एकानें एक इंग्रजी कादंबरी घेऊन, त्या मघाशींच गळलेल्या आणि आतां डोळे मिटलेल्या गड्यांच्या शेजारीं ते वाचत पडले. कांहीं वेळानें एकाचा टाइम्स त्याच्या तोंडावरच पडला. दुसरी स्वारी मात्र कादंबरी वाचनांत गढून गेली होती.

क्लबची अशी ही दैन्यावस्था तीन साडेतीनपर्यंत चालली होती. मग मात्र एक एक मंडळी येऊं लागली. निजलेली मंडळी उठली. साधारण चार साडेचार वाजेपर्यंत सिनेमालाच गेलेल्या दहा पंधरा सभासदांशिवाय जवळजवळ सगळे सभासद आतां आलेले होते. सभासदांची जा ये सारखी सुरू होती. कांहीं खेळत बसले होते, कांहीं थट्टा मस्करी करीत बसले होते तर मध्येंच अंगांत आल्याप्रमाणें कोणीतरी एखाद्या पदाची तान घेत

होते, तर एक गृहस्थ सतार वाजवीत बसले होते. एवढ्यांत गोविंदरावांनीं दिनकररावावर मात केली. गोविंदरावांनीं विजयाची एक आरोळी ठोकली. दिनकररावाची चर्या हसरी दिसत होती, तरी गोविंदरावांच्या चर्येवर जें विजयाचें तेज दिसत होतें तें कांहीं दिनकररावांच्या चर्येवर दिसत नव्हतें. तरी ते कांहीं हिरमुसलेले दिसत नव्हते. इंग्रजींतील 'स्पोर्टमन्स स्पिरिट' किंवा मराठींतील 'पोकळ वेदांती' अशी त्यांची कृति असावी. क्लबांतले पुष्कळ लोक त्यांना 'वेदांत्या'च म्हणत. डाव संपण्याबरोबर हातपाय तणावीत तोंडानें उगीचच "पतिनिमित्त पति तुजला प्रिये। प्रिय असे सहसा म्हणतां नये।" असें पुटपुटत दिनकरराव तक्क्याला टेकून आडवे झाले. तें ऐकून त्यांचे विजयी भिडू गोविंदराव त्यांना म्हणाले:—

"कां लेका, बायकोवर का इतका संतापतोस ? तुला येत नाहीं त्याला तिनं काय करावं ?"

"पुरे पुरे," दिनकरराव सहज पण कांहींशा चिडक्या स्वरानें म्हणाले 'आपल्या अकलेचें आतां यापेक्षां जास्त प्रदर्शन करूं नको.' मला वाटतं तुझी मदरटंग फ्रेंच असावी आणि सेकंड लँग्वेज पर्शियन असावी. नाहींतर वामनाच्या या साध्या दोन ओळींचा अर्थ समजूं नये, आणि कुठला तरी संबंध कुठें तरी लावावा असं झालं नसतं."

"I challenge! अर्थ कुणाला समजला नाहीं हें दिसतंच आहे. माझा अर्थ बरोबर आहे. सांग तुझा काय अर्थ आहे तो ?"

— २ —

झालें. वितंडवादाला सुरवात झाली. अर्थ लावण्याची घनचक्कर उडाली. थोडें 'तूं मी' ही झालें. अखेरीस लवादावर पाळी आली. या क्लबाला दोन तीन महिन्यांपूर्वी एक नवीन सभासद मिळाले होते. त्यांचा मराठीचा अभ्यास दांडगा होता. मराठीचे ते एम्. ए. असून विल्सनमध्यें त्याच विषयाचे प्रोफेसर होते. त्यांची चर्चा नेहमीं गंभीर असायची कधीं कुणाची चेष्टा नाहीं कीं विनोद नाहीं. बुद्धिबळें खेळण्यासाठींच ते क्लबाचे सभासद झाले होते म्हटलें तरी चालेल. त्यांच्या अशा एकंदर वर्तनानें

सर्वांवर त्यांची थोडी वेगळी छाप बसली होती. गोविंदराव आणि दिन-कररावही बुद्धिबळाचे अधिक शोकी म्हणून या दोघांशीं प्रोफेसरसाहेबांचा अधिक संबंध येत असे. त्या दोघांचा अर्थाचा वितंडवाद अगदीं हातघाईपर्यंत आला होता, त्याच सुमारास प्रोफेसरसाहेब क्लबांत आले होते. त्यांना पाहाण्याबरोबर आनंदानें बेहोष झाल्यासारखें ओरडून दिन-करराव म्हणाले—

" या या प्रोफेसर साहेब ! कसे अगदीं ऐन वेळेवर आलांत. आतां तुम्ही याचा अर्थ सांगा, म्हणजे सोनारानं कान टोंचला असें होईल."

प्रोफेसरसाहेबांनीं दोघांचाही अर्थ ऐकून घेतला आणि दोघांनींही अर्थ चुकीचा केला आहे असें सांगितलें. त्याबरोबर गोविंदराव ओरडून म्हणाले—

" फजीति–फजीति–शेम–शेम–सोनाराने कान टोंचला—"

" अरे माझीच फजीति झाली नाहीं. दोघांचीही झाली. दोघांचाही अर्थ चुकला " दिनकरराव कांहींशा हंसऱ्या चर्येनें प्रोफेसरसाहेबांकडे पहात म्हणाले.

पण कांहींशा चिडलेल्या गोविंदरावांना दिनकराचा अर्थ चुकला एव-ढेंच पाहिजे होतें. ते पुन्हां म्हणाले.

" फजीति–फजीति–शेम–शेम–सोनारानें कान टोंचला !"

असें म्हणत म्हणत गोविंदराव जाऊं लागले तेव्हां दिनकरराव त्यांना म्हणाले,

" मि. मोघे थांबा जरा. प्रोफेसरसाहेब काय सांगतात तें ऐकूं या तरी"

"कांहीं नको. मला त्याचा अर्थ चांगला माहीत आहे. माझा अर्थ बरोबर आहे. प्रोफेसरसाहेब फार तर एकादं व्याख्यान झोडतील आणि पुन्हां माझ्याच पॉइंटवर येतील. मिळून काय फजीति–सोनारानं कान टोंचला—"

मोघे निघून गेले. प्रोफेसरसाहेबांनीं दिनकररावांना अर्थ सांगितला. मग दोघेही चांगले तास दीड तास बोलत बसले होते. दिनकररावांना वेदांताची इतकी आवड असेल, अशी प्रोफेसरांची कल्पना नव्हती. दिन-कररावांनीं दासबोध विशेष वाचलेला आहे, आणि पुष्कळ बाबतींत त्यांचें

विचार अगदीं अर्धवट असावेत अशी प्रोफेसरसाहेबांची दिनकररावां-विषयीं कल्पना झाली. प्रोफेसरसाहेबांची त्यांच्या वर्तुणुकीमुळें आधींच सर्वांवर छाप होती. त्यांत आणखी आजच्या प्रसंगानें दिनकर-रावांची त्यांच्याविषयींची श्रद्धा अधिक वाढली. प्रोफेसरसाहेबांचा आणि आपला अधिक परिचय व्हावा व आपल्या आवडीच्या विषयावर, जगन्मिथ्यत्वावर, किंवा परमेश्वराच्या मायेच्या या अगडबंब अवडंबरावर त्यांचें आपलं भाषण व्हावें असें दिनकररावांना वाटलें, पण दुसऱ्या तिसऱ्या दिवसा पासूनच प्रोफेसरसाहेब दोन महिन्यांच्या रजेवर जाणार आहेत हें समजलें तेव्हां दिनकरराव थोडे हिरमुसल्यासारखे झाले. पण लागलीच त्यांच्या मनांत दुसरा एक विचार आला. त्याबरोबर त्यांची चर्या थोडी खुलल्यासारखी झाली. लागलीच त्यांच्या मनाचा निश्चयही झाल्यासारखा दिसला. ते प्रोफेसरसाहेबांना उद्देशून म्हणाले, "परमेश्वर कृपेनें आज मला गुरुस्थानीं वाटणारा थोर योग्यतेचा गृहस्थ भेटला, पण दुर्दैवानें लागलीच त्याला दूर नेलें. हीही कसोटीची तऱ्हाच आहे नाहीं प्रोफेसरसाहेब ! असो, आपण रजेवरून परत याल त्या वेळीं माझी शिष्य-त्वाला अधिक तयारी झाली आहे असं आपल्याला दिसून येईल."

— २ —

दिनकरराव वयानें कांहीं फारसे नव्हते. फार फार तर २७।२८ च्या दरम्यान असतील. ग्रॅज्युएट होण्याबरोबर त्यांना नोकरी मिळाली होती, तरी त्यांनीं बिऱ्हाड नुकतेंच म्हणजे चार सहा महिन्यांपूर्वी केलं होतं. ते स्वतः, त्यांची बायको अन्नपूर्णा आणि वर्षा दीड वर्षाचा मुलगा बाबू, एवढी त्यांच्या मुंबईच्या कुटुंबांतील मंडळी होती. संसाराचा आरंभ करून द्यायला दिनकररावांची आईही मुंबईला आली होती. तिला जाऊन दीड दोन महिने झाले असतील. दिनकररावांचें घराणें खाऊन पिऊन चांगलें सुखी होतें. त्यांना घरची किंवा संसाराची कसलीही आंच नव्हती. मुंबईला आल्यावर सुद्धां लागतील ते जिन्नस आणण्याखेरीज किंवा अन्न-पूर्णाबाईनीं दिलेली यादी दुकानदाराच्या अंगावर फेकण्याखेरीज त्यांना संसाराचा कांहीं कडू अनुभव नव्हता. दिनकरराव मराठी चवथ्या इयत्तेंत

असतांना कांहीं दिवस त्यांच्या वर्गावर एक रामदासी मास्तर आलेले होते. ते होते दोन तीन महिनेच, पण तेवढ्यांत दिनकररावासारख्या कांहीं मुलांवर त्यांच्या रामदासी पंथाचा जो कांहीं अर्धवट परिणाम झाला होता, त्याला अशीच मधून मधून केव्हां तरी उसळी येत असे. उथळ पाण्याला खळखळ फार आणि अर्धवट ज्ञानाला बडबड फार म्हणतात ना! अगदीं बरोबर अशीच स्थिति या मंडळीची झालेली होती. वेदांताची यांना गोडी लागलेली होती असेंही नव्हे. कारण तसें असतें तर त्यांनीं त्यांत हर उपायांनीं गति केली असती. मराठी चवथ्या इयत्तेंत यांना जे उपदेशामृताचे चार थेंब मिळाले होते, तेवढयावर या 'वेदांतभूषण' स्वाऱ्या अझून जिवंत होत्या, व असें मधून मधून अस्तित्व दर्शवीत होत्या. दिनकररावांची ही वेदांताची मचमच अशी कितीदांतरी झाली होती. पण असल्या विषयावर व्यवहारज्ञानाच्या आधारानें प्रासंगिक वितंड वाद करणारे दुसरेही तसेच असल्यामुळें बहुश: "काय लोकांना अक्कल नाहीं आणि उगीच कांहीं तरी बडबडत असतात झालें." असं स्वत:शीं म्हणून दिनकरराव स्वत:चेंच समाधान करून घेत. पण आज प्रोफेसरसाहेबांशीं त्यांचें जें बोलणें झालें, त्याचा त्यांच्या मनावर बराच परिणाम झाला होता. प्रपंचांतल्या मायामोहाबद्दल थोर विभूतींनी अनुभव घेऊन जे उद्गार काढले आहेत, त्याचा आपण स्वत: एकदां अनुभव घ्यावयाचा असें दिनकररावांनीं ठरविलें होतें.

— ४ —

दुसरे दिवशीं दिनकररावांची स्वारी ऑफिसला म्हणून जी गेली ती कांहीं संध्याकाळीं परत आली नाहीं. रात्रीचे आठ वाजले, आकरा झाले. चहूंकडे शांतता झाली. बारा वाजून गेले. क्लबांतलीही मंडळी आपापल्या घरीं निघून गेली. गिरगांवचा रस्ता पण तो देखील आतां शांत झाला. तरीही दिनकररावांचा पत्ता नाहीं. अनपूर्णाबाई वाट पहात पाहून कंटाळली. बिचारी अजून जेवलीही नव्हती. इतक्यांत बाळू उठला म्हणून पाजवून निजवण्यासाठीं आंथरुणांवर ती थोडी आडवी झाली. दार नुसतं पुढें केलें होतें. दिनकरराव इतका वेळ बाहेर कधींच राहिले नव्हते, त्यांतून

मुंबईची वस्ती. गाड्या काय, ट्रामा काय, मोटारी काय, इकडं कीं इकडं बघून जाण्याची कीं मनांत दुसरा कांहीं विचार आणण्याची अगदीं सोय नाहीं. आणि आज सकाळीं उठल्या पासून दिनकरराव अगदीं मूकस्तंभासारखे कसल्या तरी गोष्टीला वैतागल्यासारखे कपाळाला आठ्या घालून होते. आपल्याशीं नाहींतर नाहीं, पण बाबूशीं सुद्धां आज दोन सुखाचे शब्द बोलले नाहींत. उलट तो रोजच्यासारखा त्यांच्याकडे गेला तर त्याला चपराक देऊन झिटकारून टाकला, इतकं मनाला लागण्यासारखं कांहीं तरी घडलं होतं, हें मनांत येऊन तर अनपूर्णाबाईचें चित्त अधिकच अस्वस्थ होऊं लागलें. एकदां त्यांचे डोळेही ओले झाल्यासारखे झाले. तें त्यांच्या लक्षांत येतांच त्यांचें त्यांनाच चमत्कारिक वाटलें आणि ओले झालेले डोळे पदरानें पुशीत बळेंच हंसल्यासारखी चर्या करून त्या स्वतःशींच म्हणाल्या—

" छत् कांहीं तरीच ! काय म्हणतात ना ! वैरी सुद्धां चिंतीत नाहीं तें मन चिंतीत असतं. असं कुठें झालं आहे ! इथें काय अगदीं नवीन आहेत कीं, अगदीं लहान पोर आहे ! कसल्या तरी एका विचारांत मन गेलं म्हणजे त्याला सोय सुमार कांहीं रहात नाहीं झालं. "

मनाचें असें हें केलेलें समाधान, बळेंच केलेलें कां असेना, एक क्षणभर तरी मनाला विरंगुळा पडला. त्या क्षणभरांतच अन्नपूर्णाबाईचा डोळा लागला. डोळा कसला म्हणायचा तो—ती झोंपच होती. पण ती कांहीं गाढ झोंप नसावी. मनांतले विचार इतके उत्कट झाल्यावर ते स्वप्नांत दिसणार नाहींत असें कधीं होईल !

सकाळीं उठल्यावर तर त्यांची चर्या कांहीं चमत्कारिकच दिसूं लागली. रात्रीचें जागरण, काळजीनें मनाला खाल्लेले, आणि वाईट स्वप्नांनीं भिवलेलें, या सगळ्यांनीं त्यांच्या चर्येवर एक तऱ्हेनें दुणावलेली चिंता, तर एका तऱ्हेनें मनाला वाटणारा दीनपणा कसा अगदीं स्पष्ट दिसत होता. त्यांना उठायला आज रोजच्यापेक्षां थोडा वेळच झाला होता, तरी सगळं काम झटझट आवरून दररोजच्या ऑफीसच्या वेळेला स्वयंपाक करून ठेवून त्या दिनकररावांची वाट पहात बसल्या.

ऑफीसची वेळ टळून गेली. दिनकरराव आले नाहींत. ' काल असे-

च कुठें आपल्या मित्राकडे गेले असले, आणि सकाळीं घरीं यायला वेळ झाला नसला तर कदाचित् परभारें ऑफीसाला गेले असतील.' असं अन-पूर्णाबाईनीं मनाचें पुन्हां समाधान करून संध्याकाळपर्यंत वेळ काढला.

पण आजही कालच्याच दिवसासारखेंच कचेरीतून यायची वेळ निघून गेली, तरी दिनकररावांचा पत्ता नाहीं. मग मात्र अन्नपूर्णाबाईला धीर नाहींसा झाला. खालच्या मजल्यावर त्यांच्याच ऑफीसांतले गोविंदराव मोघे होते, त्यांची तरी ऑफीसांत गांठ पडली होती काय तें त्यांना विचा-रावें म्हणून अन्नपूर्णाबाई त्यांच्याकडे गेल्या. गोविंदराव आणि त्यांची बायको लक्ष्मीबाई जेवण आटपून फिरायला जाण्याच्या तयारींत दिसलीं. तरी पण दारांत अन्नपूर्णाबाईला पाहातांच, "या या आंत अशा काय काम आहे!" असें म्हणत लक्ष्मीबाई आंतल्या खोलींत गेल्या. मग अन्नपूर्णाबाईही आंत गेल्या. अन्नपूर्णाबाईनीं लक्ष्मीबाईला सगळी हकीकत सांगितली तेव्हां लक्ष्मीबाईनीं गोविंदरावांना विचारलें—

"आज ऑफिसांत दिनकररावांची गांठ पडली होती काय म्हणून विचारत आहेत अन्नपूर्णाबाई!"

"म्हणजे?" गोविंदराव आश्चर्यचकित होऊन म्हणाले "दिनकरराव कालपासून ऑफीसला आले नाहींत म्हणे. कालचं मला कांहीं माहीत नाहीं पण आज त्यांच्याकडचे कांहीं कागदच पाहिजे होते म्हणून मुद्दाम-च त्यांच्याकडे जावं लागलं तर ते काल न् आज दोन दिवस मुळीं आले-च नाहींत असं समजलं. रजेचीही कांहीं चिठ्ठी वगैरे आली नाहीं म्हणे. मला वाटलं, काल क्लबांतही आले नाहींत तेव्हां आजारीबिजारी अस-तील. आज क्लबांत जातांना मी चौकशी करायला येणारच होतों—आणि काल सकाळपासून दिनकररावांचा पत्ता नाहीं म्हणतां! काय विचित्र माणूस बुवा हा! घरांतही नाहीं, ऑफीसांतही नाहीं. म्हणजे हा प्राणी नाहींसा तरी झाला कुठें? हे अर्धवट वेदांती म्हणजे धड गाढवंही नव्हेत आणि धड माणसंही नव्हेत—"

लक्ष्मीबाईला देखील अन्नपूर्णाबाईच्या देखत गोविंदरावांनीं असं बोलणं बरं वाटलं नाहीं. त्या मध्येंच म्हणाल्या—

"मग कांहीं अपघातबिपघात तर झाला नाहीं ना?—"

जणूं काय लक्ष्मीबाईंनीं आपल्या मनांतलाच प्रश्न विचारला असं अन-पूर्णाबाईंना वाटलें.तसल्याही स्थितींत त्यांची चर्या किंचित् खुलल्यासारखी झाली. गोविंदराव आतां काय बोलतात याकडे त्यांचं सारं चित्त लागून राहिलं होतं. गोविंदराव अगदीं बेफिकीरपणांत म्हणाले, " छेः अपघात व्हायला काय झालं ! ते काय लहान मूल आहे की आजच मुंबईला आला आहे अपघात व्हायला ! तुम्ही हें नेहमीं लक्षांत ठेवा. मुंबईच्या माणसाला कधीं अपघात व्हायचा नाहीं. अपघातांत सांपडलेले सगळे लोक खेडवळ, ज्यांना मुंबईच्या ट्रॅफिक कंट्रोलची माहिती नाहीं किंवा मेकडासारखीं इकडे तिकडे बघत चालतां आहेत असेच असतात. त्यांतूनही समजा, अपघात झाला असता—दिनकररावांच्या बाबतीत हें शक्य आहे ,कारण स्वारीच्या डोक्यांत केव्हां कसला विचार येईल हें त्या बेटया ब्रह्मदेवालासुद्धां सांगतां यायचं नाहीं, तिथें बाकीच्यांचं काय ? तरी पण तसं असतं तर आम्हांला ताबडतोब समजलं असतं. जे. जे. हॉस्पिटल, जी. टी. हॉस्पिटल, के. ई. हॉस्पिटल सगळीकडे आमच्या ओळखी आहेत. क्लबांतच जर ते येतात तर मग आणखी काय पाहिजे ? तसं असतं तर ते आम्हांला काल रात्रींच नव्हे तर ताबडतोब फोनवर फोन आले असते. ते कांहीं नाहीं. मी उगीच पहातों आहें, दोन चार दिवसांपासून स्वारीच्या डोक्यांतील वेदांताला भलीमोठी उसळी आलेली दिसत होती. फिरलं असेल त्यांतच डोकं. मग काय घातली डोक्यांत राख ! झाला फकीर— "

" असं कुठें झालं आहे काय ? कांहीं तरीच बोलायचं " लक्ष्मीबाई मध्येंच म्हणाल्या.

" बरं–राहिलं आमचं ! फिरायला चला कशा ! जाऊन लवकर परत यायला पाहिजे. आज आमच्या क्लबांत एक ज्योतिषी येणार आहे, त्याची नुसती टर उडवायचं ठरवलं आहे सगळ्यांनीं ! मी त्याला विचारणार आहें माझं दुसरं लग्न केव्हां झालं म्हणून ?—ही जी गोष्ट झालीच नाहीं, ती अमक्यासालीं अमक्या दिवशीं आमक्या वेळीं घडून आली असं उत्तर मिळवण्यांत तर खरी मजा असते—हंः हंः—"

त्या मजेच्या कल्पनेनें गोविंदरावांनाच हसूं आवरेना.

"पुरुषांना अभद्रवाणीचं कांहीं वाटतच नाहीं."

लक्ष्मीबाईना थोडा राग आला आणि त्या कांहींशा कपाळ चढवीत तिरस्कारानेंच म्हणाल्या.

— ५ —

दुसरा दिवस गेला, तिसरा दिवसही असाच गेला. दिनकररावांचा पत्ता नाहीं. त्यावेळीं अन्नपूर्णाबाईची स्थिति काय झाली असेल हें काय वर्णन करून सांगतां येणार आहे ? या एका गोष्टीला मग किती फाटे फुटले 'दिनकरराव पळून गेले फरारी झाले, संन्यासी झाले, गोसावी झाले, अर्धवटच लेकाचा. एकानें विचारावं, ' ऑफिसांत तर कांहीं कमी जास्ती केलं नाहींना ? बाकी याच्याकडं पैशांचा व्यवहार होता कुठं म्हणा ! बरं बायकोचं आणि याचं तरी नीट जमत होतं काय ? हं वरच्या वागण्यावर जाऊं नका हं !–' एक कीं दोन ज्याच्या जें जें मनांत येईल तें तें एक गंभीरपणानं, तर एक दांत काढीत तर एक डोळे मिचकावीत बोलून टाकायचा ! बायका तर काय पुरुषाच्या वर ताण ! त्या दिवशीं बायकांच्या आणि पुरुषांच्या जिभेला हाडच नाहींसं झालं होतं. कळकळीचा मोठा आव आणून आजीबाईसारखा गंभीर चेहरा करीत बायका ज्या बोलत होत्या तें सांगावयाचं म्हटलं तर एक ग्रंथच होईल. एवढ्या मोठ्या चाळींतल्या बायका, त्यांचं बोलणं किती किती तऱ्हांनीं चाललं असेल, हें सांगून कुणाला समजणार नाहीं. अन्नपूर्णाबाईला आतां दिनकरराव निघून गेल्याच्या दुःखापेक्षां लोकांच्या या बोलण्याचंच दुःख अतिशय होऊं लागलें. कापूस पिंजावा आणि त्यांतली सरकीन् सरकी काढावी तशी अन्नपूर्णाबाईच्या मनाची स्थिति झाली.

आतां मात्र घरीं कळवून मामंजींना बोलावून घेतल्याशिवाय सोय नाहीं असं तिनं ठरविलं आणि उगीच त्यांच्या मनाला धास्ती वाटूं नये म्हणून पत्र चांगलं इत्थंभूत लिहावं असा तिनं पहिल्यानदां बेत केला; पण तिला तें लिहितांच येईना. अखेरीला तारच करून बोलावावं हें चांगलं असं तिनें ठरविलं. तार काय करायची हें तिनं मराठींत लिहून घेतलं, आणि बाबूला कडेवर घेऊन ती पोस्टांत निघाली.

साडेचार पावणे पांचाचा तो सुमार असेल. ती एक मजला उतरून खालीं आली आणि आतां दुसरा उतरणार तोंच तिथल्या तिथें थबकली. काखेंतला बाबू तिनें खालीं ठेवला. तिचे डोळे पाण्यानं भरून आले.

—६—

अन्नपूर्णाबाई दुसरा मजला उतरणार तों, दिनकररावच वर येताहेत असें तिला दिसलें. दोघांची दृष्टादृष्ट होण्याबरोबर दिनकरराव हंसले. पण त्याचें या वेळेचें तें हंसणं कसलं चमत्कारीकच होतं. तें पाहून अन्नपूर्णाबाईला समाधान झालें नाहीं. पतीच्या उल्हासयुक्त हास्यानें पत्नीचें सहजच होणारें हंसतमुख या वेळीं अन्नपूर्णाबाईचें झालें नाहीं. काय तें रूप! काय तो वेष! काय तें हंसणें! तीन दिवस अन्न नाहीं, पाणी नाहीं कीं झोंप नाहीं, अशी ती चर्या दिसत होती. डोक्याची टोपी कुठें गेली कोण जाणें, अंगावरचे कपडे, कोणीं तरी मुद्दाम मातींत घोळसावेत त्याप्रमाणें घाण झाले होते. रस्त्यावर निजणाऱ्या भिकाऱ्याप्रमाणें तोंड आणि सगळं आंग मळकट मळकट होऊन गेलं होतं; त्यांतच अन्नपूर्णाबाईकडे पाहाण्याबरोबर ही स्वारी जी होः होः करीत हंसली ती कांहीं चमत्कारिकच. धड हंसलीही नाहीं. हंसतां हंसतां मध्येंच एकदम गप्प होऊन तोंड वेडंवाकडं करीत हाताचा जो चाळा केला तो पाहून हा कोणी वेडा तर नाहीं ! असं कुणीही म्हटलें असतें. दिनकररावांचें तें रूप, तो वेष आणि तो चाळा बघून अन्नपूर्णाबाईच्या पोटांत कालवूनच आल्यासारखें झालें. त्यांचे डोळे आंसवांनीं भरून आले आणि निःशक्त झाल्यासारखें होऊन त्यांनीं बाबूला खालीं उतरला. दिनकरराव पुन्हां हंसले.

पण अशा स्थितींत एखादें दुसरें मिनिटही गेलें नसेल लागलीच अन्नपूर्णाबाईनीं बाबूला उचलून घेतला आणि त्या परत खोलींत निघाल्या. त्यांनीं एकदां मागें परतून पाहिलें. दिनकरराव येत होते.

दिनकराव आले ते कपडेबिपडे न काढतांच जमिनीवर लोळूं लागले. अन्नपूर्णाबाईनीं आंथरूण पसरून दिलें होतें. तें तसेंच बाजूला पडलें होतें- समोर चहा आणून ठेवला आणि 'हातपाय धुयाला पाणी ठेवलं आहे' असं सांगितलं. या स्वारीनें चहाची चूळ भरली, हातपाय धुवायला ठेवलेलें पाणी डाव्या हाताच्या एका

पंजाबरच ओतून टाकलें. पुसायला ठेवलेल्या टावेलानें पाण्यानें भरलेलें पंचपात्र स्वच्छ पुसून काढलं, आणि बाहेर येऊन तरटाच्या एका तुकड्यानें तोंड पुसलें. अन्नपूर्णाबाई विषण्ण मनानें हें सगळें पहात होती, पण एका शब्दानेंही ती कांहीं एक बोलली नाहीं.

जेवणाच्या वेळींही दिकनकरावांनीं असेंच कांहीं विचित्र चाळे करण्यास सुरवात केली. अगोदर आमटीच पिऊन टाकली, तूप डोक्याला चोळलें. पोळीला मधें भोंक पाडून ती कानांत अडकवली. ताटाच्या भोंवतीं भोंर, भाजीच्या चित्रावती घातल्या. भातांत पाणी ओतून तो कालवला आणि अखेरीला—

" अन्न आम्हां मातीसमान, माती आम्हां अन्नासमान " असें कांहींसे तालसुरावर म्हणत स्वारी पानावरून उठली.

पण पानावरून उठल्याबरोबर दिनकरराव अन्नपूर्णाबाईशीं असे छान बोलूं लागले कीं, त्यांना वाटलें—

" मग हें सगळं सोंगच तर ! पण असली कसली हौस ! "

लागलीच अन्नपूर्णाबाईंना समाधान वाटूं लागलें. आतांपर्यंतचा सगळा त्रास आणि सगळे कष्ट कुठच्याकुठें जाऊन त्यांचें मन प्रसन्न झालें असें दिसूं लागलें. दिनकररावांची शांत वृत्ति आणि आनंदी मन पाहून अन्नपूर्णाबाई म्हणाल्या—

" असं घरांत न सांगतां न सवरतां कुठं गेलं तर माणसाला किती काळजी लागते. कोण काय बोलतं, कोण काय बोलतं, मनांत काय कल्पना येतात न् काय नाहींत तें काय सांगून येणार आहे ? "—तें असूं द्या सध्यां, मला किती किती तरी विचारायचं आहे—तें मग विचारतें. अगोदर पोटांत चार घांस जाऊं देत—काय अवस्था झाली आहे ही ! "

" काय अवस्था झाली आहे ? भुतासारखी न् ! हः हः हः—" दिनकररावांना पुन्हां मगाची लहर आली आणि मग ते जे बडबडूं लागले न् कावूं लागले त्याला कांहीं सुमार राहिला नाहीं. त्यांच्या ओरडण्यानें शेजारचीही मंडळीं जमली. अन्नपूर्णाबाईला मग मेल्याच्या पलीकडे होऊन गेलें. पुन्हां त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

-७-

चार पांच दिवस झाले. दिनकररावांच्या त्या विचित्र वागण्याला मुळीं सुद्धां आळा पडला नाहीं. गेलेला दिवस बरा होता असं अन्नपूर्णाबाईला रोज वाटूं लागलं. वेडयाला आणखी काय शिंगं असतात ! दिनकररावांना वेडच लागलं होतं. गुरू चांगला नसला तर वेदतांच्या विचारांनीं डोकं फिरून जातं; योगासनं शिकविणारा गुरू चांगला नसला तर आणि ती साधलीं नाहींत तर कांहींच्या बाहींच होतं. प्राणावर सुद्धां बेतते, नाहींतर असे वेडे बनतात असं अन्नपूर्णाबाईनीं ऐकलं होतं आणि तेंच पुन्हां कालपरवां चाळींतल्या बायकांच्याही तोंडून ऐकलं. दिनकरराव दोनतीन दिवस नाहींसे झाले होते, त्यांनीं असेच कांहीं तरी प्रयत्न केले असतील, साधले नाहींत न् त्यांत मस्तक फिरून गेलं असं आतां अन्नपूर्णाबाईना वाटूं लागलं. दिनकररावांची क्लबांत चाललेली चेष्टा, आणि दोन प्रहरीं त्याचीच बायकांनीं चालविली नक्कल यांनीं, अन्नपूर्णाबाईला तर ‘ जगांतनं उठून जावं ’ असा वैताग आला. हा सगळा त्रास बिचारीनं सोसला पण दिनकररावांच्या खांडीगळी शिव्या आणि लोखंडासारखा हात आपल्यावर आणि बाबूवर पडूं लागला तेव्हां मात्र त्यांना तें अगदीं सहन होईनासं झालं. त्यांतल्या त्यांत याच वेळीं त्यांचा एक आतेभाऊ कशाला मुंबईला आला होता. त्याच्या देखत चाललेला हा सगळा प्रकार पाहून त्यांना शरमेनं मेल्यासारखं झालं. त्या रागांत त्या दिनकररावांना थोडं उलट बोलल्याही आणि “ चल भाऊ, मला आपली घरीं पोंचव. पुरे झाला हा वनवास न् संसार. जें तें ज्याच्या त्याच्या नशीबाचं म्हणावं न् गप्प बसावं--”

असें म्हणून बाबूला घेऊन त्या घराबाहेर निघाल्याही.

दिनकररावांनीं एक विकट हास्य केलें, आणि अन्नपूर्णाबाईचें मनगट करकचून धरून ते म्हणाले, “ कशाला जातेस घरीं ! तिथं आणखी अब्रू घालवायला ! तुला वाटलं मी वेडा आहे होय ! वेड्याचं सोंग घेऊन मला साधायचं होतं तें मी साधलं. आतां तूं राणीसारखी रहा, मी गोसाव्यासारखा राहीन—”

—( ८ )—

अन्नपूर्णाबाईंना आतां सगळं समजलं. त्या वेळीं त्या कांहीं बोलल्या नाहींत. पण दिनकररावांचा एक स्वभाव त्या मनांत समजून राहिल्या आणि वेळ प्रसंग बघून काय करायचें तें करायचें असें त्यांनीं ठरविलें. त्यांच्या भाऊला तर दिनकरराव एक विचित्रच माणूस वाटला. क्लबांत तर लोकांनीं त्यांची जी टर उडविली ती कांहीं बोलून सोय नाहीं. दिनकरराव अगदीं रडकुंडीला आले, पण त्यांना षड्रिपू जिंकावयाचे होते. लोकनिंदा सोसण्याची अत्यंत चीड आणणाऱ्या प्रसंगींही मन शांत ठेवण्याची संवय करायला म्हणून ते मुद्दाम क्लबांत जात होते. आतां तर सगळे लोक त्यांना "अरे ए पति निमित्त पति" असेंच म्हणून हाक मारीत असत.

दुसऱ्या कीं तिसऱ्याच दिवशीं कांहीं कामासाठीं प्रोफेसर साहेब मुंबईस आले होते. त्यांना क्लबांत जाण्याबरोबर गोविंदराव मोघ्यांनीं दिनकररावांचा हा पराक्रम वर्णन करून सांगितला. तेव्हां प्रोफेसर साहेबांना फार वाईट वाटलें. दिनकररावांच्या अपक्व बुद्धीची म्हणा किंवा अर्धवट मनाची म्हणा त्यांना कींव आली. ते तसेच उठून दिनकररावांच्या घरीं आले.

दिनकरराव कांहींशा सचिंत मुद्रेनें स्वस्थ बसले होते. यावेळीं त्यांच्या डोक्यांत कसला विचार चालला होता हें सांगणें कठीण आहे. प्रोफेसर साहेबांनीं दारांतूनच हाक मारली, "दिनकरराव घरीं आहेत काय ? काय कसं काय चाललं आहे ?"

प्रोफेसर साहेबांना पहातांच दिनकरराव आपल्या आसनावरून चटदिशीं उठले आणि कांहींशा आश्चर्यानें तर कांहींशा हर्षानें म्हणाले,

"म्हणजे चमत्कार म्हणायचा—या या प्रोफेसरसाहेब—आपण दोन महिन्यांच्या रजेवर गेला होताना ?—आज कांहीं काम निघालं वाटतं मुंबईस—आज आमच्या इथेंच आपण जेवायला राहिलं पाहिजे बरं कां ? हें पहा, आज एक पाहुणे जेवायला आहेत बरं कां ?—आपण येथें नसलेल्या मुदतींत एक अजब प्रत्यंतर अनुभवाला आलं प्रोफेसरसाहेब !"

"ते आतांच समजलं मला." प्रोफेसरसाहेब गंभीर मुद्रेनें आणि शांत स्वरानें म्हणाले, "तुम्ही इतके वेड्यासारखे वागाल अशी माझी

मुळींच कल्पना नव्हती. ‘ पिशाच्चयाच्या हातांत कोलीत ’ म्हणतात— अगदीं बरोबर त्याप्रमाणें तुम्ही वर्तन केलं. तुम्ही त्यांत काय अनुभव मिळवलात सांगा पाहूं ! ”

“ हो. हो. सांगतों. ” दिनकरराव आढ्यतेनें म्हणाले, “कोणी कोणाचा नव्हे. बायको, मुलगा, भाऊ, बहीण सगळे स्वार्थापुरते—”

“ होय. होय. समजलं ” प्रोफेसर मध्येंच म्हणाले “ पण त्यांत नवीन कसला अनुभव घेतलात ? चार वर्षांचं पोर सुद्धां हें सांगतो—”

“ सांगणं वेगळं आणि अनुभवानें प्रतीति घेणं वेगळं. नवरा वेडा आहे, असं समजण्याबरोबर कसलीही पतिनिष्ठ बायको त्याला तशाच असहाय्य स्थितींत सोडून माहेरीं जाण्यास तयार होते म्हणजे तिच्या स्वतः—च्याच सुखासाठीं तिला नवऱ्याची गरज आहे असं झालं नाहीं काय ! ”

“ हो झालं कीं ! हें अगदीं उघड सत्य आहे. प्रत्येक मनुष्य स्वार्थी आहे आणि स्वतःच्याच सुखासाठीं डोळ्यांत तेल घालून जपणारा आहे हें अगदीं सत्य आहे. तुम्ही लग्न केलंत तें काय बायकोवर उपकार करण्यासाठीं आणि आतांपर्यंत संसार केलांत तो बायकोच्याच सुखासाठीं असं तुम्ही म्हणतां होय ? ती तुमची सेवाचाकरी करते, तुमच्यासाठीं राबते, तुम्हांला हरतऱ्हेचं सुख देण्यास तत्पर असते, तोपर्यंतच तुम्हीही तिच्याशीं सुखासमाधानानं वागतां. तीच उद्यां आजारी पडूं दे, नाहींतर लुळीपांगळी होऊं दे. मग बघूया बरं तिच्यासाठीं तुम्ही झीज सोसता का तें ! आठ दिवसांत वैतागून माहेरीं पाठवून द्याल. परस्पर परस्परांच्या सुखासाठीं आहेत. व्यवहार आणि वेदांत यांची नेहमीं शांतपणें सांगड घालावी लागते. परमेश्वर सर्वव्यापी आहे. मनुष्याला परमेश्वरभेटीसाठीं लांब जायला नको. तो त्यांच्या हृदयांत वास करतो. सावता माळ्यानें छाती फाडून परमेश्वरदर्शन सगळ्यांना दिलं, मारुतीनं हृदयकपाट खोलून राम दाखविला. मग मनुष्याच्या हृदयांत परमेश्वर असतो हें पहाण्यासाठीं उकला पाहूं तुमची स्वतःची छाती !—”

प्रोफेसरसाहेब कितीतरी वेळ बोलत होते. ते जेव्हां उदाहरणावर उदाहरणें देऊन त्यांचा मूर्खपणा त्यांच्या गळ्यांत घालूं लागले, तेव्हां दिनकरराव

मांजरासारखे खाली मान घालून नुसते ऐकत होते. ‘ खरंच आपण कांहीं तरी वेडयासारखंच केलं !’ असें त्यांना शेवटीं शेवटीं वाटूं लागलें.

त्या दिवशीं रात्रीं प्रोफेसरसाहेब जेवायला दिनकररावांच्याच घरीं होते. निम्मीशिम्मी जेवणं झाल्यावर अन्नपूर्णाबाई दिनकररावांना उद्देशून पण प्रोफेसरसाहेबांकडे पहात त्यांनाच विचारल्यासारखें करीत म्हणाल्या—

“ मग, बायकोसाठींच पुरषांना बायका पाहिजे असतात याचं प्रत्यंतर बघण्यासाठीं मी अर्धांगवायूनं आजारी पडणार होतें ती पडूं नको ना ! ”

प्रोफेसरसाहेबांनीं हंसत हंसत दिनकररावाकडे पाहत म्हटलं—

“ काय दिनकरराव ? ”

दिनकररावांनीं हंसतमुखानें एकदां प्रोफेसरसाहेबांकडे आणि एकदां अन्नपूर्णाबाईंकडे पाहिलं मात्र!

No...
Date...

# १३—मानखटाई—

दामोदरपंत आणि राधाबाई म्हणजे एक नमुनेदार आत्मसंतुष्ट जोडपें होतें. कुटुंबांत हे पतिपत्नी व एक चार वर्षांची मुलगी एवढींच माणसें होतीं. दामोदरपंत जिल्हा कचेरींत हेड क्लार्क होते. त्यांना दरमहा ७५ रुपये पगार होता व त्यांत त्यांच्या कुटुंबाचें प्रतिष्ठितपणें पोषण होत होतें. त्यांना घरांतील अगर जवळच्या नात्यागोत्यापैकीं कोणाच्याही लग्नमुंजी अगर शिक्षण यापैकीं कोणत्याही कार्याचा भार सहन करावा लागला नसल्यामुळें व त्यांची खर्चवेंचाची बाजू अगदीं ठाकीस ठीक असल्यामुळें त्यांच्यावर कर्जवाम कांहीं नव्हतें. “उधोका देना नही और माधोका लेना नही” अशी त्यांची निरपेक्ष स्थिती होती. त्यांना स्नेहीसोबतीही फारसे कोणी असल्याचें दिसत नव्हतें. तेही ऑफिसच्या वेळेशिवाय तसाच घरोब्याच्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणीं जातांना कधींही दिसत नसत. सकाळीं नेमका अडीच कप चहा, दोन थोरले लाडू व एक लहान गोळी अशी सकाळच्या उपाहाराची नेमास नेम तयारी असे. क्वचित पाहुणा घरीं आला तर त्या मानानें एकादा दुसरा नग वाढायचा व घरांतल्या विशेष कपबशांचा उपयोग व्हावयाचा. जेवणाचा बेत नीटनेटका, स्वच्छ आणि सुग्रास असायचा. बेताचेंच पण वेळोवेळीं आलटुन पालटून अनेक चवदार पदार्थ करण्यांत राधाबाई अगदीं सुग्रण होत्या. अशा रीतीनें या सुखवस्तु कुटुंबाचें हें अडीच पानी नाटक बिनबोभाट चालत असे. अशा टापटिपीच्या संसारामुळें व त्यामुळें प्राप्त झालेल्या संग्रहामुळें राधाबाईच्या अंगावर चार ठळक दागीनें ही झळकत होते. मुलीच्याही अंगावर एक बारीकशी मरींव एकदाणी व हातांत सुंदर बारीक पण डौलदार बांगड्या होत्या. माणकाचें आणि पुष्कराजाचें एक सुंदर पिंपळपानही सणावारीं राधाबाई आपल्या मुलीच्या अंगावर घालीत.

× × × ×

दामोदरपंत ऑफिसमधून येतांना मंडईवरून तडक घरी येत. येतांना संध्याकाळकरितां लागणारी भाजी किंवा राधाबाईंनीं कचेरीस जातांना ऑर्डर दिली असेल त्याप्रमाणें ती ती वस्तु ते बिनचुक आणीत असत. त्यांच्या स्वयंपाकघराच्या आंतल्या बाजूवर एक रेखाटलेला तक्ता टांगलेला असे. त्याची सायक्लोस्टाईल प्रत सुंदर अक्षरांत त्यांनीं आपल्या कचेरींतील मशीनवर तयार करून आणली होती. त्याचीच एक नक्कल दामोदरपंताच्या बैठकीच्या खोलीच्या एका कोंपऱ्यांत त्यांच्या आराम खुर्चीच्या शेजारीं टांगलेली होती. त्यावर नेहमीं लटकत असलेला टिशू पेपर वर उचलून पाहून वाचलें असतां त्यांत खालीलप्रमाणें माहिती होती असें दिसून येईल:—

—तक्ता रोजच्या भोजनफराळांचा—

[ दामोदर गोविंद सुखात्मे ]

**सोमावार:**—सकाळ–भातभाजी, आमटी, भाकरी, कोशिंबिरी दोन, चटणी एक. संध्याकाळ–खाटीडाळ, भात अगर दशमी, उसळ वालाची. एक कोशिंबीर.

**मंगळवार:**—सकाळ—सदरहूप्रमाणें. भाजीबदलून, भाकरी ऐवजीं पोळी. डाळीचो सुकी चटणी. संध्याकाळ–खाटीडाळ, भात, थालीपीठ.

**बुधवार:**—सकाळ—भातभाजी, पंचमिसळीचें वरण, भाकरी वगैरे सदरहूप्रमाणें. संध्याकाळ—दशमी, फळभाजी, पावट्याची उसळ. आणि दूध.

**गुरुवार:**—सकाळ—फक्त मुलीकरितां नेहमीं प्रमाणें. दोघांच्याकरितां साबूदाण्याची खिचडी, दाण्यांची आमटी, तवखीराची खीर व राजगिऱ्याच्या दशम्या. संध्याकाळ—भातभाजी वगैरे नेहमींप्रमाणें. पोळी गव्हाची, यथापूर्व चटण्या कोशिंबिरी, भर्जी व देवाकरितां म्हणून विशेष असें शिरा, श्रीखंड किंवा असेंच दुसरें कांहीं तरी.

**शुक्रवार:**—सकाळ—साधारण सोमवारप्रमाणें. संध्याकाळ–देवाच्या प्रसादाकरितां अर्ध्याआण्यची काबली व खडीसाखर. तदुत्तर फराळाकरितां दशमी, दूध, पांढऱ्या हरभऱ्याची उसळ किंवा कडबोळीं.

**शनिवार:**—सकाळ—नेहमींप्रमाणें भाज्या व चटण्या कोशिंबीरी बदलून. संध्याकाळ—भात, घट्ट पिठलें व वाटाण्याची उसळ.

**रविवार:**—सकाळ—भातभाकरी नेहमीं प्रमाणें. आमटींत काजू घालावेंत. बटाट्याची सुकी भाजी किंवा रस्सा. मोसमपरत्वें दुसरी एखादी फळभाजी, घोसाळीं अगर केळ्यांची भजीं, नारळाचे मोदक किंवा दुसरें कांहींतरी तसेंच. संध्याकाळ—फोडणीचे बटाटेपोहे आणि गार पाणी.

\+ \+ \+

वरील तक्ता जरी दामोदरपंतांनीं गुप्त म्हणून ठेविला तरी त्यांच्या कांहीं थोड्याच असलेल्या पण विशेष स्नेह्यांना तो जवळजवळ पाठच होता. जेवायच्या वेळीं गप्पा मारायला म्हणून एखादेवेळीं तरी असा एखादा त्यांचा स्नेही आला म्हणजे त्याला निदान भजांची अगर भजां-सहीत मोदकांची एखादी बशी अर्पण होत असे. पाहुणा बहुधा त्यांच्याकडे महिन्यांतून एखादा दुसरा व फारच थोड्या मुदतीचा आला तर असे. बहुधा तसला पाहुणा शनिवारीं रात्रीचें गाडीनें येऊन रविवारीं संध्या-काळीं परत जात असे. पंतांचा प्रोग्राम त्याच्या नजरेला पडला होता किंवा काय हरी जाणे ! !

× × ×

पंतांना बिडीसिगारेट अगर पानतंबाखूचेंही व्यसन नव्हतें. नाट-कांना जाणें त्यांनीं मूर्खपणाच्या सदरांत काढलें होतें. पण महिन्यांतून एकदां सिनेमाला जाण्याचा त्यांचा नेम असे. त्याकरितां अगदीं पहिल्या प्रोग्रामला ते जात असत. नेमके गाडीतून ते अडीच प्यासेंजर उतरायचें, टिकिट काढावयाचें व अगदीं बहुधा नेमक्या त्याच खुर्च्यांवरून ते बसा-यचें. पंतांना व्यसन कसलें असेल ते वाचनाचें. घरीं सदासर्वदा त्यांच्या नाकावर चष्मा चढलेला असायचा व कोणतें तरी वर्तमान पत्र किंवा मासिकाचा अंक त्यांच्या समोर दिसायचाच.

घरांत जेवायला गेले तरी त्यांच्या हातांत कांहीं तरी वाचनाची वस्तू असावयाची. एखादा चांगला मजकूर त्यांत असला तर घांस चपळीत

असतांना देखील ते वाचीत असत व त्याबद्दल जेवतां जेवतां राधाबाईंशीं बोलत असत.

"जेवायचं तरी प्रथम पोटभर लक्ष लावून !" राधाबाईनीं म्हणावं. पंतांनीं जेवतां जेवतां आपल्या वाचनविषयाचें स्पष्टीकरण करावें, राधाबाईनीं हांसत हांसत त्यांच्या या गोड नादावर कौतुकानें टीका करावी, त्या आनंदांत बोलतां बोलतां पंतांनीं बबीच्या तोंडांत लाडानें छोटे छोटे घांस घालावें व अशा रीतीनें भोजेने जेवण करून एखादें वर्तमानपत्र किंवा खिशांत ठेवण्यालायक पुस्तक घेऊन पंतांनीं कचेरीचा रस्ता धरावा. जेवतांना त्यांच्या आनंदांत कधीं कधीं निराळा रस उत्पन्न झालाच तर केव्हां केव्हां बोलण्याच्या भरांत चुकून बबीच्या तोंडांस चटणीचा अगर कोशिंबिरीचा तिखट घांस घातल्यानतर तिनें गोंधळ केला असेल तेव्हांच !

× × × ×

एकदां पंत असेच भोजनास बसले होते. दैनिक नवाकाळ त्यांच्या हातांत होता. त्याच्या बाहेरच्याच पानावर स्त्रियांकरितां निघू घातलेल्या "वनिता विजय" या अभिनव मासिकाची फुलपेजाची जाहिरात होती. पत्र उघडल्याबरोबर ती जाहिरात त्यांच्या निदर्शनाला आली. त्यांना अत्यंत आनंद झाला. मराठीसारख्या सुंदर आणि प्रगल्भ भाषेंत स्त्रियांच्या करितां नांव घेण्यासारखें एखादें मासिक नसावें याबद्दल त्यांना फार वाईट वाटे. बंगाली अगर हिंदी भाषेंतलीं मनोहर मासिकें त्यांनीं पाहिलीं होतीं. त्या धर्तीवर मराठींतून उपक्रम होणें अत्यंत अवश्य आहे असें त्यांना वाटत होतें व तशी प्रेरणा कोणाला तरी होवो अशी ते परमेश्वराजवळ प्रार्थना करीत होते. आजच्या नव्याकाळानें आणलेल्या या आनंदाच्या बातमीनें त्यांना फार आनंद झाला होता. त्यांतल्यात्यांत त्याच्या संपादिका पदवीधर स्त्रियाच आहेत हें पाहून त्यांना फारच अभिमान वाटला. जाहिरात पाहिल्याबरोबर त्यांनीं पहिलें काम केलें तें हें कीं त्यांनीं तावडतोब पत्र लिहून संपादक मंडळाचें अभिनंदन केलें व रजिस्टरांत वर्गणीदार म्हणून आपल्या पत्नीचें नांव दाखल करण्यास विनंति केली. लगेच एक मनीऑर्डरीचा फॉर्मही लिहून ठेविला. राधाबाईनाही फार आनंद झाला. बबीला दूध वाढतांना तिच्या वाटींत दुधावरची सगळी

साय पडून गेली हेंही त्यांच्या ध्यानांत आलें नाहीं. अकल्पित एवढी साय मिळाल्यामुळें बबीलाही आनंद झाला होता ! !

× × × ×

नेमलेल्या दिवसाची पंत सारखी वाट पहात होते.

"आज अंक निघून पोस्टांत पडला असेल उद्यां सकाळीं खात्रीनें मिळणार, मनीऑर्डरची पावती केव्हांच आली आहे" हेंच त्यांचें जवळ जवळ राधाबाईशीं दोनतीन दिवस रोजचें बोलणें असे. पंतांच्या अदमासाप्रमाणें तो दिवस उजाडला. डाक सकाळीं लवकरच पोस्टांत येत असे. पंतांना धीर नव्हता. त्यांनीं आपली कोटटोपी चढवली व मंडईकडे जाण्यापूर्वी ते पोस्टाकडे वळले. त्यांच्या अपेक्षेप्रमाणें त्यांचा अंक आला होता. त्यांनीं तो घाईघाईनें हातांत घेतला. जलदीनें त्याचें रॅपर फाडलें व आंतल्या मजकुरावर नजर टाकली. मुखपृष्ठ मुखचित्र व एकंदर बाह्यांग पाहून त्याचें समाधान झालें. ती अभिनव वस्तु आपल्या गृहलक्ष्मीला केव्हां दाखवीन असें त्यांना होऊन गेलें होतें. मंडईत जाण्याचेंही ते विसरले. त्यांची भाजीची झोळी त्यांच्या डाव्या हातांत लटकूनच होती. रस्त्यानेंही तें अंकांतील मजकुरावरूनच दृष्टी फिरवीत होते. घरांत येतांच त्यांनीं कबूल केल्याप्रमाणें कांहीं खाऊ आणला असेल म्हणून बबी त्यांच्या कमरेला बिलगली. तिला एका हातानें उचलून घेऊन पंतांनीं सरळ स्वयंपाक घरांत प्रवेश केला.

"भाजी नाहीं आणायची झाली वाटतं कांहीं ?"

पंताच्या हातावर लटकत असलेल्या रिकाम्या झोळीकडे पाहून राधाबाई उद्गारल्या.

"स्मरणच राहिलं नाहीं बुवा त्याचं ! घरांत असली एखादी भाजी तर तीच करा आज. नाहींतर आमटी भातच खाऊं आजच्या दिवस" पंतांनीं हेडिंगें वाचावयास सुरुवात केली. राधाबाई कंबरेवर हात देऊन कौतुकानें ऐकत उभ्या होत्या. खाऊ दिसला नाहीं म्हणून बबी हिरमुसली होऊन पलीकडे मनीशीं खेळूं लागली.

"हं. हें बघितलंस, यांत कांहीं पदार्थ करण्याच्या कृती दिल्या आहेत. पदवीधर संपादिकांचें हें धोरण प्रशंसनीय आहे. यांतली ही "नानखटाई"

करून पाहूं या आपण हं ! काय काय आणायचं तें सांग लवकर व मी बाजारांतून येईपर्यंत हें प्रकरण चांगलें लक्षपूर्वक वाचून ठेव ” पंतांनीं तावडतोब “ नानखटाई ” चा तपशील वाचला. राधाबाईनीं तुपाची बरणी त्यांच्या पुढें ठेविली व “ बाकीचं सगळं आहे घरांत ” असें म्हणून अंक आपल्या हातांत घेतला. पंत चटकन बाजारांत गेले.

× × × +

आज संध्याकाळच्या फराळाला “ नानखटाई ” वांचून दुसरें कांहीं नसावयाचें असें ठरलें होतें. नानखटाईची तयारी कालपासून अगदीं ग्रंथाबरहुकुम चालली होती. सरळ देखरेखी करितां म्हणून नव्हे तरी पण पंत मधूनमधून आंत येऊन घरीं असेतोंपर्यंत पाहून जात होते. आज रविवार होता. सारा दिवस मोकळीक होती. काल रात्रींच “ नानखटाई ” तयार होऊन डब्यांत जाऊन बसली होती. बटाटे पोह्यांना आज फांटा मिळाला असून त्यांच्या जागीं “नानखटाई”ची योजना झाली होती. संध्याकाळ झाली. पंत देवदर्शनाहून आले. स्नानसंध्या करीत पाटावर बसले आणि राधाबाईनीं ताटलींत दोन चार “ नानखटाया ” आणि थोडीशी चटणी त्यांच्यापुढें आणून ठेविली.

“ कां ? अगदीं कायदेशीर झाली आहेना ?”

“ बघायची आतां खाऊन. कधीं केली नाहीं तरी माझ्या समजुतीप्रमाणं अगदीं लिहिल्याप्रमाणेंच सारं घातलं आहे त्यांत.”

बबी झोंपली होती. “ हं मग तूंही आण तुझ्याकरितां एक ताटली. आपण आज दोघेही बरोबरच फराळ करूं. ” राधाबाईचा नाइलाज झाला. “ खायचं आपण प्रथम मी खाणारच आहे नाहीं. तरी नंतर ” या त्यांच्या बोलण्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं दोघेही फराळाला बसले पंतांनीं एक थोरला तुकडा तोडून तोंडांत घातला. त्याबरोबर त्यांनीं कसेसेंच तोंड केलें.

“ ही अशी कडसर कां ग लागते ?” पंतांनीं वेडेंवांकडें तोंड करीत विचारलें.

“ कदाचित् तशीच त्या पदार्थांची चव असेल ?”

राधाबाईनीं भोळेपणानें उत्तर दिलें "कडव्या वालांची उसळ नाहीं का कडवट लागत!"

"हा पदार्थ अंमळ कडसर पण खायला स्वादिष्ट आणि खमंग असा आहे" असा दखादा टीप वजा उल्लेख चुकून आपल्या वाचनांतून राहिला आहे कीं काय हें अंक काढून त्यांनीं पुन्हां एकदां पाहिलें. आपलेकडून कांहीं चूक झाली नाहीं अशी राधाबाईनीं खातरजमा केली. पंतांची खात्री झाली. लगेच सुपारी वेलदोडा खाल्ला तरी कडवटच असलेल्या तोंडानें त्यांनीं संपादिकाबाईंचा एक पत्र खरडलें.

"वि. वि. आपल्या नव्या मासिकाच्या सर्वांग सौंदर्याबद्दल मी आपणाला धन्यवाद देतों. पण एक गोष्ट आपल्या नजरेला आणावयाची आहे ती ही कीं त्यांत दिलेल्या पदार्थांच्या कृतीबद्दल आपण विशेष लक्ष पोंहचवावें. त्या शाखेकडे एखादी सहसंपादिका स्वतंत्र ठेविल्यास उत्तम. कार्यालयांत या कृति सिद्ध करूनच त्या येथें दिल्या आहेत असें त्या संपादिकेच्या सहीनें त्याखालीं सर्टिफिकेट असणें चांगलें अशी शिफारस करण्याची परवानगी घेतों. असें सांगण्याचें विशेष कारण हें कीं आम्ही आपल्या पुस्तकांतील "नानखटाई" या पदार्थाच्या कृतीबरहुकुम तो पदार्थ आमच्या घरीं करून पाहिला. पदार्थ अगदीं काळजीपूर्वक करण्यासंबंधानें आमचें कुटुंब फार दक्ष आहे. शिवाय त्याबद्दल आम्ही स्वतःही देखरेख ठेवून खात्री करून घेतली आहे. पदार्थ खासा बनलेला पण कडवटपणा हा त्याचा गुण आहे कां दोष आहे हें समजण्यास मार्ग नाहीं. तरी जरूर तो खुलासा व्हावा व चूक असल्यास ती दुरुस्त करून वर दर्शवल्याप्रमाणें यापुढें व्यवस्था होणेंच्या सूचनेचा विचार व्हावा. परिक्षेकरितां "नानखटाई" च्या चार वड्या वेगळ्या पारसलनें पाठविल्या आहेत. उत्तराची अपेक्षा आहे. पुन्हां एकवार "वनिताविजय"चें अभिनंदन करून पत्र पुरें करितों. राग मानूं नये. कळावें–"

आपला

दामोदर गोविंद सुखात्मे.

\+ + +

योग्य वेळीं तावडतोब पंतांना त्यांच्या पत्राचें उत्तर आलें–

" वि. वि.

आपल्या पत्राबद्दल आम्ही फार आभारी आहोंत. आमच्या पुस्तकांत दिलेल्या कृति खात्रीलायक आणि अनुभवशीर अशाच असतात. आपण सुचविलेली योजना अवश्यकता वाटल्यास क्रमाक्रमानें अमलांत आणण्याचा विचार करण्यांत येईल. तत्पूर्वी आपण पाठविलेल्या पदार्थाबद्दल आम्हांस एवढेंच सुचवावयाचें आहे कीं " नानखटाई " तयार करण्यांत आपल्या गृहलक्ष्मीनें योग्य ती काळजी अगदीं सशास्त्र घेतली असली तरी तूप वाईट असल्यामुळें त्यांचा नाईलाज झालेला दिसत आहे. ही गोष्ट ढळढळीत स्पष्ट असल्यामुळें पृथक्करणाकरितां तो पदार्थ पाठविण्याचें आम्हांस कारण पडलें नाहीं. सध्यां बाजारांत " व्हिजिटेबल घी सब्स्टिटयूट " म्हणून एक पदार्थ मिळतो. त्यांतला वाईट झालेला माल चांगल्या तुपांत भेसळ करून तुपवाल्यानें आपणांस दिला असल्याचा संशय येतो. उत्तम तूप असतें तर पदार्थ खरोखरच वाखाणण्यासारखा चवदार लागला असता. आपल्या गृहलक्ष्मीची यांत कांहीं चूक नाहीं. त्यांनीं फार सावधगिरीनें व काळजीपूर्वक पदार्थ केला आहे हें स्पष्ट आहे. आपण आमच्या मासिकाकडे फार काळजीपूर्वक पाहातां याबद्दल आम्हांस फार समाधान होत आहे. या पुढेंही आपल्या गृहलक्ष्मीनें आमच्या मासिकांतील कृतीवरून कांहीं पदार्थ केल्यास आपण आमच्याकडे " नानखटाई "च्या नमून्या प्रमाणें ते ते पदार्थ अवश्य पाठवावे. त्यावर आम्ही अवश्य अभिप्राय देऊं. प्रसंगीं पृथक्करणाची जरूर वाटल्यास पुरेसें व्हावें म्हणून कोणताही पदार्थ एकशेरापेक्षां कमी पाठवूं नये. कळावें लोभ असावा हे विनंति. "

पंतांनीं हें पत्र अर्थात राधाबाईना वांचून दाखविलें नाहीं. पण हल्लीं कोणतीही वस्तु आणण्यांत ते फार चोकस असतात एवढें मात्र खरें !

ॐ तत्सत्

# भावंडांच्या भेटी

वऱ्हाडचा पाटीलः-( नाटक ) ले. महादेव नारायण जोशी, पुणें.
माळावरची मातीः—( गोष्ट ) ले. नरोत्तम. (मनोरम माला, पुणें)
नवी कुटुंबशिक्षण मालाः—( प्रकाशक-आनंद प्रेस-सातारा.

| | |
|---|---|
| निर्माल्यः—<br>मराठीची सजावटः—(भाग १ ला.)<br>गृहविहारः—(श्रीरामायण महाकाव्य.) | रचणार-श्री. कविवर्य साधुदास-सांगली. |

लग्नाचा बाजारः—( ले. सौ. शांताबाई नाशिकर, (भिडे) बी. ए.
प्रकाशकः-महिलाविजय ग्रंथमाला, मुंबई.

| | |
|---|---|
| श्रीलोकमान्य<br>चरित्रामृत-प्रथम खंड. | रचणार-कवि-<br>जयकृष्ण केशव उपाध्ये. |

भेटी पाठविणारांची माला अत्यंत आभारी आहे.

---

## महाराष्ट्र-कुटुंब-मालेच्या "त्याग" कादंबरीवरील वर्तमानपत्रांचे अभिप्राय

संग्राम ( पुणें )-महाराष्ट्र कुटुंबमालेंतील इतर ध्येयप्रवर्तक कादंबऱ्या-प्रमाणें ही कादंबरी जरी एका विशिष्ट ध्येयावर उभारली नसली तरी तड-फदार विचार, सहज स्फूर्तिजन्म सुभाषितें आणि नाविन्यपूर्ण कथानक यामुळें मालेंतील उच्च कादंबऱ्याबरोबरीचें स्थान हें ह्या कादंबरीस मिळ-णें योग्य आहे. सदोबासारखा नालायक नवरा, लक्ष्मीसारखी साध्वी पत्नी, यांचीं चित्रें कुशलतेनें रेखाटलेलीं आहेत. लक्ष्मीची सहनशीलता तिचें पावित्र्य तिचें निरपेक्ष पतिप्रेम यासर्वांमुळें ही त्यागमूर्ति वाचकांना चटका लावून सोडते. कायम ठशाच्या ठराविक चाकोरी सोडून नवीन मार्ग चोखाळण्याचा प्रयत्न अत्यंत चित्ताकर्षक वाटतो पण कथानकांतील घडण कित्येक वेळा सफाईदार न झाल्यामुळें सामान्य वाचकांचा कित्येक वेळा रसभंगही होण्यासारखा आहे; तथापि गुणांच्या आल्हादकारक आवि-ष्कारामुळें लेखक प्रशंसेस पात्र आहेत.

## आमचीं पुस्तकें

| | | रु. आ. पै |
|---|---|---|
| १ मजूर | [ ना. वि. कुलकर्णी. ] | १–०–० |
| २ कसे दिवस जातील ? | [ ,, ,, ] | १–०–० |
| ३ शिपाई | [ ,, ,, ] | १–०–० |
| ४ न्याय | [ ,, ,, ] | १–०–० |
| ५ पैसा | [ ,, ,, ] | १–०–० |
| ६ क्षमा | [ ,, ,, ] | १–०–० |
| ७ मातृसेवा | [ ,, ,, ] | १–०–० |
| ८ माईसाहेब | [ ,, ,, ] | १–०–० |
| ९ पार्थप्रतिज्ञा | [ ,, ,, ] | १–४–० |
| १० डाव जिंकला | [ ,, ,, ] | ०–१४–० |
| ११ कारकून | [ श्री. जी. टी. देसाई बी. ए. ] | १–०–० |
| १२ चिमणी | [ श्री. भा. वि. वरेरकर ] | १–०–० |
| १३ माझें बाळ तें ! | [ कु. पिरोज आनंदकर बी. ए. ] | १–०–० |
| १४ स्वाधीन संसार | [ श्री. प्र. ह. खाडिलकर ] | १–०–० |
| १५ ऋणानुबंध | [ श्री. बा. ना. पांढे ] | १–०–० |
| १६ व्यापारी | [ श्री. ग. का. गोखले ] | १–०–० |
| १७ त्याग | [ श्री. बा. श्री. पुरोहित बी. ए. ] | १–०–० |
| १८ कौटुंबिक गोष्टी | | १–०–० |
| १९ अवघीं पांच वर्षें | [ मालेचें पुढील पुस्तक ] | |

**महाराष्ट्र–कुटुंब–माला पुणें, नं. २**

# आर. एस. राऊत बुकडेपो

विद्यार्थ्यांनो !

**जर तुम्हाला जुन्या व नव्या पुस्तकांची मागणी करावयाची असेल तर आमच्या बुकडेपोला लिहा.**

आमच्या येथें सर्व प्रकारचीं जुनीं व नवीं, शाळेचीं, कॉलेजचीं, व इतर सर्व तऱ्हेचीं इंग्रजी व मराठी पुस्तकें सवलतीनें विकत मिळतात. तसेंच आम्ही जुनीं उपयुक्त पुस्तकें योग्य किंमत देऊन खरेदी करतों.

---

**बाहेरगांवीं माल व्ही. पी. नें पाठविला जातो.**
**हेड ऑफिस, १४९ कसबा पेठ,**
**शनवार वाड्याच्या गणेश दरवाज्यासमोर,**
**पुणें नं. २.**

**ब्रँचः—२४०४ इस्ट स्ट्रीट, पुणें नं. १**

## व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन ! ! !

( पत्रव्यवहार करा )

डॉ. जी. व्ही. कुलकर्णी यांचा

बाटलीची किंमत **पूना पेन बाम !** सहा आणे

डॉ. जी. व्ही. कुलकर्णी यांचें

( "जी. व्ही. के" छाप पाहून घ्या ) **एग्यू मिक्श्चर!** बाटलीची किं. बारा आणे.

उत्तम अनुभव ! उत्कृष्ट अभिप्राय ! ! पूना पेन बाम—कोणत्याही शारिरीक ठणक्यावर वस्ताद आहे ! तुमचा कितीही द्वाड मलेरियाचा ताप असो, आमचें एग्युमिक्श्चर हटकून गुण देईल.

पत्ता—डॉ जी. व्ही. कुलकर्णी, ४८ शनवार पुणें.

---

ज्ञानतेजो बलं बलम् ।

# आनंदभुवन ग्रंथमाला

## चार महत्त्वाचीं पुस्तकें

### अरविंदाचें गीतारहस्य

लेखक—श्री. भा. रा. धुरंधर, बी. ए., एलएल. बी.

ता १५ आगस्ट रोजीं प्रसिद्ध होईल.

### चीनमधील राज्यक्रांति

लेखक—श्री. का. म. ताह्मनकर, बी. ए.

### राशियन कामकऱ्यांचें राज्य

लेखक—श्री. प्र. ह. खाडिलकर

### नवें अफगाणिस्थान

लेखक—श्री. गो. बा. महाशब्दे, लवकरच अनुक्रमानें प्रसिद्ध होतील.

प्रकाशक—सहकारी ग्रंथकार, चौधरी हाऊस, गिरगांव, मुंबई ४.

# आमचीं नवीन प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें.

## १ गाणीं व संवाद.

सं. भि. वि. महाजन. किं. ५ आणे. या पुस्तकांत निवडक संवाद व गाणीं एकत्र केलेलीं असल्यामुळें पुस्तक अतिशय उत्तम झालें आहे. बक्षीससमारंभ व इतर समारंभ वगैरेच्या वेळीं या पुस्तकाचा उत्तम उपयोग होईल. केसरी, ज्ञानप्रकाश व वऱ्हाड-शाळा-पत्रक महाराष्ट्र वगैरे वर्तमानपत्राचे अतिशय उत्तम अभिप्राय आहेत.

## मुलांचा मार्गदर्शक.

ले. गं. रा. साने बी. ए., किं. १० आणे. या पुस्तकांत विद्यार्थ्यांनीं आपल्या पुढील आयुष्यांत आपले आयुष्य नीट तऱ्हेनें घालवावें म्हणून आईबाप, बंधु, बहीण, देश, गांव वगैरेबद्दल योग्य कर्तव्यें व त्यावरील त्यासंबंधीं पौराणिक व इतिहासांतील उदाहरणें देऊन पुस्तकाची रचना उत्तम केली आहे. केसरी, ज्ञानप्रकाश, वऱ्हाड-शाळा-पत्रक महाराष्ट्र वगैरे वर्तमानपत्रांचे उत्तम अभिप्राय आहेत.

## पुढील थोर लोकांचीं चरित्रें.

| | | |
|---|---|---|
| १ संत तुकाराम—ल. ना. जोशी | | ०४. |
| २ संत एकनाथ— ,, ,, | | ०४. |
| ३ संत ज्ञानराज— ,, ,, | | ०४. |
| ४ बेंजामिन फ्रांकलिन—पां. स. साने | | ०४. |
| ५ शिशिर कुमार घोष— ,, ,, | | ०४. |
| ६ नामदार गोखले—भा. श्री. कुळकर्णी | | ०४. |
| ७ स्वामी विवेकानंद— ,, ,, | | ०४. |
| ८ बंकिमचंद्र— ,, ,, | | ०४. |

हीं चरित्रें मुलांमुलींच्या करितां मुद्दाम लिहिलेलीं असून त्यांचें पुढील आयुष्य अत्यंत चांगलें व्हावें या हेतुनें हीं पुस्तकें फारच उपयुक्त व चांगलीं झाली आहेत. वर्तमानपत्रांचें अभिप्राय फारच चांगले आहेत.

ए. पी. बापट अँड ब्रदर्स.

बुकसेलर्स बुधवार पेठ पुणें शहर.

व्यापारी व मास्तर यांस भरपूर कमिशन. क्याटलाग मागवा.

# रविकिरणमण्डळाचीं पुस्तकें

१ किरण ( गद्यपद्य, मण्डळ ) ०४
२ काव्यविचार ( काव्यविषयक निबन्ध, मण्डळ ) १
३ उषा ( पद्य, मण्डळ ) ०१२
४ मधुमाधव ( पद्य, घाटे–माधव जूलियन् ) ०१२
५ शलाका ( गद्यपद्य, मण्डळ ) १
६ विरहतरङ्ग ( खण्डकाव्य, माधव जूलियन् ) ०८
७ कला ( खण्डकाव्य, गिरीश ) ०६
८ नाट्यरूप महाराष्ट्र ( ऐतिहासिक प्रवेश, विठ्ठलराव घाटे ) १
९ छन्दोरचना ( मराठी वृत्तशास्त्र, प्रो. मा. त्रि. पटवर्धन ) २
१० प्रभा ( गद्यपद्य, मण्डळ ) ०८
११ सुधारक ( खण्डकाव्य, माधव जूलियन् ) १०८
१२ आम्रराई ( खण्डकाव्य, गिरीश ) १
१३ यशोधन ( पद्य, यशवन्त ) १०८

## मण्डळाच्या सदस्यांचीं इतर पुस्तकें

विष्णु कृष्ण चिपळूणकर } ( ग. त्र्यं. माडखोलकर ) ०१०
अधुनिक कविपन्चक } ( ग. त्र्यं. माडखोलकर ) १०४
विलापिका } ( ग. त्र्यं. माडखोलकर ) ०१२
फार्शी मराठी कोश ( प्रो. मा. त्रि. पटवर्धन ) ४
दत्तांची कविता ( सम्पादक–विठ्ठलराव घाटे ) १००
काळाच्या दाढेंतून ( श्रीधर रानडे ) ०४
यशवन्ती [ यशवन्त ) ०१०
मित्रप्रेमरहस्य [ यशवन्त ) ०४
अभागी कमल ( गिरीश ) ०१२

सर्व पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः–(१) रविकिरणमण्डळ, ४६१ शनिवार पुणें शहर.

(२) परचुरे, पुराणी आणि मण्डळी, माधवबाग मुम्बई.

मेंदूचे विकार व डोकें दुखणें यांवर

नकलेबद्दल ) **ब्राह्मी तेल** ( सावध रहावें

मानसिक श्रमांचीं कामें करणारे, विद्यार्थी, वकील, वैद्य, डॉक्टर, न्यायाधीश व गिरणिकामगार, त्याप्रमाणेंच जागरणाचीं कामें करणारे, नाटकी, सर्कसवाले, तारमास्तर, स्टेशनमास्तर वगैरे लोकांस हें तेल वापरण्यास अत्यंत उपयोगी आहे. बाटली किं. आकारानुसार अनुक्रमें १॥२, ॥१०, ॥६

**बाळ-बाळंतिणीकरितां औषधें**

बाळंतकाढा नं. १-पहिल्या दहा दिवसांत घेण्याचा किं ॥१४.

बाळंतकाढा नं. २-दहा दिवसानंतर घेण्याचा. किं ॥१४.

बाळकडू-मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य. किं. ॥८.

कुमारिआसव-मुलांकरितां. बा. किं. ॥१२.

सतत २५ वर्षे लोकादरास पात्र झालेलें कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक

एक रत्तल १॥१०<br>दीड रत्तल २॥४ ) **द्राक्षासव** ( अर्धा रत्तल ॥१४<br>ट. ख. पॅ. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आंसवें, अरिष्टें, भस्में वगैरे, ५०० वर औषधें तयार असतात. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतीमान भरून पाठविण्याकरितां 'रुग्णपत्रिका' हीं सात आण्याचीं तिकीटें आलीं असतां पाठवूं.

ब्राह्मी तेलाचे व टिकाऊ तयार काढयांचे मूळ<br>कल्पक व शोधक,

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स, आयौषधी कारखाना चेंबूर, जि. ठाणें<br>दुकान-दवाखाना, ठाकुरद्वार मुंबई नं. २.

श्री. प्रभाकर हरी खाडिलकर

यांचें नवें पुस्तक

# रशियांतील कामकऱ्यांचें राज्य

अर्थात्

# आजकालचा रशिया

## लौकरच प्रसिद्ध होईल.

प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें

रमाबाई रानडे यांचें चरित्र
पानें १५० चित्रें ४ किं. १

स्वाधीन संसार ( महाराष्ट्र-कुटुंब-मालेंतून निघालेली कादंबरी पानें १५० किं. १ रु.

आमचा चौपाटी क्लब

चर्चात्मक संवाद किं. ४ आ.

टपाल हंशील निराळें. तीनही पुस्तकें एकदम मागविणारास ट. हं. माफ. मागविण्याचा पत्ता.

श्री. फणसाळकर C/o नवाकाळ मुंबई ४.

---

दमेकऱ्यांना दैवी देणगी

खाडिलकरांचा

तत्काळ गुणकारी } **दमाधूप** { किंमत डब्यास १॥ रु. ट. हं. निराळें

( १ ) माधव एजन्सी, मुंबई, ( २ ) श्री दत्तएजन्सी पुणें ( ३ ) जोग ब्रदर्स धारवाड वगैरे ठिकाणीं मिळतो.

मागविण्याचा पत्ता-म्यानेजर, शास्त्रोक्त औषधालय,
सांगली ( S. M. C. )

हिंवताप, सांधीचा ताप, वगैरे कोणत्याही

# तापांवर प रामबाण

# प सा र

# अल्पमोली र मिक्श्चर

कारखाना:—

पसार फार्मसी:—सदाशिव पेठ, पुणें नं. २

माकडछाप काळी टुथपावडर

सर्वत्र मिळते.

भयंकर धोक्याची सूचना

एक वेळ खालील मजकूर
वाचा व कामें देऊन
नंतर अनुभव घ्या

पुण्यांत
फक्त
एकच
स्टुडिओ.

## रात्रीचे व दिवसांचे विजेच्या प्रकाशांत फोटो काढण्याचा फक्त

# एकच स्टुडिओ

## एस्. जी. नाईक आणि कंपनी

आर्टिस्ट आणि फोटोग्राफर्स

लक्ष्मी रोड

स्पेशल आर्टिस्टची योजना
बाहेर गांवीं फोटो घेण्यासाठीं

पुणें सिटी

फोटो काढणें व
एनलार्जमेंट करून
देणेचे दर फारच
माफक

· रात्रींचे फोटो
काढणें असल्यास
स्पेशल
व्यवस्था केली जाते
अगोदर सूचना पाहिजे.

बरीच वर्षे अनुभवलेले
आर्टिस्ट यांची योजना
एनलार्जमेंट खात्याकडे
स्पेशल ठेविली आहे

डोहाळ-तुलीला कोणते डोहाळ-जेवण आवडेल ?

गर्भारपणी डॉक्टरकडे जावें काय ?

बाळंतपणांत औषध व पथ्यपाणी कोणतें संभाळावें ?

बारशाचा थाट करावा कीं नाहीं ?

बाळाला कोणता खाऊ द्यावा ? आणि त्याला खेळवावें कसें ?

बाळामुळें कांहीं खर्च येतो काय ?

बाळाला अन्न केव्हां घालावें ? आणि अंगावरचें कसें तोडावें ?

# डोहाळ-जेवणाची

किं० ०८ } **देणगी** { ट. ०१

ह्या पुस्तकांत ह्या सर्व गोष्टींची माहिती देऊन सामाजिक,
धार्मिक आणि वैद्यकीय बाबतींत सुधारणा आणि
काटकसर सुचविली आहे.

किं० ०५ ) **हरवलेली आंगठी.** ( ट. ०॥

शाकुंतलाची मुलांस वाचण्याजोगी सचित्र गोष्ट.


किं० ०४ } **स्मरणशक्ति** { ट० ०॥

व ती कशी वाढवावी.

तिकिटें पाठवून मागणी करा. व्ही. पी. नें ०४ अधिक पडतात.

रा. स. जोशी, B. A. हेडमास्तर ट्रेनिंगस्कूल, सातारा.

# बाजाच्या पेट्या पॅरीस कॅझरील




कलकत्ता, अमृतसर, मुंबई
वगैरे सर्व
फोनोग्राफ कंम्प्लीट
इंग्लीश मेक

कर्ण्याचे, बिनकर्ण्याचे, पोर्टेबल ( हॅंडबॅग ) वगैरे सर्व तऱ्हेचे, व त्यांचे सुटे भाग, तसेंच प्लेट्स, पिन्स्, ऑल्बमस्, इंग्लीशमेक पितळी, फ्ल्यूटस्, शिवण्याचीं यंत्रें वगैरे माल खात्रीचा व स्वस्त मिळेल.

व्ही. एन. आणि कंपनी इंपोर्टर्स
आप्पाबळवंत चौक, शनवार, पुणें. नं. २

---

सरकारी ऑफीसें व स्थानिक संस्था यांस नेहमीं लागणारे
पितळी व रबरी शिक्के, शिपायांचे पट्टे, बिल्ले वगैरे
उत्तम व माफक दरानें करून मिळण्याचें ठिकाण:—

# महाराष्ट्र पेंटिंग वर्क्स

पेन्टर्स, रबर स्टॅंप मेकर्स, एनग्रेव्हर्स, अॅंड स्टेशनर्स,
अप्पाबळवंत चौक, पुणें शहर.

बालवीरांचीं पथक निशाणें ( Troop Flags ) उत्तम
कापडावर करून मिळतील.

वि. खु. पत्रद्वारें.

# डॉ. बैलूर यांचीं औषधें.

## हिंवज्वर गोळ्या,

## अजीर्णनाशक चूर्ण,

## बालग्रह ( अकडी ) चूर्ण.

इतर औषधांबद्दल क्याटलॉग मागवा.

कफ-सायरप विशेष सूचना:—इन्फ्ल्युएंझा, ताप, डांग्या खोकला, डबा वगैरेवर लहान मुलांस अगर मोठ्या मनुष्यांकरितां देतां येतें.

पत्ता:—डॉ. हरी महादेव बैलूर,
दवाखाना, बेळगांव.

२ रु. वर औषधें घेणारांस १२ टक्के कमिशन.

व्यापाऱ्यांस विशेष सवलत.

पुणें येथील एजंट:—महादेव आणि कंपनी, बुधवार पेठ.

आयुर्वेदिक संमेलनांकडून सुवर्ण पदकें मिळविलेल

---

वैद्यालंकृति श्री. रंगूबाई रानडे, यांचा

# महाराष्ट्र औषधी कारखाना

## बेळगांव.

या कारखान्यांत सर्व प्रकारचीं भस्में, मात्रा, रस, गुटिका, कुपित्व रसायनें, चूर्णें, मलमें, आसवें, नारायण तेल, लाक्षादि तेल, अ शिशीवर एकाच दिवसांत इटकून गुण देणारें भृंगराज तेल वगै तेलें, हीं औषधें आयुर्वेदिक पद्धतीचीं, शास्त्रोक्त व पूर्ण खात्रीनं योग्य भावानें विकत मिळतात. दोन आण्यांचीं तिकीटें पाठवु संपूर्ण माहितीचा क्याटलाग मागवा. औषधें व्ही. पी.नें पाठवि जातील. नागपूर एजन्ट–

रामराव पेहेलवान

श्री. राजे लक्ष्मणराव भोंसले यांचा

वाडा–नागपूर.

---

टीप—आमचे कारखान्यांतील श्री० माधवराव घारे यांस बरोबर औषधी देऊन फिरतीवर पाठविलें आहे.